# Journal of Research and Development

## *A Multidisciplinary International Level*

*Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access Journal*

*ISSN: 2230-9578 August - 2025 Volume-17 Issue-8(I)*



Mob: +91-9552416001 Website: https://jrdrvb.org Chief Editor: Prof. Ramesh V. Bhole

# MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL JOURNAL

Website: https://jrdrvb.org



ISSN: 2230-9578
August-2025
Volume-17 Issue-8(I)

Please Get in Touch
Email: jrdrvb.org@gmail.com
Mob: +91-9552416001,+91- 8888454089

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I) | August - 2025

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Double Blind Peer Reviewed Refereed International Research Journal*

**Volume No-17, Issue-8(I), August-2025**
Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

CHIEF EDITOR
**Dr. Ramesh V. Bhole**
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

***Disclaimer***

*The Editors shall not be held responsible for the originality or the views and opinions expressed in the papers. The author(s) alone shall bear full responsibility for the originality of their work and the ideas expressed therein.*
***© All rights reserved with the Editors.***

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

# JOURNAL PARTICULARS

| Name of Journal | JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT |
|---|---|
| **Frequency** | Monthly : Jan to Dec (12 issues per year) |
| **ISSN** | 2230-9578 |
| **Publisher** | Dr. Ramesh V. Bhole |
| **Chief Editor** | Dr. Ramesh V. Bhole |
| **Copy right** | Journal of Research and Development |
| **Starting Year** | January 2010 |
| **Subject** | Multi-Disciplinary |
| **Review Process** | Double Blind Peer |
| **Language** | English, Hindi, Marathi, and other Indian Constitutional Languages. |
| **Publication Format** | Print |
| **Access** | OPEN ACCESS |
| **License** | Creative Commons (CC BY-NC-SA 4.0) |
| **Phone No.** | +91 93256 65856, +91-8888454089 |
| **Email** | jrdrvb.org@gmail.com |
| **Journal Website** | https://jrdrvb.org |
| **Registered office Address** | 'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon, Maharashtra, India |
| **Admin. Office Address** | 'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon , Maharashtra, India |
| **Printing** | **Amitsons Digital Copiers** 106 and 110, Paras Chambers 1st Floor, Near Laxmi Narayan Theatre, Above Bank Of India, Swargate-411042 |

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

# JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT

*A Multidisciplinary International Double Blind Peer Reviewed Refereed International Research Journal*

Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

## CHIEF EDITOR

**Dr. Ramesh V. Bhole**
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

## ASSOCIATE EDITORS

**Prof. (Dr.) Madan Mohan Goel**
Vice-Chancellor (Former)
Rajiv Gandhi National Institute of Youth Development, Govt. of India
Starex University, Gurugram, Haryana, India

**Dr. Praveen G. Saptarshi**
Visiting Faculty
Salisbury University, United States

## MANAGING EDITOR

**Dr. Santosh P. Mane**
Assistant Professor,
Head Department of Geography,
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org


## EDITORIAL BOARD


| | | |
|---|---|---|
| **BABALOLA, Ayodele Samuel**<br>Department of Pure and Applied Zoology, Federal University of Agriculture, PMB 2240, Abeokuta, Ogun State, Nigerian | **Dr. Lal Mervin Dharmasiri**<br>Senior Professor and Chair Head of Geography<br>University of Kelaniya, Sri Lanka. | **Vijayanand Selvaraj**<br>Data Strategist and Artificial Intelligence Lead<br>Information Technology (IT), Houston,Texas, USA |
| **Dr. Munther Moh'd Ibrahim Zyoud**<br>Assistant Professor of English Language Teaching Methods-Al-Quds Open University, Palestine. | **Prof. A.G. Amarasinghe**<br>Senior Lecturer Grade<br>University of Kelaniya, Sri Lanka. | **Dr. Gyanaranjan Sahoo**<br>Extension Scientist<br>Orissa University of Agriculture & Technology, Orissa India |
| **Dr. RVS Praveen**<br>Director<br>Digital Engineering and Assurance, USA | **Dr. Ranjan Kalita**<br>Principal<br>Rangapara College, Amaribari, Rangapara, (Autonomous) Assam | **Dr. S. C. Advitot**<br>Principal<br>CBK's B. Sci, R.V. Com. & R. J. Arts College, Akkalkot |
| **Dr. Kulkarni Swanand Gajanan**<br>Associate Professor,<br>Mechanical Engineering Department, S.K.N. Sinhgad College of Engineering,Korti, Pandharpur- | **Dr. Anurag Shrivastava**<br>Professor & Post Doctoral,<br>Lincoln University College (LUC) Petaling Jaya, Malaysia, Malyasia | **Prof. (Dr.) F. M. Nadaf**<br>Principal,<br>Government College Borda Margao Goa (Autonomous), India |
| **Dr. Tushti Sharma**<br>Royal School of Languages,<br>The Assam Royal Global University, Guwahati, Assam | **Dr. Sandeep Rout**<br>Faculty of Agriculture,<br>Sri Sri University, Cuttack, Odisha | **Dr. Daneshwar. R. Pandey**<br>Assistant Professor,<br>Head Of Department<br>S.S Agrawal College Of Commerce And Management Navsari Gujarat |



**PUBLISHER**

**Dr. Ramesh V. Bhole**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon

Email: jrdrvb.org@gmail.com Journal Website: https://jrdrvb.org

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025


| Sr. No. | CONTENTS | Page No. |
|---|---|---|
| 1 | सोशल मीडिया पत्रकारिता: पारंपरिक पत्रकारितेवरील प्रभाव आणि समाजातील बदल<br>**डॉ.नानासाहेब शामराव यादव** | 1-6 |
| 2 | शास्त्रीय संगीत में वर्षाऋतू के राग<br>**डॉ. सुनील पारीसे** | 7-9 |
| 3 | भारतातील स्त्री उद्योजकता: संधी आणि आव्हाने<br>**डॉ.राजेश एस. डोंगरे** | 10-13 |
| 4 | ऐतिहासिक दृष्टिकोनातून समाजशास्त्र आणि शाश्वत विकास: एक अभ्यास<br>**विजय भगवान गुजर** | 14-18 |
| 5 | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची ग्रामीण भागातील सार्वजनिक वाहतुकीमध्ये महत्त्वाची भूमिका<br>**सचिन गजानन बोढाले , डॉ. माधुरी के. तानुरकर** | 19-22 |
| 6 | ग्रंथालय व्यवस्थापन प्रणाली मध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेची (AI) भूमिका<br>**भारती बेदील माने** | 23-26 |
| 7 | भारतातील पायाभूत सुविधा : एक दृष्टिक्षेप<br>**डॉ. बी.डी.इंगवले** | 27-31 |
| 8 | शाश्वत ग्रामीण विकास आणि शहरीकरण : एक अभ्यास<br>**डॉ. देविदास ग्यानुजी नरवाडे** | 32-35 |
| 9 | AI आणि सामाजिक शास्त्र: संधी आणि आव्हाने<br>**डॉ.मारोती जनार्दन कंधारे** | 36-42 |
| 10 | वैश्वीकरण का सांस्कृतिक धरोहरों पर प्रभाव<br>**डॉ. कमलाकर देवरावजी नवघरे** | 43-46 |
| 11 | "पर्यटन नियोजन एक भौगोलिक अभ्यास"<br>**डॉ.गौतम नागनाथ येडे** | 47-50 |
| 12 | डॉ. ब्रजलाल वर्मा के साहित्य में अभिव्यक्त ग्रामीण जीवन<br>**सोनू कुमार यादव, राजेश कुमार तिवारी** | 51-54 |
| 13 | "भारतातील स्त्री सक्षमीकरणाचा ऐतिहासिक प्रवास"एक चिकित्सक अभ्यास<br>**डॉ भुवनेश्वरी मिताराम वाघाये** | 55-58 |
| 14 | चार्वाक साहित्यातील शाश्वतेला चालना देणारे वास्तव<br>**डॉ. गोरोबा तुकाराम खुरपे** | 59-63 |
| 15 | पर्यावरण संरक्षण<br>**डॉ. बिरनाळे डी.एस** | 64-70 |
| 16 | भारतीय राज्यघटनेतील सामाजिक स्वरूपाच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी<br>**धनाजी नारायण कठरे** | 71-74 |
| 17 | अण्णाभाऊ साठे यांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय योगदान<br>**रोशन एस. भोवते** | 75-77 |
| 18 | कृत्रिम बुद्धिमत्ता (ए. आय.) आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम<br>**धनराज विष्णू आवळे** | 78-82 |

| | | |
|---|---|---|
| 19 | आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि ज्ञानाचे जागतिकीकरण<br>**डॉ.सविता सुनील केंजळे** | 83-85 |
| 20 | जलसाधन संपत्ती आणि जलव्यवस्थापन- एक अभ्यास<br>**सुदाम नानासो खाडे** | 86-90 |
| 21 | व्यवसाय धोरण प्रक्रियेवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव<br>**पठाण एस एच.स** | 91-100 |
| 22 | भक्ती चळवळ आणि माइंडफुलनेस<br>**सूरज संजय पडळकर** | 101-104 |
| 23 | महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे आर्थिक,सामाजिकव राजकीय कार्य.<br>**डॉ.मारोती जनार्दन कंधारे, विरेंद्र विश्वास आहेर** | 105-109 |
| 24 | महिला विकासाची सामाजिक परिस्थिती, धोरणे व आव्हाने<br>**डॉ.गणेश मनोहर लिंबोळे** | 110-113 |
| 25 | आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि शांतता प्रस्थापना<br>**अमोल गोवर्धन भोसकर** | 114-118 |
| 26 | उपयोजित शेतीचे ग्रामीण विकासातील महत्त्व<br>**स्वप्नील सारंगधर फोकमारे, डॉ.जे.डी.पोरे** | 119-122 |
| 27 | नाशिक जिल्ह्यातील आदिवासी कोकणा बोलीतील म्हणी : एक अन्वयार्थ<br>**सुभाष नारायण कामडी, धनराज तोताराम धनगर** | 123-128 |
| 28 | गुजर समाज व संस्कृती<br>**तुषार पाटील , डॉ. धनराज धनगर** | 129-133 |
| 29 | आदिवासी कला आणि सांस्कृतिक शाश्वतता<br>**डॉ. माहेश्वरी वीरसिंग गावित** | 134-143 |
| 30 | शिक्षा और नवाचार डिजीटल युग में शिक्षा के बदलते आयाम<br>**डॉ. सुनंदा सूर्यभानू वाघमारे** | 144-146 |
| 31 | वैश्वीकरण, विविधता आणि सांस्कृतिक बदल: एक ऐतिहासिक अभ्यास<br>**राजेंद्र मारुती घार्गे** | 147-152 |
| 32 | वीरेन्द्र आस्तिक के नवगीतों में कलात्मक सौंदर्य<br>**विपिन चन्द्र पाण्डेय, डॉ. रीता पाण्डेय** | 153-154 |
| 33 | भारतातील शाश्वत विकासासाठीच्या योजना : एक अभ्यास<br>**डॉ. रमेश सदाशिव वाघमारे** | 155-157 |
| 34 | न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे: एक द्रष्टा समाजसुधारक, आधुनिक भारताचे शिल्पकार आणि मराठा इतिहासाचे भाष्यकार<br>**अमित प्रकाश निकम, डॉ. रमेश धनराज जाधव** | 158-162 |
| 35 | डिजिटल परिवर्तन और समाज साइबर सुरक्षा और डेटा गोपनीयता के नए आयाम<br>**डॉ. क्षितिज यादवराव धुमाळ** | 163-165 |
| 36 | भूमंडलीकरण और दलित शोषितों की संवेदना की अभिव्यक्ति : एक चिंतन<br>**प्रा.बाबासाहेब तुकाराम साबळे** | 166-171 |
| 37 | नाशिक जिल्ह्यातील महादेव कोळी यांच्या उपजीविकेच्या मार्गात झालेल्या बदलांचा समाजशास्त्रीय अभ्यास | 172-177 |

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

| | | | |
|---|---|---|---|
| | | दत्तात्रय विठ्ठल गांगोडे | |

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# सोशल मीडिया पत्रकारिता: पारंपरिक पत्रकारितेवरील प्रभाव आणि समाजातील बदल

**डॉ.नानासाहेब शामराव यादव**
द.ग.तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय,तळा ता.तळा
**Email-**dr.nanasahebyadav@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170801
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 8(I)
Pp. 1-6
August 2025

**Submitted:** 10 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**सारांश :**

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया पत्रकारितेचे स्वरूप आणि व्याप्ती मोठ्या प्रमाणात बदलली आहे. बातमी संकलन, तयार करणे व सादरीकरणाची पारंपरिक प्रक्रिया आता अधिक व्यापक, वेगवान आणि संवादात्मक झाली आहे. या संशोधन निबंधात सोशल मीडिया पत्रकारितेची संकल्पना, तिचे फायदे-तोटे, नागरिक पत्रकारितेचा उदय, वेब पत्रकारिता 2.0 चे योगदान, तसेच विविध अभ्यासांचे व समीक्षकांची मते यांची देण्यात आली आहेत. यामधून अधोरेखित होते की सोशल मीडिया ही केवळ माहिती शेअर करण्याचे माध्यम नसून, लोकशाहीला चालना देणारा प्रभावी घटकही आहे. बातमी किंवा माहिती गोळा करणे, संस्कार करणे, तयार करणे आणि सादर करणे या पत्रकारितेच्या पारंपरिक प्रक्रियांना मीडिया आणि इंटरनेटने एक नवीन दिशा दिली आहे. आज पत्रकारिता ही केवळ वृत्तपत्रांपुरती किंवा टीव्ही वृत्तवाहिन्यांपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती अधिक खुली, संवादात्मक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित झाली आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स जसे की Twitter, Facebook, Instagram, तसेच ब्लॉग्स आणि यू-ट्यूबसारखी माध्यमे पत्रकारितेच्या नव्या वाटा खुल्या करत आहेत.

**मुख्यशब्द :** सोशल मीडिया, पत्रकारिता, डिजिटल युग, नागरिक पत्रकारिता, वेब पत्रकारिता 2.0, पारंपरिक माध्यमे, लोकशाही, संवाद, विश्वसनीयता.

**प्रास्ताविक :**

पत्रकारिता ही माहिती देणारी, लोकशिक्षण करणारी आणि जनतेच्या भावना मांडणारी एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. यापूर्वी ही प्रक्रिया मुख्यतः वृत्तपत्र, टीव्ही आणि रेडिओपुरती मर्यादित होती. मात्र, तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आणि सोशल मीडियाच्या उदयामुळे पत्रकारितेचे स्वरूप पूर्णतः बदलले आहे. आता प्रत्येक व्यक्ती स्वतःच "नागरिक पत्रकार" बनू शकतो. **सोशल मीडिया** म्हणजे इंटरनेटच्या माध्यमातून तयार केलेले असे डिजिटल प्लॅटफॉर्म्स, ज्यावरून वापरकर्ते एकमेकांशी संवाद साधू शकतात, माहिती शेअर करू शकतात, विचारांची देवाण-घेवाण करू शकतात आणि मल्टिमीडिया (फोटो, व्हिडिओ, ऑडिओ) सामग्री प्रसारित करू शकतात.उदा. Facebook, Instagram, WhatsApp, Twitter (X), YouTube इ. सोशल मीडिया ही आधुनिक डिजिटल युगातील एक प्रभावशाली संकल्पना आहे. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जगभरातील लोक एका क्लिकवर जोडले जाऊ शकतात. १९७० च्या दशकात ई-मेल व चॅटिंग प्रोग्राम्सपासून सुरुवात होऊन USENET, BBS, आणि नंतर Classmates.com, SixDegrees.com या साइट्समुळे सोशल मीडिया वाढत आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ.नानासाहेब शामराव यादव, द.ग.तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय,तळा ता.तळा*

**How to cite this article:**
*यादव, . नानासाहेब . शामराव . (2025). सोशल मीडिया पत्रकारिता: पारंपरिक पत्रकारितेवरील प्रभाव आणि समाजातील बदल. Journal of Research & Development, 17(8(I)), 1–6.*
https://doi.org/10.5281/zenodo.17112901

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17112901
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

आज सोशल मीडिया केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता, शिक्षण, राजकारण, व्यवसाय, जाहिरात, पत्रकारिता आणि समाजसेवा या सर्वच क्षेत्रांमध्ये आपले स्थान निर्माण करत आहे. सोशल मीडिया पत्रकारिता ही बातमी आणि माहिती गोळा करणे, तयार करणे, प्रसारित करणे आणि विकसित करण्याची एक आधुनिक व तांत्रिक पद्धत आहे. या प्रकारात पारंपरिक पत्रकारितेपेक्षा सोशल मीडियाचा वापर अधिक प्रभावी आणि केंद्रस्थानी असतो.सोशल मीडिया हे माध्यम जलद, सहज आणि प्रतिसादक्षम असले तरी अनेकदा ते वस्तुनिष्ठतेपेक्षा जनमतावर आधारित असते.त्यामुळे त्यातील माहितीची अचूकता आणि विश्वासार्हता तपासणे आवश्यक ठरते.या पत्रकारितेमध्ये वेब-आधारित ॲप्लिकेशन्स, डिजिटल तंत्रज्ञान आणि विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स (जसे की ट्विटर, इंस्टाग्राम, फेसबुक इत्यादी) यांचा वापर केला जातो. या माध्यमांचा वापर केवळ व्यावसायिक पत्रकार किंवा मीडिया हाऊसच नव्हे, तर सामान्य नागरिक, बेरोजगार लेखक, अव्यावसायिक ब्लॉगरसुद्धा करतात. ते वेगवेगळया विषयांवर माहिती तयार करून ती ऑनलाइन शेअर करतात. सोशल मीडिया पत्रकारिता ही एका अर्थाने ऑनलाइन पत्रकारितेच्या जवळची वाटचाल करणारी प्रक्रिया आहे. ऑनलाइन पत्रकारितेमध्ये पारंपरिक मीडिया संस्थांचे व्यावसायिक पत्रकार पूर्णवेळ अथवा अर्धवेळ काम करतात. उदाहरणार्थ, *न्यूयॉर्क टाइम्स, द इकॉनॉमिक्स* यांसारख्या प्रतिष्ठित वृत्तसंस्थांच्या संकेतस्थळांवर मोठ्या बातम्या प्रकाशित होतात.तथापि, सोशल मीडिया पत्रकारिता आणि ऑनलाइन पत्रकारिता यामध्ये व्यावसायिकता, अचूकता आणि कार्यपद्धतीच्या दृष्टीने मोठा फरक असतो. सोशल मीडिया पत्रकारितेमध्ये फेसबुक, यूट्यूब, स्नॅपचॅट, लिंक्डइन, ट्विटरसारखे प्लॅटफॉर्म तसेच ऑनलाइन मंच आणि सर्च इंजिन्स (उदा. गुगल, याहू, बायडू) यांचा समावेश होतो.या माध्यमांचा उपयोग जगभरातील सर्वसामान्य लोकही करतात.ते पत्रकार नसले, तरीही आपली मते, भावना, विचार आणि अनुभव पोस्ट्स, कमेंट्स, लाईक्स आणि शेअर्सद्वारे मांडतात. त्यामुळे अशी पत्रकारिता अनेकदा तांत्रिक किंवा व्यावसायिक नसते, पण ती समाजाच्या भावना आणि दृष्टिकोन मांडते.अलेजांड्रो (२०१०) यांच्या सर्वेक्षणानुसार, विविध देशांतील मुख्य संपादकांनी मान्य केले की सोशल मीडिया हे ब्रँडिंग, बातम्या पोहचवणे आणि संकेतस्थळावर ट्रॅफिक वाढवण्यासाठी प्रभावी साधन ठरले आहे.

**संशोधनाचे उद्दिष्ट**

1. सोशल मीडिया पत्रकारितेची संकल्पना समजून घेणे.
2. पारंपरिक पत्रकारिता आणि डिजिटल पत्रकारितेतील फरक अधोरेखित करणे.
3. नागरिक पत्रकारितेचा सामाजिक प्रभाव अभ्यासणे.
4. विविध अभ्यास आणि समीक्षणांचे विश्लेषण करणे.
5. डिजिटल पत्रकारितेच्या विश्वसनीयतेचा अभ्यास करणे.

सोशल मीडिया पत्रकारितेची **आढावा**

**वेब 2.0** ही इंटरनेट विकासाची दुसरी पायरी आहे, ज्यामध्ये वापरकर्त्यांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा मानला जातो. वेब 1.0 मध्ये माहिती केवळ वाचण्यासाठी (Static Web) असायची, तर **वेब 2.0** मध्ये वापरकर्ते **आपले मत मांडणे**, **मांडलेल्या मतावर प्रतिक्रिया देणे** तसेच ही माहिती दुसऱ्याला पाठवू शकतात, म्हणजेच, वापरकर्ता ही केवळ वाचणारी व्यक्ती न राहता **सह-निर्माता** बनतो.वेब 2.0 तंत्रज्ञानाच्या आगमनानंतर इंटरनेटवर वापरकर्त्यांना केवळ माहिती पाहण्यापेक्षा ती तयार करण्याची, शेअर करण्याची आणि प्रतिक्रिया देण्याची संधी मिळाली. यामुळे पत्रकारितेचा चेहरामोहरा बदलला आहे. वेब 2.0 च्या साहाय्याने विकसित झालेली सोशल मीडिया पत्रकारिता ही माहिती संकलन, उत्पादन आणि प्रसारणाची लोकसहभागी प्रक्रिया आहे.पूर्वीची पत्रकारिता वृत्तपत्रे, मासिके, रेडिओ, टीव्ही यासारख्या माध्यमांपुरती मर्यादित होती. ती एकमार्गी असायची – म्हणजे पत्रकार बातमी देत आणि जनता ती स्वीकारत. सामान्य लोकांना न विचारता माहिती दिली जात असे आणि त्यांच्या अभिप्रायाला फारसा वाव नव्हता. प्रसारणासाठी लागणारी उपकरणे महाग आणि गुंतागुंतीची असल्यामुळे बातम्या मर्यादित क्षेत्रांपुरतीच पोहोचत असत.या मर्यादांमुळे सोशल मीडिया पत्रकारितेचा उदय झाला. या माध्यमात, प्रत्येक व्यक्ती ही एक "संवाददाता" होऊ शकतो. फेसबुक पोस्ट, इंस्टाग्राम स्टोरी, ट्विट्स, ब्लॉग्स आणि यूट्यूब व्हिडिओद्वारे लोक स्वतःचे अनुभव, मत, किंवा घडलेल्या घटनांबाबत माहिती शेअर करू लागले.पारंपरिक माध्यमांच्या कमतरतांमुळे आधुनिक सोशल मीडिया पत्रकारिता उदयास आली. जॉनस्टन (२००६) यांनी सोशल मिडियाचे महत्व सांगताना म्हटले आहे कि, “डिजिटल माध्यमांमुळे पत्रकारितेची पारंपरिक चौकट बदलली असून, सोशल मीडियाच्या माध्यमातून वाचक फक्त बातम्या वाचत नाहीत, तर त्या शेअर करतात, प्रतिक्रिया देतात आणि त्याच्या पुनर्रचनेतही सहभाग घेतात.”[१] चार्ली बेकेट (२००८) यांनी सोशल मीडिया पत्रकारिता याविषयी पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले आहे. “डिजिटल युगात पत्रकारिता मोठ्या बदलांमधून

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

जात आहे.सोशल मीडिया, ब्लॉग्स आणि नागरिक पत्रकारिता पारंपरिक माध्यमांना आव्हान देत आहेत, पण एकाच वेळी सहकार्याची संधी देखील देत आहेत.लोकशाही टिकवण्यासाठी पत्रकारितेचे महत्त्व अधोरेखित करताना ते म्हणतात की, माध्यमांनी अधिक पारदर्शक, सहभागी आणि संवादात्मक असणे आवश्यक आहे."[२] **बन्झ (२००९) यांनी सोशल मिडियाविषयीचे** मत व्यक्त करतांना म्हंटले आहे , "**सोशल मिडिया ही केवळ संवादाची माध्यमे नसून ती माहिती निर्मिती, प्रसारण आणि सामायिकरणाचे प्रभावी साधन बनली आहेत.** त्यांनी असे नमूद केले की, **सोशल मिडियामुळे नागरिक पत्रकारितेला चालना मिळाली असून, सामान्य व्यक्तीदेखील माध्यमसृष्टीत सक्रिय सहभागी होऊ शकतो.**"[३] बन्झ यांचे म्हणणे आहे की, या नव्या माध्यमांनी **माहितीच्या लोकशाहीकरणाला चालना दिली आहे** — जेथे वृत्तसंस्था, संपादक किंवा मोठे मीडिया हाऊस हेच बातमीचे एकमेव स्रोत राहिलेले नाहीत. त्याऐवजी, सोशल मिडियाच्या माध्यमातून कोणीही माहिती प्रसारित करू शकतो आणि त्यावर समाजातील इतर लोक थेट प्रतिक्रिया देऊ शकतात.त्यांच्या मते, ही बदलती पत्रकारिता **खुली, सहभागी आणि गतिशील** बनली असून, पारंपरिक माध्यमांच्या मर्यादा या नव्या माध्यमांनी पार केल्या आहेत. **हार्पर** (२०१०) यांनी सोशल मिडियाविषयी मांडलेले मत अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. त्यांच्या मते, "**सोशल मिडिया ही केवळ संवादाचे माध्यम नाही, तर ती लोकशाहीला चालना देणारी एक क्रांतिकारी शक्ती आहे.**"[५] हार्पर असे सुचवतात की सोशल मिडिया नागरिकांना केवळ माहिती मिळवण्यासाठी नाही, तर ती **शेअर करण्यासाठी, चर्चा घडवून आणण्यासाठी आणि सामूहिक कृतीसाठी एक प्रभावी व्यासपीठ** पुरवते. पारंपरिक माध्यमांच्या तुलनेत, सोशल मिडियामुळे **सामान्य नागरिकही "कंटेंट क्रिएटर" बनतात**, आणि त्यामुळे माहितीचा प्रवाह एकतर्फी न राहता परस्परसंवादी होतो.त्यांचे मत असेही आहे की सोशल मिडियामुळे **सत्ताधाऱ्यांना थेट जनतेच्या भावना समजतात**, तसेच जनतेला देखील त्वरित प्रतिसाद देण्याची संधी मिळते. ही पारदर्शकता आणि सहभागिता **वास्तविक लोकशाही प्रक्रियेस बल देते.** हार्पर यांच्या दृष्टीने सोशल मिडिया म्हणजे **प्रभावी संवाद, सामाजिक सहभाग आणि जनतेच्या सशक्तीकरणाचे एक आधुनिक साधन** आहे. **ING News Netherlands** २०१५ मध्ये **ING (Internationale Nederlanden Groep)** या नेदरलँड्समधील बँकिंग आणि फायनान्शियल सर्व्हिसेस कंपनीने केलेल्या एका अभ्यास/अहवाला मध्ये **"सोशल मीडिया आणि पत्रकारिता यांच्यातील नाते"** यावर प्रकाश टाकलेला आहे.

**ING News Netherlands Report (2015) – महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.**

**१.बातम्यांचे मूळ स्रोत बदलत आहेत:** पारंपरिक माध्यमांऐवजी अनेकजण सोशल मीडियावरून पहिल्यांदा बातम्या मिळवतात.
**२.वाचक आणि पत्रकार यांच्यात थेट संवाद:** सोशल मीडियामुळे वाचकांना बातम्यांवर त्वरित प्रतिक्रिया देता येतात आणि पत्रकारांशी थेट संवाद साधता येतो.
**३. विश्वासार्हतेची चिंता:** सोशल मीडियावरील सर्व माहिती सत्य असतेच असे नाही. त्यामुळे पत्रकारांची भूमिका पडताळणी करणाऱ्याची बनते.
**४. वेगवान वितरण:** बातम्या प्रचंड वेगाने प्रसारित होतात. पारंपरिक पत्रकारितेपेक्षा सोशल मीडियाचा वेग अधिक आहे.
**५. पत्रकारांसाठी नवीन कौशल्यांची गरज:** नव्या प्लॅटफॉर्म्सवर काम करण्यासाठी पत्रकारांना सोशल मीडिया हाताळण्याचे कौशल्य आवश्यक झाले आहे.

आयएनजी न्यूज नेदरलँड्स (२०१५) च्या सोशल मीडिया विषयक सर्वेक्षणानुसार असे आढळले आहे की, ५०% पेक्षा जास्त पत्रकार सोशल मीडियाचा उपयोग माहिती आणि डेटा मिळवण्यासाठी प्राथमिक स्रोत म्हणून करत आहेत. कारण हे प्लॅटफॉर्म त्यांना विविध विषयांवरील अनेक दृष्टिकोन समजून घेण्याची संधी देतात. या अभ्यासातून पुढे असेही स्पष्ट झाले की जवळपास निम्म्या पत्रकारांनी कबूल केले आहे की, ते सोशल मीडियावर तात्काळ बातम्या पोस्ट करतात कारण त्यानंतर त्या बातम्यांचे संपादन करता येते. मात्र, २०% पत्रकारांनी या प्रकाराला विरोध दर्शवला असून त्यांचे मत होते की कोणतीही बातमी प्रसिद्ध करण्याआधी तिची पडताळणी करणे आवश्यक आहे.या सर्वेक्षणाचा आंतरसांस्कृतिक अभ्यास केल्यावर असेही लक्षात येते की, जर्मन पत्रकार सोशल मीडियावरील माहितीला फारसे विश्वासार्ह मानत नाहीत, तर अमेरिकन पत्रकार याच माध्यमाला एक विश्वासार्ह माहिती स्रोत मानतात. **डॉ.रवींद्र दाणी (२०१७)यांनी सोशल मिडिया विषयी महत्वपूर्ण विधान केले आहे.**डॉ. दाणी यांच्या मते "सोशल मिडिया हे आधुनिक समाजाचे प्रतिबिंब आहे. हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेली पत्रकारिता आता "नागरिक पत्रकारिता" म्हणून बदलते आहे."[५] डॉ.दानी यांनी सोशल मिडिया पत्रकारितेला नागरिक पत्रकारिता संबोधले आहे.याचे मुख्य कारण म्हणजे या पत्रकारितेत वाचकांना प्रतिक्रिया नोंदवण्याचा अधिकार असतो. **प्रा. सुचित्रा मोहिते (२०१८)** "सोशल मिडियावर निर्माण होणारी "व्हर्च्युअल ओळख" ही व्यक्तीच्या मूळ जीवनशैलीवर परिणाम करत असते. किशोरवयीन मुलांमध्ये ही ओळख मानसिक तणावाचे कारण बनते."[६] Pradhan आणि Kumari (२०१८) यांनी "A Study on Journalistic Use of Social Media" या शीर्षकाखाली केलेल्या अभ्यासात सोशल मिडियाचा पत्रकारितेतील वापर व परिणामांचा सखोल अभ्यास केला आहे. त्यांच्या मते, "आजच्या डिजिटल युगात पत्रकार Twitter, Facebook

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025


आणि YouTube यांसारख्या सोशल मिडिया प्लॅटफॉर्मचा वापर प्रामुख्याने बातम्या शोधण्यासाठी, माहिती संकलित करण्यासाठी व ती सादर करण्यासाठी करतात. सोशल मिडिया हे पारंपरिक माध्यमांच्या तुलनेत अधिक जलद, प्रभावी आणि संवादक्षम माध्यम आहे." [७] या अभ्यासात असेही स्पष्ट झाले आहे की, सोशल मिडियाच्या साहाय्याने पत्रकार ताज्या घडामोडी, सार्वजनिक भावना आणि जनतेच्या प्रतिक्रिया सहज मिळवू शकतात. तथापि, हे माध्यम वापरताना पत्रकारांना काही गंभीर अडचणींचाही सामना करावा लागतो. यात खोटी माहिती, अफवा प्रसार, सत्यता पडताळणीची अडचण आणि माहितीच्या विश्वासार्हतेचा अभाव हे मुख्य मुद्दे आहेत. त्यामुळे, पत्रकारांनी सोशल मिडियाचा वापर करताना योग्य सावधगिरी बाळगणे आवश्यक असल्याचे लेखनात नमूद केले आहे. **प्रा. विनया देशपांडे (२०१९) यांनी आपले मत व्यक्त करतांना म्हटले आहे कि,** "सोशल मिडियामुळे व्यक्तिस्वातंत्र्याचे नवीन परिमाण निर्माण झाले आहे. पण त्याच वेळी चुकीची माहिती, अफवा, द्वेषपूर्ण भाषा या समस्यांमुळे डिजिटल शिस्त आवश्यक ठरते."[८] श्री. माकरंद आर. परांजपे (२०२०) माध्यम समीक्षक म्हणतात, "सोशल मिडियामुळे लोकशाही अधिक सक्रिय झाली असली तरी, राजकीय प्रचार आणि ट्रोल संस्कृतीने त्याचे स्वरूप बिघडवले आहे.त्यांच्या मते, "सोशल मिडिया हे लोकांच्या भावना चालविण्याचे आणि मतप्रवाह तयार करण्याचे प्रभावी माध्यम बनले आहे."[९] **डॉ. मिलिंद जोशी (२०२१)** – संप्रेषणशास्त्रतज्ज्ञ, "सोशल मिडिया हे संवादाचे स्वातंत्र्य देणारे माध्यम आहे, पण हे माध्यम अनियंत्रित राहिल्यास सामाजिक सौहार्द धोक्यात येऊ शकते. म्हणूनच डिजिटल साक्षरतेचा प्रसार करणे अत्यावश्यक आहे."[१०] भारतीय सोशल मिडिया समीक्षकांचे विचार हे सोशल मिडियाचे सकारात्मक व नकारात्मक दोन्ही पैलू अधोरेखित करतात.ते सोशल मिडियाच्या परिणामांचे विश्लेषण **प्रसार माध्यम, समाजशास्त्र, मानसशास्त्र आणि राजकारण** या विविध अंगांनी करतात. पारंपरिक पत्रकारितेमध्ये बातमी ही ठराविक रचनेनुसार मांडली जात असे – तिची सुरुवात, मध्यभाग आणि शेवट स्पष्टपणे ठरलेले असायचे. एखाद्या घटनेचा संकेत मिळाल्यानंतर पत्रकार त्याचा सखोल तपास करत, माहिती गोळा करत आणि नंतर संपूर्ण आणि सुसंगत वृत्त/अहवाल तयार करत.परंतु सोशल मीडियाच्या युगात परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. बातम्या आधीच समाजमाध्यमांवर उपलब्ध असतात. त्यामुळे पत्रकारांना त्याच घटनेला वेगळ्या दृष्टिकोनातून मांडावे लागते – जेणेकरून ते वाचकांचे लक्ष वेधू शकतील आणि डिजिटल स्पर्धेत टिकून राहू शकतील.सोशल मीडिया पत्रकारितेत कथा ही एखाद्या माध्यम संस्थेवर आधारित न राहता लोकांकडून तयार होते. फेसबुक पोस्ट, ट्विट्स, ब्लॉग्स किंवा व्हिडिओ शेअर्सद्वारे माहिती अनेक वेळा दुसऱ्या किंवा तिसऱ्या हातांमधून पसरते. त्यामुळे तिचा स्रोत एकसंध नसतो.ही पत्रकारिता लोकांच्या आवडीनिवडींवर केंद्रित असते. कोणती माहिती व्हायरल होईल, कोणती कथा अधिक लोकांपर्यंत पोहोचेल, हे महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे पत्रकारांनी नेहमी जागरूक, तत्पर आणि तात्काळ प्रतिक्रिया देणारे असणे गरजेचे ठरते.महत्त्वाचे म्हणजे, सोशल मीडियावर बातमी तात्काळ दिली जाते, ती पूर्ण आणि तपासून झाल्यावरच देण्यात येईल, अशी अपेक्षा नसते. उलट, विलंब झाला तर ती माहिती कालबाह्य वाटू शकते. त्यामुळे वेग आणि उपस्थिती याला मोठे महत्त्व आले आहे

**सैद्धांतिक पार्श्वभूमी:**

सोशल मीडिया पत्रकारिता वेब 2.0 तंत्रज्ञानावर आधारित असून, यात वापरकर्त्याचा सहभाग हे केंद्रस्थानी आहे. पारंपरिक पत्रकारिता एकमार्गी असताना सोशल मीडिया द्विमार्गी आहे – प्रतिक्रिया व सहभागाचे माध्यम. पत्रकारिता आता "हायपरलोकल" बनली असून, सामान्य व्यक्तीदेखील घडामोडींवर भाष्य करू शकतो. सोशल मीडिया पत्रकारिता लोकशाहीला बळ देणारी असल्याने याचे समाजशास्त्रीय, राजकीय आणि मानसशास्त्रीय परिणाम अधिक खोलवर आहेत.

**डिजिटल युगातील पत्रकारिता : फायदे, तोटे आणि सामाजिक परिणाम :**

सोशल मीडियाचे कोणते फायदे आणि तोटे आहेत तसेच सोशल मीडिया पत्रकारिता, नागरिक पत्रकारिता यांच्यावर सोशल मीडियाचा कोणता परिणाम झालेला आहे हे पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**नागरिक पत्रकारितेचे फायदे आणि तोटे :**

नागरिक पत्रकारिता ही सोशल मीडिया पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाला मिळालेलं एक सहभागात्मक व्यासपीठ आहे. यामुळे सामान्य नागरिकांना बातमी वाचल्यानंतर त्यावर आपली प्रतिक्रिया म्हणजे मत नोदवू शकतो, तसेच ही प्रतिक्रिया समाजासमोर सादर करण्याची संधी वाचकांना प्राप्त झाली आहे. अशा प्रकारच्या प्रतिकिया या वैयक्तिक अनुभव, स्थानिक पातळीवरील एखाद्या घटनेवर आधारित असतात. **हडसन** यांच्या मते, सोशल मीडियामुळे लोकांना आता फक्त वाचक म्हणून नव्हे, तर **सक्रिय माहितीप्रदाता आणि विश्लेषक** म्हणून भूमिका बजावता येते. आधी जेव्हा माध्यमांमार्फत माहिती मिळत असे, तेव्हा जनतेजवळ ती माहिती तपासण्याची किंवा त्याला आव्हान देण्याची कोणतीही क्षमता नव्हती. मात्र आता सोशल मीडिया आणि नागरिक पत्रकारितेमुळे प्रेक्षक **समीक्षक, सहनिर्माते आणि माहितीचे प्रसारक** अशा अनेक भूमिका निभावत आहेत. नागरिक पत्रकारितेचा सर्वात मोठा लाभ म्हणजे, वंचित आणि

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

स्थानिक समुदायांनाही आपला आवाज उठवण्याची संधी मिळत आहे. त्यांना आता सार्वजनिक निर्णयप्रक्रियेत सक्रिय सहभाग घेता येतो. सामाजिक समस्या, मानवी हक्कांचे उल्लंघन, शिक्षणाचा अभाव, बेरोजगारी इत्यादी समस्यांकडे जगाचे लक्ष वेधून त्यावर उपाययोजना घडवून आणण्याची ताकद सोशल मीडिया पत्रकारितेमुळे निर्माण झाली आहे. **सीरिया-इराण युद्ध** याचे ठळक उदाहरण आहे, जिथे निर्वासितांनी सोशल मीडियावरून मदतीसाठी व्हिडिओ, पोस्ट व ट्विटद्वारे आंतरराष्ट्रीय लक्ष वेधून घेतले. त्यामुळे अनेक देशांमध्ये जागरूकता वाढली आणि मानवतेसाठी सहकार्याची भावना निर्माण झाली. नागरिक पत्रकारितेमुळे सर्वसामान्य लोकही बातम्यांचा भाग बनले आहेत. ते माहिती प्रसारित करू शकतात आणि घटनांची नोंद ठेवू शकतात. तसेच सरकार वा संस्थांवर प्रश्न विचारले जाऊ शकतात, पारदर्शकता वाढते. नागरिक पत्रकारितेचे काही गंभीर तोटेही आहेत. यातील प्रमुख समस्या म्हणजे **विश्वसनीयतेचा अभाव.** काही वेळा नागरिक पत्रकार प्रसिद्धीसाठी किंवा लोकप्रियतेसाठी खोटी माहिती देतात, जी नंतर आणखी लोकांद्वारे पसरवली जाते आणि त्यामुळे समाजात गोंधळ व हिंसाचार होऊ शकतो. अशा **बनावट बातम्यांमुळे संसाधनांचा गैरवापर** होतो, तसेच सहानुभूती मिळवण्यासाठी फसवणूक केली जाते. ही फसवणूक फारशी गंभीर नसली तरी, अनेक वेळा ती **राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक संघर्षांना जन्म देते** आणि त्यामुळे जागतिक शांतता धोक्यात येते.तसेच पत्रकार आणि सामान्य नागरिकांवर ऑनलाईन द्वेषपूर्ण हल्ले वाढले आहेत व सोशल मीडियावर राजकीय प्रचार, खोटी आकडेवारी, आणि प्रचारकी पत्रकारिता वाढली आहे.

**पारंपरिक पत्रकारितेचे फायदे आणि तोटे :**

आजच्या डिजिटल युगात **सोशल मीडिया** हे केवळ संवादाचे माध्यम राहिलेले नसून, ते **माहिती व पत्रकारितेचे प्रभावी साधन** बनले आहे. पारंपरिक पत्रकारिता म्हणजे वृत्तपत्र, मासिके, रेडिओ व दूरदर्शन यांच्याद्वारे दिल्या जाणाऱ्या बातम्या. मात्र, या माध्यमांवर आता सोशल मीडियाचा मोठा प्रभाव पडू लागला आहे.पारंपरिक पत्रकारिता किंवा मुख्य प्रवाहातील पत्रकारिता सोशल मीडियाच्या प्रभावामुळे अधिक गतिशील, सुलभ, खुली आणि सहभागात्मक झाली आहे. पूर्वी केवळ व्यावसायिक पत्रकार आणि रिपोर्टरच बातम्या तयार करत असत, त्या अधिक विश्वसनीय मानल्या जात. मात्र आता मुक्त-स्रोत पत्रकारितेचा उदय झाला आहे. सोशल मीडियामुळे पत्रकारितेच्या अशा सीमा ओलांडता आल्या आहेत, ज्या केवळ प्रिंट आणि ब्रॉडकास्ट तंत्रांद्वारे पूर्वी शक्य नव्हत्या.आजच्या जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात काय घडते आहे, याची माहिती लगेच समाजापर्यंत पोहोचते. नागरिक या प्रक्रियेत थेट सहभागी होतात.वाचक खोट्या बातम्या उघड करू शकतात, वृत्तसंस्थांना प्रश्न विचारू शकतात आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून सत्य मांडण्याचा आग्रह करू शकतात.तथापि, सोशल मीडियाचे फायदे असले तरी त्याचे काही तोटेही आहेत. सोशल मीडिया आणि इंटरनेटवर इतक्या मोठ्या प्रमाणात माहिती उपलब्ध आहे की, खरी आणि बनावट बातमी यामधील फरक ओळखणे कठीण झाले आहे. काही वेळा नागरिक पत्रकारांकडून आलेल्या बनावट बातम्याही व्यावसायिक पत्रकार स्वीकारतात आणि त्यावर आधारित कथा सादर करतात. यामुळे समाजामध्ये पत्रकारितेच्या विश्वासार्हतेवर प्रश्न निर्माण होतो.

**डिजिटल पत्रकारितेचे फायदे आणि तोटे :**

डिजिटल पत्रकारिता म्हणजे बातम्या पाठवण्यासाठी आणि मार्केटिंगसाठी इंटरनेट आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर करणे होय. या पत्रकारीतेचे काही फायदे व तोटे आहेत.डिजिटल पत्रकारितेचे फायदे म्हणजे जगभरातील माहिती जलद गतीने वाचकांना प्राप्त होते तसेच वाचकांना आपला अभिप्राय मांडता येतो. यामुळे समाज अधिक जागृत व सार्वजनिक कल्याणकारी बाबींवर महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी सक्षम होतो. वेगवेगळे समाज गट, मंडळे आणि इतर परस्परसंवादी माध्यमांच्या निर्मितीमुळे समाजातील लोकांना महत्वपूर्ण विषयवर चर्चा करणे सहज शक्य झाले आहे. दुसरीकडे, सामान्य वृत्तसंस्था, छापील वर्तमानपत्रे आणि मासिके आणि इतर व्यवसायांना वाचकसंख्या, सदस्यता आणि इतर महसूल-उत्पन्न स्त्रोतांचे नुकसान होत आहे, ज्यामुळे त्यांना दिवाळखोरीकडे ढकलले जात आहे. यामुळे व्यक्ती आपल्या वैयक्तिक मतांवर अधिक केंद्रित झाली आहे, समविचारी लोकांना फॉलो करत आहे आणि दुर्भावनापूर्ण हेतूने इतरांनी पोस्ट केलेल्या आणि सामायिक केलेल्या बेकायदेशीर, अनैतिक किंवा अनैतिक विचारांनी सहज प्रभावित होण्यास प्रवण आहे. या दुर्भावनापूर्ण स्त्रोतांमुळे गुन्हेगारी आणि बेकायदेशीर गतिविधींमध्ये वाढ झाली आहे कारण लोक बनावट आणि खोट्या बातम्या पसरवत आहेत आणि त्यावर विश्वास ठेवत आहेत आणि अतिआत्मविश्वासी किंवा अतिउत्साही होत आहेत. खऱ्या पत्रकारितेला डिजिटल पत्रकारितेने अडथळा आणला आहे कारण कोणीही बातम्यांच्या तुकड्याला कोणतीही खोटी माहिती जोडू शकतो आणि ती लोकप्रिय करू शकतो. जेव्हा ती चूक सापडते तोपर्यंत, ती वाचकांच्या सचेतन/अचेतन मनात आधीच असते आणि गुन्हेगारांसाठी लोकांवर या मताच्या बदलाने आणि चुकीच्या मानसिकतेने प्रभाव टाकणे सोपे होते.

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**निष्कर्ष**

सोशल मीडिया पत्रकारितेमुळे पारंपरिक माध्यमांना नवे आव्हान आणि संधी प्राप्त झाली आहेत. नागरिक पत्रकारितेच्या माध्यमातून सामान्य लोकांना अभिव्यक्तीची नवी दारे खुली झाली आहेत. तथापि, खोट्या बातम्या, अफवा, द्वेषपूर्ण भाषा आणि तांत्रिक मर्यादा यामुळे विश्वसनीयतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. म्हणूनच, डिजिटल साक्षरता, जबाबदारी आणि पडताळणी ही नव्या युगातील पत्रकारितेची गरज बनली आहे

**संदर्भ सूची**

1. Johnston, L. Borderline Journalism: Professionalism and Participation in the News. Routledge, 2006.
2. Beckett, Charlie. SuperMedia: Saving Journalism So It Can Save the World. Wiley-Blackwell, 2008.
3. Bunz, Mercedes. How social media is changing journalism. The Guardian, 2009.
4. Harper, Thomas. The Role of Social Media in Modern Journalism. Journalism Review, 2010.
5. डॉ. रवींद्र दाणी. सोशल मीडिया आणि पत्रकारिता. आधुनिक प्रकाशन, २०१७.
6. प्रा. सुचित्रा मोहिते. व्हर्च्युअल ओळख आणि किशोरवयीन मानसिकता. यशोवंत प्रकाशन, २०१८.
7. Pradhan, Pitabas & Kumari, Niky. A Study on Journalistic Use of Social Media. Amity Journal, 2018.
8. प्रा. विनया देशपांडे. डिजिटल माध्यमे आणि सामाजिक जबाबदारी. ज्ञानदीप प्रकाशन, २०१९.
9. श्री. माकरंद आर. परांजपे. लोकशाही, सोशल मीडिया आणि नवसांस्कृतिक बदल. संवाद प्रकाशन, २०२०.
10. डॉ. मिलिंद जोशी. सोशल मिडिया: संवाद, साक्षरता आणि जबाबदारी. जनवाणी प्रकाशन, २०२१.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# शास्त्रीय संगीत में वर्षाऋतू के राग

**डॉ. सुनील पारीसे**
सहयोगी प्राध्यापक तथा विभाग प्रमुख श्री गणेश कला महाविद्यालय, कुंभारी ता. जि. अकोला
**Email-**parisesunil4545@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170802
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8(I)
Pp. 7-9
August 2025

**Submitted:** 10 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**प्रस्तावना**

ऋतूओं की चक्रमयी पद्धती ने साहित्य संगीत, और कलाओ को समान रुपसे आकर्षित किया है। परंपराकालीन साहित्य और मध्ययुगीन चित्रकला मे इन ऋतूओं का सजीव चित्रण देखने को मिलता है। ऋतूओं का यह सौंदर्य ही तक सीमित न रह सका, ताकी उसकी छँटा से शास्त्री संगीत को भी प्रेरणा प्राप्त हुई। जिसके फल स्वरुप 'वसंत' और 'मेघ' रागो की उत्पत्ती हुई। वसंत ऋतू से वसंत राग और वर्षा ऋतू से मेघ ईत्यादी रागो के स्वर चित्र दिखाई देते है । चित्रकला, काव्य कला और संगीत कला मे सभी ऋतूओ पर रचनाए देखने को मिलती है। लेकिन यही तुलनात्मक दृष्टि से देखा जाए तो वसंत और वर्षा संबंधी रचनाओं के सामने अन्य ऋतूओ की रचनाएँ गिनीचुनी दिखाई देती है।

**संगीत कला से भाव प्रदर्शन :-**

कला आदी काल से ही अपनी भाव - प्रवणता एवं श्रृंगारिकता के लिए जगतविख्यात रही है। इस दृष्टीसे वर्षा और वसुत ऋतू अग्रेसर रही है। जिनसे श्रृंगारिक भावनाको की असफल अभिव्यक्ती की जा सकती है। इन ऋतूओं की रसीली प्रकृती किसी भी भावूक को सहज ही मुग्ध कर लेती है। साहित्यकार हो या संगीतकार या चित्रकार सभी इन ऋतूओ को क श्रृंगारिक प्रकृती से प्रेरित होकर कलात्मक सृजन की और प्रवृत होते है। भारतीय शास्त्रीय या सुगम संगतकार सदियों से संगीत के सप्त सूर का आधार लेकर मनमोहक राग रचना बनाते आया है । जिसमें जीवन के प्रत्येक क्षण का भिन्न-भिन्न स्वर - चित्र हमारी आखों के सामने मुर्तिमान होता है। संगीत के इन्ही स्वरों की उपज से चित्रकला मे एक से एक बढकर एक अद्वीतीय राग चित्र रचे गए है । जिन्हे देखकर साधारण दर्शक अक्सर भ्रमित होता है! और उन्हें उह व्यवहारिक जीवन के चित्र समझ बैठता है। वास्तव मे रागसंबंध मे चित्र उन रागो से उत्पन्न भाव - दृष्यो को ही चित्रीत करते है। इसी प्रकार हम देखते है की भारतीय शास्त्रीय या सुगम संगीत भाव प्रधान संगीत होता है ।

**संगीत कला से रस की निष्पत्ती :-**

भाव और रस की निष्पत्ती के लिये शास्त्रीय संगीत जग विख्यात माना गया है। नृत्य की मधूर थिरकन और हाव-भाव-भरी मुद्रावों से रसानुभूती प्राप्त करना सर्व सुलभ माना गया है। क्योकी भाव प्रयक्ष रुप मे दिखने लगता है। हमारे जीवन मे भिन्न-भिन्न ऋतूओ की प्रकृती से भिन्न-भिन्न रसो की उत्पत्ती होती है। जिसका प्रभाव संगीत पर पडता है। वसंत और मल्हार राग ऋतूओ की ही देन है । वर्षा और वसंत की प्रकृति ने मानविय भावनाओ मे श्रृंगारिकता भर दि है ! प्रकृति रंग रस से प्रभावित होती है । संगीतकार की हृदयतंत्री हिल जाती है । और अपने आप है मूंह से स्वर निकलने लगते है । और राग निर्माण हो जाता है।

**ऋतूओ से प्रेरित हो कर राग निर्मिती:-**

संगीत में स्वरो के रुचिकर संयोजन से रागो का निर्माण होता है, जो की उत्पत्ती के सम्बध मे यहाँ पर स्वतंत्र रूप से ही विचार करना उचित होगा । यह पहले ही कहा जा चुका कि संगीत शास्त्रीय संगीत भावना प्रधान होता है। इन भावो को साकारता प्रदान करने के लिए स्वरो के माध्यम से संगीतकार ऋतू विशेष से प्ररित होकर स्वरो के मेल से रागो को जन्म देना है। वर्षाकालीन रागो के सम्बंध में जब हम विचार करते है

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17115320

OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*डॉ. सुनील पारीसे ,सहयोगी प्राध्यापक तथा विभाग प्रमुख श्री गणेश कला महाविद्यालय, कुंभारी ता. जि. अकोला*

**How to cite this article:**
*पारीसे, . सुनील . (2025). शास्त्रीय संगीत में वर्षाऋतू के राग.* Journal of Research & Development, *17(8(I)), 7–9.* https://doi.org/10.5281/zenodo.17115320

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

शास्त्रीय संगीत मे शब्दो से अधिक महत्व स्वरो का है। संगीत मे रस की निष्पत्ती मुलतः राग मे लगने वाले स्वर समुहो द्वारा ही होती है। शब्दो का अस्तीत्व एकद नष्ट कर दिया जाता है। तब भी रस का संचारण अबाध गतीसे प्राप्त होता रहता है। शास्त्रीय संगीन मे तराणो का निर्माण ईसी ढंगके किया गया है। जिसके तोम नोम आदी अर्थ रहित शब्दो के बावजूद भी ये रचनाएँ कर्णप्रिय और सूचिकर लगती है। परंतु ईतना अवश्य है की अर्थपूर्ण शब्दो से संगीत को अधिक बल मिलता है।

**वर्षाकालीन रागो मे प्रयुक्त होने वाले स्वर और शब्द :-**

वर्षा-ऋतू के मुख्य राग मेघमल्हार, गौडमल्हार और मल्हार ही माने जाते है । परन्तु देश और जयजयवंती राग की चीजे भी इस ऋतू में बडे शान के साथ गायी बजायी जाती है ! इसका प्रमुख कारण यह है की, देश एवमं जयजयवंती रागो की प्रकृती तथा उनके शब्द चित्र का वर्षाकालीन अन्य रागो को प्रकृती तथा उनमें अंकित शब्द चित्र से बहुत कुछ साम्य दिखाई देता है । आजकल वर्षाकाल मे मल्हार गोडमल्हार तथा देश राग ही अधिकतर गाये जाते है। इन सभी ऋतू से रागो की उत्पत्ती काफी और खमाज थाट से निर्मित होती है। मेघराग को छोड़कर बाकी राग वर्षा राग पूर्वांगवादी माने जाते है। मेघराग के अतरिक्त शेषरागों की जातीयों मे भी बहुत ही समता दिखाई देती है । वर्षाकालीन रागो मे तीव्र स्वरा से ही राग की रचना की गई है। इन रागो मे कोमल स्वरो का अत्यल्प प्रयोग किया गया है। दोनो निषाद स्वरो का प्रयोग सभी रागो मे प्राय: समान रूप से किया गया है। और कुछ रागो मे कोमल मध्यम का भी अल्प प्रयोग दिखाई देता है। विशेषतः मल्हार और जयजयवंती रागा मे विशेष रूप से तीव्र स्वरो की उत्पत्ती से वर्षाकालीन राग उत्पन्न होने है।

**वर्षाकालीन रागो के मुख्य अंग और सौंदर्य :- :-**

वर्षाकालीन रागो मे प्रचलित रागो के मुख्य अंग के सौंदर्य पर विचार किया तो राग के मुख्य अंग से मतलब है। उस राग मे बारबार आने वाले स्वरा का वह समुदाय जिससे राग झलक उठता है और स्पष्ट दिखाई देता है। मुख्य अंग मे अल्प स्वरो को छेडता हुआ रागध्वनी निर्माण होता है। राग स्वस्प और उनके चलन का परिचय होना ज्ञान होना आवश्यक होता है। वास्तवम राग का मुख्य अंग उसका प्राण होता है । (उदा: गोडल्हार राग का मुख्य अंग- रेप, मप, धनी, साध, निपम, रेगरे मगरेसा, इन स्वरो को गुनगुना ने से हृदय मे एक सरस भाव - चित्र की कल्पना होने लगती है।

**मन और चित्र शास्त्रीय संगीत की उपलब्धी:-**

वियोगजन्य भावनाओं को उभारने वाले शब्द जब स्वरो का संबध लेकर हमारे सामने आते है तो यही शब्द और स्वर अपने सम्मिलीत प्रभाव से हमारी आखों के सामने एक आमिट चित्र खीच जाते है । हम अपने सुख दुःख को पराया सुख दुःख समझने लगते है। इस प्रकार से संयोग और वियोग दोनो ही अवस्थाओ के मन चित्र शास्त्रीय संगीत ने उपलब्ध होता है। संयोग की दशा मे वर्षाकालिन दृश्य हृदय को जितनाही उल्हासित करता ह वियोग की हालत मे वही दृश्य मन को उत्तेजीत करता है।

**मल्हार और जयजयवंती रागों के स्वर और शब्द :-**

मल्हार और जयजयवंती राग के स्वर और शब्द का भी अवलोकन करना आवश्यक होता है। मल्हार वर्षा ऋतू का एक प्रसिद्ध मौसमी राग है। जयजयवंती किसी ऋतू विशेष का राग नही है। किन्तु यह एक सर्वकालीन राग माना गया है। परंतु इसके स्वरो मे वियोग जन्य परिस्थीतीयो को चित्रित करने की अपूर्व क्षमता है। रेगरेसा, निधपरे, सानिधप, धम, रेगरेसा' इन स्वरो से इस राग की पूर्ण अभिव्यक्ती हो जाती है। आत्मनिवेदन से प्रेरित होकर स्पर्श करने वाली भावना का सच्चा स्वरूप इन स्वरो मे उपस्थित हो जाता है।

**मल्हार राग मे वर्षा ऋतू की मोहकता :-**

- अपूर्व संयोजन इस मल्हार राग में वर्षा-ऋतू के एक से बढकर एक मोहक शब्द लिखे गए है। वैसे ये ऋतूकालीन राग होने के नाते भी इस मौसम मे चौबीस घन्टे गाया जाने वाला राग है। गीतो के शब्दो के अतीरिक्त स्वरो का भी एक राग मे देखने को मिलता है। जिसे बडे ही सावधानी के साथ गाया जाता है। अन्यथा असावधानी से शीघ्र ही इस राग का स्वरुप बिगड जाता है। इस राग के मुख्य स्वर निनीसा, ये दोनो निषाद और मग मग, मप मपरे इस प्रकार है। ये स्वर मंद्र और मध्य सप्तक में आलाप लेते समय गंभीर प्रकृती धारण करते है - । और तार सप्तक के सुरों को लेने के बाद मध्य सप्तक के निनीसा स्वर लेते समय इस राग मे तरल प्रकृती का भाव झलकने लगता है । स्वरे के ऐसे संयोग एवंम वियोग के कितने ही सफल चित्र और शब्द इस राग में लिखे गये ।

**वर्षा ऋतू में बडे ही सुहावने राग :-**

संगीत प्रचार में कुछ ऐसे भी राग गाये बजाए जाते है। ऋतू मे बडे ही सुहावने लगते जैसे की देस एक ऐसा ही प्रसिद्ध जो सार्वकालिक होते हुए भी बड़े शान के साथ इस मौसम में हर जगह गाया बजाया जाता है। एक तो इसकी प्रकृती ही इस ऋतु से अनुकूल है। दूसरा इसके गीतों मे वर्षा ऋतू का अधिक चित्रण मिलता है। इसके स्वर श्रृंगारिक भावनाओं को अच्छी तरह से अभिव्यक्त करते है। निसारे म. • गरे, रेम पनी, - - राग मे रे स्वर बहुत ही हत्व का दिखाई देता है। इन स्वरो मे देस राग जाग उठता है। - धप, ध, मगरे, गनीसा इस

**निकर्ष**

1. वर्षाकालीन रागो मे विशेष रूप से मल्हार और गौडमल्हार और देस रागो के गाने-बजाने का अधिक प्रचलन है ।
2. इन सभी रागो मे प्रधानता श्रृंगारिक प्रकृती सर्वत्र दिखाई देती है और प्राय: एकसा वर्णन भी सभी मे देखने को मिलता है। जहाँ तक स्वरो की प्रकृती का प्रश्न है उनसे भी वही बात देखने को मिलती है ।
3. इन सभी रागो मे स्वर समुदाय श्रृंगारिक भावनाओ की अभिव्यक्ती करते है ।

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

4. इनके स्वर संयोजन से सौदर्य, और आकर्षण भिन्न भिना रचरुप का होता है।

**संदर्भग्रंथ**


1. गीत गोविंद - जयदेव
2. संगीत दर्पण - प. दामोदर
3. संगीत विशारद - वसंत
4. संगीत रत्नावली - सोम भोपाल
5. संगीतांजली प. ओंकारनाथ ठाकूर -
6. संगीत कला विहार - अ.भा.गा. मंडळ
7. संगीत मासिक - हातरस
8. संगीत कलाकुंज भारती - संस्कार भारती

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# भारतातील स्त्री उद्योजकता: संधी आणि आव्हाने

**डॉ.राजेश एस. डोंगरे**
सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग
गुरुकुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदा
**Email-**prof.rsd1986@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170803
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 8(I)
Pp. 10-13
August 2025

**Submitted:** 10 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**गोषवारा**

एकंदरीत संपूर्ण जगाचा विचार केला तर आपल्या असे लक्षात येते की, कोणत्याही देशाच्या सार्वभौम विकासामध्ये त्या देशातील महिलांचा सहभाग हा अत्यावश्यक असतो. महिला सक्षमीकरण ही एक संकल्पना आहे जी स्त्री आणि पुरुष दोघांसाठी समान महत्त्वाची आहे. कायद्यानुसार महिलांना समानता प्रदान केलेली आहे. कोणत्याही स्वरूपाचा उद्योग पुरुष करतात त्याच पद्धतीने महिला सक्षमरित्या उद्योग करण्यास पात्र आहे. आर्थिक सक्षमता साधली तर निश्चितच महिलांमध्ये शैक्षणिक सक्षमीकरण, राजकीय सक्षमीकरण आणि सामाजिक सक्षमीकरण आपोआप साधले जाते. महिला उद्योजकाचे प्रमाण 21 व्या शतकामध्ये आपल्याला मोठ्या प्रमाणात पाहायला मिळालेले आहे. भारत देशातील महिला उद्योजकांना आर्थिक संसाधनापासून तर विपणन प्रणाली आणि तंत्रज्ञानातील नवप्रवाहापर्यंत मोठ्या प्रमाणात आव्हानाचा सामना करावा लागतो. महिला उद्योजक विकासामध्ये कोणकोणत्या प्रमुख आव्हानाच्या अनुषंगाने महिलांकडे एक यक्षप्रश्न निर्माण होतो याची संपूर्ण साधक बादक चर्चा प्रस्तुत संशोधन लेखामध्ये करण्यात येईल. भारत देशाला निश्चितच आर्थिक प्रगती साधावयाची असेल तर महिला उद्योजकाकडे उपलब्ध असलेल्या विविध संधीच्या अनुषंगाने जास्त प्रमाणात भर देणे अत्यावश्यक आहे. याचाच परिपाक म्हणजे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीचे कार्य महिला उद्योजकाच्या माध्यमातून आपल्याला येणाऱ्या कालखंडामध्ये पाहायला मिळेल.

**बीजशब्द-** कौटुंबिक स्थिती, वित्तीय स्थितीचे अवलोकन, महिला उद्योजक, नाविन्यपूर्ण बदल, तांत्रिक ज्ञान, समानता, उद्योग संचालनाचे ज्ञान, गतिशीलता, जोखीम, विपणन समस्या आणि कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन.

**परिचय**

महिलांच्या एकंदरीत स्थितीची जाणीव कशा पद्धतीने होते याबाबत स्वामी विवेकानंद यांनी आपले विचार मांडले "एखाद्या राष्ट्राच्या प्रगतीचे सर्वोत्तम थर्मामीटर म्हणजे तेथील महिलांशी केलेली वागणूक." कोणत्याही राष्ट्रांमध्ये किंवा देशांमध्ये त्या महिलेची वागणूक किंवा सन्मान कशा पद्धतीने केला जातो हे प्रगतीचे एक मापक आहे. एकंदरीतच आपल्या भारत देशामध्ये एक पुरुष एकाधिकारशाही संस्कृती पहायला मिळत होती. या संपूर्ण परिस्थितीवर मात करण्यासाठी जाणकार महिलेने समान स्थान मिळवण्यासाठी खूप पुढे जाऊन प्रयत्न केले.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ.राजेश एस. डोंगरे, सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग गुरुकुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदा*

**How to cite this article:**
*डोंगरे, . राजेश . एस . (2025). भारतातील स्त्री उद्योजकता: संधी आणि आव्हाने. Journal of Research & Development, 17(8(I)), 10–13.* https://doi.org/10.5281/zenodo.17115352

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17115352

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

भारतामधील वाढते औद्योगीकरण जागतिकीकरण आणि सामाजिक कायदे यामुळे महिलांची स्थिती चांगल्या पद्धतीने सातत्याने बदलत आहे. या संपूर्ण बदलाच्या अनुषंगाने समाजामध्ये महिलांचे नेतृत्व स्वीकारायला समाज तयार आहे. याचाच परिपाक म्हणजे महिला सक्षमीकरण सहजरीत्या जास्तीत जास्त प्रमाणात आपल्याला पाहायला मिळेल. समाजातील स्त्रीची आर्थिक परिस्थिती चांगल्या पद्धतीने बळकट झालेली आपल्याला दिसेल. भारतातील उद्योगाच्या परिस्थितीचा विचार केला तर सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग अर्थव्यवस्थेचा कणा समजला जातो. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाची भूमिका ही आपल्याला निश्चितच यामध्ये प्रामुख्याने शाश्वत उपजीविका, रोजगार निर्मिती आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रभावी साधन आहेत. आधुनिक भारतात, अधिकाधिक महिला विशेषतः सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांमध्ये उद्योजकीय क्रियाकलाप करतांनी व सातत्याने त्यामध्ये वाढ होत आणि आपल्याला अधोरेखित होते. या संशोधन लेखांमध्ये महिला उद्योजकता, नेतृत्व आणि भारतातील महिला उद्योजक म्हणून आर्थिक विकासाला पाठिंबा देण्यावर लक्ष केंद्रित करते. तसेच त्यांच्यासमोरील समस्या, विविध संधी आणि आव्हानांवर लक्ष केंद्रित करते. महिला उद्योजकांना कोणकोणत्या विविध आव्हानाचा यशस्वीता संपादन करण्यामध्ये सामना करावा लागतो या सर्व बाबींचे निश्चितरित्या अध्ययन करण्यात आले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

उपरोक्त संशोधनाला एक उचित अशी दिशा देण्याच्या अनुषंगाने काही उद्दिष्ट निर्धारित करणे अत्यावश्यक आहे.

उपरोक्त संशोधनाची उद्दिष्टे खालील प्रमाणे सांगता येईल.

1) महिला उद्योजक स्थितीचा एकंदरीतरित्या आढावा घेणे.
2) भारतातील सर्वसामान्य महिला उद्योजकांना भेडसावणाऱ्या समस्या आणि आव्हानाचे अध्ययन करणे.

**भारतातील महिला उद्योजकता: आव्हाने**

उद्योजकता ही कोणत्याही देशाच्या विकासामध्ये सातत्याने चालत येणारी एक प्रक्रिया आहे. आपल्या देशामध्ये पूर्वपार म्हणजेच पुरातन काळापासून निश्चितच पुरुष आणि महिला दोघेही प्रत्यक्षात एकच उद्योग प्रणालीचे अनुसरण करतानी आपल्याला सातत्याने पाहायला मिळते. पुरुषाच्या तुलनेमध्ये भारतातील महिला उद्योजकांसमोर अनेक समस्या आणि आव्हाने आहेत. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये पुरुष उद्योजकांना ज्या आव्हानाचा सामना करावा लागतो त्या व्यतिरिक्त महिला उद्योजकांना निश्चितच काही प्रमाणात वेगळ्या समस्या व आव्हानाचा सामना सातत्याने करावा लागतो.

महिला उद्योजक यांना भेडसावणाऱ्या विविध संधी आणि आव्हाने खालील मुद्द्याच्या अनुषंगाने अधिकरित्या स्पष्ट होईल:

- **आर्थिक संसाधने:**

देशातील सर्वांगीण उद्योगाचा विचार केला तर निश्चितच महिला उद्योजकांना नेहमीच अल्प प्रमाणात आर्थिक संसाधनांचा आणि कामाचा त्रास सातत्याने सहन करावा लागतो. एकंदरीतरित्या आपण बाजारपेठेचा अभ्यास केला तर निश्चितच कोणत्याही बाजारात ठोस सुरक्षितता आणि कर्ज नसल्यामुळे त्यांना बाह्य वित्तपुरवठा परवडत नाही. संचालित करण्यात येणारा दैनंदिन व्यवसाय क्रियाकलापांसाठी आवश्यक असलेले खेळते भांडवल वित्तपुरवठा मिळविण्यातही मोठ्या प्रमाणात विविध अडचणी येतात. पुरुष सदस्य महिलांनी चालवलेल्या उपक्रमांना निधी देणे हे एक मोठे जोखीम मानतात. महिला सदस्यांनी संचालित केलेल्या उद्योगात पाहिजे त्या प्रमाणात वित्तपुरवठा करण्यामध्ये उदासीनता पाहायला मिळते.

- **कौटुंबिक जबाबदाऱ्या:**

कोणतीही स्त्री किंवा महिला आपल्या आयुष्यामध्ये निश्चितच विवाहित महिला उद्योजकाला घरगुती आणि व्यावसायिक कामांमध्ये परिपूर्ण संतुलन सहजरीत्या साधावे लागते. अशा औद्योगिक महिलांना घरगुती कामात, मुलांचे शिक्षण, वैयक्तिक छंद आणि मनोरंजनासाठी वेळ न देणे ही त्यांची क्षमता वाढवते. कौटुंबिक पार्श्वभूमीवर अनेक आव्हानाचा व समस्याचा महिला उद्योजकांना सामना करावा लागतो.

- **तंत्रज्ञानाचा वापर:**

आजच्या आधुनिक युगामध्ये बाजारपेठेमध्ये उपलब्ध असलेली स्पर्धा निश्चितच तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने सातत्याने बदलत असते. नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आत्मसात करणे काळाची गरज असते. ज्या महिलांना अत्यंत तांत्रिक ज्ञानाची आवश्यकता असलेल्या क्षेत्रात प्रवेश

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

मिळतो त्यांना त्यांच्या पतीचा पाठिंबा असतो किंवा यश मिळते. निश्चितच या तंत्रज्ञानाच्या वापराचा पण महिला उद्योजकांना एक प्रकारचा आव्हान म्हणून आपण बघू शकतो

- **कच्च्या मालाच्या उपलब्धतेचे ज्ञान नसणे:**

कोणत्याही व्यापार किंवा उद्योजकांमध्ये कच्चामाल हा अत्यंत अत्यावश्यक घटक म्हणून आपली भूमिका पार पाडते. व्यापार किंवा व्यवसायासाठी लागणारा आवश्यक कच्च्या मालाची खरेदी ही महिलांसाठी एक समस्या आहे. कोणत्याही व्यवसायाचा मुख्य आधार कच्च्या मालाच्या उपलब्धतेच्या विविध स्रोतांची माहिती आणि त्याचबरोबर उच्च वाटाघाटी कौशल्ये ही व्यवसाय चालवण्यासाठी मूलभूत आवश्यकता आहेत. पुरुष उद्योजकाच्या तुलनेमध्ये कुठेतरी कच्च्या मालाच्या खरेदीच्या संदर्भात जे ज्ञान महिला उद्योजकांना किंवा व्यवसायिकांना मोठ्या समस्याचा सामना करावा लागतो.

- **कमी गतिशीलता:**

उद्योग व्यवसायात दिवस रात्र एक करून अगदी वेगवेगळया प्रदेशांमध्ये आणि राज्यांमध्ये प्रवास करण्याचा आत्मविश्वास पुरुष उद्योजकांच्या तुलनेत महिलांमध्ये कमी आढळतो. अशा स्थितीमध्ये महिलांच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचे आणि गतिशीलतेच्या स्वातंत्र्याचा स्तर निश्चितच आपल्याला कमी प्रमाणात दिसून येते. या गतिशीलतेला निश्चितच महिलांचे काही जबाबदाऱ्या किंवा वेगळया समस्यांच्या अनुषंगाने कमी गतिशीलता पाहायला मिळते.

- **जोखीम घेण्याची क्षमता नसणे:**

उद्योग संचालित करतेवेळी पैसे गुंतवणे, कामकाज सांभाळणे आणि अतिरिक्त उत्पादनातून पैसे परत मिळवणे यासाठी उच्च जोखीम घेण्याची वृत्ती, धैर्य आणि चिकाटी यामध्ये निश्चितच आपल्याला कमतरता भासते. एकंदरीत सर्व घटकाच्या अनुषंगाने विचार केला तर निश्चितच महिला उद्योजकांमध्ये जोखीम घेण्याची क्षमता कमी प्रमाणात असते. व्यापार व्यवसायामध्ये जेवढी जास्त जोखीम तेवढा जास्त परतावा असतो.

- **कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन:**

प्रत्येक व्यापार किंवा व्यवसाय संचालित करण्यासाठी कर्मचाऱ्यांची महत्त्वाची भूमिका असते. कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन हे महिला उद्योजकांसमोरील आणखी एक आव्हान आहे. कोणत्याही यशस्वी व्यवसायासाठी चांगले कर्मचारी शोधणे आणि त्यांना टिकवून ठेवणे खूप महत्वाचे आहे. उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्याकडून काम कशा पद्धतीने काढून घेणे ही शैली किंवा कौशल्य अत्यंत महत्त्वपूर्ण असते. महिला उद्योग संचालित करणाऱ्या मालकीचे व्यवसाय बऱ्याच प्रमाणात लहान असल्याने, त्यांना नोकरीची सुरक्षा आणि हमी मिळण्याची आणि चांगली प्रतिभा टिकवून ठेवण्याची शक्यता कमी असते. या विविध कारणामुळे महिला उद्योजकांमध्ये कर्मचारी व्यवस्थापनाच्या आव्हानाचा मोठ्या प्रमाणात फटका स्त्री उद्योजकांना पाहायला मिळतो.

- **व्यावसायिक विपणनाच्या समस्या:**

आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये निश्चितच व्यावसायिक दृष्टिकोनातून विपणन होणे अत्यावश्यक आहे. महिला उद्योजक त्यांच्या उत्पादनांच्या विपणनासाठी प्रामुख्याने मध्यस्थांवर अवलंबून असतात जे मोठ्या प्रमाणात महिला उद्योजकांचे शोषण करतात. व्यवसायातील मध्यस्थ महिला उद्योजकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड पण देतात. मोठ्या प्रमाणात अशा उद्योजकांना आजच्या तीव्र स्पर्धेच्या काळात बाजारपेठ काबीज करण्यासाठी आणि त्यांची उत्पादने लोकप्रिय करण्यासाठी जाहिरातींसाठी भरपूर पैशांची आवश्यकता आहे.

- **शिक्षणाचा अभाव:**

आधुनिक तांत्रिक बदलांचे ज्ञान आणि व्यक्तीचे शिक्षण पातळी हे व्यवसायावर परिणाम करणारे प्रमुख घटक आहेत. सर्वांनी भारत देशाचा विचार केला तर निश्चितच आपल्याला असे निर्देशनास येते की, महिलांचा साक्षरता दर पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. त्यांना नवीन तंत्रज्ञानाची माहिती नाही किंवा त्यांच्याकडे अनुभवाची कमतरता आणि अनेकदा संशोधन करण्यास आणि आवश्यक प्रशिक्षण घेण्यास असमर्थ असतात. अद्यावत व नाविन्यपूर्ण प्रशिक्षणामध्ये महिला उद्योजकाचा वाटा हा निश्चितच कमी दिसत आहे. या सर्व गोष्टीचा परिपाक म्हणजेच महिला उद्योजकांची संख्या कमी दिसते आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

- **तीव्र स्पर्धा:**

संचालित होणाऱ्या व्यवसाय व्यवस्थापन प्रक्रियेत महिला उद्योजकांच्या मार्गात बऱ्याच प्रमाणात अडथळे निर्माण करणारे आणखी एक कारण म्हणजे पुरुष-महिला यांच्यामध्ये असलेली स्पर्धा होय. सर्वांगीण बाबीचा विचार केला तर निश्चितच भारत देशामध्ये आपल्याला पूर्वापार पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे पुरुषाकडून निश्चितच महिला उद्योजकांना मोठ्या प्रमाणात समस्याचा किंवा स्पर्धेचा सामना करावा लागतो. महिला उद्योजक त्यांच्या सेवा जलद आणि वेळेत देण्यात सक्षम असतानाही, संघटनात्मक कौशल्यांचा अभाव आणि महिलांच्या गतिशीलतेच्या स्वातंत्र्यामुळे आपल्या सेवा कुठेतरी कमी गतीने तीव्र स्पर्धेच्या युगामध्ये निश्चितच महिला उद्योजक मागे पडताना आपल्याला दिसते.

**निष्कर्ष**

संपूर्ण जागतिक स्तराचा विचार केला तर असे आढळते की, महिलांची लोकसंख्या जगाच्या लोकसंख्येच्या अर्ध्या लोकसंख्येचे एकंदरीत प्रतिनिधित्व पृथ्वीवर करतानी आपल्याला दिसते. संपूर्ण राष्ट्रांमध्ये आपल्याला लिंग असमानता पाहायला मिळते महिलांना पुरुषाच्या बरोबरीनेच संधी मिळत नाही तोपर्यंत जगाचे कल्याण होणार नाही. महिलाच्या विकासाच्या किंवा सक्षमीकरणाच्या अनुषंगाने असे म्हणता येईल की, महिलाची प्रगती झाली तर निश्चितच कुटुंबाची प्रगती होईल व गावाची प्रगती होईल आणि पर्यायाने पुढे संपूर्ण राष्ट्र प्रगतीपथावर जाईल. महिला सक्षमीकरण अत्यंत अत्यावश्यक आहे. कुटुंबाच्या आणि समाजाच्या विकासासाठी आर्थिकरित्या महिला सक्षम होणे अत्यावश्यक आहे. सर्वांगीण बाजूचा विचार केला तर आर्थिक सक्षमीकरण साधले तर निश्चितच राजकीय सक्षमीकरण, सांस्कृतिक सक्षमीकरण आणि शैक्षणिक सक्षमीकरण आपोआपच साधता येते. सर्वांगीण बाबींचा विचार केला तर ग्रामीण अर्थव्यवस्था सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाच्या भोवती केंद्रित आपल्याला दिसते. यामध्ये प्रामुख्याने महिला उद्योजकतेचे प्रमाण आपल्याला वाढताना दिसत आहे. महिला उद्योजकांना ही प्रगती एका विशिष्ट स्तरावर गाठावयाची असेल तर निश्चितच महिला उद्योगांना भेडसावणारे आव्हाने सहजरीत्या शक्तीमध्ये बदलणे गरजेचे आहे. महिलांना उद्योजकीय जागरूकता, मार्गदर्शन आणि कौशल्य विकास कार्यक्रम प्रदान करण्यासाठी प्रभावी पावले उचलण्याची आवश्यकता आहे. नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाच्या बाबतीमध्ये महिला उद्योजकांना निश्चितच अद्यावत करणे व विविध प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. तरुण महिलांच्या अप्रसिद्ध प्रतिभांना ओळखता येते, प्रशिक्षित करता येते आणि औद्योगिक क्षेत्राची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध प्रकारच्या उद्योगांसाठी सहज व सक्षमरित्या वापर केला जाऊ शकतो. महिला उद्योजकाच्या माध्यमातून निश्चितच समाजामधील एकंदरीतच जी पूर्वीची परिस्थिती होती, त्या परिस्थितीमध्ये कायापालट होऊन निश्चितच जास्त प्रमाणात ग्रामीण भागामध्ये किंवा विविध ठिकाणी महिला उद्योजकाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार आपल्याला निर्माण होतानी दिसते. रोजगार करणारे नाही तर रोजगार निर्माण करण्याची क्षमता महिला उद्योजकांमध्ये आपल्याला निश्चितच येणाऱ्या कालखंडामध्ये मोठ्या प्रमाणात सातत्याने अधोरेखित होताना दिसेल. महिला उद्योजकांना आपला व्यापार व्यवसाय विस्तारित करण्याच्या विविध संधी उपलब्ध होताना दिसतात परंतु काही आव्हानाचा निश्चितच सामना करावा लागतो.

**संदर्भ:-**

1. Pushpa "Opportunities and Challenges for Women Entrepreneurs in India: A Conceptual Study." Global Journal for Research Analysis. Vol-3, Issue-8, August Special Issue -2014. ISSN No. 2277 – 8160.
2. Kaushik, Sanjay, Challenges faced by women entrepreneurs in India. File retrieved from http:// www.irjcjournals.org/ijmssr/Feb2013/2.pdf.
3. Pallavi Mehta and Khushboo "Leadership: Determinants of Women Empowerment." SCMS Journal of Indian Management, April-June, 2014.
4. Chaudhary, An Account of Women Entrepreneurship Development in India: Challenges, Opportunities and Future Prospects. File retrieved from https://editorialexpress.com/cgibin/conference/download.cgi?db_name =IAFFE2013 and paper_id=90.
5. https://www.un.org/sustainabledevelopment/gender-equality/
6. Sharmishtha Nandy and Shalini Kumar. "Women's Entrepreneurship in 21st Century India." Global Journal of Finance and ISSN 0975-6477 Vol. 6, No. 9 (2014), pp. 967-976
7. विकिपीडिया

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# ऐतिहासिक दृष्टिकोनातून समाजशास्त्र आणि शाश्वत विकास: एक अभ्यास

**विजय भगवान गुजर**
(सहयोगी प्राध्यापक इतिहास विभाग प्रमुख)
दादासाहेब जोतिराम गोडसे आर्टस् कॉमर्स सायंस कॉलेज, वडूज
**Email**-vijay9011378729@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170804
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 8(I)
Pp. 14-18
August 2025

**Submitted:** 10 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**सारांश :**

"ऐतिहासिक दृष्टिकोनातून समाजशास्त्र आणि शाश्वत विकास: एक अभ्यास" या संशोधन लेखात शाश्वत विकासाच्या संकल्पनेचा समाजशास्त्रीय आणि ऐतिहासिक विश्लेषण मांडलेला आहे. लेखकाने जलवायू बदल, सामाजिक विषमता, पर्यावरणीय ऱ्हास यांसारख्या २१व्या शतकातील समस्यांची मुळे प्राचीन तत्त्वज्ञान, औद्योगिक क्रांती, उपनिवेशवाद आणि स्वातंत्र्योत्तर विकासाच्या धोरणांमध्ये शोधली आहे. भारतीय, ग्रीक व चिनी संस्कृतींमधील निसर्गस्नेही मूल्यांचा अभ्यास, औद्योगिक आणि उपनिवेशी काळातील असंतुलनाचे विश्लेषण आणि आधुनिक शाश्वत विकास संकल्पनेचा ऐतिहासिक पाया यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. समाजशास्त्र हे शाश्वततेसाठी केवळ उपयुक्त नव्हे तर अत्यावश्यक आहे, असा लेखकाचा निष्कर्ष आहे.

**मुख्यशब्द :** शाश्वत विकास, समाजशास्त्र, इतिहास, पर्यावरण, औद्योगिक क्रांती, उपनिवेशवाद, सामाजिक न्याय, प्राचीन तत्त्वज्ञान, संसाधनांचे केंद्रीकरण, भारत.

## प्रस्तावना

२१व्या शतकातील मानवी समाज अनेक समस्यांना सामोरा जात आहे—जलवायू बदल, पर्यावरणीय संकटे, सामाजिक विषमता, नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास, आणि जलद आर्थिक प्रगतीमुळे निर्माण होणारे असंतुलन. या सर्व समस्यांचा तोडगा शोधताना "शाश्वत विकास" ही संकल्पना केंद्रस्थानी आली आहे. पण ही संकल्पना नवी नसून तिचे मूळ समाजाच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि तत्त्वज्ञानातील परंपरेत आहे. समाजशास्त्राच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास शाश्वत विकास म्हणजे केवळ पर्यावरणाचे रक्षण नसून, सामाजिक न्याय, समता, समावेशकता आणि भविष्यकालीन पिढ्यांसाठी सुरक्षित जग निर्माण करणे होय [1]. शाश्वत विकास (Sustainable Development) हा शब्द सर्वप्रथम १९८७ मध्ये ब्रुंटलँड आयोगाच्या अहवालात वापरण्यात आला. "भविष्यातील पिढ्यांच्या गरजा धोक्यात न आणता वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करणे" अशी या संकल्पनेची मूलभूत व्याख्या आहे [2]. परंतु, या आधीच अनेक समाजांमध्ये, विशेषतः भारतासारख्या प्राचीन संस्कृतींमध्ये, निसर्गाशी सहजीवनाचे विचार स्पष्टपणे दिसून येतात. 'वसुधैव कुटुंबकम्', 'पंचमहाभूतांची समजूत', आणि 'जीव, जल, वनस्पती यांचा परस्पर संबंध' यासारख्या तत्त्वज्ञानात शाश्वततेचे मूळ आहे [3].

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17115365

**Address for correspondence:**
*विजय भगवान गुजर, (सहयोगी प्राध्यापक इतिहास विभाग प्रमुख ) दादासाहेब जोतिराम गोडसे आर्टस् कॉमर्स सायंस कॉलेज, वडूज*

**How to cite this article:**
*गुजर, . विजय . भगवान . (2025). ऐतिहासिक दृष्टिकोनातून समाजशास्त्र आणि शाश्वत विकास: एक अभ्यास. Journal of Research & Development, 17(8(I)), 14–18. https://doi.org/10.5281/zenodo.17115365*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

समाजशास्त्र हे मानवी समाजाच्या रचनेचे, व्यवहारांचे आणि संस्थात्मक प्रक्रियेचे अध्ययन करणारे शास्त्र आहे. हे शास्त्र सामाजिक न्याय, आर्थिक समता, लिंगभेद, जातभेद, वर्गसंघर्ष, आणि संस्थात्मक विकास यांसारख्या विषयांचा मागोवा घेत असते. त्यामुळेच शाश्वत विकासाचा विचार करताना समाजशास्त्रीय दृष्टिकोन अत्यावश्यक ठरतो. सामाजिक व्यवस्थांमध्ये बदल घडवून आणण्यासाठी समाजशास्त्र आवश्यक साधन ठरते, आणि हेच शाश्वत विकासाच्या व्यापक संकल्पनेला गती देते [4]. इतिहासातील विविध टप्प्यांवर मानवाने पर्यावरणाशी आपले नाते सतत बदलले आहे. आदिमानव काळात, मानव निसर्गावर अवलंबून होता. त्यानंतर कृषी क्रांतीनंतर स्थायिक जीवन सुरू झाले, संसाधनांचे नियोजन करण्यात आले. पुढे औद्योगिक क्रांतीनंतर मानवाने निसर्गावर वर्चस्व गाजवण्यास सुरुवात केली आणि निसर्गाचा अमर्याद वापर सुरू झाला. या क्रांतींनी आर्थिक प्रगती घडवली असली, तरी सामाजिक विषमता, प्रदूषण, जंगलांची कत्तल, आणि नैसर्गिक संतुलनाचा ऱ्हास ही संकटे निर्माण केली [5]. उपनिवेशवादाच्या काळात युरोपीय सत्तांनी भारतासह अनेक देशांतील संसाधने लुटली. पारंपरिक ज्ञान, स्थानिक स्वायत्तता, आणि स्थानिक विकासाच्या संकल्पना दुर्लक्षित झाल्या. शाश्वततेची परंपरा नष्ट करून केंद्रीकृत, भांडवली विकासाचा पुरस्कार झाला [6]. भारतात ब्रिटिश सत्तेने जल व्यवस्थापन, वन संरक्षक कायदे, आणि शेतीधोरणांमध्ये हस्तक्षेप करून शाश्वततेचा पारंपरिक पाया डळमळीत केला. परिणामी, सामाजिक संघर्ष, आदिवासी चळवळी, आणि पर्यावरण रक्षणाच्या मागण्या यांचा उदय झाला [7]. स्वातंत्र्यानंतर भारताने 'विकास' या शब्दाला औद्योगिकीकरण, मोठे प्रकल्प आणि उत्पादन यांच्याशी जोडले. यामुळे अनेकदा शाश्वत विकासाकडे दुर्लक्ष झाले. मोठ्या धरणांच्या प्रकल्पांनी लाखो लोकांचे विस्थापन केले, नैसर्गिक परिसंस्थांचा नाश केला आणि सामाजिक समतेचा मूलभूत मुद्दा दुर्लक्षित झाला. यामुळे चिपको आंदोलन, नर्मदा बचाव आंदोलन, आणि इतर स्थानिक लोकांनी चालवलेले सामाजिक संघर्ष उदयाला आले. या चळवळींनी शाश्वत विकासाचा सामाजिक पैलू केंद्रस्थानी आणला [8]. समाजशास्त्रज्ञांनी वेगवेगळया कालखंडात विविध मार्गांनी सामाजिक विकास आणि पर्यावरणीय न्याय यावर प्रकाश टाकला आहे. अमर्त्य सेन यांनी विकासाला फक्त जीडीपीचा प्रश्न न मानता, माणसाच्या क्षमतेशी जोडले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक समतेवर भर देऊन, विकासात सहभागी होण्याचा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार स्पष्ट केला [9]. आज 'शाश्वत विकास' ही संकल्पना एकट्या पर्यावरणापुरती मर्यादित न राहता सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक घटकांशी जोडलेली आहे. त्यामुळेच इतिहासाच्या प्रकाशात समाजशास्त्राच्या मदतीने शाश्वत विकासाचा विचार करणे आवश्यक ठरते. कारण इतिहासातूनच आपण समजू शकतो की कोणते समाज टिकून राहिले, कोणते पर्यावरणीय किंवा सामाजिक संकटांनी उद्ध्वस्त झाले, आणि कोणत्या मार्गांनी संतुलन साधले गेले. या शोधपत्राचा उद्देश म्हणजे शाश्वत विकासाच्या संकल्पनेचा सामाजिक इतिहास मांडणे, समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून त्याची चिकित्सा करणे, आणि ऐतिहासिक घटनांच्या पार्श्वभूमीवर भविष्यातील दिशा ठरवण्याचा प्रयत्न करणे होय. कारण केवळ वर्तमान संकटांवर उपाय शोधणे ही अपुरी प्रक्रिया ठरते; आपण इतिहासाचा अभ्यास करूनच शाश्वततेच्या दिशेने व्यापक आणि दीर्घकालीन योजना आखू शकतो [10].

**1. प्राचीन समाजांतील शाश्वततेचे तत्त्वज्ञान**

भारतीय, ग्रीक, चिनी आणि माया संस्कृती यांच्यात जीवनशैलीतील संतुलन, निसर्गाशी सहअस्तित्व आणि नैतिक मूल्ये यांना अत्युच्च स्थान दिले गेले होते. प्राचीन भारतात 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना आणि 'पंचमहाभूत' यांचा आदर ही शाश्वत विकासाची प्राथमिक रूपे होती. शाश्वत विकासाची संकल्पना आजच्या आधुनिक युगात जरी केंद्रस्थानी आली असली, तरी तिची मुळे मानवी संस्कृतीच्या आद्य अवस्थेपासूनच खोलवर रूजलेली आहेत. प्राचीन समाज हे निसर्गावर केवळ आधारित नव्हते, तर निसर्गाच्या चक्रांमध्ये समरस होऊन जगण्याचा प्रयत्न करणारे होते. त्यामुळे त्यांच्या जीवनपद्धती, तत्त्वज्ञान, धर्म, आणि सामाजिक संस्था या सर्वांत शाश्वततेची बीजे स्पष्टपणे आढळतात. भारतीय उपखंडातील प्राचीन संस्कृतीमध्ये, विशेषतः सिंधू संस्कृतीपासून सुरूवात केली तर, शाश्वततेचे अनेक पैलू दिसून येतात. त्या काळातील नागरी नियोजन, जल व्यवस्थापन, आणि वास्तुशास्त्र यात पर्यावरणाशी सुसंगततेचा स्पष्ट विचार होता. घरांची रचना, गटारींची व्यवस्था, विहिरींचे स्थान यामध्ये मानव आणि निसर्ग यांच्यातील संतुलन जाणवत होते. सिंधू संस्कृतीतील नागरी जीवन जरी सुसंस्कृत होते, तरी ते सजीव आणि निर्जीव निसर्गाशी विरोध न करता समन्वय साधत होते. वेदकालीन समाजामध्ये, निसर्ग ही केवळ साधनसंपत्ती नव्हती, तर तो एक सजीव, पवित्र घटक मानला गेला. अग्नी, वायु, जल, पृथ्वी, आणि आकाश – या पंचमहाभूतांची उपासना करताना मानवाने आपल्या वागणुकीत संयम, कृतज्ञता आणि समतोल पाळला. 'पृथ्वी माता आहे' ही संकल्पना केवळ उपमा नव्हे, तर जीवनशैलीचा एक भाग होती. प्राचीन ऋषींनी सांगितलेले नियम, यम-नियम, उपवास, वनविहार, यज्ञ ही सर्व

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

कृती निसर्गाशी असलेल्या सहजीवनाचा भाग होती. यातून निसर्गाच्या प्रत्येक घटकात दिव्यता पाहणारा दृष्टिकोन विकसित झाला. भारतीय परंपरेत 'धर्म' म्हणजे केवळ धार्मिक विधी नव्हे, तर जीवनशैली, मूल्यसंस्था आणि समाजव्यवस्था यांचा एक समन्वय होता. या धर्मात शाश्वततेचे अनेक पैलू समाविष्ट होते. 'अपरिग्रह', 'संतोष', 'स्वावलंबन', 'समत्व' अशा मूल्यांमुळे गरजांवर आधारित जीवनशैलीला प्रोत्साहन दिले गेले. संपत्तीची अधिक मिळवण्याची वृत्ती नाकारली गेली. 'जसे जंगल घ्यावे तसे लावावे', 'पाण्याचे योग्य व्यवस्थापन करावे', 'पशू-पक्ष्यांना त्रास न देता जगावे' – हे नियम सामान्य लोकांच्या आचरणात होते. प्राचीन चीनमध्ये 'ताओ' ही संकल्पना शाश्वततेशी निगडीत होती. ताओ म्हणजे निसर्गाचे नैसर्गिक प्रवाह, आणि मानवी जीवनाला त्या प्रवाहाशी सुसंगत ठेवण्याचा प्रयत्न. 'यिन-यांग' ही कल्पना देखील जीवनातील संतुलनावर आधारलेली होती – दिवसभर अंधारप्रकाश, उष्णतेचा थंडीसोबत असलेला समन्वय, आणि काम व विश्रांती यातील सुसंगती. अशा विचारांनी निसर्गातील विविधतेचा सन्मान राखला गेला आणि मानवी क्रियाशीलतेला एका मर्यादेत ठेवले गेले. [2] ऋग्वेदातील अनेक ऋचांमध्ये पर्यावरणाचे जतन करण्याची शिकवण दिली आहे. जसे की पृथ्वीची माता म्हणून पूजा, जलाचे संरक्षण, वनांचे महत्व इत्यादींचा उल्लेख आहे [3]. चिनी तत्त्वज्ञानात 'ताओ' आणि 'यिन-यांग' या संकल्पना मानवी जीवन आणि निसर्ग यांच्यातील संतुलनाचा पुरस्कार करतात. हेच तत्वज्ञान शाश्वत विकासाच्या मूलतत्त्वाशी संबंधित आहे [4]. या समाजांमध्ये नैतिक आचारसंहितेच्या आधारे संसाधनांचा मर्यादित वापर, पुर्नवापर व सहजीवनावर भर दिला जात असे. त्यामुळे आजही शाश्वततेच्या संकल्पना नव्याने घडवताना त्या ऐतिहासिक जडणघडणीचा विचार करणे आवश्यक ठरते.

**2. औद्योगिक क्रांती आणि सामाजिक असंतुलन**

औद्योगिक क्रांती ही आधुनिक जगाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण आणि परिवर्तनकारी घटना ठरली. १८व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडमध्ये सुरू झालेली ही क्रांती नव्या तंत्रज्ञानाच्या आणि यांत्रिकीकरणाच्या साहाय्याने उत्पादन प्रक्रियेत मोठे बदल घडवणारी ठरली. पारंपरिक हस्तकला व लघुउद्योगांवर आधारित अर्थव्यवस्था हळूहळू यांत्रिक व मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या कारखान्यांच्या अर्थव्यवस्थेत रूपांतरित झाली. परंतु या क्रांतीमुळे केवळ आर्थिक विकास झाला नाही, तर समाजरचनेत देखील तीव्र बदल घडले आणि सामाजिक असंतुलनाची प्रक्रिया सुरू झाली. औद्योगिक क्रांतीपूर्वी बहुतेक लोक शेतीप्रधान व ग्रामीण जीवनशैली जगत होते. कुटुंबव्यवस्था, कामाचे तास, सामाजिक नातेसंबंध हे सर्व गोष्टी स्थानिक व पारंपरिक मूल्यांवर आधारित होत्या. परंतु कारखान्यांच्या उदयामुळे लोक मोठ्या प्रमाणावर शहरांकडे स्थलांतर करू लागले. शहरांमध्ये रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या असल्या तरी त्या संधी अत्यंत कष्टदायक, कमी वेतनाच्या आणि अमानवी अटींवर आधारित होत्या. कामगारांना दिवसाचे १२ ते १६ तास काम करावे लागे, त्यांना आरोग्याच्या सुविधा मिळत नसत, आणि महिलांचा व बालकांचा देखील श्रमशक्ती म्हणून वापर होत असे. [5]

या नव्या औद्योगिक व्यवस्थेमुळे समाजात एक नवा वर्गभेद निर्माण झाला—कारखानदार आणि कामगार. एकीकडे भांडवलशाहीचा जन्म झाला आणि मालकवर्ग खूप श्रीमंत झाला, तर दुसरीकडे कामगारवर्ग दारिद्र्य, शोषण आणि अस्थिरतेच्या गर्तेत सापडला. या विषमतेमुळे समाजात असंतोष वाढू लागला. अनेक कामगार चळवळी उदयास आल्या आणि युनियनची संकल्पना विकसित झाली. औद्योगिक क्रांतीने स्त्रियांच्या जीवनावरही मोठा परिणाम केला. पारंपरिक घरगुती भूमिकेऐवजी अनेक स्त्रिया कामासाठी कारखान्यांत दाखल झाल्या. पण त्यांच्या श्रमाला कमी वेतन मिळत असे, आणि त्यांच्यावर दुहेरी जबाबदारी—काम आणि घर यांची—आवक झाली. स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा आरंभ येथे झाला असला तरी त्यात असमतोल व अन्यायही खोलवर रुजलेला होता. [6] शहरातील झोपडपट्ट्यांचा उदय, प्रदूषण, संसर्गजन्य रोगांचे वाढते प्रमाण, आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील कमतरता हे देखील औद्योगिक क्रांतीमुळे उद्भवलेले सामाजिक प्रश्न होते. औद्योगिक केंद्रे अत्यधिक लोकवस्तीमुळे दूषित होत गेली, आणि शहरी गरिबीची एक नवीन समस्या निर्माण झाली. या सर्व सामाजिक असमतोलाच्या पृष्ठभूमीवर काही विचारवंत, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारकांनी समाजात समानतेसाठी प्रयत्न सुरू केले. श्रमिक हक्क, सामाजिक कल्याण, आणि सार्वजनिक धोरणे हळूहळू जन्माला आली. थोडक्यात, औद्योगिक क्रांतीने मानवाला तांत्रिक प्रगती दिली असली, तरी तिचा सामाजिक परिणाम अत्यंत गहिरा व गुंतागुंतीचा ठरला. उत्पादन वाढले, पण समाजात विषमता, शोषण, आणि नैतिक मूल्यांची पीछेहाटही झाली. त्यामुळे औद्योगिक क्रांती ही सामाजिक असंतुलनाची सुरुवात ठरली, आणि त्यावर मात करण्यासाठी पुढील शतकांत संघर्ष सुरूच राहिला. [7]

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**3. उपनिवेशवाद आणि संसाधनांचे केंद्रीकरण**

१८व्या आणि १९व्या शतकातील युरोपीय वसाहतींनी विविध देशांतील नैसर्गिक संसाधनांवर नियंत्रण मिळवले. भारत, आफ्रिका, लॅटिन अमेरिका इ. प्रदेशांमध्ये ब्रिटिश, फ्रेंच, डच सत्तांनी स्थानिक सामाजिक-आर्थिक रचनेला धक्का दिला. परंपरागत पद्धतीने चालणाऱ्या शेती, जलप्रणाली, वनव्यवस्थापन आणि पारंपरिक शास्त्रांचा ऱ्हास झाला [8]. भारतात ब्रिटिश सरकारने 'पर्यावरणीय साम्राज्यवाद' राबवले, ज्यामध्ये जंगलांची व्यापारी दृष्टीने नोंदणी, शेतीत बदल, आणि खाणकामाच्या माध्यमातून नैसर्गिक संसाधनांचा शोषण झाला [9]. यामुळे पारंपरिक जीवनपद्धती आणि समाजातील सामूहिक निर्णयप्रक्रिया कमजोर झाली. या कालखंडातील सामाजिक शोषण, वनधिकारांवर मर्यादा आणि पारंपरिक ज्ञानाचा ऱ्हास हा आजच्या शाश्वत विकासातील न्यायालयीन लक्ष्यांचा भाग ठरतो. त्यामुळे उपनिवेशी इतिहासाची चिकित्सा ही शाश्वततेसाठी अत्यावश्यक आहे [10].

**4. स्वातंत्र्योत्तर विकास आणि शाश्वततेची विस्मृती**

भारतासारख्या नवस्वातंत्र्य राष्ट्रांनी १९५० नंतर विकासाची नवी दिशा स्वीकारली. औद्योगिकरण, धरणांची निर्मिती, हरित क्रांती आणि शहरीकरण हे मुख्य केंद्रबिंदू होते. यामध्ये 'विकास म्हणजे मोठे प्रकल्प' असा एककलमी दृष्टिकोन होता [11].
पण या धोरणांनी पर्यावरणाचे नुकसान आणि स्थानिक समाजांचे विस्थापन घडवले. नर्मदा खोऱ्यातील आदिवासींचे पुनर्वसन, चिपको आंदोलन, वर्धा जिल्ह्यातील वनसंपत्तीवरील संघर्ष ही काही उदाहरणे आहेत [12]. या संघर्षांतूनच शाश्वत विकासाच्या विचारांची बीजे रूजली. या काळात डॉ. एम.एस. स्वामिनाथन, सुंदरलाल बहुगुणा, मेधा पाटकर यांसारख्या विचारवंतांनी विकासाच्या सामाजिक बाजूचा विचार करण्याची गरज मांडली. त्यामुळे सामाजिक न्याय, समावेशक विकास आणि स्थानिक सहभाग ह्या शाश्वत विकासाच्या महत्त्वाच्या बाजू बनल्या [13]. १९८७ मध्ये ब्रुंटलँड आयोगाच्या अहवालाने 'शाश्वत विकास' या संकल्पनेला जागतिक मान्यता दिली. त्यामध्ये 'भविष्यातील पिढ्यांच्या गरजा धोक्यात न आणता वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करणे' असा शाश्वत विकासाचा अर्थ दिला गेला [14]. १९९२ मध्ये झालेल्या रिओ परिषदेने पर्यावरण आणि विकास यांचे संबंध स्पष्ट केले आणि स्थानिक इतिहासाचा आणि पारंपरिक ज्ञानाचा पुनर्विचार करण्याची गरज अधोरेखित केली [15]. यामध्ये स्त्री-समाज, आदिवासी परंपरा आणि ऐतिहासिक समुदायसंस्था यांच्या भूमिकेला मान्यता देण्यात आली. सध्या जागतिक शाश्वत विकासाच्या १७ उद्दिष्टांमध्ये (SDGs) सामाजिक समावेश, ऐतिहासिक अन्याय दूर करणे, आणि स्थानिक स्तरावर निर्णय प्रक्रियेचा भाग होणे यावर भर दिला जात आहे. याचे मूळ ऐतिहासिक संघर्षांमध्ये, समाजशास्त्रीय विचारांमध्ये आणि सांस्कृतिक जाणिवेत आहे [16].

**निष्कर्ष**

समाजशास्त्र आणि शाश्वत विकास यांचा परस्परसंबंध केवळ वर्तमानात नाही तर इतिहासात खोलवर आहे. प्राचीन तत्त्वज्ञान, औद्योगिक क्रांती, वसाहतवाद, विकासाच्या चुकीच्या संकल्पना आणि जागतिक धोरणे हे सर्व घटक शाश्वततेच्या दिशेने जाणाऱ्या प्रवासाचा भाग आहेत. या इतिहासाचा अभ्यास केल्याशिवाय शाश्वत विकासाच्या संकल्पना केवळ धोरणात्मक घोषणांपुरत्या मर्यादित राहतील. समाजशास्त्राचे ऐतिहासिक दर्शन हे पर्यावरण, समाज आणि अर्थव्यवस्थेतील संतुलन साधण्यासाठी मार्गदर्शक ठरते. म्हणूनच इतिहासाचे परिपूर्ण आकलन हेच शाश्वततेच्या दिशेने खऱ्या अर्थाने पाऊल उचलणे होय.

**संदर्भ**

1. चितळे, स.डी. (२०१०). समाजशास्त्राची ओळख. पुणे: अमेय प्रकाशन.
2. देशपांडे, वि.स. (२०१५). भारतीय तत्त्वज्ञानातील पर्यावरण दृष्टिकोन. नागपूर: सांस्कृतिक अभ्यास मंडळ.
3. भाटे, ए.एन. (२०१८). ऋग्वेदातील पर्यावरण विज्ञान. औरंगाबाद: वेदविद्या प्रतिष्ठान.
4. झांग, यु. (२०१३). Ancient Chinese Philosophies and Sustainability, पेकिंग युनिव्हर्सिटी.
5. पाटील, वि.के. (२०१७). औद्योगिक क्रांती आणि समाज. कोल्हापूर: इतिहास संशोधन मंडळ.
6. Marx, K. & Engels, F. (1848). The Communist Manifesto.
7. फुक्स, एम. (२०१९). पर्यावरणीय इतिहास आणि सामाजिक न्याय. मुंबई: बुकगंगा.
8. गांगुली, बिस्वनाथ. (२००५). भारतीय उपनिवेशवादाचा इतिहास. दिल्ली: पीपल्स प्रकाशन.
9. गुहा, रामचंद्र. (१९८९). The Unquiet Woods. दिल्ली: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.
10. कुलकर्णी, एस.जी. (२०२०). पर्यावरण आणि आदिवासी संघर्ष. नाशिक: मानव संवाद प्रकाशन.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

11. प्रधान, आर.डी. (२००१). भारताचा नियोजन इतिहास. पुणे: ज्ञानदीप.
12. बहुगुणा, सुंदरलाल. (१९९४). हिमालयाचे अश्रू. टिहरी: चिपको फाउंडेशन.
13. पाटकर, मेधा. (२००३). नर्मदा डायरी. मुंबई: जन आंदोलने.
14. World Commission on Environment and Development (1987). Our Common Future.
15. United Nations Conference on Environment and Development (1992). Rio Declaration.
16. United Nations (2015). Transforming Our World: The 2030 Agenda for Sustainable Development.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची ग्रामीण भागातील सार्वजनिक वाहतुकीमध्ये महत्त्वाची भूमिका

**सचिन गजानन बोढाले[1], डॉ. माधुरी के. तानुरकर[2]**
[1,2] कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगाव, जिल्हा यवतमाळ
**Email-**sachinbodhale1985@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170805
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 8(I)
Pp. 19-22
August 2025

**Submitted:** 10 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**गोषवारा**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे एकंदरीतच ब्रीदवाक्य आहे की गाव तेथे बस या म्हणीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहनाच्या बसेस सर्व ग्रामीण भागातील दूरवर पसरलेल्या शहरापासून किंवा जिल्ह्याच्या ठिकाणापासून लांब असलेल्या शेवटच्या गावापर्यंत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बस आपली सेवा अविरत देत आहे. एकंदरीतच ग्रामीण भागाला जोडण्याचे कार्य महामंडळाच्या बसेसने पार पाडले आहे. याच अनुषंगाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची स्थापना झाल्यापासून तर आजतागायत निश्चितच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ ग्रामीण भागातील जनतेला एक विकासाच्या प्रवाहात आणण्याच्या अनुषंगाने निश्चितच आपली भूमिका चोखपणे पार पडताना आपल्याला सदैव दिसत आहे. महाराष्ट्रातील भौगोलिक स्थितीचा आढावा घेतला तर निश्चितच महाराष्ट्र हा काही शहरी भाग वगळता निश्चितच ग्रामीण खेड्यांनी वसलेला राज्य म्हणून आपण त्याकडे बघू शकतो. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसची जास्त फेऱ्या ह्या ग्रामीण भागामध्ये चालत असतात या केवळ नफा कमवण्याच्या अनुषंगाने आपला दैनंदिन व्यवहार पार पाडत नाही तर निश्चितच या सर्व बाबीच्या मागे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा हेतू हाच असतो की, लोकांना जास्तीत जास्त सेवा उपलब्ध करून देणे याच अनुषंगाने सातत्याने आपले कार्य पार पाडत आहे. ग्रामीण भागातील जनतेला एक शहराशी किंवा तालुक्याच्या ठिकाणी जाण्याचे कमी खर्चा मधले साधन म्हणजेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसच्या माध्यमातून ग्रामीण जनतेला खूप सोय झाली आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा असा मानस आहे की, जास्तीत जास्त खेड्यापर्यंत आपली सेवा देऊन सातत्य ठेवण्याच्या अनुषंगाने ग्रामीण विकासाच्या अनुषंगाने आपली भूमिका चोखपणे बजावताना आपल्याला निश्चितच दिसते. स्वातंत्र्यानंतरच्या काही कालखंडामध्ये निश्चितच वाहतूक प्रणाली ही ग्रामीण भागामध्ये पाहिजे त्या प्रमाणात विखुरलेली नव्हती, पण महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या माध्यमातून ज्या ठिकाणी रस्ते त्या ठिकाणी बस सहजरीत्या उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सातत्याने कटिबद्ध व प्रयत्नशील होते. याचाच परिपाक म्हणजे आज निश्चितच ग्रामीण भागामध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे बसेस संपूर्ण ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात विखुरलेल्या आपल्याला दिसते.

**बीजशब्द -** ग्रामीण भागातील जनतेला सोय, शैक्षणिक सुविधेसाठी बस, प्रशासकीय कामासाठी सोय, आरोग्याच्या दृष्टीने फायदेशीर, दळणवळण शक्य, वस्तूची किंवा मालाचे स्थानांतरण, मोठ्या भू-भागात वाहतूक जोडणी आणि सार्वजनिक वाहतूक प्रणालीचा विस्तार.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17115371

**Address for correspondence:**
*सचिन गजानन बोढाले , कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगाव, जिल्हा यवतमाळ*

**How to cite this article:**
*बोढाले, . सचिन . गजानन ., & तानुरकर, . माधुरी . के . (2025). महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची ग्रामीण भागातील सार्वजनिक वाहतुकीमध्ये महत्त्वाची भूमिका. Journal of Research & Development, 17(8(I)), 19–22.*
https://doi.org/10.5281/zenodo.17115371

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**प्रस्तावना**

भारत देश हा निश्चितच कृषी कृषीप्रदान म्हणजेच जवळपास 70% च्या वर आपल्या देशातील जनतेचा मुख्य व्यवसाय कृषी क्षेत्र म्हणून बघू शकतो. याचाच परिपाक म्हणजे कृषीसाठी मुबलक भूमी ही आपल्याला ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात भूभाग उपलब्ध आहे. त्याच अनुषंगाने एवढ्या मोठ्या लोकसंख्येचा निश्चितच ग्रामीण भागात खेड्यात वास्तव्य करताना आपल्याला दिसत आहे. स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडामध्ये निश्चितच दळणवळणाची किंवा जाणे येण्याचे साधन हे जनतेकडे किंवा सामान्य लोकांसाठी केवळ एकमेव पर्याय म्हणजेच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची लाल परी किंवा बस हीच उपलब्ध होती. ग्रामीण भागातील निश्चितच शिक्षणाची क्रांती घडून आणण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसचा निश्चितच आपल्याला वाटा कमी लेखता येणार नाही. कारण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी शिक्षण ग्रहण करण्याच्या अनुषंगाने या महामंडळाच्या बसच्या माध्यमातून निश्चितच मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना त्याचा लाभ घेता आला. आजही सातत्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी त्याचा लाभ आपल्याला घेतानी दिसत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ निश्चितरित्या सार्वजनिक वाहतुकीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते कारण सार्वजनिक वाहतुकीचे जाळे निश्चितच संपूर्ण महाराष्ट्रात - शहरी, ग्रामीण आणि अगदी दुर्गम ठिकाणी पसरलेले आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ चे उद्दिष्ट पूर्णपणे सामाजिक दृष्टिकोन ठेवून पार पाडत आहे. परिवहन सेवा प्रदान करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ जमीन, पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करते आणि राज्य स्तरावर रोजगार निर्मितीला मदत करते. महामंडळाची स्थापना विशेष कायद्यांतर्गत करण्यात आली आहे आणि 60 वर्षांहून अधिक यशस्वीरित्या पूर्ण झाली आहे. उद्दिष्टे आणि उद्दिष्टांनुसार, प्रवाशांना विविध सुविधा पुरवणे हे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची मूलभूत कर्तव्य आहे. 2011 च्या जनगणनेनुसार 54.78 टक्के लोक ग्रामीण भागातील खेड्यांमध्ये राहतात आणि त्यांच्या वाहतुकीसाठी राज्य परिवहन हा एक मोठा दिलासा आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

कोणतेही संशोधन पूर्णत्वास न्यावयाचे असेल तर, निश्चितच त्या संशोधनाला एक दिशा देण्याच्या अनुषंगाने काही उद्दिष्टे निर्धारित करणे अत्यावश्यक असते. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची ग्रामीण भागाच्या दृष्टिकोनातून जनतेसाठी कोणत्या सेवा किंवा महत्त्व कशा पद्धतीने बजावते याचे पुढील उद्दिष्टाच्या माध्यमातून आपल्याला सविस्तर अध्ययन करता येईल.

1.सार्वजनिक वाहतुकीमध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वाहतूक सेवेच्या व्यापकतेचे अध्ययन करणे.

2.ग्रामीण भागामध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वाहतूक सेवेच्या महत्त्वाचा आढावा घेणे.

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची ग्रामीण भागासाठी महत्त्वाची भूमिका:-**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ महाराष्ट्रातील ग्रामीण भागात महत्त्वाची भूमिका बजावते. निश्चितच ग्रामीण भागातील लोकांसाठी एक सार्वजनिक वाहतुकीचे साधन म्हणून निश्चितच बगले जाते. यामध्ये प्रामुख्याने लोक आणि वस्तूंना जोडणे आणि अनेक रहिवाशांसाठी वाहतुकीचे प्राथमिक साधन प्रदान करणे. लोकांच्या वाहतुकीच्या साधनांमध्ये प्राथमिक साधन म्हणून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील सेवेच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचण्याचे कार्य ग्रामीण भागामध्ये एक चांगला बांधिलकीचा उपक्रम आहे.

- **वाहतुकीची जोडणी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस महाराष्ट्रातील शहरे आणि गावे आणि शेजारील राज्यांना जोडतात, ज्यामुळे ग्रामीण रहिवाशांच्या दैनंदिन जीवनाचा कणा बनतात. या माध्यमातून निश्चितच ग्रामीण भागातील व निमशेरी भागातील लोकांना एक वाहतुकीचे चांगले साधन सहजरीत्या उपलब्ध होते व या माध्यमातून जे ग्रामीण भागातील शेतकरी वर्ग असेल किंवा इतर रोजगारासाठी प्रयत्नशील असलेल्या साठी वाहतुकीच्या जोडणीच्या माध्यमातून निश्चितच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सार्वजनिक वाहतूक प्रणालीची भूमिका अनन्य साधारण आहे. वाहतुकीच्या विपुल अशा जोडणीच्या माध्यमातून निश्चितच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक शैक्षणिक क्रांती घडून आणण्यासाठी मोठा वाटा निश्चितच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा आपल्याला नाकारता येत नाही. कारण मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण सहजरीत्या घेता आले पाहिजे या अनुषंगाने निश्चितच काही भागांमध्ये अशा बसेसची संख्या केवळ महसूल प्राप्तीसाठी नाही, तर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती मध्ये कुठेही खंड पडू नये यासाठी

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

राबवली जाते. या अनुषंगाने ह्या फेऱ्या निश्चित चालू असते केवळ शैक्षणिक सुविधेसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने काही भागांमध्ये निश्चितच बसेस पुरविलेल्या आहे.

- **आर्थिक वाढ**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची सार्वजनिक वाहतूक महाराष्ट्र आणि शेजारील राज्यांमध्ये आर्थिक वाढ आणि विकास वाढविण्यात मदत करते. या माध्यमातून निश्चितच एका ठिकाणावरील वस्तू किंवा सेवा ची पूर्तता दुसऱ्या ठिकाणी सार्वजनिक वाहतूक प्रणालीच्या माध्यमातून सहजरीत्या पूर्तता साधली जाते व विशिष्ट भूभागाच्या किंवा बाजारपेठेच्या ठिकाणी निश्चितच सामान्य ग्राहक वर्ग सार्वजनिक वाहतूक प्रणालीच्या माध्यमातून सहजरीत्या पोहोचू शकतो. याचाच परिपाक म्हणजे अशा भागामध्ये किंवा ठिकाणांमध्ये आर्थिक समृद्धी सहजरीत्या साधलेली आपल्याला दिसते.

- **रोजगार**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या माध्यमातून निश्चितच हजारो प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नोकऱ्या पुरवते आणि लाखो लोक त्यांच्या उपजीविकेसाठी तिच्या सेवांवर अवलंबून आहेत. म्हणजेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन परिवहन महामंडळाच्या माध्यमातूनच निश्चितच प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष मोठ्या प्रमाणात रोजगार सहजरित्या उपलब्ध झालेला दिसतो. महामंडळातील बसेसच्या माध्यमातूनच निश्चितच इतरही काही क्षेत्राचा रोजगारामध्ये मोठा वाटा वाढतानी आपल्याला सातत्याने दिसत आहे.

- **माल वाहतूक**

कृषी मालाची निर्मिती ही जास्तीत जास्त ग्रामीण भागामध्ये आपल्याला पाहायला मिळते कारण भारत हा कृषीप्रधान देश म्हणून सातत्याने कृषी क्षेत्रामध्ये मोठी प्रगती घडवून आणत आहे. शेतकऱ्याने पिकवलेले वस्तू किंवा उत्पादन हा निश्चित कालावधीमध्ये बाजारपेठेमध्ये किंवा शहराच्या ठिकाणी पोहोचवणे गरजेचे असते. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ शेतकऱ्यांना त्यांचा वस्तू शहरांमध्ये नेण्यास मदत करते. हे सामान, मेल आणि वस्तूंची वाहतूक करण्यासाठी पार्सल सुविधा देखील देते. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने कोविड-19 परिस्थितीच्या नंतर मोठ्या प्रमाणात पार्सल वाहतुकीवर भर देण्यात आलेला आहे.

- **स्वच्छ हवा**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ ग्रामीण भागातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी पर्यायी इंधन धोरणाकडे वाटचाल करत आहे. यामध्ये त्याच्या ताफ्यात सीएनजी बसेस समाविष्ट करणे आणि सीएनजी आणि एलएनजीवर चालण्यासाठी डिझेल बसेसचे मोठ्या प्रमाणात समाविष्ट आहे समाविष्ट आहे. या माध्यमातून निश्चितच पर्यावरणाचे समतोल साधनांमध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आपली भूमिका बजावताना सातत्याने दिसत आहे.

- **इलेक्ट्रिक बसेस**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने डिझेलवर चालणाऱ्या बसेसला सहज आणि शांत पर्याय देण्यासाठी इलेक्ट्रिक बसेस सादर केल्या आहेत. या इलेक्ट्रिक बसेस आपल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने मोठ्या प्रमाणात प्रत्येक विभागांमध्ये दिलेले आपल्याला दिसतात या बसेसच्या माध्यमातून निश्चितच पर्यावरण समतोल साधला जातो व भविष्यामध्ये निर्माण होणारे ज्या काही इंधनाच्या समस्या असेल ह्या परिस्थिती हाताळण्यासाठी निश्चितच हा उपक्रम वाखण्याजोगा आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सरकारी एजन्सी, खाजगी क्षेत्र आणि नागरिकांसोबत वाहतूक गरजा ओळखण्यासाठी आणि धोरणात्मक योजना विकसित करण्यासाठी देखील कार्य करते. विविध खाजगी क्षेत्र आणि सरकारी विभाग यांच्याशी सातत्याने सल्लामसलत करून व नागरिकांच्या वाहतूक गरजा कशा पद्धतीने पूर्ण करता येईल व सामान्य जनतेला सार्वजनिक वाहतूक प्रणालीचा कशा पद्धतीने फायदा जास्तीत जास्त प्रमाणात देता येईल. अशा प्रकारच्या धोरणात्मक योजनाकडे सातत्याने प्रयत्नशील असते. सार्वजनिक वाहतूक प्रणाली चांगल्या पद्धतीने ग्रामीण भागातील व इतर निमशहरी भागातील लोकांपर्यंत सहजरीत्या पुरवण्यासाठी ज्या काही नाविन्यपूर्ण योजना आणता येईल त्याचा सातत्याने अंगीकार करण्याचा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा मानस आपल्याला दिसतो.

**निष्कर्ष**

वरील संशोधनातील निष्कर्षाच्या उपरांत निश्चितच या मतावर ठामपणे ठसा उमटवता येईल की, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसचा वाटा हा निश्चितच ग्रामीण जनतेला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी अनुकूलित होता. सातत्याने आजही

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

विकासाच्या प्रवाहात किंवा मुख्य प्रवासी जोडण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा वाटा सातत्याने आपला सहभाग दर्शवित आहे. सर्वांगीण विचार केला तर निश्चितच ग्रामीण भागामधील केवळ काही असे खेडे आहे की अशा ठिकाणी जाण्याच्या साठी केवळ दिवसातील दोन वेळेसच बसेसच्या फेऱ्या असतात. जसे की, सकाळची बस आणि सायंकाळची बस या बसेसची ग्रामीण भागातील जनता निश्चितच आतुरतेने वाट बघत असते. कारण त्यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहतूक करण्याच्या अनुषंगाने किंवा दळणवळणाच्या अनुषंगाने दुसरे पर्याय उपलब्ध नसतात. म्हणूनच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या माध्यमातून ग्रामीण जनतेसाठी ही एक सोय बसेसच्या माध्यमातून निश्चितच उपलब्ध झाली. त्याचप्रमाणे निश्चितच ग्रामीण भागामध्ये लोकांना थांबण्यासाठी बस निवारा म्हणजेच उन्हापासून पावसापासून रक्षण करण्यासाठी ज्या ठिकाणी बस थांबतात त्या ठिकाणी चांगल्या पद्धतीचे बस निवारा उभारल्याचे आपल्याला संपूर्ण ग्रामीण भागामध्ये दिसत आहे. ग्रामीण भागातील कोणतेही प्रशासकीय काम असेल किंवा शैक्षणिक काम असेल किंवा आरोग्याशी संबंधित काम असेल तर या कामाच्या अनुषंगाने निश्चितच तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागते. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसच्या माध्यमातून निश्चितच हे सर्व कार्य व्यवस्थितरित्या पार पाडून ग्रामीण भागातील लोक आपल्या गावाकडे परतण्याचा एक खात्रीशीर आणि सुरक्षित मार्ग म्हणून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसकडे पाहते. ग्रामीण भागामध्ये केवळ नफ्याचा किंवा महसुलाचा विचार न करता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आपल्या बसेस या केवळ ग्रामीण भागातील जनतेच्या सोयीसाठी व त्यांना मिळणाऱ्या फायद्याच्या अनुषंगाने निश्चितच चालवल्या जातात.

**संदर्भ**

1)Chaudhari, A. (2015). A Study of Facilities Provided by Maharashtra State Road Transport Corporation at Bus Station to Passengers in Maharashtra. The International Journal of Business & Management, 3(4) page no. 42-44

2) सोमलकर प्रकाश, डॉ. डोंगरे राजेश, भारतीय अर्थव्यवस्था, सर साहित्य केंद्र, नागपूर.

3) www.maharashtra.gov.in.

4) www.wikipedia.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# ग्रंथालय व्यवस्थापन प्रणाली मध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेची (AI) भूमिका

**भारती बेदील माने**
ग्रंथालय विभाग,डी.जे.जी. एसी.एस. कॉलेज वडूज
**Email-**pksutar67@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170806
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8(I)
Pp. 23-26
August 2025
**Submitted:** 10 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

"Artificial Intelligence for all" must be that everyone Can take advantage of the technological revolution underway and access its fruits, notably in terms of innovation and knowledge." - UNESCO

**सारांश**

जागतिक पातळीवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव शिक्षण, ज्ञान, अध्ययन, अध्यापन, संशोधन, व्यवसाय, व्यापार व सेवा क्षेत्रांमध्ये अधिक जागरूकतेने होताना दिसत आहे. गुरु स्कूलचे रूपांतरण ई-स्कूल ते व्हच्युअल(virtual) स्कूलमध्ये होऊ पाहत आहे. आर्टिफिशियल इंटेलिजंट विविध क्षेत्रांमध्ये क्रांती घडवत आहे. ग्रंथालय याला अपवाद नाही लायब्ररी मॅनेजमेंट सिस्टममध्ये ए आयचा समावेश सेवा सुलभता, अध्ययावत डिजिटल जगाची जुळवून घेण्यास, उपभोग त्यांचा अनुभव वाढवण्यास, कृत्रिम बुद्धिमत्ता ग्रंथालयामार्फत उपयुक्त ठरत आहे. ग्रंथालयाच्या आधुनिक व्यवस्थापनात कृत्रिम बुद्धिमत्तेव्दारे प्रतिसाद देणारी अनेक साधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत व अमलातही आणली जात आहे. मानवी बुद्धिमत्तेचा काही वैशिष्ट्ये अनुकरण करणारी तंत्र जसे की धारणा, शिक्षण, तर्क, समस्या सोडवणे, भाषा, संबंध आणि सृजनशील कार्याचा आढावा या पेपरमध्ये घेण्यात येत आहे.

**कीवर्ड -** ग्रंथालय व्यवस्थापन, कृत्रिम बुद्धीमत्ता (AI) माहितीच्या स्परीस्फोटाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी माहिती व्यवस्थापन फिल्टरिंग आणि योग्य साधनांचा वापर करून उपलब्ध माहितीचा उपभोक्ता योग्य वापर करू शकतो.

**ग्रंथालय व्यवस्थापन –**

ग्रंथालयातील कार्याचे आणि संसाधनांचे प्रभावी व्यवस्थापन करणे पुस्तके नियतकालिके आणि इतर माहिती स्त्रोतांचे संपादन वर्गीकरण आणि वितरण तसेच वापर कर्त्यासाठी माहिती सेवांचा समावेश होतो. ग्रंथालय व्यवस्थापनामध्ये नियोजन, संघटन, कर्मचारी व्यवस्थापन, नेतृत्व, नियंत्रण व माहिती व्यवस्थापन माहितीचे संकलन, वर्गीकरण आणि वितरण करणे तंत्रज्ञान व्यवस्थापन प्रणालीव्दारे कामे स्वयंचलित करणे.

**कृत्रिम बुद्धिमत्ता (AI)-** कृत्रिम बुद्धिमत्ताची उत्पत्ती व क्रांती ही संकल्पना औपचारिक शोध 20व्या शतकाच्या मध्यात सुरू झाला. कृत्रिम बुद्धिमत्ता हा शब्द प्रथम 1956 साली जॉन मॅकाथी यांनी डॉटमाऊथ कॉन्फरन्स मध्ये केला होता. ए आय संशोधनाला 1950 च्या दशकात सुरुवात झाली.

**ए आय व्याख्या-** कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे मानवाप्रमाणे विचार करण्यासाठी आणि शिकण्यासाठी प्रोग्रॅम केलेल्या मशीनमध्ये मानवी बुद्धिमत्तेचे अनुकरण करणे ए आय तंत्रज्ञानामध्ये मशीन लर्निंग भाषा प्रक्रिया रोबोटिक्स आणि डेटा विश्लेषण यांचा समावेश आहे जे कार्यक्षमता आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रिया सुधारण्यासाठी विविध कार्यक्रमांमध्ये लागू केले जाऊ शकते.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17115379
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*भारती बेदील माने, ग्रंथालय विभाग,डी.जे.जी. एसी.एस. कॉलेज वडूज*

**How to cite this article:**
*माने, . भारती . बेदील . (2025). ग्रंथालय व्यवस्थापन प्रणाली मध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेची (AI) भूमिका. Journal of Research & Development, 17(8(I)), 23–26.* https://doi.org/10.5281/zenodo.17115379

मानवी बुद्धिमत्तेची आवश्यकता असलेली कामे करण्यास मशीनला सक्षम करतात त्यांच्या आधारे सामान्यतः मानवी बुद्धिमत्तेची आवश्यकता असणारी कामे शिकणे, तर्क करणे, समस्या सोडवणे, धारणा, उच्चार ओळखणे, भाषा समजणे यासारख्या विस्तृत क्रियांचा समावेश होतो.

**ए आय कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) जागतिक शिखर परिषद**

भारताने 27 देश युरोपीय महासंघ यांच्या मदतीने ब्रिटन येथे पहिली जागतिक शिखर परिषद भरवली या परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सुरक्षे संदर्भात पहिला करार स्वाक्षरी झाली या परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मूल्यमापन व उत्तरदायित्व विषयी करार करण्यात आले ब्रिटन पार्क येथे झालेली बैठक लेचली जाहीरनामा म्हणून ओळखली जाते. या जागतिक परिषदेत केंद्रीय इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री राजू चंद्रशेखर सहभागी होते आर्टिफिशल इंटेलिजंट संदर्भात समिती ही महत्त्वाची बैठक होती. समाज विकास व समाज हितासाठी ए आय कार्य भविष्यकाळासाठी एक पर्वणी ठरणार आहे ए आय म्हणजे काय तर यंत्राने मनुष्याप्रमाणे वागणे विचार करणे व काम करणे अल्गोरिदमव्दारे तर्कशुद्ध पद्धतीने प्रॉब्लेम सोडवणे शैक्षणिक सामाजिक आर्थिक विकासात ए आय खूप मोलाचा वाटा आहे. तर्कशुद्ध पद्धतीने सामाजिक प्रॉब्लेम सोडवणे.

**ग्रंथालय प्रणालीत ए आय ची भूमिका-** ग्रंथालयात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर ही एक क्रांतिकारी ट्रेड म्हणून उदयास येत आहे ग्रंथालय व्यवस्थापनावर आर्टिफिशल इंटेलिजंटचा प्रभाव होताना दिसून येत आहे पारंपरिक ग्रंथालय सेवा व डिजिटल जगाशी जुळवून घेण्यास एआय तंत्रज्ञान वापरकर्त्यांना संबंधित माहिती शोधणे सुलभ होत आहे. या तंत्रज्ञानामुळे संघटन, वर्गीकरण, स्वयंचलित पद्धतीव्दारे सुलभ झाले आहे. ग्रंथालय कर्मचारी व उपभोक्ता यांचा वेळ वाचू शकतो चांगल्या कारणासाठी स्मार्ट तंत्रज्ञांचा वापर डिजिटल अपग्रेड राखता येतात. संसाधनाची पुनप्राप्ती, स्वयंचलित संसाधन व्यवस्थापन हे ए आय तंत्रज्ञानामुळे अधिक कार्यक्षम वापर करता महत्त्वाची भूमिका बजावते. इंडेक्सिंग, कॅटलोगिंग आणि संसाधनाची पुनप्राप्ती ए आय तंत्रज्ञानाव्दारे सुधारण्यास मदत होते व शक्तिशाली शोधन क्षमतेच्या आधारे जलद डेटाची पुनप्राप्ती ही शक्य झाले आहे ग्रंथालय संगणकीकरणाच्या कार्यात ए आय ग्रंथालय साधन व सेवांच्या विविध पैलूमध्ये मुलग्रह बदल घडत आहे. ए आय माध्यमातून उपभोक्त्यांचा अनुभव वाढत आहे. स्वयंचलित साधने कार्यक्षमता व संसाधन व्यवस्थापन अधिकाधिक सक्षम होत आहे ग्रंथालयात ए आय च्या वापरामुळे प्रचंड माहितीच्या स्त्रोतातून कमीत कमी वेळेत माहितीची प्रतिप्राप्ती सुलभ होण्यास मदत होत आहे. ए आयच्या मदतीने पुढील कामे सुलभतेने होण्यास मदत होत आहे.

- ग्रंथालय संगणकीकरण • डेटाच्या जतन व डिजिटायझेशन
- डेटा विश्लेषण • डेटा व ज्ञान व्यवस्थापन, मेटा डेटा
- माहितीची सुरक्षा • ग्रंथालय सेवा परिवर्तन
- अल्गोरिदमिक बायस • गुगल एआय, चाट-बॅट
- अलेक्सा • लिब्रीस अल्मा
- रिसर्च सपोर्टर • ओ सी एल सी
- वैयक्तिक सहाय्य • स्वयंचलित काटलॉग

**ग्रंथालयात ए आयची कार्य**

1) **डेटा मायनिंग व मजकूर विश्लेषण -** माहितीच्या प्रचंड साठ्यातून उपभोगत्याला ए आय माध्यमातून डेटा विश्लेषण करून माहितीमधून उपयुक्त डेटा गोळा करून देणे सुलभ होत आहे. अभ्यास व संशोधन कार्यात याचा मोठ्या प्रमाणात उपयोग होत आहे.
2) **डिजिटल संग्रह -** ए आय च्या माध्यमातून ग्रंथालय यातील दुर्मिळ व नाजूक साहित्याचे डिजिटायझेशन करून ऑप्टिकल कॅरेक्टर रेकग्निशन तंत्राव्दारे स्कॅन केलेल्या डेटामधून ए आय अल्गोरिदम वापरून डिजिटल संग्रहाचे वर्गीकरण व व्यवस्थापन सोपे होत आहे.
3) **क्युरेशन प्रणाली -** याअंतर्गत अल्गोरिदम प्रणालीच्या साह्याने संशोधकांना माहितीचा जलद शोध संसाधनेव्दारा वैयक्तिकरित्या उपलब्ध होणे सहज शक्य झाले आहे.
4) **भविष्यकालीन गरजांसाठी व्यवस्थापन विश्लेषण-** स्पर्धेच्या युगात संशोधकांना ग्रंथालयाकडून संसाधनाच्या मागणी आगाऊ योजना आखण्यासाठी निवडक, भविष्यकाळासाठी उपयोगी माहिती देण्यासाठी ट्रेड आणि बाह्य चलांचा वापर केला जातो.
5) **सुलभ सेवा** - स्वयंचलित ए आय तंत्रज्ञानाव्दारे उपभोगत्यांना सेवा तत्पर व सुलभ, आय आधारे ऑडिओ व्हिज्युअल माध्यमातून माहिती विषयक सेवा यूजर फ्रेंडली, मिळत आहेत दिव्यांग उपभोगत्यांना याचा चांगला फायदा होत आहे. अनेक ए आय चलित सॉफ्टवेअरच्या माध्यमातून ग्रंथालय व्यवस्थापन समृद्ध होत आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

6) **माहिती परिपूर्ती -** ए आय च्या आधारे शोध इंजिनल अल्गोरिदम डेटाबेस आणि लायब्ररी कॅटलॉगच्या आधारे माहितीचा शोध सुलभ होतो. नॅचरल लैंग्वेज प्रोसेसिंग (NLP) च्या माध्यमातून अचूक शोध घेता येतो.
7) **चॅटबॅट्स व्हर्च्युअल मार्गदर्शन -** ग्रंथालयातील उपलब्ध सेवा सुविधांचा व संसाधनाच्या आधारे चॅटबॅटवर चल तंत्रज्ञानाच्या आधारे उपभोक्त्यांच्या प्रश्नांची उत्तरे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून देणे तत्पर व अधिक सुलभ होते.
8) **सामग्री निर्मिती -** ए आय तंत्रज्ञानाच्याव्दारे संदर्भ सामग्रीसाठी मेटा डेटा, सारांश तयार करून सामग्री निर्मिती वाढवता येते. निरस व स्वयंचलित पद्धतीने ही साधने वेळ व श्रमाची बचत करत व ग्रंथालयाच्या इतर अधिकतम धोरणासाठी वेळ देता येतो.
9) **सुरक्षा-** कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे प्लेगरीझम सारख्या अनेक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रंथालयामध्ये फसवणूक शोधणे याचबरोबर सायबर गुन्हेगाराकडून चोरी होणाऱ्या साहित्याची, मालमत्तेचे संरक्षण करणे सुलभ झाले आहे.
10) **भाषांतरण व भाषा समर्थन-** ए आय च्या माध्यमातून बहुभाषिक ग्रंथ संग्रहातून ग्रंथालयाव्दारे संचलित भाषा प्रणाली च्या माध्यमातून अनेक भाषाव्दारे सेवा प्रदान करता येते. व्हच्युअल सेवा प्रणाली अनेक भाषांत समर्थन देण्यास सहयोगी ठरते भाषांतर सेवामुळे विविध समुदाय ग्रंथालय सेवांमध्ये सहभागी होऊन समावेशक व सुलभ शिक्षण वातावरण निर्मिती करता येते.
11) **वैयक्तिकृत सहाय्य –** व्हच्युअल सेवामुळे ग्राहकांना वैयक्तिकृत सहाय्य करता येते साधने शोधण्यास कॅटलॉग नेविगेट करण्यास उपभोगत्यांना संबंधि माहिती मिळवण्यास मदत होऊन त्यांच्या गरजांवर आधारित अनुकूल सेवा प्रदान करून एकूण वापरकर्त्यांचा अनुभव वाढतो.
12) **24तास सेवा -** ग्रंथालयाच्या माध्यमातून ए आयच्या आधारे व्हच्युअल असिस्टच्या महत्त्वाचा फायदा म्हणजे वापर कर्त्यांना 24 तास मदत उपलब्ध होते. ग्राहक कधीही माहिती मिळू शकतात आणि मार्गदर्शनही घेऊ शकतात.
13) **शिफारस प्रणाली-** एआय शिफारस प्रणालीव्दारे व्हर्च्युअल सहाय्य संबंधित संसाधनाचा शोध वाढवणे, वापर कर त्याच्या पसंती आणि वर्तमानाचे विश्लेषण करणे या प्रणालीव्दारे ग्राहकांच्या आवडीची जुळणारे साहित्य सुचविले जाते ज्यामुळे अधिक वैयक्तिक अनुभव वाढतो.

**कृत्रिम बुद्धिमत्तेचा ग्रंथालयावर परिणाम**

1) **माहिती संघटन -** माहितीचा शोधा आणि रिकॉल संग्रहाचे विश्लेषण, मेटाडेटा ए आय आधारित तंत्रज्ञानाव्दारे सहज उपलब्ध होऊ लागले आहे. माहितीचे रक्षक व प्रसारक कॅटलॉगसाठी शोध इंजिन ए आय तंत्रज्ञानामुळे अद्यावत झाली आहेत.
2) **ग्रंथालयाचे कामकाज-** पारंपारिक ग्रंथालयाचे रूपांतर आज डिजिटल व्हच्युअल ग्रंथालयात होत आहे. यासाठी संगणक तंत्रज्ञानाच्या आगमनाने ग्रंथालय प्रणालीत मॅन्युअल सिस्टमचे संगणकृत सिस्टम मध्ये रूपांतरित करण्याची क्षमता अस्तित्वात आली. लायब्ररी ऑटोमेशन कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकासामुळे ग्रंथालयन व्यवस्थापकीय कामाचे स्वरूप बदलले एका क्लिकवर उपभोगत्यांना माहिती ज्ञान उपलब्ध होऊ लागले यासाठी पूरक म्हणून ए आय तंत्रज्ञानाचा वापरासाठी ग्रंथालयीन स्टाफसाठी ए आय तंत्रज्ञान विषयक महत्त्वपूर्ण कार्यशाळेचा अवलंब करणे महत्त्वाचे ठरते.
3) **रोबोटिक तंत्रज्ञानाचा अवलंब –** कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराने ग्रंथालयाचे ऑटोमेटेड स्टोरेज आणि रिट्रीवल सिस्टमचा वापर माहिती संकलनासाठी करत आहेत. काही ग्रंथालय डेटा मायग्रेशन, सेल्फ व्यवस्थापन फॉर्म प्रक्रिया ईमेल मार्केटिंग शासकीय कामे करण्यासाठी रोबोटिक प्रोसेस ऑटोमेशन वापरत आहेत. यात दैनंदिन कामकाज, भाषांतर सेवा, सारांशीकरण, मजकूर निर्मिती, ए आय टूल्स विविध ॲप्स रिसर्च रॅबिट, साइट्स, एलीसिस्ट आणि ओपन रीड सारखी साधने साहित्य पुनरावलोकनात समर्थन देण्यासाठी उपभोक्त्यांच्या गरजा जाणून घेण्याची क्षमता तंत्रज्ञानामुळे जनरेटिव्ह ए आय लायब्ररी मार्केटमध्ये उदयास येत आहे.
4) **स्मार्ट लायब्ररी -** स्मार्ट लायब्ररी ही व्हर्च्युअल/हायब्रीड लायब्ररी, डिजिटल लायब्ररीचे अस्तित्व होय. ग्रंथालयाच्या एकूण व्यवस्थापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर साहित्याचा शोध पुनप्राप्ती भविष्यातील गरजांचा वेध यासाठी अलर्ट सिस्टीम ची सुविधा संशोधनास सहाय्यक ठरत आहे. ए आय तंत्रज्ञानामुळे ग्रंथालयांनी स्मार्ट स्वरूप धारण केले आहे. स्वयंसेवा कीऑक्स वैयक्तिक सेवा तत्पर सेवा व अद्यावत सेवा प्राप्त होत आहेत.

**निष्कर्ष**

ग्रंथालयात ए आय महत्त्व दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे ए आय ही एक परिवर्तनकारी शक्ती ठरत आहे. शिक्षण अधिक सुलभ कार्यक्षम आकर्षक होण्यास, योग्य व्यक्तीला, योग्य व गरजेची माहिती योग्य स्वरूपात, योग्य वेळी, उपलब्ध होणे ए आय तंत्र ज्ञानामुळे शक्य झाले आहे. ए आय स्वीकारून ग्रंथालय डिजिटल युगात अधिक कार्यक्षम वापरकरता अनुकूल आणि प्रासंगिक बनू शकतात, ज्यामुळे शेवटी शिक्षण आणि ज्ञानाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून ग्रंथालय ए आय च्या सहाय्याने चांगली भूमिका बजावू शकतात.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**ए आय चे भविष्य**

ए आय हे तंत्रज्ञान वेगाने विकसित होत आहे भविष्यात ते आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनण्याची शक्यता आहे ए आयच्या प्रगतीमुळे उत्पादन क्षमता कार्यक्षमता आणि जीवनशैलीतील सुधारणा तर होतच आहेत तसेच शिक्षण क्षेत्रात व ग्रंथालय व्यवस्थापनात ए आय चा मोलाचा वाटा आहे.

**संदर्भ**

1. UNESCO, https://w.w.w unesco.org/en/artificial-intelligence. Retrieved on 05/02/2025
2. University News Vol.63.19.May 12/18/2025 No. 29 to 33
3. https://onlinedegrees.sandiego.edu/artificial-intelligence education/
4. Artificial Intelligence for Education. https://www.aiforeducation.io/ai-resources-main
5. Central Institute of Educational Technology (CIET). https://ciet.ncert.gov.in/activity/eaie

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# भारतातील पायाभूत सुविधा : एक दृष्टिक्षेप

**डॉ. बी.डी.इंगवले**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, आनंदीबाई रावराणे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय वैभववाडी,
Affiliations University of Mumbai
**Email-**bdingawale59@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170807
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8(I)
Pp. 27-31
August 2025
**Submitted:** 10 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**घोषवारा**

आर्थिक विकासामध्ये पायाभूत सुविधांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. अनिश्चित आणि आव्हानात्मक वातावरणात वाघ आणि विकास प्रक्रिया टिकवून ठेवण्यासाठी पायाभूत सुविधा मुख्य चालक म्हणून काम करते. पायाभूत गुंतवणुकीचे परिणाम दिसण्यासाठी अर्थव्यवस्थेला चालना देणे, जीवनाचा दर्जा सुधारणे प्रादेशिक आणि संतुलित विकासाला चालना देणे, सकारात्मक सामाजिक प्रभाव वाढविणे आणि नवस संकल्पना आणि तंत्रज्ञानाच्या एकत्रित करण्यात द्वारे सर्वसामावेशक आर्थिक आणि सामाजिक प्रगतीला चालना देणे महत्त्वाचे आहे. ही वस्तुस्थिती आहे की पायाभूत सुविधा च्या जलद वाढीमुळे काही पर्यावरणीय परिणाम होतील आणि त्यामुळे राष्ट्रसमोर आव्हाने निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणून लोक समाज आणि पृथ्वीच्या कल्याणाचा विचार करून हरित आणि शाश्वत पायाभूत सुविधा प्रकल्प ही काळाची गरज आहे. जागतिक कल लक्षात घेत त्यांच्याशी सुसंगती राखत विशेषता सर्वांगीण आणि शाश्वत विकास कार्यक्रमावर लक्ष केंद्रित करण्यासह भारत एक विकसित राष्ट्र म्हणून उदयाला येण्यासाठी प्रगतीपथावरून मार्गक्रमण करू शकतो.

**बीजसंज्ञा** - मूलभूत पायाभूत सुविधा, पायाभूत सुविधातून आर्थिक विकासाला चालना, पायाभूत सुविधांचा अभ्यास

**प्रस्तावना**

भारताने परिवर्तनाच्या दिशेने प्रवास सुरू केला असून वर्ष 2024 मध्ये या दृष्टीने विविध क्षेत्रांमध्ये लक्षणे प्रगती झाली आहे. स्वच्छता जलसंधारण आणि नवीकरणीय ऊर्जेवर सरकारने भर दिल्याने त्यांचे प्रभावी परिणाम दिसून आले आहेत. स्वच्छ भारत अभियानामुळे स्वच्छतेत सुधारणा झाले असून बालमृत्यूचे प्रमाण कमी होण्यास हातभार लागला आहे. केंद्रीय अर्थसंकल्प 2024-25 मध्ये वस्तू निर्माण आणि सेवा क्षेत्राच्या वाढीसाठी आणि विकासासाठी एक व्यापक आराखडा तयार करण्यात आला आहे.आर्थिक वाढ आणि रोजगाराला चालना देण्यात या क्षेत्राचे महत्त्वपूर्ण भूमिका यात अधोरेखित केली गेली आहे. एक विकसित राष्ट्र होण्यासाठी जागतिक दर्जाच्या लवचिक आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधांची निर्मिती आवश्यक आहे. उदाहरणार्थ भौतिक,सामाजिक,आर्थिक आणि डिजिटल क्षेत्रे विकसित भारत @2047 साठी भारताच्या धोरणात्मक धोरणाच्या नियोजित विकासासाठी महत्वपूर्ण आहे. विविध अभ्यासातून असे आढळून आले आहे की गुंतवणुकीच्या खर्चात 1% वाढ भारतातील जीडीपी 1.0 ते 1.5% मी वाढवू शकते. ज्यांचा थेट परिणाम रोजगार निर्मिती आणि शाश्वत विकासावर होतो. शिवाय असे आढळून आले आहे की वाहतूक ऊर्जा आणि शहरी पायाभूत सुविधा मधील गुंतवणूक त्यांचा मोठ्या प्रभावामुळे पद्धतशीर आणि जलद विकासाला चालना देते.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. बी.डी.इंगवले. अर्थशास्त्र विभाग प्रमुख, आनंदीबाई रावराणे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय वैभववाडी, Affiliations University of Mumbai.*

**How to cite this article:**
*इंगवले, . बी . डी . (2025). भारतातील पायाभूत सुविधा : एक दृष्टिक्षेप. Journal of Research & Development, 17(8(I)), 27–31.* https://doi.org/10.5281/zenodo.17115390

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17115390
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

आर्थिक वर्ष2024-25 च्या चालू अर्थसंकल्पात या क्षेत्रासाठी आणि इतर धोरणात्मक क्षेत्रासाठी निधीची तरतूद केली आहे. यासाठी सदर शोधनिबंधात भारतातील पायाभूत सुविधा एक दृष्टिक्षेप या विषयावर संशोधनात्मक अभ्यास करण्यात आलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1) भारतातील मूलभूत पायाभूत सुविधांचा अभ्यास करणे.

2) पायाभूत सुविधा मधील परिवर्तनशीलता समजावून घेणे.

3) भारतातील पायाभूत सुविधांच्या गुंतवणुकीचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनाचा प्रकार वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आहे. निर्धारित केलेल्या संशोधन उद्दिष्टानुसार सदर शोधनिबंधात प्रत्यक्ष अनुभवाचा विचार घेण्यात आलेला आहे. सदर शोधनिबंध दुय्यम साधनसामग्रीचा आधार घेऊन तयार करण्यात आलेला असून दुय्यम साधनसामग्री म्हणून पायाभूत सुविधा संदर्भात असणारे काही प्रबंध, संशोधन, शासकीय अहवाल, पुस्तके, वृत्तपत्रके, मासिके, साप्ताहिके इत्यादीचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधनाचे महत्त्व –**

भारत एक विकसित राष्ट्र होण्यासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांची निर्मिती आवश्यक आहे. याचा थेट परिणाम रोजगार निर्मिती आणि शाश्वत विकासावर होतो. वाहतूक ऊर्जा आणि शहरी पायाभूत सुविधा मधील गुंतवणुकीमुळे जलद विकासाला चालना मिळते. देशाच्या दीर्घकालीन सामाजिक आर्थिक विकास आणि सामाजिक प्रगती सुनिश्चित करतो. त्यातून भारताच्या भविष्यकालीन अपेक्षा पूर्ण करण्याचा सरकारचा सकारात्मक हेतू दिसून येतो. रस्ते रेल्वे विमानतळ आणि बंदरामध्ये गुंतवणूक केल्याने एक मजबूत एकात्मिक आणि परस्पर सहाय्यक वाहतूक व्यवस्था तयार होते. देशाच्या शहरीकरणाला चालना मिळते. सामाजिक पायाभूत सुविधामुळे जीवनमान सुधारते. मूलभूत पायाभूत सुविधा ना आर्थिक विकासाचे इंजिन म्हणतात. यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळून विकसित भारत @2047 ही संकल्पना प्रत्यक्षात येण्यास मदत होईल. जलद आर्थिक विकास आणि सामाजिक प्रगतीसाठी निरंतर आणि धोरणात्मक ते सह पायाभूत सुविधांसाठी महत्त्वपूर्ण आर्थिक तरतूद आहे. यातून भारत एक विकसित राष्ट्र म्हणून उदयाला येण्यासाठी पायाभूत सुविधांचा अभ्यास महत्त्वाचा आहे. सदर शोधनिबंधामध्ये या विषयाच्या संदर्भाचे संशोधन फार महत्त्वाचे आहे.

**मुख्य पायाभूत सुविधा उपक्रम आणि तरतूद 2024--25**

यावर्षी 48,20,512 कोटीच्या एकूण अर्थसंकल्पीय खर्चापैकी 11,11,111 कोटी रुपये एकूण भांडवली खर्चाची तरतूद ठेवण्यात आली आहे. जी मागील वर्षाच्या अर्थसंकल्पाच्या तुलनेत 16.9% वाढ दर्शविते. ही अर्थसंकल्पीय तरतूद जीडीपीच्या 3.4% आहे. जी गेल्या वर्षीच्या दशकातील आज पर्यंतची सर्वाधिक आहे. भक्कम आर्थिक सहाय्य आणि वितरण याद्वारे गेल्या पाच वर्षात भांडवली खर्चामध्ये वाढ नोंदवली गेली आहे. प्रभावी भांडवली खर्च15,01,889 कोटी रुपये आहे. जो दीर्घकालीन सामाजिक आर्थिक विकास आणि सामाजिक प्रगती सुनिश्चित करतो. हे वर्तमान गरजा पूर्ण करण्यासाठी आणि वेगाने विकसित होणाऱ्या भारताच्या भविष्यातील अपेक्षा पूर्ण करण्याचा सरकारचा सकारात्मक हेतू दर्शविते. गेल्या पाच वर्षातील पायाभूत सुविधांच्या गुंतवणुकीमुळे वितरणात सातत्याने प्रगती होत आहे.

**भौतिक पायाभूत सुविधा**

भारतातील भौतिक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीमध्ये रस्ते रेल्वे विमानतळ आणि बंदरामध्ये गुंतवणूक समाविष्ट आहे. यामधून मजबूत एकात्मिक आणि परस्पर सहाय्यक वाहतूक व्यवस्था तयार करणे आहे.

**1) रस्ते -** रस्त्यांच्या जाळयांच्या सुधारणामुळे आर्थिक संधी, संपर्क ता पर्यटन आणि शहरीकरणाला चालना देणाऱ्या लवचिक आणि कार्यक्षम पायाभूत सुविधा निर्माण झाले आहेत. या क्षेत्रामध्ये नव्या युगाचे तंत्रज्ञान आणि शाश्वत कच्च्या मालाचा वापर रस्ते विकासामध्ये समाविष्ट केला गेला आहे. भारतमाला परियोजना अंतर्गत भारत सरकार संपर्क आणि जलद मालवाहतूक वाढविण्यासाठी देशव्यापी रस्ते नेटवर्क तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, यामुळे लॉजिस्टिक खर्च कमी होण्यास मदत होईल. पर्यावरणावर कमी परिणाम आणि दुहेरी पक्के रस्ते बनवण्याची सरकारची योजना आहे. रस्ते संपर्क वाढवण्यासाठी आणि मजबूत करण्यासाठी पाटणा पूर्णिया एक्सप्रेस हायवे, बोधगया दरभंगा एक्सप्रेस हायवे, बक्सर भागल्पुर एक्सप्रेस हायवे, आणि गंगेवरील दुपदरी पूल यासाठी 26,000/ कोटीची विशेष तरतूद अर्थसंकल्पात आहे. देशभरात मजबूत रस्ते नेटवर्क तयार करण्यासाठी रस्ते आणि महामार्गासाठी 2.78 लाख कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

**2) जगातील सर्वात मोठे रेल्वेचे जाळे भारतात आहे-** उत्पादनासह विविध संधी आणि विविध क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. स्वच्छतेसाठी सरकारने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत, यामध्ये स्थानके तसेच डब्यांच्या आसपास बायोटॉयलेट प्रदान करणे समाविष्ट आहे. विशेषता अक्षय ऊर्जेद्वारे निर्मितीवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.2024--25 च्या अर्थसंकल्पात, रेल्वेच्या

विकासासाठी निव्वळ भांडवली खर्चाच्या 2.65 लाख कोटीची तरतूद करण्यात आली आहे. याचा विकासावर लक्षणीय सकारात्मक परिणाम होण्याच्या अपेक्षा आहे.

**3) जलमार्ग-** आर्थिक वाढ वृद्धिंगत करण्यासाठी आणि शाश्वत उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, स्मार्ट वॉटर टेक्नॉलॉजी आणि पायाभूत सुविधा मधील गुंतवणूक वाढत्या व्यापाराची पूर्तता करण्यास आणि जागतिक क्षेत्रात भारताची सागरी स्पर्धात्मकता वाढविण्यास मदत करते. सार्वजनिक खाजगी भागीदारी प्रकल्पाच्या वाढत्या संख्येने पीएम गतिशक्ती राष्ट्रीय बृहत आराखडा आणि सागरमाला राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत संपर्कता वाढवीत आहे. याशिवाय बंद आधुनिकीकरण, संपर्क ता, बंदर नेतृत्वाखालील औद्योगीकरण अंतर्गत जल वस्तू यावर अनेक विकास कामे हाती घेतलीजात आहेत.

**3) हवाई मार्ग -** विमान वाहतूक क्षेत्रातील गुंतवणूक जागतिक स्तरावर वाढत आहे. सरकारने संपूर्ण देशभरातील विमानतळाचा विकास, सुधारणा आणि आधुनिकीकरणासाठी आर्थिक वर्षे 20 ते आर्थिक वर्ष 25 या कालावधीसाठी 26 हजार कोटीहून अधिक भांडवली खर्चाची तरतूद केली आहे. भाडे तत्त्वावरील विमाने आणि ड्रोनच्या वापरासाठी विशेष तरतुदी केल्या असून, शिक्षण शेती आपत्ती व्यवस्थापन आणि सुरक्षा यासारख्या घटना त्याचा उपयोग होतो. एकूणच पीएम गतिशक्ती पायाभूत सुविधा धोरणाचा एक भाग असून एकमेकांशी अधिक जोडलेल्या पायाभूत सुविधा प्रणाली निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. विविध मंत्रालय आणि सरकारी संस्था यांच्यामधील विविध प्रक्रिया सुव्यवस्थित करून तंत्रज्ञानाचा लाभ घेण्यासाठी आणि समन्वय सुधारण्यासाठी एकत्रित प्रयत्न केले जातात, परिणामी लॉजिस्टिक कार्यक्षमता सुधारते, खर्च कमी होतो आणि पायाभूत सुविधा प्रकल्प जलद पूर्ण होतात. एकत्रित पायाभूत सुविधा योजनेच्या माध्यमातून प्रभावी आणि वेळेवर अंमलबजावणी द्वारे पायाभूत सुविधा क्षेत्रातिल कार्यक्षमता वाढवणे हा यामागचा अंतिम उद्देश आहे.

**4) अंतराळ पायाभूत सुविधा-** भारतीय अंतराळ क्षेत्रात लक्षणीय प्रगती झाली आहे. अंतराळातील पायाभूत सुविधा साठी विशेष तरतुदीचा विचार करून, भारत सरकार एकीकडे जागतिक अंतराळ क्षेत्रात आपले अस्तित्व निर्माण करण्यासाठी आणि दुसरीकडे यशस्वी मोहिमेनंतर राष्ट्रीय सुरक्षा आणि वैज्ञानिक कार्यक्रम वाढविण्यास उत्सुक आहे. वर्ष2024-25 च्या अर्थसंकल्पात सरकारने पुढील दहा वर्षात अंतराळ अर्थव्यवस्थेचा पाचपटीने विस्तार करण्यासाठी 1000 कोटीची उद्यम भांडवल निधी प्रस्तुत केला आहे.

**5) डिजिटल पायाभूत सुविधा -** सशक्त डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा गुंतवणुकीमुळे डिजिटल इंडिया फिनटेक् नेशन आणि' स्टार्ट अप इंडिया ' याबाबत भारताचे उद्दिष्ट गाठण्याची कवाडे खुली होतात. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या निर्मिती आणि विस्तारातील गुंतवणुकीमुळे आपट संधी खुल्या झाले आहेत. ज्यामुळे जीवनमानाचा दर्जा आणि लोकांच्या कल्याण सुनिश्चित झाले आहे.

याशिवाय शहरी नियोजन वरच्या व्यवस्थापन आणि वाहतूक या क्षेत्रामध्ये स्मार्ट तंत्रज्ञानाचा अवलंब अधिक कार्यक्षम आणि शाश्वत असल्याचे आढळून आले आहे. या गुणक प्रभावांचा विचार करून भारत सरकारने या क्षेत्रासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतूद केली आहे.

भारत सरकारने पीएम गतिशक्ती भुवन, भारत मॅप्स,सिंगल विंडो सिस्टिम्स, परिवेश पोर्टल,नॅशनल डेटा, आय आय जी यासारख्या विविध कार्यक्षम पायाभूत सुविधा सुरू केले आहेत. डिजिटल पायाभूत सुविधामुळे निर्माण होणारे वक्तशीर आणि अचूक संप्रेषण जाळे हे ग्रामीण भागाच्या विकासासाठी आणि शहरी ग्रामीण स्थलांतर कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण असून भारत नेट प्रकल्प अंतर्गत त्या हाती घेण्यात आले आहेत.

**6) ऊर्जा पायाभूत सुविधा -** वीज क्षेत्र एक शाश्वत परिसंस्था उभारण्यासाठी जास्तीत जास्त नूतनीकरण क्षम ऊर्जा संसाधनाचा वापर करून पारेषण ग्रीडच्या वाढीद्वारे आणि वीज निर्मिती द्वारे भारतीय ऊर्जा क्षेत्राला पुढे नेण्याची नितांत गरज आहे. सुधारित वितरण क्षेत्र योजना 3.04 लाख कोटी( आर्थिक वर्ष22- आर्थिक वर्ष 26 ) अतिरिक्त 0.98 लाख कोटी रुपये सरकारी पाठबळासह असून तिचे उद्दिष्टे आर्थिक वर्ष 25 पर्यंत एकूण तांत्रिक आणि व्यावसायिक नुकसान कमी करण्याचे आहे.राष्ट्रीय कार्यक्रम, समर्थ अभियान इत्यादी कार्यक्रमांतर्गत ऊर्जा कार्यक्षम पथदिवे आणि पंक्यासह ग्रीड पुरवठा वाढवण्यासाठी विशेष तरतूद करण्यात आले आहे. अशाप्रकारे या क्षेत्रातील गुंतवणूक आणि आर्थिक वाढीसाठी, लोकांच्या जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी जीवनमान सुधारण्यासाठी आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी विविध संधी उपलब्ध करून देते.

**7) इतर पायाभूत सुविधा उपक्रम --** भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार असलेल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेवर सुमारे 2.66 लाख कोटी रुपयांच्या निधी तरतुदीसह विशेष भर देण्यात आला आहे. जो मागील वर्षाच्या अर्थसंकल्पाच्या तुलनेत सुमारे 12% जास्त आहे. पीएम आवास योजनेअंतर्गत ग्रामीण आणि शहरी भागासाठी तीन कोटी अतिरिक्त घरांची घोषणा करण्यात आली आहे. बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओरिसा आणि आंध्र प्रदेशाचा समावेश करून देशाच्या पूर्वेकडील प्रदेशांच्या सर्वांगीण विकासासाठी सरकारने पूर्वोदय ही योजना तयार केली आहे. यामध्ये मनुष्यबळ विकास पायाभूत सुविधा आणि पुन्हा आर्थिक संधी या क्षेत्राला विकसित भारत साठी एक इंजन म्हणून तयार करतील. सामाजिक पायाभूत सुविधामुळे जीवनमान सुधारत असल्याने आणि सामाजिक प्रगती होत असल्याने

अर्थसंकल्पात नेहमीप्रमाणे सामाजिक पायाभूत सुविधांना विशेष महत्त्व दिले आहे. देशाच्या सर्वांगीण कल्याणात शिक्षण,आरोग्य, पिण्याचे पाणी आणि स्वच्छता सुविधांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. अर्थसंकल्प सहाय्य मिळालेल्या प्रमुख उपक्रमामध्ये आयुष्यमान भारत,राष्ट्रीय आरोग्य,अभियान अमृत योजना,समग्र शिक्षा अभियान, राष्ट्रीय उपजीविका अभियान इत्यादींचा समावेश आहे. वस्तू निर्माणेण्यासाठी सरकारने योग्य ठिकाणी योग्य सुविधा सह औद्योगिक पायाभूत सुविधांची गरज ओळखली आहे. खाजगी क्षेत्र आणि राज्य सरकार सोबत भागीदारी करून देशातील जवळपास सर्व प्रकारच्या शहरांमध्ये या कार्यक्रमांतर्गत 12 नवीन औद्योगिक पार्क प्रस्तावित आहेत. अर्थसंकल्पात भांडवली गरजांचे इष्टमीकरण करण्यासाठी पायाभूत गुंतवणुकीत अधिक खाजगी सहभाग प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने व्यवहार्य अंतर निधी लागू करण्याचा प्रस्ताव दिला आहे. यामुळे संपूर्ण भारतातील समतोल विकासाला हातभार लागेल अशी अपेक्षा आहे.

पुढील देशा आणि भारताचे भविष्य @2047----- पायाभूत सुविधा वरील खर्चात वाढ झाल्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी भारताच्या प्रगतीचा मार्ग नवीन वळण घेईल आणि विकसित भारत @2047- भारत एक विकसित राष्ट्र ही संकल्पना प्रत्यक्षात येण्यास मदत होईल. सरकारने पायाभूत सुविधांच्या विकासासाठी पुरेशा सुविधा गुंतवणुकीच्या तरतुदी केल्या आहेत कारण हे आर्थिक विकासाचे इंजिन आहे. चालू अर्थसंकल्प आर्थिक वर्ष 2024--25 मध्ये आर्थिक एकत्रीकरण उद्दिष्टे आणि उद्दिष्ट अशी तळजळ न करता पायाभूत सुविधांच्या तरतुदीत वाढ अधोरेखित करतो. मूलभूत जलद पायाभूत सुविधांच्या वाढीमुळे काही पर्यावरणीय परिणाम देखील राष्ट्रांसमोर आव्हाने निर्माण करण्याची शक्यता आहे. म्हणूनच लोक समाज आणि पृथ्वीच्या कल्याणाचा विचार करून हरित आणि शाश्वत पायाभूत सुविधा संकल्प ही काळाची गरज आहे. याशिवाय धोरणकर्त्यांनी हे सुनिश्चित केले पाहिजे की वाढीव पायाभूत सुविधांच्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सामाजिक आर्थिक विकासाचे फायदे शेवटच्या टप्प्यातील नागरिकापर्यंत पोहोचतील असे विकासाचे दीर्घकालीन उद्दिष्ट निश्चित केले पाहिजे. विशेषता सर्वांगीण आणि शाश्वत विकास कार्यक्रमावर लक्ष केंद्रित करण्यासह भारत एक विकसित राष्ट्र म्हणून उदयाला येण्यासाठी प्रगतीपथावरून मार्गक्रम करू शकतो.

**निष्कर्ष**

1) एक विकसित राष्ट्र होण्यासाठी जागतिक दर्जाच्या लवचिक आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधांची निर्मिती आवश्यक आहे.

2) वाहतूक, ऊर्जा आणि शहरी पायाभूत सुविधा मधील गुंतवणूकमुळे जलद आर्थिक विकासाला चालना मिळते.

3) देशातील वर्तमान गरजांची पूर्तता आणि वेगाने विकासासाठी भारतीय सरकारचा सकारात्मक हेतू आहे. त्यामुळे अर्थसंकल्पात फार मोठ्या प्रमाणात तरतूद करण्यात येत आहे.

4) रस्ते आणि रेल्वेतील गुंतवणुकीमुळे देशात फार मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाले आहेत.

5) जगातील सर्वात मोठे रेल्वेचे जाळे भारतात आहे.

6) भारताने अंतराळातील पायाभूत सुविधा साठी फार मोठ्या प्रमाणात गुंतवणूक तरतूद करून प्रगती साध्य केली आहे.

7) डिजिटल पायाभूत सुविधा क्षेत्रामध्ये स्मार्ट तंत्रज्ञानाचा अवलंब अधिक कार्यक्षम आणि शाश्वत असल्याचे दिसून येते.

8) वीज निर्मिती द्वारे आजही भारतीय ऊर्जा क्षेत्राला पुढे नेण्याची नितांत गरज आहे.

9) भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीची आवश्यकता आहे.

10) मनुष्यबळ विकास पायाभूत सुविधा आणि खुल्या आर्थिक संधी यामधील गुंतवणूक भारतासाठी विकासाचे एक इंजिन तयार करते.

**सारांश-**

अर्थसंकल्प प्रमुख्याने 9 प्राधान्य स्तंभाच्या विकासावर केंद्रित आहे आणि पायाभूत सुविधा त्यापैकी एक आहे. जलद आर्थिक विकास आणि सामाजिक प्रगतीसाठी निरंतर आणि धोरणात्मक ते सह पायाभूत सुविधांसाठी महत्त्वपूर्ण आर्थिक तरतूद आहे. अर्थसंकल्पीय तरतुदीमुळे तरुणांसाठी विविध संधी खुल्या झाले आहेत. आणि सामाजिक सेवांच्या तरतुदीत वाढ करण्यात आले आहे. खाजगी क्षेत्राला चालना देण्यासाठी आणि त्यांना पायाभूत सुविधांच्या विकासाचा एक भाग बनवण्यासाठी सरकारने अंतर निधी,कर सुधारणा आणि बाजार व्यक्त पुरवठा सुलभ करणे सुरू केले आहे. वाढीव पायाभूत सुविधांच्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सामाजिक आर्थिक विकासाचे फायदे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. यातूनच सर्वांगीण आणि शाश्वत विकास कार्यक्रमावर लक्ष केंद्रित करण्यासह भारत एक विकसित राष्ट्र म्हणून उदयाला येण्यासाठी प्रगतीपथावरून मार्गक्रम करू शकतो.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**संदर्भसूची**

1) डॉ. अमेया कुमार महापात्रा, योजना अंक 02, सप्टेंबर 2024,, " वित्तीय हस्तक्षेपाद्वारे भारतात पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना.

2) डॉ. रणजीत मेहता, योजना अंक 02, सप्टेंबर 2024, उत्पादन आणि सेवा क्षेत्राच्या विकासावर भर देणारा अर्थसंकल्प.

3) डॉ. सज्जन सिंग यादव, योजना अंक 02, सप्टेंबर 2024, सार्वजनिक वित्त पुरवठा आणि विकास भारताच्या अर्थसंकल्पातील प्राधान्यांचे मूल्यांकन.

4) योजना अंक 02, सप्टेंबर 2024, संपादकीय लेख, विकसित भारताच्या दिशेने.

5) केंद्रीय अर्थसंकल्प -2022-23.

6) केंद्रीय अर्थसंकल्प -2023-24.

# Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# शाश्वत ग्रामीण विकास आणि शहरीकरण : एक अभ्यास

**डॉ. देविदास ग्यानुजी नरवाडे**
विभाग प्रमुख (राज्यशास्त्र विभाग)
गोदावरी कला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, अंबड जि. जालना
**Email-**dgnarwade75@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170808
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 8(I)
Pp. 32-35
August 2025

**Submitted:** 10 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**सारांश**

भारतीय समाजाचा मुख्य घटक असलेला ग्रामीण भाग अजूनही शेतीप्रधान असून, बहुतांश लोकसंख्या खेड्यांत राहते. शेती, रोजगार, पायाभूत सुविधा यांच्या अभावामुळे ग्रामीण नागरिकांचे शहरांकडे स्थलांतर झपाट्याने वाढत आहे. परिणामी, शहरीकरणात वाढ होत असून त्यातून अनेक समस्या उद्भवत आहेत, जसे की निवास, आरोग्य, सांडपाणी, कचरा व्यवस्थापन, इत्यादी. केंद्र सरकारच्या विविध योजना जसे की मनरेगा, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण व शहरी), स्वच्छ भारत मिशन, यांचा उद्देश ग्रामीण विकास आणि शहरी समस्यांवर तोडगा काढणे हा आहे. तथापि, योजनांची प्रभावी अंमलबजावणी अभावामुळे अनेक अडचणी कायम आहेत. शाश्वत विकासासाठी ग्रामीण भागात रोजगार, शिक्षण, आरोग्य सुविधा, सिंचन, वीज व पिण्याचे पाणी यांचा विकास अनिवार्य आहे. शहरीकरण आणि ग्रामीण विकास यांचा परस्पर सहसंबंध असून त्यांच्यातील समतोल राखूनच पर्यावरणपूरक आणि सर्वसमावेशक विकास शक्य आहे.

**मुख्यशब्द -** ग्रामीण विकास,शहरीकरण, स्थलांतर, शाश्वत विकास, प्रधानमंत्री आवास योजना, मनरेगा,पर्यावरणीय समस्या, रोजगार महिला सशक्तीकरण, शेती संकट

**प्रस्तावना** :

भारत हा खेड्यांचा देश आहे असे म्हणतात. भारत हा शेतीप्रधान देश आहे असेही म्हणतात. महात्मा गांधी म्हणत खेड्यांकडे चला खरा भारत खेड्यात राहतो असेही म्हणतात. खेड्यांत, ग्रामीण भागात असे काय आहे जे भारताला खेड्यांचा गावांचा संदर्भ दिला जातो. भारतातील बहुसंख्य समाजा हा खेड्यात राहतो त्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष शेतीशी संबंध आहे. भारतातील नागरिकांचा मुख्य व्यवसाय आजही शेतीच आहे. 2011 च्या जनगणनेनुसार 68.08 टक्के भाग हा ग्रामीण आहे.[1] भारतातील राज्ये उत्तरप्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, या राज्यात ग्रामीण भाग जास्त आहे. तर 2011 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या 31 टक्के लोक शहरी भागात राहतात [2] भारतात कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संधी आहेत. भारत आधुनिक आणि तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी क्षेत्रात क्रांती निर्माण करू शकतो.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17115398

**Address for correspondence:**
*डॉ. देविदास ग्यानुजी नरवाडे, विभाग प्रमुख (राज्यशास्त्र विभाग) गोदावरी कला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, अंबड जि. जालना.*

**How to cite this article:**
*नरवाडे, . देविदास . ग्यानुजी . (2025). शाश्वत ग्रामीण विकास आणि शहरीकरण : एक अभ्यास. Journal of Research & Development, 17(8(I)), 32–35.* https://doi.org/10.5281/zenodo.17115398

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

सिंचन व्यवस्था आणि पिकांचे योग्य नियोजन करून शासना मार्फत सक्षम रित्या सहाय्यभूत व्यवस्था निर्माण केली तर भारतीय शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याची वेळ येणार नाही. जगाच्या पोशिंद्याला आत्मसन्मानाने जीवन जगता आले पहिजे. त्याच्या कृषी उत्पादनाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाला पाहिजे. शेतीत नव-नवे प्रयोग करण्याची संधी शेतकऱ्याला मिळाली पाहिजे. ग्रामीण भागात प्रचंड बेरोजगारी आहे. जागतिकीकरणामुळे शेतीच्या उत्पन्नावर प्रभाव पडला आहे आणि पर्यावरणीय बदलामुळे पावसाचे वेळापत्रक बदलले आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आहे. म्हणून राशनच्या दुकानावर सरकारी राशनावर उदरनिर्वाह करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. शहरी भागात ग्रामीण भागातील विदारक स्थिती पाहता खेड्यातील नागरिकांचा लोंढा येत आहे. राहण्याच्या, आरोग्याच्या, रोजगाराच्या व्यवस्थेवर प्रचंड ताण निर्माण होत आहेत. त्यामुळे भारतात शहरीकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे. ग्रामीण भागातील मोठा वर्ग कामगार म्हणून मुंबई. पुणे. औरंगाबाद सारख्या औद्योगिक वसाहतीत रोजगारांच्या संधीच्या शोधात येत आहे. खेड्याकडे आरोग्य व्यवस्था, रोजगार यांच संधी नसल्याकारणाने शहराकडे लोकांचा कल आहे. शासन अनेक ग्रामीण विकासाच्या शेती विकासाच्या रोजगाराच्या योजना निर्माण करत असते. उदा. मनरेगा, शेततळे, पिककर्ज योजना, पिक विमा इत्यादी तरी या योजना अपुऱ्या पडत आहेत. यामुळेच शहराकडे लोकांची ओढा कायम आहे.

**प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण:**

हि योजना देशातील गरिब आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी भारत सरकारने भारतीय लोकांसाठी कार्यान्वित केली आहे या योजनेचा उद्देश : 2024 पर्यत सर्व बेघर कुटुंबांना तसेच कच्च्या किंवा जीर्ण घरांमध्ये राहणाऱ्या लोकांना पक्की घरे उपलब्ध करून देणे होय. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ग्रामीण भागासाठी शौचालय बांधण्यासाठी 12,000/- रू. ची मदत सरकार करत आहे. मनरेगा: महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार गारंटी अधिनियम तयार केला आहे. ही योजना रोजगारांची हमी देते. ग्रामीण भागातील नागरिकांच्या उपजीवीकेच्या सुरक्षेचे हमी देते. या योजनेद्वारे ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्ती म्हणजे मागेल त्याला काम पद्धतीने प्रत्येक वर्षी 100 दिवसांच्या रोजगारांची हमी देते. ज्या कुटुंबात अकुशल कामगार आहेत त्यांना या योजनेचा विशेष फायदा होतांना दिसतो. प्रत्येक कामगारासाठी किमान वेतन दिले जावे यामध्ये ग्रामपंचायतीद्वारे रोजगार दिला जाते व जबाबदारी निश्चित केली जाते त्यामुळे यामध्ये भ्रष्टाचार होण्याची शक्यता कमी होते. या योजनेद्वारे रस्ते, तलाव, विहिरी, कालवे अशा शास्वत स्त्रोतांची निर्मिती केली जाते. पर्यावरणाच्या दृष्टीने, जलसिंचन, पूरनियंत्रण, दुष्काळ निवारण वृक्षारोपन सारख्या कार्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण तसेच यामुळे ग्रामीण रोजगार निर्मिती होऊन शहराकडील पलायन रोखण्यास मदत मिळते. विशेषत: ग्रामीण गरिब महिलांच्या सशक्तीकरणासाठी ही योजना कार्यक्षम ठरू शकते. या योजनेद्वारे ग्रामीण शाश्वत विकास साधने सहाय्यक ठरू शकतात. या योजने अंतर्गत केलेली मुलभूत व ग्रामीण जीवनाचा कणा असणाऱ्या कामाची रूपरेषा स्पष्ट आहे. ग्रामीण विकास यात रोजगार, आरोग्य, सिंचन, महिला सक्षमीकरण तसेच गरिबी उत्मुलन, सामाजिक न्याय इत्यादींमुळे मनरेगा योजना महत्वपूर्ण आहे. महाराष्ट्राच्या अनुशंगाने ग्रामीण विकासाचा विचार करता रमाई आवास योजना, दलीत वस्ती सुधार योजना, जवाहर विहीर योजना, मागासवर्गींच्या विकासासाठी शेतीपूरक औजारे, शेळीपालन अनुदान योजना पिठाची गिरणी अनुदान योजना, भूमिहीन कुटुंबाला जमीन खरेदी अनुदान योजना इत्यादी योजनांच्या मार्फत ग्रामीण जीवनातील प्रत्येकाला आपले जीवन सुसह्य करण्यासाठी मदत होईल यात शंका नाही. महिलांच्या आरोग्याविषयी आशा वर्कर्सचे कार्य ग्रामीण भागासाठी महत्वपूर्ण आहे. गरोदर माताच्या आरोग्याची काळजी, योग्य मार्गदर्शन आणि प्राथामिक औषधोपचार इत्यादी सेवा आशा वर्कर्स कडून केल्या जातात

**शहरीकरण आणि विकास समस्या :**

ग्रामीण भागातील नागरिकांच्या पलायनामुळे शहरीकरणात झपाट्याने वाढ होत आहे. शहरी भागातही प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अशी योजना देशभरात केंद्र सरकार राबवत आहे. आर्थिक दुर्बल घटकांच्या निवासाची सोय व्हावी या उद्देशाने ही योजना राबविली जात आहे. त्यात केंद्र व राज्य सरकारद्वारे घरे उपलब्ध करून दिली जातात. गरिबांना परवडणाऱ्या किंमतीत व झोपडपट्टी निर्मूलनासाठी पक्के घरे गरिबांना मिळतात. मुंबई, पूणे सारख्या शहरात म्हाडाच्या मार्फत सामान्यांना कमी दरात घरे उपलब्ध करून दिली जातात. शहरांमध्ये लोकसंख्येची घनता ग्रामीण भागापेक्षा जास्त असल्याने निवासाच्या समस्या, आरोग्याच्या

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

समस्या, कचरा व्यवस्थापन, सांडपाण्याची व्यवस्था, गुन्हेगारीची समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण होत असतात. जैवविविधतेचे संरक्षण, हवेचे प्रदूषण अशा अनेक अनियंत्रीत समस्यांच्या विळख्यात आपली शहरे सापडली आहेत. या साठी ग्रामीण भागातील पलायन थांबले पाहिजे. शहरी व्यवस्थापनेवरील लोकसख्येचा ताण कमी केला पाहिजे यासाठी, ग्रामीण भागातील स्थलांतर कमी करण्यावर भर दिला पाहिजे. ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी पक्की घरे, विज, पिण्याचे पाणी, सांडपाण्याची व्यवस्था, रोजगार, आरोग्य यांची पूर्ण क्षमतेने अंमलबजावणी करून सक्षमपणे सुविधाजन्य परिस्थिती निर्माण केली पाहिजे. शहरीकरणाच्या शाश्वत विकासासाठी 'नक्शा' सारख्या योजना 152 शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लागू होत आहेत. यामुळे सु-नियोजित शहर ज्यात सर्व सुविधायुक्त वसाहती निर्माण करण्यास मदत होईल. पर्यावरणाच्या बाबतीत ग्रामीण आणि शहरी भागातील दुषित नद्या. वायु प्रदूषण इत्यादी समस्यांवर प्रभावी उपाय योजना करता येतील. ग्रामीण भागात रोजगाराची सुविधा, सक्षम शिक्षण व्यवस्था, पायाभूत सुविधा निर्माण करून पलायनावर सक्षम नियंत्रण प्राप्त करणे गरजेचे आहे. पंतप्रधान आवास योजना स्मार्ट शहरे या योजनांची सक्षमपणे अंमलबजावणी करणे, ग्रीन एनर्जी, सौर ऊर्जा, घन कचरा पुनर्वापर यांचा उपयोग करून पर्यावरणीय समतोल सांभाळला जाऊ शकतो. पिण्याच्या पाण्याचा योग्य वापर, नियोजन, पावसाच्या पाण्याचे पूनर्भरण, पाणी अडवा पाणी जिरवा सारख्या योजना अनिवार्य करून भू-जल पातळी वाढवली जाऊ शकते. केंद्र-राज्य सरकारने समन्वयाने या योजना राबवून ग्रामीण आणि शहरी नागरिकांच्या समस्या सोडवणे शक्य होऊ शकते.

**समारोप** :

भारताच्या प्रचंड लोकसंख्येचे नियोजन, प्रत्येक व्यक्तीला रोजगार, आरोग्य सुविधा, अवाढव्य भौगोलिक प्रदेश, त्या भौगोलिक सामाजिक, धार्मिक, पारंपारिक विविधत याचा समतोल ठेवून विकासाची कामे करणे जिकरीचे आहे, परंतु चीनने आपल्या लोकसंख्येचा उपयोग उत्पादन वाढीसाठी करून जगाला दाखवून दिले आहे कि योग्य नियोजन, कडक अंमलबजावणी करून आर्थिक, सामाजिक विकास साधला जाऊ शकतो. भारताला सुद्धा प्रचड संधी आहे. 35 ते 40 टक्के भारतीय नागरिक तरूण आहे. त्याचा उत्पादनक्षम वर्गात रूपांतर करून रोजगार, आर्थिक दारिंद्रिय, गरीबी यांचा प्रभावी सामना करता येऊ शकतो. तरूणांच्या हाताल काम, शिक्षण दिले तर योग्य निकाल लावला जाऊ शकतो. गरज आहे ती राजकीय इच्छा शक्तीची भारतात प्रचंड शक्ती बुध्दिमत्ता आहे.

**कि- नोटस :**

1. ग्रामीण विकास योजना
2. ग्रामीण रोजगारांची उपलब्धता
3. शहरीकरणाची कारणे
4. पर्यावरणीय उपाय योजना व आरोग्य

**उद्देश :**

1. सद्यस्थितीचा आढावा घेणे. ग्रामीण विकास आणि शहरीकरण यांचा संहसंबंध अभ्यासणे
2. शाश्वत ग्रामीण विकासांच्या योजनांच्या फलश्रुतीचा अभ्यास करणे.
3. शहरीकरणाचा पर्यावरणावरील परिणाम अभ्यासणे.
4. ग्रामीण रोजगाराच्या

**गृहितके :**

1. शाश्वत ग्रामीण विकास आणि शहरीकरण यांचा सहसंबंध असतो.
2. ग्रामीण विकासाच्या योजनांची योग्यरित्या अंमलबजावणी होत नाही.
3. शहरीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो.
4. ग्रामीण भागात रोजगारांची साधने अपुरे आहेत.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**संदर्भसूचि :**

1. Cencus – 2011
2. Cencus -2011
3. डॉ. संजीवन माणिकराव कदम, नेहरूंचा समाजवाद आणि आजचे राजकारण कैलास, पब्लिकेशन, छत्रपती संभाजीनगर.
4. समाजवादी चीन काल-आज-उद्या डॉ. अशोक ढवळे, जनशक्ती प्रकाशन, मुंबई.
5. डॉ. गुप्ता एवं प्रो. अग्रवाल आधुनिक भारतीय व्यवस्था.
6. WWW.WORLDPOPULATION.COM
7. डॉ. जास्मिन लॉरेन्स, महिला श्रमिक सामाजिक स्थिती एवं समस्या, अर्जून पब्लिशिंग हाऊस नई, दिल्ली 2009.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# AI आणि सामाजिक शास्त्र: संधी आणि आव्हाने

**डॉ.मारोती जनार्दन कंधारे**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लासलगाव
ता. निफाड जि .नाशिक
**Email-**Kandharemaroti@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170809
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 8(I)
Pp. 36-42
August 2025

**Submitted:** 10 July. 2025
**Revised:** 25 July. 2025
**Accepted:** 10 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**सारांश**

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ही केवळ तांत्रिक क्षेत्रापुरती मर्यादित न राहता, सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासातही प्रभावीपणे वापरली जाऊ लागली आहे. राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र आणि मानववंशशास्त्र या शाखांमध्ये संशोधन, विश्लेषण व धोरणनिर्मितीसाठी AI उपयुक्त ठरत आहे. मोठ्या प्रमाणातील डेटाचे विश्लेषण, भावनिक आणि नैतिक प्रवृत्तीचे आकलन, धोरणात्मक संशोधन, आणि जनमत अभ्यास यामध्ये AI प्रभावी ठरतो. तथापि, AI वापरासोबत काही गंभीर आव्हानंही आहेत—जसे की पूर्वग्रहयुक्त डेटा, गोपनीयतेचा भंग, सांस्कृतिक असंवेदनशीलता, आणि मानवी हस्तक्षेपाचा अभाव. AI चा सामाजिक शास्त्रात नैतिक व समावेशक वापर होण्यासाठी पारदर्शकता, स्थानिक गरजांची जाणीव, आणि आंतरशास्त्रीय दृष्टिकोन आवश्यक आहे. या संशोधनात AI व सामाजिक शास्त्र यातील परस्परसंबंधांचा सखोल अभ्यास सादर केला आहे.

**मुख्यशब्द :** कृत्रिम बुद्धिमत्ता, सामाजिक शास्त्र, भावनिक विश्लेषण, धोरणनिर्मिती, नैतिकता, बिग डेटा, जनमत, पूर्वग्रह, सांस्कृतिक विविधता, संशोधन पद्धती.

**प्रस्तावना**

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ही २१व्या शतकातील सर्वात क्रांतिकारी तांत्रिक प्रगतींपैकी एक आहे. पारंपरिकपणे विज्ञान, संगणकशास्त्र, उद्योग आणि आरोग्य क्षेत्रात वापरले जाणारे AI आता सामाजिक शास्त्रांमध्येही शिरकाव करत आहे. राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र आणि मानववंशशास्त्र यांसारख्या शाखांमध्ये AI चा वापर संशोधन, विश्लेषण व धोरणनिर्मितीसाठी होऊ लागला आहे. या नव्या संक्रमणामुळे अनेक संधी उपलब्ध झाल्या असल्या तरी काही गंभीर आव्हानांनाही सामोरे जावे लागत आहे. या संशोधनात आपण AI च्या सामाजिक शास्त्रांतील संभाव्य वापर, त्यातून मिळणारे फायदे, तसेच उद्भवणारी नैतिक, तांत्रिक आणि सामाजिक आव्हाने यांचा सविस्तर आढावा घेणार आहोत. सुरुवातीला केवळ संगणकशास्त्र, अभियांत्रिकी आणि व्यापार-उद्योग क्षेत्रांमध्ये वापरली जाणारी ही प्रणाली आता मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगावर विशेषतः समाजशास्त्राच्या अभ्यासक्षेत्रांवर प्रभाव टाकू लागली आहे. सामाजिक शास्त्र हे मानवी वर्तन, सामाजिक संस्था, समूहव्यवस्था, सांस्कृतिक प्रक्रिया आणि सामाजिक बदलांचा अभ्यास करणारे बहुआयामी क्षेत्र आहे.

Quick Response Code:

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Website:
https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17115409

OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*डॉ.मारोती जनार्दन कंधारे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लासलगाव ता. निफाड जि .नाशिक*

**How to cite this article:**
*कंधारे, . मारोती . जनार्दन . (2025). AI आणि सामाजिक शास्त्र: संधी आणि आव्हाने. Journal of Research & Development, 17(8(I)), 36–42.* https://doi.org/10.5281/zenodo.17115409

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

AI च्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावरील माहितीचे विश्लेषण, वर्तणूक नमुने शोधणे, भावनिक विश्लेषण, आणि सामाजिक भाकित करणे अधिक अचूक आणि वेगवान झाले आहे. त्यामुळे सामाजिक शास्त्रातील पारंपरिक संशोधन पद्धतींमध्ये आमूलाग्र बदल घडून येत आहे. मात्र, या प्रगत तंत्रज्ञानासोबत नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक अशा विविध पातळ्यांवरील आव्हानांचा सामना करावा लागत आहे. AI आधारित प्रणालीमध्ये पूर्वग्रह (bias), गोपनीयतेचा भंग, सांस्कृतिक असंवेदनशीलता, आणि नियमनाचा अभाव ही गंभीर समस्या ठरत आहेत. अशा पार्श्वभूमीवर, हा संशोधनप्रबंध AI आणि सामाजिक शास्त्र यांच्यातील संबंध, त्यातील संशोधन व धोरणनिर्मितीतील संधी, आणि समोरासमोर असणारी आव्हाने यांचा सखोल अभ्यास करतो. याचा उद्देश असा आहे की, AI चा वापर सामाजिक शास्त्रात अधिक उत्तरदायित्वपूर्ण, नैतिक आणि समावेशक स्वरूपात होण्यासाठी मार्गदर्शन करता यावे. सामाजिक शास्त्र हे मानवी वर्तन, समाजरचना, मूल्यव्यवस्था आणि संस्थात्मक संरचनेचा अभ्यास करणारे क्षेत्र आहे. तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे, विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) या क्षेत्रात झालेल्या क्रांतीमुळे सामाजिक शास्त्राच्या अभ्यासाची दिशा आणि व्याप्ती दोन्ही बदलत आहेत. AI आता समाजशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र इत्यादी शाखांमध्ये नव्या संधी उघडत आहे. मात्र या बदलासोबतच काही गंभीर आव्हानंही निर्माण झाली आहेत नैतिकता, गोपनीयता, माहितीचा गैरवापर, सामाजिक पक्षपातीपणा आणि मानवी हस्तक्षेपाची गरज.

**AI म्हणजे काय?**

AI म्हणजे "Artificial Intelligence" संगणक किंवा यंत्रणांना मानवीप्रमाणे विचार करण्याची, शिकण्याची, निर्णय घेण्याची व संवाद साधण्याची क्षमता प्रदान करणारी तंत्रज्ञानपद्धती. यामध्ये मशीन लर्निंग, नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग (NLP), डीप लर्निंग, डेटा ॲनालिटिक्स इत्यादींचा समावेश होतो. आजचा युग म्हणजे माहिती, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे युग. या युगात मानवी जीवन अधिक सुलभ, वेगवान आणि कार्यक्षम बनवण्याचे काम अनेक तंत्रज्ञानांनी केले आहे. त्यापैकी सर्वाधिक महत्त्वाचे आणि क्रांतिकारी तंत्रज्ञान म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता, म्हणजेच (Artificial Intelligence). AI हे एक असे तंत्रज्ञान आहे जे मानवप्रमाणे विचार करू शकणाऱ्या संगणकीय प्रणाली तयार करते. या प्रणाली शिकतात, समजून घेतात, निर्णय घेतात आणि अनुभवावरून सुधारणा करतात. याचा अर्थ असा की, मशीन किंवा संगणक प्रणालीला मानवाच्या मेंदूसारख्या कार्यांची क्षमता प्राप्त करून देणे. यात बुद्धिमत्ता, शहाणपण, शिकण्याची क्षमता, समस्या सोडवणे, भाषा समजणे, आणि निर्णय घेणे या गुणांचा समावेश होतो. AI चा उपयोग अनेक क्षेत्रांमध्ये होत असून त्याच्या मदतीने यंत्रे फक्त आदेश न पाळता, स्वतः निर्णय घेऊ लागली आहेत. ही प्रणाली *मशीन लर्निंग, नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग, कम्प्युटर व्हिजन* अशा विविध शाखांवर आधारित असते.

**उद्दिष्टे**

1. AI तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सामाजिक शास्त्रात निर्माण झालेल्या संधींचा अभ्यास करणे.
2. सामाजिक शास्त्रातील संशोधन, विश्लेषण व धोरणनिर्मितीत AI चा वापर कसा होतो, हे समजावून घेणे.
3. AI च्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या नैतिक, सामाजिक व सांस्कृतिक आव्हानांची चिकित्सा करणे.
4. भारतातील संदर्भात AI आणि सामाजिक शास्त्र यातील परस्परसंबंध विश्लेषित करणे.

**संशोधन पद्धती (Research Methodology)**

या संशोधनासाठी गुणात्मक (Qualitative) आणि विश्लेषणात्मक (Analytical) पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. मुख्यतः खालील स्त्रोत वापरले गेले:

- माध्यम विश्लेषण : विद्यमान संशोधन लेख, शासकीय अहवाल, AI तज्ज्ञांचे भाषण, विविध देशातील धोरण कागदपत्रे.
- मुलाखती : काही समाजशास्त्रज्ञ, AI विश्लेषक व धोरण निर्माते यांच्याशी संवाद.
- केस स्टडी : भारतात AI आधारित सामाजिक कार्यक्रम, जसे की “Aadhaar”, PM-Kisan योजनेत डेटा ॲनालिटिक्सचा वापर.

**सामाजिक शास्त्रात AI मुळे निर्माण झालेल्या प्रमुख संधी**

**1. मोठ्या प्रमाणावर डेटा विश्लेषण**

सामाजिक शास्त्रात आजच्या घडीला मोठ्या प्रमाणावर डेटा गोळा करणे आणि त्याचे विश्लेषण करणे ही एक महत्त्वाची गरज बनली आहे. पारंपरिक पद्धतींमध्ये डेटा संकलन आणि विश्लेषण यासाठी मोठा कालावधी लागत असे, परंतु कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

बिग डेटा तंत्रज्ञानाच्या सहाय्याने हे काम आता अधिक जलद, अचूक आणि सखोल पद्धतीने करता येते. आज विविध स्त्रोतांमधून जसे की जनगणना, सर्वेक्षण, आरोग्य विषयक अहवाल, सोशल मीडिया, मोबाईल ऍप्स, आणि ऑनलाईन व्यवहार यांमधून मोठ्या प्रमाणावर डेटा मिळतो. या डेटाचा उपयोग समाजातील विविध घटकांचे वर्तन, कल, गरजा आणि प्रतिक्रिया यांचा अभ्यास करण्यासाठी केला जातो.

**अ) जनतेची मतं आणि भावना जाणून घेण्यासाठी सोशल मिडिया ट्रेंड्सचे विश्लेषण:**

आजच्या डिजिटल युगात लोक आपले विचार, मतं, भावना सोशल मिडियावर मोकळेपणाने व्यक्त करतात. ट्विटर, फेसबुक, इंस्टाग्राम यांसारख्या माध्यमांवरील पोस्ट, कमेंट्स, हॅशटॅग्स, व चर्चांमधून प्रचंड प्रमाणात डेटा उपलब्ध होतो. AI च्या Natural Language Processing तंत्रज्ञानामुळे: लोकांचे भावना (sentiment analysis) समजतात. उदाहरणार्थ, एखाद्या धोरणाविषयी सकारात्मक की नकारात्मक प्रतिक्रिया आहे? एखाद्या सामाजिक घटनेविषयी जनतेचा कल काय आहे?

सामाजिक किंवा राजकीय आंदोलनांची व्याप्ती, तीव्रता आणि परिणाम समजता येतो.

**ब) सामाजिक योजनांचे परिणाम समजण्यासाठी Big Data आधारित अध्ययन:**

सरकार किंवा एनजीओंनी राबविलेल्या योजनांचा परिणाम प्रत्यक्षात काय झाला हे पारंपरिक पद्धतीने समजून घेणे खूप वेळखाऊ आणि मर्यादित असते. परंतु Big Data चा वापर केल्यास:

* योजनांमुळे किती लोक लाभले, कोणत्या भागात अधिक फायदा झाला, कोणत्या वर्गाला कमी फायदा झाला याचे विश्लेषण करता येते.
* विविध डेटासेट (उदा. उत्पन्न, आरोग्य, शिक्षण, रोजगार) यांचा परस्पर संबंध लावून धोरणे अधिक प्रभावीपणे आखता येतात.
* वेळोवेळी डेटा अपडेट करून योजनांमध्ये तातडीने बदल सुचवता येतो.

सामाजिक शास्त्रातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे मानवाच्या वर्तनाचे विश्लेषण करणे. मानवी वर्तन हे अनेक घटकांवर अवलंबून असते. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय आणि मनोवैज्ञानिक. पारंपरिक संशोधन पद्धतींच्या तुलनेत, आज कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि सिम्युलेशन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने या वर्तनाचे अचूक निरीक्षण, विश्लेषण आणि भविष्यातील परिस्थितींचे अनुकरण (simulation) करणे शक्य झाले आहे. AI आधारित मॉडेल्समध्ये मोठ्या प्रमाणावर डेटा वापरून, लोक कसे विचार करतात, निर्णय कसे घेतात, कोणत्या परिस्थितीत काय प्रतिक्रिया देतात याचे गणिती आणि सांख्यिकीय मॉडेल्स तयार करता येतात. ही मॉडेल्स वापरून विविध "what if" परिस्थितींचा अभ्यास करता येतो. म्हणजेच, एखादी घटना घडल्यास त्याचा समाजावर काय परिणाम होईल, हे आधीच समजण्याचा प्रयत्न केला जातो.

**निवडणूकांतील मतदान पद्धतींचे विश्लेषण:**

AI चा उपयोग करून निवडणुकीच्या आधी आणि नंतर मतदारांचा कल समजून घेता येतो:

- वेगवेगळया सामाजिक गटांचे मतदान वर्तन कसे बदलते?
- प्रचार, सामाजिक माध्यमांवरील ट्रेंड्स, स्थानिक समस्या यांचा मतदारांवर काय प्रभाव होतो?
- मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी कोणती धोरणे उपयोगी ठरू शकतात?

यासोबतच सिम्युलेशन वापरून वेगवेगळया मतदान यंत्रणा किंवा प्रचार रणनीतींचे परिणाम आधीच तपासून पाहता येतात. उदाहरणार्थ, एखाद्या भागात विशिष्ट प्रकारचा प्रचार केल्यास मतांमध्ये किती बदल होईल याचा अंदाज घेता येतो.

**दंगली, स्थलांतर व सामाजिक आंदोलनांचे सिम्युलेशन:**

समाजातील असंतोष, दारिद्र्य, भेदभाव, राजकीय अस्थिरता इत्यादी घटक काही वेळा दंगली, स्थलांतर किंवा आंदोलनांना कारणीभूत ठरतात. अशा घटनांचे AI आधारित सिम्युलेशन केल्यास:

- कोणत्या भागात अशा घटनांचा धोका अधिक आहे हे ओळखता येते.
- दंगल किंवा आंदोलन सुरू झाल्यास त्याचा प्रसार कसा होईल, किती काळ चालेल, कुठल्या भागांवर प्रभाव पडेल याचे आकलन मिळते.
- प्रशासन कोणती धोरणात्मक पावले उचलू शकते हे वेळेआधी समजते.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

उदाहरणार्थ, **"agent-based modelling"** ही एक सिम्युलेशन पद्धत आहे जिथे प्रत्येक व्यक्ती एक वेगळे वर्तन करते, आणि सामूहिक वर्तनातून मोठ्या सामाजिक घडामोडींचे अनुकरण करता येते.

**3. भावनिक विश्लेषण व नैतिक प्रवृत्तीचा अभ्यास (Sentiment & Moral Analysis)**

भावनिक विश्लेषण (Sentiment Analysis) आणि नैतिक प्रवृत्तीचा अभ्यास (Moral Analysis) हे **Natural Language Processing (NLP)** तंत्रज्ञानाच्या साहाय्याने केले जाणारे भाषिक विश्लेषणाचे महत्त्वाचे क्षेत्र आहे. या प्रक्रियेत संगणक प्रणाली मानवी भाषेतील भावना, नैतिकता, मूल्यप्रणाली व सामाजिक दृष्टिकोन ओळखते व विश्लेषित करते. खाली याचे सविस्तर स्पष्टीकरण दिले आहे:

**1. भावनिक विश्लेषण (Sentiment Analysis)**

भावनिक विश्लेषण म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या मजकुरातून (text) ती व्यक्ती *सकारात्मक (*positive), *नकारात्मक (*negative) किंवा *तटस्थ (*neutral) भावनेत आहे का हे शोधणे. हे विश्लेषण मुख्यतः लोकांच्या प्रतिक्रिया, अभिप्राय (feedback), सोशल मीडिया पोस्ट्स, इत्यादींवर आधारित असते. याचा वापर पुढीलबाबी साठी होतो. ग्राहकांचे अभिप्राय (customer reviews) समजून घेणे. एखाद्या घटनेवरील लोकांचा प्रतिसाद जाणून घेणे आणि सोशल मीडिया ट्रेंड समजणे. उदाहरणार्थ Twitter वर "सरकारच्या धोरणांबद्दल संताप" व्यक्त करणाऱ्या ट्वीट्स ओळखणे.Facebook पोस्टमधून एखाद्या सामाजिक चळवळीबद्दलचा लोकांचा सकारात्मक / नकारात्मक प्रतिसाद शोधणे.

**2. नैतिक प्रवृत्तीचा अभ्यास (Moral Analysis)**

NLP चा वापर करून नैतिक विश्लेषण म्हणजे भाषिक डेटातून लोकांची नैतिक मूल्यप्रणाली, धार्मिक किंवा सामाजिक विश्वास, सामाजिक अन्यायाविषयी दृष्टिकोन समजून घेणे. याचा वापर लोकांचे सामाजिक न्याय, समानता, स्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षता यासारख्या मूल्यांबाबतचे मत समजणे.उदाहरणार्थ ऑनलाइन भाषणांमधील पूर्वग्रह, द्वेष, सामाजिक भेदभाव ओळखणे,राजकीय किंवा सामाजिक चळवळींवर लोकांच्या नैतिक दृष्टिकोनांचे विश्लेषण.

- दलित अत्याचाराबाबत जनतेच्या नैतिक भावना शोधणे.
- स्त्री-पुरुष समानतेविषयी विविध समूहांचे नैतिक विचार विश्लेषित करणे.
- LGBTQ+ समुदायावर होणाऱ्या सामाजिक टिप्पणींमधून नैतिक वृत्ती विश्लेषित करणे.

**हे कसे कार्य करते?**

1. **डेटासंकलन.**
   Twitter, Facebook, Reddit, News articles यांमधून पोस्ट्स, कॉमेंट्स, किंवा अभिप्राय गोळा करणे.
2. **भाषिकपूर्वप्रक्रिया(Preprocessing):**
   मजकुरातील अडथळे काढून शुद्ध केले जाते.जसे की विशेष चिन्हे, स्टॉपवर्ड्स, इ.

**याचे फायदे:**

- समाजातील वास्तव समजून घेता येते.
- धोरणनिर्मितीसाठी उपयोगी ठरते.
- सामाजिक न्याय व समतेच्या चळवळींना दिशा देता येते.
- मीडियामधील पूर्वग्रह शोधता येतो.

**4.राजकीय व धोरणात्मक संशोधनात मदत**

AI चा वापर करून विविध सामाजिक योजनांचे परिणाम व प्रभाव तपासता येतात. या विश्लेषणाचा उपयोग राज्यशास्त्र, समाजकार्य आणि धोरण-निर्मिती क्षेत्रात होतो. उदाहरण: सार्वजनिक आरोग्य कार्यक्रमांची प्रभावीता मोजणे. ग्रामीण विकास योजनांची कार्यक्षमता विश्लेषण करणे. AI चा सर्वाधिक जर वापर होत असेल तर तो राजकीय विश्लेषण करण्यासाठी केला जातो.

**5. शैक्षणिक आणि संशोधन सहाय्य**

AI आधारित संशोधन सहाय्यक (जसे ChatGPT) वापरून समाजशास्त्रज्ञ आपल्या संशोधनासाठी संदर्भ, आकडेवारी आणि प्राथमिक विश्लेषण मिळवू शकतात.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

उदाहरण:

- AI सह लिटरचर रिव्ह्यू
- संशोधन प्रस्ताव तयार करणे
- माहिती संकलन आणि स्पष्टीकरण

**6. मानववंशशास्त्रात AI चा वापर (Anthropological Applications)**

AI च्या साहाय्याने विविध समाजांच्या पारंपरिक पद्धती, भाषा, प्रथा यांचे दस्तऐवजीकरण आणि विश्लेषण करता येते.

उदाहरण:

- आदिवासी भाषांचा भाषावैज्ञानिक विश्लेषण
- सांस्कृतिक सापेक्षतेचे मॉडेलिंग

**7. समाजमाध्यम आणि जनमत अभ्यास (Media & Public Opinion Research)**

AI सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील संवाद, ट्रेंड्स व प्रतिक्रियांचे विश्लेषण करू शकतो. हे विश्लेषण जनमत समजण्यासाठी उपयुक्त ठरते.

उदाहरण:

- राजकीय पक्षांविषयी मतांचे विश्लेषण
- कोविड-१९ काळातील जनतेच्या भावना

**AI आणि सामाजिक शास्त्र: आव्हाने**

**1. डेटामध्ये पूर्वग्रह (Bias in Data)**

AI प्रणाली ज्या डेटावर प्रशिक्षित केल्या जातात, त्या डेटामध्ये अनेकदा जात, लिंग, धर्म, वर्ग इत्यादींवर आधारित पूर्वग्रह (bias) असतो. ही प्रणाली पुढे समाजशास्त्रीय विश्लेषणात वापरली गेल्यास अन्यायकारक आणि पक्षपाती निष्कर्ष मिळू शकतात.

उदाहरण:

- facial recognition तंत्रज्ञान काळ्या व्यक्तींना चुकीचे ओळखते.
- महिलांविषयी असलेल्या पूर्वग्रहामुळे पुरुषप्रधान निर्णय घेतले जातात.

**2. गोपनीयता आणि वैयक्तिक माहितीचा अपवापर (Privacy and Data Misuse)**

AI आधारित सामाजिक संशोधनासाठी व्यक्तिगत माहितीचे मोठ्या प्रमाणावर संकलन आवश्यक असते. यामुळे लोकांची खाजगी माहिती उघड होणे, डेटा चोरी, आणि निगेटिव्ह सामाजिक परिणाम होऊ शकतात.

उदाहरण:

- Facebook-Cambridge Analytica प्रकरण, जिथे मतदारांचा डेटा राजकीय फायद्यासाठी वापरला गेला.

**3. नैतिकतेचे प्रश्न (Ethical Dilemmas)**

AI प्रणाली कोणत्याही नैतिक विचार किंवा सामाजिक संदर्भाशिवाय कार्य करतात. सामाजिक शास्त्रात मूल्य, नैतिकता, माणुसकी यांना महत्त्व असते. AI चा वापर करताना खालील प्रश्न उपस्थित होतात:

- कोणाला संशोधनात सहभागी करायचे?
- AI ने घेतलेला निर्णय नैतिकदृष्ट्या योग्य आहे का?
- मानवी हस्तक्षेप किती असावा?

**4. सांस्कृतिक असंवेदनशीलता (Cultural Insensitivity)**

AI सिस्टीम्स बहुतांश वेळा पश्चिमी संदर्भांवर आधारित असतात. त्यामुळे त्या भारतीय किंवा स्थानिक समाजरचनेतील विविधता, परंपरा, मूल्यं समजून घेण्यात अयशस्वी ठरतात.

उदाहरण: ग्रामीण भारतातले सामाजिक प्रश्न समजण्यासाठी AI प्रशिक्षित करताना केवळ शहरी डेटाचा वापर केल्यास चुकीचे निष्कर्ष मिळतात.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**5. मानवी संवादाचा अभाव (Loss of Human Interpretation)**

सामाजिक शास्त्रातील अनेक पैलू जसे की भावना, प्रतीक, लोकसंस्कृती हे सांकेतिक, अमूर्त आणि संदर्भाधारित असतात. AI अशा संकल्पना अचूक समजू शकत नाही, आणि त्यामुळे संशोधनाचे मानवी पैलू हरवतात.

**6. AI वर अतीनिर्भरता (Over-dependence on Technology)**

AI प्रणाली वेगाने काम करत असल्या, तरी समाजशास्त्रात गहन निरीक्षण, प्रत्यक्ष सहभाग, आणि मानवकेंद्रित विश्लेषण आवश्यक असते. AI वर अतीनिर्भर झाल्यास संशोधनात मानवी संवेदनशीलता कमी होते.

**7. पारंपरिक संशोधन पद्धतींचे विस्मरण (Neglect of Traditional Methods)**

AI आधारित डेटा विश्लेषणामुळे अनेक अभ्यासक पारंपरिक पद्धती जसे की क्षेत्रीय अभ्यास (fieldwork), व्यक्ती संवाद (interview), पद्धतशीरनिरीक्षणयाकडेदुर्लक्षकरतात.
हे समाजशास्त्रीय दृष्टिकोनासाठी घातक ठरू शकते.

**8. AI चे आत्मशिकण आणि अनपेक्षित परिणाम (Unpredictable Outcomes)**

AI स्वतः शिकणाऱ्या (self-learning) प्रणालींवर आधारित असते. त्या कधी कधी मानवी अपेक्षेपेक्षा भिन्न आणि अनपेक्षित सामाजिक निर्णयघेऊशकतात.
हे समाजात गोंधळ, गैरसमज, किंवा धोके निर्माण करू शकते.

**RESULTS AND DISCUSSION (परिणाम आणि चर्चा)**

संशोधनातून दिसून आले की, AI हे सामाजिक शास्त्राच्या क्षेत्रासाठी एक दुहेरी धार आहे. एका बाजूला, ते संशोधन व धोरण निर्मितीला अचूकता, गती व विश्लेषणात्मक क्षमता देत आहे. दुसऱ्या बाजूला, AI मुळे सामाजिक अन्याय, नैतिक प्रश्न, आणि गोपनीयतेचे उल्लंघन यांसारख्या नव्या समस्या उद्भवत आहेत. भारतातील उदाहरणांवरून हे दिसून येते की, AI वापरून नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा वेग वाढला आहे. मात्र, अशा धोरणांमध्ये पारदर्शकतेचा अभाव आणि वैयक्तिक माहितीचा वापर चिंता निर्माण करतो. तसेच, ग्रामीण भागात AI वापराचे प्रमाण कमी असून शिक्षण व तांत्रिक सुविधा यांची असमानता आहे.

**निष्कर्ष**

**AI आणि सामाजिक शास्त्र यामधील गुंतागुंतीचे संबंध: एक सखोल अभ्यास**

AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) आणि सामाजिक शास्त्र यामधील संबंध हे केवळ परस्परसंबंधीच नाहीत, तर ते परस्परपूरक स्वरूपाचे आहेत. सामाजिक शास्त्र मानवाच्या वर्तन, परंपरा, संस्था आणि समाजघटनांचे विश्लेषण करते, तर AI या प्रक्रियांना अधिक कार्यक्षम, गतिमान आणि प्रामाणिक बनविण्याची क्षमता बाळगते. मात्र, यातील संबंध केवळ तांत्रिक नसून नैतिक, सांस्कृतिक आणि राजकीय संदर्भात देखील गुंतागुंतीचे आहेत.

**AI हे सामाजिक विश्लेषणाचे प्रभावी साधन**

AI च्या सहाय्याने सामाजिक शास्त्रातील मोठ्या प्रमाणातील आकडेवारीचे विश्लेषण करता येते. उदाहरणार्थ, निवडणूक नमुने, जनमत सर्वेक्षण, सामाजिक माध्यमांवरील ट्रेंड्स, लोकसंख्या अभ्यास, स्थलांतर नमुने, शिक्षण प्रणालीतील असमतोल यासारख्या विविध घटकांचे विश्लेषण AI वापरून करता येते. AI आधारित Natural Language Processing (NLP), Machine Learning (ML), आणि Big Data Analysis या साधनांचा वापर करून समाजातील लपलेली प्रवृत्ती किंवा अनोळखी समस्याही शोधता येतात. उदाहरणार्थ, AI चा वापर करून एखाद्या शहरातील विशिष्ट भागात गुन्हेगारीची प्रवृत्ती, सार्वजनिक आरोग्याशी संबंधित धोके किंवा बेरोजगारीचे प्रमाण इत्यादी बाबी तपासता येतात. यामुळे धोरणे अधिक लक्ष्यित स्वरूपात तयार होतात. मात्र, अशा विश्लेषणासाठी लागणारे डेटाचे स्वरूप, गोपनीयता आणि परवानगी याबाबतीतही सजग राहावे लागते.

**नैतिकता, पारदर्शकता आणि समावेशिकता**

AI चा प्रभावी वापर होण्यासाठी नैतिकता ही अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. एखाद्या समाजातील विशिष्ट गटावर अन्यायकारक परिणाम होणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, जर AI मॉडेलमध्ये पूर्वग्रहदूषित डेटाचा वापर केला

गेला, तर त्याचे निर्णयसुद्धा पूर्वग्रहदूषित असतील. त्यामुळे 'algorithmic bias' ही एक गंभीर समस्या ठरते. यामुळेच पारदर्शकता महत्त्वाची ठरते. AI प्रणाली कशी कार्य करते, निर्णय कसे घेतले जातात, आणि यामागील लॉजिक काय आहे हे वापरकर्त्यांसाठी समजण्याजोगे असणे आवश्यक आहे. यासह, AI विकास प्रक्रियेत विविध सामाजिक गटांचा समावेश, विशेषतः अल्पसंख्याक, महिला, आणि वंचित समुदायांचा सहभाग देखील आवश्यक आहे. सामाजिक शास्त्रातील समावेशाच्या तत्त्वांवर आधारित दृष्टिकोनातूनच AI ला अधिक न्याय्य आणि व्यापक करता येईल.

**सामाजिक संदर्भ, मानवी मूल्ये व स्थानिक गरजांची जाणीव**

AI प्रणाली विकसित करताना स्थानिक संदर्भ लक्षात घेणे अनिवार्य आहे. एका देशात प्रभावी ठरलेली AI प्रणाली दुसऱ्या देशात यशस्वी होईलच असे नाही. सामाजिक मूल्यव्यवस्था, संस्कृती, भाषा, आणि गरजांची भिन्नता लक्षात घेता AI प्रणालींमध्ये लवचिकता आणि स्थानिक गरजांशी सुसंगतता असावी लागते. मानवी मूल्ये, जसे की समानता, सहानुभूती, स्वायत्तता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा समावेश AI च्या निर्णयप्रक्रियेत व्हावा लागतो. अन्यथा, AI प्रणाली केवळ तांत्रिक समाधान देईल, पण सामाजिक समस्या अधिक गुंतागुंतीच्या बनवेल.

**बहुआयामी व आंतरशास्त्रीय संशोधनाची आवश्यकता**

भविष्यातील अभ्यासासाठी, AI आणि सामाजिक शास्त्र यामधील सहकार्य अधिक बळकट करणे आवश्यक आहे. यासाठी केवळ तांत्रिक ज्ञान पुरेसे नाही, तर मानसशास्त्र, मानवशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, आणि तत्त्वज्ञान यासारख्या विविध शाखांचा समावेश होणे गरजेचे आहे. AI तंत्रज्ञानाच्या विकासासोबतच, त्याचा समाजावर होणारा परिणाम, व्यक्तीगत स्वातंत्र्यावर होणारे परिणाम, कामाच्या पद्धतीतील बदल, सामाजिक संवादातील बदल, आणि मानवी नातेसंबंधांवरील परिणाम यांचा अभ्यास करणे तितकेच आवश्यक आहे. AI तज्ञ, सामाजिक शास्त्रज्ञ, धोरणकर्ते, आणि नागरी समाज यांच्यातील संवाद वाढवणे हे या क्षेत्रातील प्रगतीसाठी महत्त्वाचे पाऊल ठरेल. शासकीय धोरणे तयार करताना किंवा AI आधारित सामाजिक प्रकल्प राबवताना आंतरशास्त्रीय दृष्टिकोन महत्त्वाचा ठरतो.

**संदर्भ (References)**

1. Russell, S., & Norvig, P. (2020). Artificial Intelligence: A Modern Approach. Pearson.
2. Crawford, K. (2021). Atlas of AI. Yale University Press.
3. Florida, L. (2018). The Ethics of Artificial Intelligence. Oxford University Press.
4. अनेक सामाजिक शास्त्र अभ्यासकांचे संशोधन लेख व अभ्यास अहवाल.
5. विविध सरकारी आणि शिक्षण संस्थांचे AI धोरण दस्तावेज.
6. Indian Council of Social Science Research (ICSSR) Publications.

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025


Original Article

# वैश्वीकरण का सांस्कृतिक धरोहरों पर प्रभाव


**डॉ. कमलाकर देवरावजी नवघरे**

सहायक प्राध्यापक (हिंदी)

**Email**-kamlakarnavghare@gmail.com



**Manuscript ID**:

JRD -2025-170810

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 8(I)

Pp. 43-46

August 2025

**Submitted:** 10 July. 2025

**Revised:** 25 July. 2025

**Accepted:** 10 Aug 2025

**Published:** 30 Aug. 2025



## सारांश

आधुनिक युगात महिला सक्षमीकरण हा महत्त्वाचा मुद्दा आहे. सक्षमीकरण आणि सशक्तीकरण हे दोन्ही सारखेच आहेत. एखादा व्यक्ती सक्षम असणे याचा अर्थ असा होतो कि, ते स्वत:चे निर्णय स्व:त घेऊ शकतात. कोणाच्याही मदतीशिवाय जीवन जगू शकतात. भारतातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि लैगिक समानतेसाठी संघटीत प्रयत्नांची सुरुवात १९व्या शतकातील सामाजिक - धार्मिक सुधारणा चळवळीपासून केली जावू शकते. राजा राम मोहन राय, स्वामी दयानंद सरस्वती, ईश्वरचंद विद्यासागर आणि त्यांच्याशी संबंधित संस्थासारख्या समाज सुधारकांनी केलेल्या प्रयत्नामुळे भारतात लैगिक समानता आणि महिला सक्षमीकरणाला चालना मिळाली. "स्त्रियांनी नवनवीन व्यावसायिक कौशल्य हस्तगत करून स्व:आत्मनिर्भर होण्याबरोबरच समाजाला देखील आत्मनिर्भर व विकसित होण्यास मदत करावी."[३] आधुनिक युगात, अनेक भारतीय महिला अनेक महत्त्वाच्या राजकीय आणि प्रशासकीय पदांवर तैनात आहेत.तरीही सामान्य ग्रामीण महिलांना अजूनही त्यांना घरात राहण्यास भाग पडले जाते आणि त्यांच्याकडे सामान्य आरोग्य सुविधा आणि शिक्षण यासारख्या सुविधा नाहीत. स्त्री सक्षमीकरणाचा मुद्दा केवळ भारतापुरता सीमित नाही कारण आज प्रगत म्हणविणाऱ्या व आर्थिक भरारीचे बळ गाठणाऱ्या देशातील स्त्रियांनाही आपल्या अस्तित्वासाठी व हक्कासाठी लढा पुकारावा लागला होता. ज्याचे पडसाद संपूर्ण जगावर उमटले व स्त्री शक्तीला एक नवी दिशा मिळाली. ज्याचे रुपांतर हळूहळू स्त्री सक्षमीकरण, स्त्री सशक्तीकरण, स्त्रीवाद, स्त्री-पुरुष समानता यासारख्या मुद्द्यांमध्ये झाले. एकंदरीतच पाहता, दि. ८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून घोषित झाला व समस्त स्त्रियांचे प्रश्न व्यासपीठावरून मांडले जावू लागले. जागतिक पातळीवर स्त्री सक्षमीकरणाची वाटचाल सुरु झाली. सशक्त महिला हेच सशक्त समाजाचे लक्षण होय. भारतीयांची मानसिकता बदलण्यास, स्त्रियांनी निर्णय क्षम झाल्यास तसेच शासनाने लक्ष घातल्यास खऱ्या अर्थाने स्त्री सक्षमीकरण होणे शक्य आहे. ज्या क्षणी स्त्रिया आर्थिकदृष्टया स्वावलंबी व स्वतंत्र होतील त्या क्षणी देश सुदृढ व विकसित झाला असे म्हणता येईल."[४] ज्या देशातील स्त्री सुरक्षित तो देश सुरक्षित कारण देश घडवण्याची वाचवण्याची व पुढे नेण्याची क्षमता स्त्रीयांशिवाय इतर घटकात नाही. कवी कुसुमाग्रजांच्या कवितेच्या ओळी इथे नमूद कराव्याशा वाटतात –

"समान मानव माना स्त्रीला तिची अस्मिता खुडू नका
दासी म्हणून विकू नका व देवी म्हणून भजू नका" ||

भारतातील महिला अजूनही दुय्यम स्थानावर आहेत. त्या आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल तसेच निर्भर आहेत. पण वर्तमान स्थितीत स्त्रियांमध्ये शिक्षण व तत्सम कारणामुळे जागरुकता वाढत चालली आहे. त्यामुळे स्त्री सक्षमीकरणाच्या संकल्पनेचा विचार गांभीर्याने करणे गरजेचे आहे. स्त्री सक्षमीकरणाचा विचार करताना विविध बाजू आणि पैलूंचा विचार करणे गरजेचे आहे. जसे- स्त्रीयांचा सर्वांगीण विकास या एका समस्येचा विचार करतांना संबंधित अनेक समस्यांचाही विचार केला गेला पाहिजे. त्यांची परिणामकारकता व पारदर्शकता तपासली जावी. स्त्रियांनी फॅशनेबल कपडे घातले म्हणून स्वातंत्र मिळाले किंवा सक्षमीकरण झाले असे नाही तर त्याचबरोबर वैचारिक स्वातंत्र्य,मानसिक परिपक्कता स्वातंत्र्याच्या संकल्पना इ. चा विचार करण्यात यावा.शिक्षण आणि स्त्री सक्षमीकरण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. साक्षरतेमुळे स्त्रीयांना बाहेरचे जग व त्यातील व्यवहारांचा परिचय होतो. स्वत:चे हक्क, अधिकार कायदेविषयक माहिती इ. चे ज्ञान मिळते. स्त्री सक्षमीकरण एक स्थिर प्रक्रिया नसून गतिशील प्रक्रिया आहे. याप्रक्रियेत सातत्य असणे आवश्यक आहे. एखादी स्त्रीवादी मागणी पूर्ण झाली म्हणजे स्त्री सक्षमीकरणाचा हेतू साध्य झाला असे म्हणता येत नाही. कारण सक्षमीकरणाशी निगडीत असलेल्या अनेक बाबीचा विचार करून त्यात गतिमानता निर्माण करणे आवश्यक आहे. "कमी शिक्षण लहान वयातील लग्न, कुटुंबातील दुय्यम स्थान, हिंसाचाराचे अनुभव, वैवाहिक स्थितीवर अवलंबून असलेले समाजातील स्थान, साधनहीनता आणि रोजगाराच्या मर्यादित संधी अशा मुळातच प्रतिकूल परिस्थितीतून येणाऱ्या या महिला आहेत."[५] स्त्री सक्षमिकरणासाठी वैयक्तिक पातळीवर उपाय खालीलप्रमाणे सुचविता येतील –

1. महिलांनी स्वत:साठी वेळ काढावा.
2. महिलांनी स्वत:मध्ये आत्मभान व विश्वास जागृत करावा.
3. लहानसहान बाबीसाठी इतरांवर वासाभून राहू नये.
4. कुटुंबातील व समाजातील मोठे निर्णय सामोपचाराने सोडवावे.
5. धार्मिक दृष्टीकोन समानतेवर आधारित असावा.
6. स्त्रीवादी उपेक्षा प्रधान वक्तव्यावर आक्षेप घेण्याचे साहस करावे.
7. सामाजिक व नैतिक मुल्यांचा विकास करावा.
8. प्रसंगी कणखरतेची भूमिका घ्यावी.
9. स्पर्धा आणि महत्वाकांक्षेकडे वाटचाल सुरु करावी.

ज्योपर्यंत स्त्रीवर स्त्रीपण लादले जाईल, तिला बंदिस्त चौकटीत बसविले जाईल,अधिकारापासून वंचित ठेवले जाईल, तिच्या स्त्रीत्वाचा अपमान केला जाईल, तिच्या आत्मसन्मानाला ठेच लावली जाईल, तोपर्यन खऱ्या अर्थाने स्त्री सक्षमीकरण साधता येणार नाही....साधले जाणार नाही. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी' या उक्तीप्रमाणे एक स्त्री शिकली तर ती संपूर्ण कुटुंबाला साक्षर करू शकते. ज्या देशातील महिला सुरक्षित तो देश सुरक्षित, ज्या देशातील महिला विकसित तों देश विकसित आणि ज्या देशातील महिला

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

अप्रगत तो देश अप्रगत असा निष्कर्ष संपूर्ण जगातील स्त्रियांचा अभ्यास करून काढता येईल. जगाच्या नकाशावर ज्या ज्या देशातील स्त्रीयांना विकासाची समान संधी न मिळाली तो देश झपाट्याने पुढे गेला कारण कुटुंबातील स्त्री प्रगत झाल्यास ते कुटुंब आपोआप प्रगत होते. पण ज्या देशात स्त्रीयांना दुय्यम वागणूक दिली जाते. ते देश अजूनही विकासाच्या वाटेवर संथगतीने वाटचाल करताना दिसून येतात.स्त्रीचं कार्यक्षेत्र आज 'चूल आणि मुल' एवढ्यापुरतच मर्यादित राहिलं नाही. तर सर्वच क्षेत्रात स्त्री हि पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून बरोबरीने कार्य करतांना दिसून येते. स्त्री कडे फक्त एक अबला म्हणून पाहन हे माणुसकीला काळिमा फासणार आहे. स्त्री ही अबला नसून एक सक्षम कार्यक्षम साहसी कर्तृवक्षम महिला आहे. "लोक स्त्रीकडे एक भोगवस्तू म्हणून पाहतात पण त्यांना विसर पडला आहे कि ,स्त्री सर्वात प्रथम आई आहे. ती आईच्या रुपात मिळाली नसती तर काय झाल असत? आपण जन्माला आलोच नसतो आणि हे जीवनही मिळालं नसत. तेव्हा केवळ शून्य झालं असत. त्या शून्याला भरण्यासाठी परमेश्वराने स्त्रीला आपल्यासाठी प्रथम आई बनवलं. म्हणून आईला पूज्यनीय देवी मानल जाते. 'मातृदेवो भव': या शब्दाचा हाच खरा अर्थ आहे. आज स्त्रीच्या सहज सुलभ गुणांचा आदर केला जात नाही."[६] महिला सक्षमिकरणात ती शक्ती आहे. जी समाजात आणि देशात खूप बदल घडवून आणू शकतात. केवळ घरघुती आणि कौटुंबिक जबाबदाऱ्याच नव्हे तर महिलांनी प्रत्येक क्षेत्रात सक्रिय आणि सकारात्मक भूमिका बजावली पाहिजे. ग्रामीण भागात जाऊन तेथील महिलांना शासनाकडून मिळणाऱ्या सुविधा आणि त्यांच्या हक्काची माहिती दिल्याने त्यांचे भविष्य चांगले होऊ शकेल. महिला सक्षमीकरणासाठी 'बेटी बचाओ बेटी पढाओ', उज्वला योजना अशा विविध योजनेची कामे शासनाकडून केली जात आहेत. वेगवेगळया क्षेत्रांमध्ये महिलांना सहभागी करून घेण्यासाठी जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. शिक्षणासाठी झटणाऱ्या महाराष्ट्राची आद्यशिक्षिका सावित्रीबाई फुले , राणी लक्ष्मीबाई, कल्पना चावला,सिंधुताई सपकाळ, माता जिजाऊ यांनी त्यांच्या आयुष्यात अनेक अडचणींचा सामना करत देशाच्या प्रगतीसाठी मोलाचे योगदान दिले.आज महिलांना अनेक समस्याचा सामना करावा लागतो. "दर दिवशी महिलांवर अत्याचार होत आहेत. दर ४२-४४ मिनिटांनी महिलांचे अपहरण केले जाते. प्रत्येक ४७ मिनिटांनी बलात्कार केले जातात. दररोज १७ हुंड्यासाठी हत्या केली जाते."[७] भारताला सक्षम व महासत्ता बनवण्याच्या प्रयत्नांच्या दृष्टीने महिलांचे सक्षमीकरण आवश्यक आहे. प्रत्येक महिला आपल्या हक्कासाठी स्वातंत्र्या साठी आणि स्वत:वर होणाऱ्या अन्यायाविरुध्द आवाज उठवू शकते. लढू शकते. महिला मानसिकदृष्ट्या सक्षम झाली तर ती कुठल्याही क्षेत्रांमध्ये यश प्राप्त करू शकते. महिलांच्या सक्षमीकरणात मानसिक, शारीरिक, सुदृढतेबरोबरच महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र बनवले पाहिजे. महिलांवरील अन्याय रोखण्यात कायद्याची भूमिका खूप महत्त्वाची असते.त्या पद्धतीचे कायदे संसदेत पारित करण्यात आले आहेत. हुंडा प्रतिबंध कायदा,गर्भधारणा कायदा, सती आयोग, स्त्री भृणहत्या विरोधी कायदा, बालविवाह अधिनियम, लैगिक छळ अधिनियम यासारखे कायदे भारतात लागू करण्यात आले.

**निष्कर्ष**

भारताच्या सामाजिक,सांस्कृतिक आणि राजकीय इतिहासात स्त्री सक्षमीकरण हा एक महत्त्वाचा आणि परिवर्तनशील प्रवास राहिला आहे. प्राचीन काळात भारतीय स्त्रीयांना शिक्षण ,संपत्तीचे स्वामित्व आणि समाजात सन्मान्य स्थान होते. परंतु मध्ययुगात सामाजिक बंधनामुळे स्त्रियांचे अधिकार आणि स्वतंत्रता मर्यादित झाली. १९ व्या शतकात समाजसुधारकांनी स्त्रियांच्या स्थितीत परिवर्तन घडवण्याचा प्रयत्न केला. राजा राम मोहन रॉय, महात्मा फुले, पंडिता रमाबाई, सावित्रीबाई फुले, यांसारख्या विचारवंतांनी स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह, आणि सतीप्रथा बंदी यासाठी मोठे योगदान दिले. स्त्रीयांना शिक्षण दिल्यास त्यांचा सर्वांगीण विकास होईल, हे सुधारकांनी स्पष्ट केले. आज शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रिया वेगवेगळया क्षेत्रात आपली ओळख निर्माण करत आहेत. मात्र ग्रामीण आणि मागास भागात अजूनही शिक्षणाची टक्केवारी अजूनही कमी आहे. शिक्षण, तंत्रज्ञान आणि अर्थव्यवस्थेच्या प्रगतीमुळे भारतीय स्त्रिया वेगवेगळया क्षेत्रात आघाडीवर आहेत. सरकारने 'बेटी बचाओ, बेटी पढाओ', महिलांसाठी आरक्षण, स्वयंरोजगार योजना यासारख्या अनेक धोरणाव्दारे स्त्री सक्षमीकरणाला चालना दिली.भारताच्या स्त्री सक्षमीकरणाच्या प्रवासात प्रगती झाली असली तरी अजूनही काही सामाजिक आणि आर्थिक अडथडे कायम आहेत. एकंदरीतच पाहता, शिक्षण,स्वावलंबन आणि सामाजिक परिवर्तनाद्वारे महिलांना अधिक सक्षम बनविणे ही काळाची गरज आहे. भविष्यात,समान संधी आणि लैंगिक समभाव वाढवून भारतातील स्त्रियांचा सर्वांगीण विकास साधला जावू शकतो. स्त्री सक्षमीकरण हा केवळ महिला विकासाचा मुद्दा नसून संपूर्ण समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. शिक्षण आरोग्य, रोजगार आणि राजकीय सहभाग यामध्ये महिलांना संधी देऊन त्यांच्या विकासाला चालना देणे गरजेचे आहे. समाजातील प्रत्येकाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे,कारण सक्षम स्त्री म्हणजे सक्षम समाज.

**संदर्भ:-**


1. गंगणे डॉ. वर्षा,'स्त्री सक्षमीकरणाची वाटचाल आणि वास्तव' ,ऋचा प्रकाशन नागपुर प्रथम आवृत्ती जुलै २०१५ पृष्ठ क्र.९६
2. सं. कोत्तापल्ले नागनाथ, ताराबाई शिंदे लिखित 'स्त्री-पुरुष तुलना' सायन पब्लिकेशन पुणे तृतीयावृत्ती २०१० पृष्ठ क्र.६९
3. बोर्डे-खडसे डॉ.सुनिता, 'स्त्री सुधारणा',महाराजा सयाजीराव गायकवाडचरित्र साधने प्रकाशन समिति औरंगाबाद पहिली आवृत्ती २०२० पृष्ठ.क्र. १२९
4. गंगणे डॉ. वर्षा,'स्त्री सक्षमीकरणाची वाटचाल आणि वास्तव' ,ऋचा प्रकाशन नागपुर प्रथम आवृत्ती जुलै २०१५ पृष्ठ क्र.११४
5. सं. दया पवार, प्रज्ञा भोसले, नारायण दीक्षित, माधुरी जोंधळे, सुरेंद्र, 'पाक्षिक परिवर्तनाचा वाटसरू' जानेवारी २०२५ पृष्ठ क्र.१५
6. आर्य डॉ. राकेश कुमार, 'महिला सशक्तीकरण और भारत' डायमंड पॉकेट बुक्स नई दिल्ली पृष्ठ क्र. ७८, ७९
7. श्रीवास्तव डॉ.अभिषेक व देशपांडे डॉ. सुनीलकुमार देशपांडे, एस. बी. पी. डी. पब्लिकेशन, आगरा पृष्ठ क्र.७२

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# चार्वाक साहित्यातील शाश्वतेला चालना देणारे वास्तव

**डॉ. गोरोबा तुकाराम खुरपे**
प्राचार्य
कला व वाणिज्य महाविद्यालय, मायणी
ता. खटाव जि. सातारा (महाराष्ट्र)
Email : gtkhurpe@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-170814
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8(I)
Pp. 59-63
August 2025
**Submitted:** 12 July. 2025
**Revised:** 27 July. 2025
**Accepted:** 12 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**सारांश**

चार्वाक तत्वज्ञान हे एक प्राचीन भारतीय भौतिकवादी नास्तिक तत्वज्ञान आहे. ते केवळ प्रत्यक्ष पुराव्यांवर विश्वास ठेवते आणि अलौकिक प्राण्यांच्या सिद्धांताला स्वीकारत नाही. या तत्वज्ञानाला वेदबाह्य असेही म्हणतात. शाश्वतता हा शब्द सामान्यतः: कालातीतता, चिरस्थायीपणा किंवा दीर्घकाळ टिकून राहण्याच्या क्षमतेचा दर्शक आहे. चार्वाक साहित्यात शाश्वतता ही संकल्पना थेट ग्रंथांच्या उपलब्धतेपेक्षा त्यातील विचारांच्या प्रभावातून आणि तर्कशुद्ध दृष्टिकोनातून दिसून येते. चार्वाक दर्शनाचे साहित्य मूळ स्वरूपात उपलब्ध नसले तरी त्याचा प्रभाव भारतीय तत्त्वज्ञान, साहित्य आणि सामाजिक विचारांवर पडला आहे. चार्वाक साहित्याची शाश्वतता खालील कारणांमुळे टिकून आहे

**तर्कशुद्धता आणि संशयवाद :** चार्वाक दर्शनाने तर्क आणि संशयवादी दृष्टिकोनाला प्रोत्साहन दिले. यामुळे पारंपरिक धार्मिक आणि कर्मकांड विचारांना आव्हान मिळाले, जे आजच्या वैज्ञानिक युगातही प्रासंगिक आहे.

सामाजिक सुधारणा: चार्वाक दर्शनाने जातीयव्यवस्था, कर्मकांडआणि अंधश्रद्धांचा विरोध केला. यामुळे सामाजिक समानतेच्या विचारांचा प्रोत्साहन मिळाला, जे आधुनिक काळातही शाश्वत आहे.

**सुखवादीतत्त्व :** जीवनाचा उद्देश सुख मिळवणे हा विचार आजच्या भौतिकवादी आणि व्यक्तिकेंद्रीत समाजातही प्रतिबिंबित होतो. चार्वाक साहित्याचा प्रभाव बौद्ध, जैन आणि हिंदू तत्त्वज्ञानातील वादविवादांमधून दिसतो. उदाहरणार्थ, गौतम बुद्ध यांच्या संवादांमध्ये आणि जैन साहित्यात चार्वाक विचारांचा उल्लेख आढळतो. यामुळे चार्वाक दर्शनाचे विचार इतर तत्त्वज्ञांशी संगत करत राहिले.

**मुख्यशब्द :** चार्वाक साहित्य, शाश्वतता, वास्तव, वैध ज्ञान, तर्कशुद्धता, संशयवाद, कर्मकांड, आधुनिक विचारधारा

**प्रास्ताविक**

चार्वाक हा शब्द 'चारु' + 'वाक' (गोड बोलणारा) या शब्दांपासून निर्माण झाला आहे असा लोकांचा समज आहे. बौद्ध पिटकांमध्ये 'लोकायत' हा शब्द चार्वाक तत्वांसाठी वापरला जातो, ज्याचा अर्थ 'या जगावर विश्वास ठेवणारी आणि स्वर्ग, नरक किंवा मोक्ष या संकल्पनेवर विश्वास न ठेवणारी तत्वज्ञानाची प्रणाली' असा होतो. चार्वाक किंवा लोकायत तत्वज्ञानाचा उल्लेख महाभारतातही आढळतो, परंतु याचा कोणताही मूळ मजकूर उपलब्ध नाही. चार्वाक तत्वज्ञान हे एक प्राचीन भारतीय भौतिकवादी नास्तिक तत्वज्ञान आहे. ते केवळ प्रत्यक्ष पुराव्यांवर विश्वास ठेवते आणि अलौकिक प्राण्यांच्या सिद्धांताला स्वीकारत नाही. या तत्वज्ञानाला वेदबाह्य असेही म्हणतात. सहा वेदबाह्य तत्वज्ञान आहेत - चार्वाक, माध्यमिक, योगचार, सौत्रांतिका, वैभासिक आणि अर्हत (जैन). हे सर्व वेदांशी असहमत असलेल्या सिद्धांतांचे प्रतिपादन करतात.

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17115455

OPEN ACCESS

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. गोरोबा तुकाराम खुरपे, प्राचार्य,कला व वाणिज्य महाविद्यालय, मायणी ता. खटाव जि. सातारा (महाराष्ट्र)*

**How to cite this article:**
*खुरपे, . गोरोबा . तुकाराम . (2025). चार्वाक साहित्यातील शाश्वतेला चालना देणारे वास्तव. Journal of Research & Development, 17(8(I)), 59–63.* https://doi.org/10.5281/zenodo.17115455

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

अजित केशकंबली यांना चार्वाकचे अग्रदूत म्हणून श्रेय दिले जाते, तर बृहस्पती यांना सहसा चार्वाक किंवा लोकायत तत्वज्ञानाचे संस्थापक म्हणून ओळखले जाते. चार्वाकचे बहुतेक प्राथमिक साहित्य, बृहस्पती सूत्र (600 ईसापूर्व), हरवले आहे किंवा हरवले आहे. त्याच्या शिकवणी शास्त्रे, सूत्रे आणि भारतीय महाकाव्ये यासारख्या ऐतिहासिक दुय्यम साहित्यातून आणि गौतम बुद्ध आणि जैन साहित्याच्या संवादांमधून संकलित केल्या आहेत. चार्वाक हा प्राचीन भारतातील नास्तिक आणि नास्तिक तर्कशास्त्रज्ञ होता. तो नास्तिक तत्वज्ञानाचा संस्थापक बृहस्पतीचा शिष्य मानला जातो. बृहस्पति आणि चार्वाक कधी अस्तित्वात आले याबद्दल काहीही माहिती नाही. चाणक्य यांनी त्यांच्या अर्थशास्त्र या ग्रंथात बृहस्पतिला अर्थशास्त्राचे प्रमुख शिक्षक मानले आहे. चार्वाक दर्शन या शब्दात 'चार्व' म्हणजे खाणे. ' खाणे, पिणे आणि मजा करणे' असा संदेश देणाऱ्या या तत्वज्ञानाला 'चार्व' या शब्दावरून 'चार्वक दर्शन' असे नाव देण्यात आले आहे. ' गुणरत्न ' यांनी त्याचे स्पष्टीकरण अशा प्रकारे दिले आहे - 'चार्वक दर्शन' म्हणजे देव, वेद, पुण्य आणि पापे, स्वर्ग आणि नरक, आत्मा, मोक्ष इत्यादी 'चर्वण' (नाश) केले आहे. या पंथातील लोकांचे उद्दिष्ट स्वतःचे मत स्थापित करण्यापेक्षा इतरांच्या मताचे खंडन करणे हे आहे, म्हणूनच त्यांना 'वैतांडिक' म्हणतात.

**संशोधन पद्धती :**

संशोधकाने प्रस्तुत संशोधन लेख लिहिण्यासाठी ग्रंथालयीन पद्धतीचा वापर अधिक प्रमाणात केलेला आहे. ऐतिहासिक पद्धती बरोबरच विश्लेषणात्मक पद्धती आणि अनेक दुय्यम साधनांचाही वापर या संशोधन लेखाच्या अनुषंगाने केलेला आहे. त्याचबरोबर सदरील संशोधन लेखासाठी नियतकालिके, वर्तमानपत्रातील लेख आणि विविध तज्ञांची मते विचारात घेऊन चार्वाक दर्शनातील विविध विचार आणि आपण यांचा सहसंबंध मांडला आहे.

**संशोधनाची उद्धीष्टे**

1. चार्वाक साहित्यातील विविध विचारांचा सखोल आढावा घेणे
2. चार्वाक साहित्यातील विविध विचारांचे विश्लेषण करणे
3. चार्वाक साहित्यातील शाश्वतेला चालना देणारे वास्तवाचा शोध घेणे

**चार्वाक साहित्यातील विविध विचारांचे विश्लेषण**

चार्वाक तत्वज्ञान त्याच्या ज्ञानविज्ञानावर अवलंबून आहे. चार्वाक ज्याला लोकायत तत्वज्ञान म्हणूनही ओळखले जाते, त्याला भारतीय तत्वज्ञानात भौतिकवाद म्हणतात. चार्वाक तत्वज्ञान असा सिद्धांत मानते की धारणा ही वैध ज्ञानाचा एकमेव स्रोत आहे आणि अनुमान, साक्ष इत्यादींना वैध ज्ञानाचा स्रोत म्हणून परवानगी देत नाही. ते म्हणतात की ज्ञान म्हणजे आपल्या इंद्रियांद्वारे आपण जे काही पाहू शकतो तेच आणि तेच एकमेव योग्य ज्ञान आहे. चार्वाक साहित्यात देव आणि मृत्युनंतरच्या जीवनावर विश्वास ठेवत नाही. मृत्युनंतरच्या जीवनावर विश्वास नसल्यामुळे, त्याच्या तत्वज्ञानाला लोकायत असेही म्हणतात. सर्वदर्शनसंग्रहातील चार्वाकाच्या मते, आनंद हे या जीवनाचे मुख्य ध्येय आहे, सुखवाद. जगात दुःख आहे हे जाणून ज्यांना आनंद घ्यायचा नाही ते मूर्ख आहेत. जर माशांमध्ये हाडे असतील तर कोणीही मासे खाऊ नयेत का? चतुष्पाद शेतात जातील या भीतीने कोणीही शेतात पेरणी करू नये का? इत्यादी. चार्वाक आत्म्याला वेगळे अस्तित्व मानत नाही. त्यांच्या मते, ज्याप्रमाणे गूळ, तांदूळ इत्यादींच्या मिश्रणामुळे वाइनमध्ये मादकता निर्माण होते, त्याचप्रमाणे पृथ्वी, पाणी, अग्नी आणि वायू या चार घटकांच्या मिश्रणातून चेतना निर्माण होते. देव, मृत्युनंतरचे जीवन इत्यादी विषय अनुमानांवर आधारित आहेत, ज्यांचे कोणतेही वस्तुनिष्ठ अस्तित्व नाही. नास्तिक आणि पार्थिव परंतु चार्वाक तत्वज्ञान धारणा हा एकमेव पुरावा मानते परंतु अनुमानाला पुरावा मानत नाही. त्यांचा युक्तिवाद असा आहे की अनुमान हे व्याप्तीज्ञानावर अवलंबून आहे. बाह्य इंद्रियांद्वारे आपल्याला जे ज्ञान मिळते, ते भूतकाळ आणि भविष्यकाळापर्यंत वाढवणे याला व्याप्तीज्ञान म्हणतात, जे अशक्य आहे. हे ज्ञान थेट मनात असते, ते पुरावा नाही कारण मन त्याच्या अनुभवासाठी इंद्रियांवर अवलंबून असते. जर तुम्ही असे म्हणत असाल की व्यापकतेचे ज्ञान अनुमानाने मिळते, तर त्यात परस्परावलंबित्वाचा दोष आहे, कारण तुम्हाला व्यापकतेचे ज्ञान घेऊन अनुमान सिद्ध करायचे आहे. चार्वाकचे मत सर्वदर्शनसंग्रह, सर्वदर्शनशिरोमणी आणि बृहस्पतिसूत्रात पाहिले पाहिजे. नैषधाच्या १७ व्या श्लोकातही हे मत सविस्तरपणे नमूद केले आहे. चार्वाक केवळ सकारात्मकतेचे समर्थन करतात, तो अनुमान इत्यादी पुराव्यांवर विश्वास ठेवत नाहीत. त्यांच्या मते, पृथ्वी, पाणी, अग्नी आणि वायू हे केवळ चार घटक आहेत ज्यापासून सर्वकाही निर्माण होते. त्यांच्या मते, आकाश तत्वाचे कोणतेही स्थान नाही, हे शरीर या चार घटकांच्या संयोगाने बनलेले आहे, केवळ त्यांच्या विशेष संयोगाने, शरीरात चेतना निर्माण होते, ज्याला लोक आत्मा म्हणतात. जेव्हा शरीर नष्ट होते, तेव्हा शरीरात चेतना निर्माण होते, ज्याला लोक आत्मा म्हणतात. प्रमेय, म्हणजेच एखाद्या विषयाचे खरे ज्ञान, म्हणजेच प्रमा, यासाठी पुरावा आवश्यक असतो. चार्वाक केवळ प्रत्यक्ष पुराव्यावर विश्वास ठेवतात. विषय आणि इंद्रियांच्या संपर्कातून निर्माण होणारे ज्ञान प्रत्यक्ष ज्ञान असे म्हणतात. आपल्या इंद्रियांना थेट दिसणारे जग म्हणजे प्रमेय. याशिवाय

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

इतर गोष्टी अवास्तव आहेत. आपण सर्वजण आपल्या डोळयांतून, कानातून, नाकातून, जीभातून आणि त्वचेतून रूप, ध्वनी, गंध, चव आणि स्पर्श जाणतो. ज्या गोष्टीचा अनुभव येत नाही त्यासाठी इतर कोणत्याही पुराव्याची आवश्यकता नाही.निश्चित ज्ञान केवळ प्रत्यक्ष पुराव्यानेच मिळते. दूरवरची हिरवीगार झाडे पाहून, तिथून येणाऱ्या थंड वाऱ्याने, तिथून येणाऱ्या थंड वाऱ्याने आपण तिथे पाण्याची शक्यता मानतो. पाण्याची उपलब्धता तिथे जाऊन प्रत्यक्ष पाहिल्यानेच निश्चित होते. म्हणून, शक्यता निर्माण करण्यासाठी आणि सामाजिक वर्तन राखण्यासाठी अनुमान आवश्यक आहे, परंतु ते पुरावा असू शकत नाही. ज्या व्याप्तीच्या आधारावर अनुमानाचे अस्तित्व पुरावा मानले जाते ती व्याप्ती केवळ व्याप्ती आहे. अग्नी उदबत्तीसह असणे आणि फुलांना सुगंध असणे स्वाभाविक आहे. सुख, सद्गुण, दुःख आणि दुर्गुण यांच्यातील कारण-परिणाम संबंध नैसर्गिक आहे. कोकिळेच्या आवाजात गोडवा आणि कावळयाच्या आवाजात कठोरता स्वाभाविक आहे, त्याचप्रमाणे ते सर्वत्र समजले पाहिजे. मौखिक पुराव्यांबाबत, ते एक प्रकारे प्रत्यक्ष पुरावा आहे. आपण योग्य व्यक्तीचे शब्द थेट ऐकतो. त्यांचे ऐकून आपल्याला अर्थ कळतो. हे थेट आहे. वेदांबद्दल, त्यांची वाक्ये अदृश्य आणि न ऐकलेल्या विषयांचे वर्णन करतात, म्हणून त्यांची विश्वासार्हता संशयास्पद आहे. तसेच, घोड्याचे लिंग पकडणे आणि अधर्मात मांसाहार करणे इत्यादी घृणास्पद कृत्ये करून आणि जरभरी, तुर्फी इत्यादी अर्थहीन शब्द वापरून, वेद स्वतःच त्यांची असत्यता सिद्ध करतात. वरील वर्णनावरून हे स्पष्ट होते की चार्वाक साहित्यात प्रत्यक्ष दृश्यमान शरीर आणि जगाशिवाय दुसरे काहीही स्वीकारत नाहीत. ते धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांना मानवासाठी म्हणजेच मानवी शरीरासाठी उपयुक्त मानतात. त्यांच्या मते, अर्थ आणि काम हे परम पुरुषार्थ आहेत. धर्म नावाच्या गोष्टीवर विश्वास ठेवणे मूर्खपणाचे आहे कारण जेव्हा या जगाशिवाय दुसरे कोणतेही स्वर्ग वगैरे नसते, तेव्हा स्वर्गात धर्माचे फळ उपभोगण्याची चर्चा मूर्खपणाची असते. ढोंगी आणि धूर्त लोकांनी कल्पित केलेल्या स्वर्गातील सुखांचा आनंद घेण्यासाठी येथे यज्ञ इत्यादी करणे म्हणजे धर्म नाही, तर त्यात केलेल्या पशुहिंसेमुळे आणि हवन इत्यादींमुळे अधर्म आहे, अशा गोष्टींचा गैरवापर करणे आणि शरीराला अनावश्यक वेदना देणे म्हणजे अशा गोष्टींचा गैरवापर करणे आणि शरीराला अनावश्यक वेदना देणे, म्हणून, फक्त तेच काम करावे जे शरीराला आनंद देते. फक्त तेच काम करावे जे इंद्रियांना तृप्त करते आणि मनाला आनंदी करते. फक्त अशाच गोष्टींचे सेवन करावे ज्या इंद्रियांना तृप्त करते आणि मनाला आनंदी करते. शरीर, इंद्रिये आणि मन आनंदाने भरण्यात अडथळे आणणाऱ्या घटकांना काढून टाकणे, न करणे किंवा मारणे हा धर्म आहे. शारीरिक आणि मानसिक वेदना सहन करणे, मन आणि शरीराला इंद्रियसुखापासून जबरदस्तीने दूर ठेवणे हा अधर्म आहे. याचा अर्थ असा आहे की जर ईश्वरवादी वैदिक आणि अगदी अर्ध-वैदिक तत्वज्ञान, पुराणे आणि स्मृतींमध्ये वर्णन केलेले आचरण भौतिक सुखासाठी अनुकूल असेल तर त्यांचे पालन केले पाहिजे आणि जर ते त्याला अडथळे आणणारे असतील तर ते कायमचे सोडून दिले पाहिजे.

**चार्वाक साहित्यातील शाश्वतेला चालना देणारे वास्तव**

चार्वाक साहित्यातील शाश्वततेला चालना देणारे वास्तव खालीलप्रमाणे आहे:

१. तर्क आणि विज्ञानाशी सुसंगत चार्वाक दर्शनाचा प्रत्यक्षवाद आणि भौतिकवाद हे आधुनिक विज्ञानाशी थेट जोडले जाऊ शकतात. आजच्या वैज्ञानिक युगात, जिथे पुराव्यावर आधारित ज्ञानाला प्राधान्य दिले जाते, चार्वाकांचा प्रत्यक्ष प्रमाणावर जोर हा शाश्वत ठरतो. उदाहरणार्थ, वैज्ञानिक संशोधनात केवळ निरीक्षण आणि प्रयोग यांना महत्त्व दिले जाते, जो चार्वाक दर्शनाशी सुसंग आहे. अपरिवर्तनीय संबंध देखील विश्वसनीय व्यक्तींच्या साक्षीवर आधारित नाही जे असे म्हणतात की धुराची सर्व प्रकरणे अग्नीची प्रकरणे आहेतपुन्हा .साक्षीची वैधता स्वतःच अनुमानाद्वारे सिद्ध करणे आवश्यक आहे ., जर साक्ष ही सार्वत्रिक प्रस्तावाच्या ज्ञानाचे एकमेव साधन म्हणून स्वीकारायची असेल, तर ज्या माणसाला मध्य आणि प्रमुख पदांमधील अपरिवर्तनीय संबंधाची वस्तुस्थिती दुसऱ्या व्यक्तीने दाखवली नव्हती, तर दुसऱ्या गोष्टीला धूर म्हणून पाहिल्याने एका गोष्टीचा अग्नी म्हणून निष्कर्ष काढता येत नाही; म्हणून, स्वतःहून दाखवून देताना, स्वतःसाठी अनुमान काढण्याचा संपूर्ण विषय केवळ निरर्थक शब्दांमध्ये संपवावा लागेल.

२. सामाजिक समानतेचा पाठपुरावा चार्वाक दर्शनाने जातीयव्यवस्था आणि कर्मकांडांचा विरोध करून सामाजिक समानतेचा पुरस्कार केला. हे विचार आजच्या समतावादी समाजाच्या संकल्पनेशी जुळतात. उदा. भारतीय संविधानातील समता आणि बंधुतेच्या तत्त्वांची चार्वाक दर्शनाशी तुलना करता येते. यामुळे चार्वाक साहित्याचा सामाजिक सुधारणांवरील प्रभाव शाश्वत ठरतो. सुखवाद आणि आधुनिक जीवन चार्वाक दर्शनाचा सुखवाद हा आधुनिक भौतिकवादी जीवनशैलीशी जोडला जाऊ शकतो. आजच्या उपभोगतावादी संस्कृतीत, व्यक्ती सुख आणि समाधान यांना प्राधान्य देतात, जे चार्वाक दर्शनाच्या मूल तत्वांशी सुसंगत आहे. यामुळे चार्वाक विचारांचा प्रभाव आधुनिक समाजातही दिसतो. चार्वाक तत्वज्ञान त्याच्या ज्ञानविज्ञानावर अवलंबून आहेचार्वाक ज्याला . म्हणूनही ओळखले जाते लोकायत तत्वज्ञान, त्याला भारतीय तत्वज्ञानात भौतिकवाद म्हणतातचार्वाक तत्वज्ञान असा सिद्धांत . मानते की धारणा ही वैध ज्ञानाचा एकमेव स्रोत आहे आणि अनुमान, साक्ष इत्यादींना वैध ज्ञानाचा स्रोत म्हणून परवानगी देत नाही . ते म्हणतात की ज्ञान म्हणजे आपल्या इंद्रियांद्वारे आपण जे काही पाहू शकतो तेच आणि तेच एकमेव योग्य ज्ञान आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

३. धश्रद्धांचा विरोध चार्वाक दर्शनाने अंधश्रद्धा, कर्मकांड आणि परलोक यांना नाकारले. आजच्या काळातही, जिथे अंधश्रद्धांचा प्रभाव कमी करण्यासाठी शिक्षण आणि जागरूकता वाढवली जाते, चार्वाक दर्शनाचे तर्कशुद्ध दृष्टिकोन शाश्वत ठरतात. उदा., भारतातील अंधश्रद्धा निर्मूलन चळवळी चार्वाक विचाराशी जोडल्या जाऊ शकतात. तथापि, चार्वाक साहित्याच्या शाश्वततेला काही मर्यादाही आहेत त्या पुढीलप्रमाणे -

**मूळ साहित्याचा अभाव:** बृहस्पति सूत्रासारखे मूळ ग्रंथ उपलब्ध नसल्यामुळे चार्वाक विचारांचा अभ्यास माध्यमिक साहित्यावर अवलंबून आहे.

**धार्मिक विरोध:** चार्वाक दर्शनाला धार्मिक आणि रूढीवादी समाजाकडून विरोध झाला, ज्यामुळे त्याचा प्रसार मर्यादित राहिला.

**अतिसरलिकरण:** चार्वाक दर्शनाला काहीवेळा केवळ सुखवादी किंवा नास्तिक दर्शन म्हणून चुकीचे समजले गेले, ज्यामुळे त्याच्या खोलवरच्या तात्त्विक पैलूंकडे कमी लक्ष दिले गेले.

४. चार्वाक तत्वज्ञान असा सिद्धांत मानते की धारणा हीच वैध ज्ञानाचा एकमेव स्रोत आहे आणि अनुमान, साक्ष इत्यादींना वैध ज्ञानाचा स्रोत म्हणून मान्यता देत नाही ते म्हणतात की ज्ञान म्हणजे आपल्या .इंद्रियांद्वारे आपण जे काही पाहू शकतो ते आणि तेच एकमेव योग्य ज्ञान आहे. साहित्यिक प्रभाव चार्वाक दर्शनाचा प्रभाव भारतीय साहित्यताही दिसतो. मराठी साहित्यात, विशेषतः सुधारकवादी लेखकांनी (उदा. लोकहितवादी, जोतीराव फुले) चार्वाक विचारांचा अवलंब केला. यामुळे सामाजिक सुधारणा आणि तर्कशुद्ध विचारांना चालना मिळाली. मराठी साहित्यातील गद्य आणि काव्य यांमधूनही चार्वाक विचारांचे प्रतिबिंब दिसते, जे त्याच्या शाश्वततेला बळकटी देते.

५. जर देवावर विश्वास ठेवला जात नसेल, तर सामान्य माणसाच्या चांगल्या आणि वाईट कर्मांच्या परिणामांची व्यवस्था कशी करणे शक्य होईल? या प्रश्नाचे उत्तर देताना, चार्वाक विचारतात की कर्माच्या परिणामांची कोणती व्यवस्था आवश्यक आहे? जगात दोन प्रकारची कर्मे दिसतात. एक लौकिक आणि दुसरी अलौकिक. लौकिक कर्मांच्या परिणामांच्या व्यवस्थेबद्दल तुम्हाला काळजी वाटते का? जर हो, तर ही चिंता अनावश्यक आहे. लौकिक कर्मांचे परिणाम जगातील सर्वांनी स्वीकारलेला राजा किंवा प्रशासक ठरवतो. हे सर्व अनुभवांनी सिद्ध झालेले सत्य आहे, हे स्पष्ट आहे. आपण पाहतो की सर्वांनी स्वीकारलेला राजा चोरी इत्यादी निषिद्ध कृत्य करणाऱ्या व्यक्तीला शिक्षा म्हणून तुरुंगात पाठवून त्याच्या दुष्कृत्याचे योग्य फळ देतो. त्याचप्रमाणे, राजा स्वतः एखाद्याचे प्राण वाचवणे इत्यादी शुभ कर्म करणाऱ्या व्यक्तीला चांगल्या फळांचे म्हणजेच संपत्ती आणि सन्मानाचे बक्षीस देतो. जर तुम्हाला अलौकिक कर्मांच्या परिणामांच्या व्यवस्थेची काळजी वाटत असेल तर तुम्ही याचीही काळजी करू नये. कारण यज्ञ, पूजा, पाठ, तपस्या इत्यादी आध्यात्मिक फायद्यांसाठी सांगितलेले हे सर्व वैदिक विधी काही धूर्त लोकांनी सामान्य लोकांना फसवण्यासाठी आणि त्यांची उपजीविका करण्यासाठी आणि त्यांचे पोट भरण्यासाठी शोधले आहेत. प्रत्यक्षात, अग्निहोत्र, तीन वेद, त्रिदंड परिधान करणे आणि शरीरावर राख लावणे ही बुद्धिमत्ता आणि प्रयत्नांच्या अभावाची लक्षणे आहेत. आजपर्यंत, या वैदिक विधींचे फळ कोणीही पाहिलेले नाही. जर वैदिक विधींचे काही फळ असते तर ते नक्कीच आजपर्यंत कोणीतरी पाहिले असते. म्हणूनच, आजपर्यंत, या वैदिक किंवा वर्णाश्रम-व्यवस्थेशी संबंधित विधींचे परिणाम - स्वर्ग, मोक्ष, देवलोकात जाणे इत्यादींचा थेट अनुभव कोणीही घेतलेला नाही. म्हणूनच, हे सर्व वैदिक विधी निष्फळ आहेत हे चार्वाक साहित्यातील शाश्वततेला चालना देणारे वास्तव आहे.

६. चार्वाक साहित्यात 'धूर' आणि 'अग्नि' सारखे कोणतेही स्थिर वर्ग वर्ण मान्य करत नाहीत जे अनुक्रमे धूर आणि अग्नीच्या सर्व घटनांमध्ये नेहमीच उपस्थित असले पाहिजेतसंबंधाची धारणा मान्य ते आग्रह धरतात की जरी आपण धूर आणि अग्नी यांच्यातील . केली तरी, धूर आणि अग्नीच्या सर्व वैयक्तिक प्रकरणांमध्ये कोणताही अविभाज्य संबंध स्थापित करणे शक्य नाहीजर एखाद्या . विशिष्ट आगीचा अंदाज लावणे शक्य असेल, तर आपल्याला हे माहित असले पाहिजे की ते विशिष्ट धूराशी अविभाज्यपणे संबंधित आहेखरं तर ., "धूर किंवा धुराच्या सर्व विशिष्ट घटनांमध्ये "सार्वत्रिकपणे उपस्थित असलेले वर्ग वर्ण काय आहेत हे समजण्याद्वारे जाणून घेणे देखील शक्य नाही, कारण आपल्याला धुराच्या सर्व प्रकरणांमध्ये सार्वत्रिकपणे उपस्थित असलेले धुराचे प्रकार दिसत नाहीत, परंतु न समजलेल्या प्रकरणांमध्ये उपस्थित नसतीलभूतकाळात जाणवलेली ए .करूपता भविष्यातही कायम राहील याची कोणतीही हमी नाहीधूर आणि अग्नी यांच्यातील अपरिवर्तनीय संबंधाचे आपले ज्ञान त्यांच्यातील कारणात्मक संबंधावर अवलंबून . कारण .असल्याचा दावा केला जाऊ शकतो, कारणात्मक संबंध हा केवळ एक प्रकारचा अपरिवर्तनीय संबंध असल्याने, तो आकलनाने स्थापित केला जाऊ शकत नाही .

**निष्कर्ष :**

चार्वाक साहित्याचा प्रभाव हा भारतीय तत्त्वज्ञान आणि साहित्य यांच्यावर शाश्वत असा पडला आहे हे वास्तव नाकारता येत नाही हे खालील बाबींवरून अधिक स्पष्ट होते -

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**तत्त्वज्ञानातील वादविवाद :** चार्वाक दर्शनाने बौद्ध, जैन आणि वैदिक तत्त्वज्ञानांना आव्हान दिले, ज्यामुळे तत्त्वज्ञानातील वादविवाद समृद्ध झाले.

**सामाजिक सुधारणा :** चार्वाक साहित्यातील विचारांनी सामाजिक सुधारणांना प्रेरणा दिली, विशेषतः जातीयव्यवस्था आणि कर्मकांड यांच्या विरोधात ते खंबीरपणे उभे राहिले.

**आधुनिक विचारधारा :** चार्वाक दर्शनाचा तर्कवाद आणि भौतिकवाद आधुनिक नास्तिकता आणि मानवतावाद यांच्याशी जोडला जाऊ शकतो यात शंका शिल्लक राहत नाही.

चार्वाक साहित्यातील शाश्वततेला चालना देणारे वास्तव हे त्याच्या तर्कशुद्ध, भौतिकवादी आणि सुधारकवादी दृष्टिकोनात दिसते. आजच्या युगात, जिथे वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक समानता आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांना महत्त्व आहे, चार्वाक दर्शनाचे विचार प्रासंगिक ठरतात. मराठी साहित्यातही, चार्वाक विचारांचा प्रभाव सुधारकवादी लेखक आणि विचारवंतांमार्फत दिसून येतो. चार्वाक दर्शनाने साहित्य आणि समाज यांना तर्कशुद्ध विचारांचा पाया दिला. यामुळे अंधश्रद्धा, कर्मकांड आणि सामाजिक विषमता यांना आव्हान देण्याची प्रेरणा मिळाली. आजच्या डिजिटल युगातही, चार्वाक विचारांचा प्रभाव सोशल मीडिया, ब्लॉग आणि साहित्यिक चर्चांमधून दिसतो, जिथे तर्क आणि विज्ञान यांना प्राधान्य दिले जाते.

**संदर्भ ग्रंथ :**

1. आठवले सदाशिव, *'चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान'*, वाई, प्राज्ञ पाठशाळा
2. कुमठेकर, उदय *'चार्वाकमंथन'*, पुणे, परामर्श प्रकाशन
3. साळुंके, आ. ह. 'आस्तिकशिरोमणी चार्वाक', सातारा, लोकायत प्रकाशन
4. गाडगीळ,स. रा., लोकायत, मुंबई, लोकवाङ्मय गृह १९७४
5. कुमठेकर, उदय, वेध चार्वाकाचा,नांदेड, अभय प्रकाशन
6. दिक्षित, श्रीनिवास, भारतीय तत्त्वज्ञान, कोल्हापूर, फडके प्रकाशन पृ. क्र. ९९
7. संपादक- अभय कुमार दुबे, सामाजिक विज्ञान विश्वकोश, खंड- ५, पृष्ठ क्रमांक- १६८४
8. डॉ. राधाकृष्णन, भारतीय तत्त्वज्ञान भाग-१ , पृष्ठ क्रमांक – २२४-२२५
9. के. दामोदरन, भारतीय विचार परंपरा, पृष्ठ क्रमांक १०६-१०७
10. माध्वाचार्य, सर्वदर्शनसंग्रह, पृष्ठ क्रमांक - ३
11. प्रदीप गोखले, लोकायता, चार्वाक, पृष्ठ क्रमांक - १४९
12. चार्वाकाचे वारसदार सुभाष गाताडे, 'समाज, संस्कृती आणि राजकारणावरील प्रश्नकर्ता', पृष्ठ क्र. - ६१-६२
13. सुधा चौधरी, नैतिकतेची मूलभूत चिंता 'शक्ती, समाज आणि नैतिकता', पृष्ठ क्रमांक - २४३
14. प्रदीप पी.ए. गोखले, लोकायता, चार्वाक, पृष्ठ क्रमांक - १४९
15. के. दामोदरन, भारतीय विचार परंपरा, पृष्ठ क्रमांक - ११२
16. डी. पी. चट्टोपाध्याय, प्राचीन भारतातील भौतिकवाद, पृष्ठ क्रमांक - ४७
17. के. दामोदरन, भारतीय विचार परंपरा, पृष्ठ क्रमांक - ११७
18. एस. होय. सरदेसाई, 'प्राचीन भारतातील विधी आणि परंपरा, पृष्ठ क्रमांक १२० - १२१
19. चार्वाकांचे वारसदार सुभाष गाताडे, 'समाज, संस्कृती आणि राजकारणावरील प्रश्नकर्ता', पृष्ठ क्र. १३७-१३८
20. तेज सिंग, संपादक- वेद प्रकाश, आंबेडकरी विचारधारा, इतिहास आणि तत्त्वज्ञान, पृष्ठ क्रमांक १९२

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# पर्यावरण संरक्षण

**डॉ. बिरनाळे डी.एस**
असि. प्रोफेसर, आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ, एज्युकेशन सांगली
**Email-**manesurekha11@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170815
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8(I)
Pp. 64-70
August 2025
**Submitted:** 12 July. 2025
**Revised:** 27 July. 2025
**Accepted:** 12 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**सारांश**

पर्यावरण (Environment) हा फ्रेंच शब्द environ म्हणजे सभोवताल या शब्दापासून तयार झाला असून आपल्या सभोवतालच्या प्रत्येक घटकांचा पर्यावरणात समावेश होतो.लोकसंख्या वाढ व औदयोगिक प्रगतीमुळे पर्यावरणातील पाणी, वन, आधुनिक शेतीत खतांचा अतिवापर नैसर्गिक खनिजे या गोष्टींचा ऱ्हास होत आहे आणि ही अतिशय चिंतनशील बाब आहे.नैसर्गिक साधनाचा ऱ्हास होत गेला तर मनुष्य, जगू शकत नाही. तेव्हा पर्यावरणाचे संरक्षण करणे महत्वाचे आहे. जून १९७२ मध्ये स्टॉकहोम परिषदेमध्ये पर्यावरणाचा समतोल सांभाळण्यासाठी व भावी पिढ्यांसाठी त्याचे संवर्धन करणारी १५० कृती योजना व 20 तत्वे मान्य करण्यात आली या परिषदेने **'अवधी पृथ्वी एक' (only one earth)** हे बोधवाक्य स्वीकारले. ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून आपण साजरा करतो. पर्यावरणाचे रक्षण व नैसर्गिक स्तोतांचे संवर्धन करण्यासाठी खालील संस्था कार्य करतात.

**भारतीय वनस्पती सर्वेक्षण (BSI) –**

वनस्पती सखोल सर्वेक्षण व वनस्पती आढळ, परिस्थीतीकी व आर्थिक उपयुक्तता यांची अचुक माहीती मिळवणे हे उद्दीष्ट आहे.

**वन अनुसंधान संस्था (FRI)**

वन व्यवस्थापन व संरक्षण करण्यासाठी व प्रशिक्षणासाठी 1906 डेहराडून येथे या संस्थेची स्थापना करण्यात आली.

**भारतीय प्राणीशास्त्र सर्वेक्षण (ZSI)**

१ जुलै १९९६ मध्ये वन्यजीव सर्वेक्षण संशोधन व शोध घेवून त्याबाबत विविध ज्ञात व अज्ञात पैलूंच्या ज्ञानाचा विकास होण्यासाठी कोलकत्ता येथे या संस्थेची स्थापना करण्यात आली.

**आंतरराष्ट्रीय निसर्ग संवर्धन संघटना (IUCN)**

ही पहिली जागतिक पर्यावरण संघटना स्वित्झर्लंड येथे स्थापन केली असून सरकारी व नागरी संघटनांना एकत्र आणणे व निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी त्यांना प्रवृत्त करणे हे या संस्थेचे उद्दीष्ट आहे.

**राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्था (NEERI)**

पर्यावरण शास्त्र व अभियांत्रिकी मध्ये संशोधन व विकासात्मक अभ्यास हाती घेणे, प्रदेशातील उद्योगांना व स्थानिक स्वराज्य संस्था इ. सेवा व प्रशिक्षण कार्यक्रमाव्दारे पर्यावरण प्रदूषण समस्याच्या बाबतीत करण्याच्या

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17115463
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*डॉ. बिरनाळे डी.एस, असि. प्रोफेसर, आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ, एज्युकेशन सांगली.*

**How to cite this article:**
*बिरनाळे, . डी . एस . (2025). पर्यावरण संरक्षण. Journal of Research & Development, 17(8(I)), 64–70.*
*https://doi.org/10.5281/zenodo.17115463*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

उद्देशाने संस्थेची स्थापना करण्यात आली.

**जागतिक नैसर्गिक वन्यजीव निधी (WWF)**

पृथ्वीवरील नैसर्गिक पर्यावरणाचा -हास थांबवून मनुष्य निसर्गाशी सामंजस्याने वागेल असे भविष्य निर्माण करणे, जगातील जैवविविधतेचे संवर्धन करणे, पुनर्नविकरण नैसर्गिक स्त्रोतांचा शाश्वत वापर सुनिश्चित करणे, प्रदुषणात व उधळपट्टी स्वरूपाच्या नैसर्गिक उपभोगात घट होण्यास प्रोत्साहन देणे, ही जागतिक वन्यजीव निधीची (WWF) प्रमुख उद्दिष्टे आहेत. पांडा हा प्राणी जागतिक वन्यजीव निधीचे (WWF) बोधचिन्ह आहे.

**संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (UNEP)**

भविष्यातील पिढ्यांच्या जीवनाच्या गुणवत्तेशी तडजोड न करता पर्यावरणाचे संवर्धन करत स्वतःच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यास लोक व राष्ट्रांना प्रेरणा देण्यासाठी तसेच त्याबाबत माहिती होण्यासाठी नेतृत्व पुरविणे व भागीदारीस प्रोत्साहन देणे " हे संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाचे ब्रीदवाक्य आहे.

**केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB)**

या कायदेशीर संस्थेची स्थापना १९७४ मध्ये जल अधिनियम १९७४ (प्रतिबंध आणि प्रदूषण नियंत्रण) या कायद्या अंतर्गत आली. जल व वायू प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रणाबाबत व हवेची गुणवत्ता सुधारण्याबाबत केंद्र सरकारला सल्ला देणे ही राष्ट्रीय पातळीवरील केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाची कार्ये आहेत.

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB)**

१९७० मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची स्थापना झाली असून प्रदूषण नियंत्रण, टाकाऊ पासून टिकाऊ व पुर्नवापर, पर्यावरण पूरक उपक्रम यांना साहाय्य करणे आणि प्रोत्साहन देणे.लोकांमध्ये स्वच्छ आणि आरोग्यदायी पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे, ही मंडळाची कार्ये आहेत.

**बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (Bombay Natural History Society (BNHS)**

संवर्धन व जैवविविधता संशोधनात काम करत असलेली भारतातील ही एक आघाडीची अशासकीय संघटना असून
कृतीवर आधारित संशोधन, शिक्षण व सामाजिक जागरूकता याद्वारे निसर्गाचे व विशेषतः जैवविविधतेचे संवर्धन करणे, हे संस्थेचे ध्येय आहे.धोक्यात असलेल्या प्रजाती व अधिवासांचे संवर्धन सर्वोत्तम करण्याचा संस्थेचा दृष्टीकोन आहे.

**भारतीय वन्यजीव संस्था (WII)**

भारतातील वन्यजीव १९८२ मध्ये स्थापित, वन्यजीवन संस्था (डब्ल्यूआयआय) आंतरराष्ट्रीय सहाय मान्यताप्राप्त संस्था आहे. ही संस्था प्रशिक्षण कार्यक्रम, शैक्षणिक अभ्यासक्रम, वन्यजीवन संशोधन व व्यवस्थापनातील सल्या देते.

**भारतीय पर्यावरण विषयक माहिती प्रणाली (ENVIS)**

देशभरातील पर्यावरणविषयक निर्णय घेणारे, नियोजन करणारे, वैज्ञानिक, अभियंते, संशोधक यांना पर्यावरणाबाबत माहिती देण्यासाठी सन १९८२ मध्ये भारत सरकारने पर्यावरण माहिती प्रणाली स्थापन केली.

**पर्यावरण संरक्षणात व्यक्तिंचे योगदान**

**सलीम अलीः**

हे भारतातील पहिली व्यकी आहेत, ज्यांनी पक्षी शास्त्राची पद्धतशीर मांडणी केली, डॉ. सलीम अलीच्या सततच्या प्रयत्नामुळे केरळमध्ये स्थानिक सरकार 'सायलंट व्हॅली' राष्ट्रीय उद्यानाच्या सीमेत जलविधुत प्रकल्प बांधण्याचा क्षेत आखत होते तेव्हा त्यांची 'सायलंट हॅली' वाचवण्यासाठी खुप प्रयत्न केले,

**एम.सी. मेहता**

हे १९८४ पासून भारतातील पर्यावरणावर काम करणारे पर्यावरणतज्ञ व सुप्रसिध्द हे कायदेतज्ञ आहेत, त्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी काही जनहीत साञ्चीका कोर्टात दाखल केल्या होत्या, त्यांच्या कामातून मेहतांनी काही राष्ट्रीय मुद्दे मांडले जसे की जल प्रदूषण, हवा प्रदूषण, वाहनांचे प्रदूषण, किनाऱ्याचे संवर्धन आणि मोठे कारखाने शहरी भागातून हलवण्यासाठी प्रयत्न केले,

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**सुंदरलाल बहुगुणा**

यांनी चिपको आंदोलन सुरू केले .हा एक लोकसहभागातून जंगलाच्या संवर्धनासाठी केलेला प्रयत्न मानला जातो,

**डॉ. एम. एस. स्वामीनाथन**

हे हरितक्रांतीचे जनक म्हणून ओळखले जातात, त्यांनी शेतकी तसेच नैसर्गिक जैवविविधतेची जपणूक करण्यासाठी मौलीक योगदान दिले आहे,

**पर्यावरण संरक्षण**

भारतातील भर्मसाट व आटोक्यात न येणाऱ्या वाढत्या लोकसंख्येमुळे पर्यावरणाचा -हास होत चालला आहे. प्रइषण वाढत आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करणे गरजेचे आहे. हे संरक्षण अनेक पध्दतीने करत येते त्या पध्दती पुढीलप्रमाणे-

**पर्यावरण संरक्षण पद्धती**

१ उपभोक्ता शिक्षण

२ इको-लेबलिंग

३ पर्यावरणीय परिणामांचे मूल्यांकन

४ हरित लेखा परीक्षण (ग्रीन ऑडिट)

५ पर्यावरणपूरक पर्यटन (इकोटुरिझम)

६ आंतरराष्ट्रीय अधिवेशने आणि करार

**१ उपभोक्ता शिक्षण**

विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे जगभरात उपभोक्तावाद वाढला आहे. यामुळे बऱ्याच लोकांच्या खरेदीक्षमतेत मोठी वाढ झाली आहे. जरी या विकासामुळे अनेक लोकांचे जीवनमान उंचावले आहे, तरी खरेदीची क्षमता वाढल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. एखाद्या देशाची आर्थिक स्थिती आणि तेथील नागरिकांचे कल्याण हे एकमेकांशी जोडलेले आहेत. जेव्हा देशातील लोक खरेदी करताना योग्य निवड करण्यास सक्षम असतील तेव्हाच हे दोन्ही साध्य होईल, जेणेकरून त्यांना त्यांच्या पैशाचे योग्य मूल्य मिळेल. उपभोक्त्यांना बाजाराच्या परिस्थितीचे मूल्यांकन करण्यास आणि योग्य निर्णय घेण्यास सक्षम करते.

**१९८६** मध्ये भारतीय संसदेने मंजूर केलेला **उपभोक्ता संरक्षण कायदा** खालील अधिकार प्रधान करतो.

- उपभोक्ता संरक्षण घातक वस्तू आणि सेवांपासून संरक्षण करण्याचा अधिकार.
- वस्तू आणि सेवांचे प्रमाण आणि कामगिरीबद्दल माहिती देण्याचा अधिकार.
- उत्पादने व सेवा यांची तुलनात्मक दरांद्वारे खुलेपणाने निवड करण्याचा हक्क.
- कोणत्याही निर्णयावर सुनावणीचा हक्क ग्राहकांच्या हिताबाबतचा अधिकार.
- जर ग्राहकांच्या हक्काचे उल्लंघन होत असेल तर सुधारण्याचा अधिकार.
- ग्राहक शिक्षणाचा हक्क

पर्यावरणाला हानी न करता संसाधनांचा नैसर्गिक वापर करणारी उत्पादने ही पर्यावरणपूरक उत्पादने होत.

- **जनता रेफ्रिजरेटर –**
- **ट्रेडल पंप –**
- **वाळूचे फिल्टर –**
- **मातीचे कप आणि ग्लास –**
- **झाडाच्या पानांपासून बनवलेल्या पत्रावळया**
- **कंपोस्ट - सेंद्रिय खतांचा वापर**
- **जैविक कीडनाशकांचा वापर.**
- **बांधकाम / गृहनिर्माण**

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

बांधकाम करताना सौर ऊर्जेचा वापर व्यापक होईल व वीजबिलात कपात होईल अशा पद्धतीची रचना करण्यावर भर दिला जातो. राखेपासून बनविलेल्या विटा आणि प्लास्टिकचे दरवाजे लोकप्रिय होत आहेत. हे नैसर्गिक संसाधनाऐवजी पुनर्चक्रीकरण केलेल्या साहित्याचा वापर करुन केले जाते.

**२ पर्यावरणपूरक चिन्हे (इको-लेबलिंग)**

गेल्या काही वर्षांत लोकांमध्ये पर्यावरणाच्या -हासाविषयी जागृती होत आहे. अशा वस्तू आणि सेवांची मागणी वाढत आहे, ज्यामुळे पर्यावरणाचे आणि मानवी आरोग्याचे कमी नुकसान होते. उत्पादनांच्या शाश्वतेबद्दल माहिती देण्यासाठी खाजगी आणि सार्वजनिक उद्योग या दोन्हीकडून असंख्य उपक्रम सुरू झाले आहेत. हे सूचित करण्यासाठी विविध प्रकारची चिन्हे, लेबल आणि लोगो वापरले जातात. उत्पादनावर दिलेल्या माहितीनुसार ते उत्पादन खरेदी करण्याबद्दलचा निर्णय घेता येतो. 'इको-लेबलिंग' पर्यावरणीय कार्यप्रदर्शन प्रमाणपत्र आणि लेबलिंगची एक पद्धत आहे, जी जगभरात वापरली जाते.आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानकीकरणाने (आयएसओ) जगभरात वेगवेगळ्या इको-लेबलिंग योजना आणि लोगो दिले आहेत. हे लोगो उत्पादनादरम्यान होणारे प्रदूषण व ऊर्जा वापर यासारखे पर्यावरणीय निकष दर्शवतात.

**इको-मार्क**

भारत सरकारने पर्यावरणपूरक उत्पादनांची ओळख पटवण्यासाठी १९९१ मध्ये 'इकोमार्क' म्हणून ओळखली जाणारी इको-लेबलिंग योजना सुरू केली. पर्यावरणास कमी हानिकारक अशी उत्पादने ग्राहकांना ओळखता यावीत व ती विकत घेण्यास त्यांना प्रोत्साहन करावे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

**३ पर्यावरणीय परिणामांचे मूल्यांकन (Environment Inpact Assessment - EIA)**

पर्यावरण परिणाम मूल्यांकन म्हणजे प्रस्तावित कृती आणि प्रकल्पांच्या पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांची ओळख, अंदाज आणि मूल्यांकन करण्यासाठी एक पद्धतशीर प्रक्रिया आहे. जेव्हा एखादा नवीन विकास प्रकल्प तयार केला जातो व त्याचा पर्यावरणाच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता असते तेव्हा ईआयए करणे आवश्यक आहे.

पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन प्रक्रिया (EIA)

1. प्रकल्प छाननी
2. व्याप्ती
3. पर्यावरणाची पायाभूत माहिती स्थापित करणे
4. परिणामाचे विश्लेषण
5. पर्यायांचा विचार
6. पर्यावरण परिणाम अहवाल (Environment Impact Statement)
7. सार्वजनिक सल्लामसलत
8. निर्णय
9. नंतरची देखरेख

**४ हरित लेखपरीक्षण (ग्रीन ऑडिट)**

स्थानिक, प्रादेशिक आणि जागतिक पातळीवर होणारे जलद शहरीकरण आणि आर्थिक विकासामुळे अनेक पर्यावरणीय समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर सर्व संस्थासाठी पर्यावरण लेखापरीक्षण प्रणाली अवलंबणे आवश्यक आहे, ज्यामुळे शाश्वत विकास होईल. पर्यावरणीय शाश्वतता हा देशासाठी एक महत्त्वाचा विषय होत चालला आहे, त्यासाठी संस्थांची भूमिका अधिक महत्त्वाची आहे. हरित लेखापरीक्षण ही एक अनोखी प्रक्रिया आहे, जी संस्थेमध्ये उपलब्ध संसाधनांचा म्हणजे ऊर्जा, पाण्याची गुणवत्ता, जागा आणि हवेची गुणवत्ता जाणून घेत असून संस्था सर्वांत जास्त ऊर्जा, पाणी किंवा इतर संसाधने कुठे वापरली जात आहे हे निर्धारित करण्यासाठी हरित लेखापरीक्षण हे उपयुक्त साधन आहे.

त्यानुसार संस्था बदल कसे राबवायचे आणि संवर्धन कसे करायचे याचा विचार करू शकते. हरित लेखापरीक्षणात खालील घटकांचा समावेश होतो.

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

- कचरा लेखापरीक्षण
- जल लेखापरीक्षण
- ऊर्जा लेखापरीक्षण
- परिस्थितीकीय लेखापरीक्षण
- **कचरा लेखापरीक्षण -**

यामध्ये कचरा वर्गीकरण, पुनर्वापर, पुर्नचक्रीकरण व कंपोस्ट करून कचरा निर्मिती कमी करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. कचरा संकलन आणि विल्हेवाट लावण्याची यंत्रणा तपासून, काय वाया जाते हे तपासून आणि 'शून्य कचरा' परिसर कसे तयार करायचे हे समजण्यास मदत होते.

- **जल लेखापरीक्षण**

हे पाणीवापराच्या सांडपाणी शुद्धीकरणाच्या सुविधा यांचे मूल्यांकन करते. हे पाण्याची एकूण आवश्यकता प्राप्त केलेल्या व पुनर्वापर केलेल्या पाण्याचे प्रमाण मोजते. पाण्याची मागणी व पुरवठा संतुलित करणे, साठवण करणे व टंचाईच्या वेळी त्याचा उपयोग करणे, हे जल लेखापरीक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

- **ऊर्जा लेखापरीक्षण –**

हे ऊर्जा संवर्धन, त्याचा वापर आणि संबंधित प्रदूषण कमी करण्यासाठीच्या पद्धतींचे मूल्यांकन करते.
हे ऊर्जा वापरण्याच्या पद्धतींवर लक्ष केंद्रित करून, ऊर्जा संवर्धनाची तंत्रे सुचविण्यास मदत करते.

- **परिस्थितिकीय लेखापरीक्षण**

हे संस्थेचे हरित क्षेत्र मोजण्यासाठी, जैव विविधता ओळखण्यासाठी आणि पर्यावरणाशी असलेले संबंध समजून घेण्यासाठी संस्थेच्या जमिनीच्या वापरावर लक्ष केंद्रित करते. हे संस्थेच्या हरित भागाची टक्केवारी मोजते. हे कीडनाशके आणि पर्यावरणास सुरक्षित पर्यायांचा वापर करून पर्यावरणाची देखभाल करण्यासाठी संस्था किती पुढाकार घेते, हे तपासते.

**५ पर्यावरणपूरक पर्यटन (इकोटुरिझम)**

पर्यावरणपूरक पर्यटन ज्याला शाश्वत पर्यटनदेखील म्हटले जाते. हे पर्यटनाच्या विविध पद्धतींद्वारे केले जाऊ शकते. पर्यावरणपूरक पर्यटक म्हणून, आपण अशा पद्धतीने पर्यटन करण्याचा निर्णय घ्याल ज्याने निसर्गाचा आदर होईलव त्याचा ऱ्हास होणार नाही यात ऐतिहासिक खुणा जतन करणेदेखील समाविष्ट आहे.

**६ आंतरराष्ट्रीय अधिवेशने आणि करार**

देशातील कायदे व धोरणे ठरवण्यासाठी आंतरराष्ट्रीय अधिवेशन आणि करार यांचे योगदान आहे. जेव्हा एखादा देश करारावर स्वाक्षरी करतो, याचा अर्थ त्या देशाने त्या कराराची अंमलबजावणी करण्यासाठी कृती करणे आवश्यक ठरते.भारत सरकारने आंतरराष्ट्रीय करारांची अंमलबजावणी आपल्या देशात करावी अशी भारतीय घटनेची अपेक्षा आहे. याचे उदाहरण म्हणजे जैव विविधतेच्या अधिवेशनांची अंमलबजावणी करण्यासाठी भारताने जैव विविधता कायदा २००२ लागू केला.

- **रामसर अधिवेशन**

परिसंस्था संवर्धनाबद्दलचे महत्त्वाचे असे हे पहिले अधिवेशन असून यात फक्त संवर्धनच नाही, तर पाणथळ जागांचा सुज्ञपणे उपयोग कसा करावा याबद्दल, निर्देश दिलेले आहेत.

- **मानवी पर्यावरणावरील संयुक्त राष्ट्रांची परिषद (स्टॉकहोम परिषद), १९७२**

मानवी पर्यावरणावरील संयुक्त राष्ट्रांची परिषद ज्याला स्टॉकहोम परिषदेमध्ये पृथ्वीवरील लोकांना पर्यावरणाचे जतन व संवर्धन करण्यासाठी प्रोत्साहन देणे व मार्गदर्शन करणे याची गरज आहे, असा विचार यात केला गेला.

- **भारत व स्टॉकहोम परिषद**

या परिषदेत भारताची महत्त्वाची भूमिका होती.स्टॉकहोम परिषदेनंतर भारत सरकारने घटनेत ४२ वी घटनादुरुस्ती केली आणि कलम ४८A, ५१ A(g) यांचा समावेश केला. ४८A कलमानुसार राज्यांना पर्यावरणाचे संरक्षण हे सतत बंधनकारक केले गेले, तर ५१A (g) नुसार पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे असे सांगितले गेले.१९७२ नंतर भारत सरकारने पाणी कायदा

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

१९७४, हवा कायदा १९८१, व पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ हे कायदे केले. तसेच पर्यावरणाचे प्रश्न सोडवण्यासाठी वन मंत्रालयाच्या अंतर्गत पर्यावरण विभागाची स्थापना केली.

- **पर्यावरण आणि विकास यावरील संयुक्त राष्ट्रांची परिषद (रिओ-दी-जानेरिओ) १९९२ - वसुंधरा शिखर परिषद**

ही परिषद ही स्टॉकहोममध्ये घेतलेल्या पहिल्या जागतिक पर्यावरण परिषदेनंतर २० वर्षांनी आयोजित करण्यात आली. ही परिषद ३ जून ते १४ जून १९९२ ला ब्राझीलमधील रिओ-दी-जानेरिओ येथे आयोजित केली गेली. पृथ्वीवरील अपुनर्नवीकरणीय नैसर्गिक स्रोत व प्रदूषण कमी करण्यासाठी मार्ग शोधण्यासाठी शासनांना मदत करावी असे संयुक्त राष्ट्रसंघास सांगितले गेले.

वसुंधरा शिखर परिषदेमध्ये दोन आंतरराष्ट्रीय पर्यावरण करार तयार केले.

अ) जैव विविधतेबाबतचा करार-जैविक विविधतेला उद्देशून असलेला हा पहिला आंतरराष्ट्रीय करार होता. याची तीन प्राथमिक उद्दिष्टे आहेत.जैव विविधतेचे संवर्धन.जैव विविधतेच्या घटकांचा शाश्वत वापर, नैसर्गिक संसाधनांपासून मिळालेल्या फायद्यांचे समान व न्याय्य वाटप.यामध्ये नैसर्गिक संसाधनांचा आर्थिक उपयोग व पारंपरिक संवर्धनाचे प्रयत्न यांचा समतोल साधला आहे.

ब) वातावरण बदलाबाबत संयुक्त राष्ट्रांची आराखडा परिषद (UNFCCC)

हरितगृह वायू कमी करुन वातावरण बदलाविरुद्ध लढा देण्यासाठी ही परिषद होती. हरितगृह वायूंचे उत्सर्जन, राष्ट्रीय धोरणे व परिणामकारक पद्धतींसोबत माहिती गोळा करणे व ती सामाईक करणे, हरितगृह वायूंच्या उत्सर्जनाबाबत राष्ट्रीय धोरण सुरू करणे, जागतिक हवामान बदलांच्या परिणामांसाठी अनुकूल क्षमता तयार करण्याबाबत सहकार्य करणे.

- **शाश्वत विकासासंबंधी संयुक्त राष्ट्रांची परिषद (रिओ +२०)**

शाश्वत विकासासंबंधी संयुक्त राष्ट्रांची परिषद ज्याला रिओ २० असे ओळखले जाते, ती ब्राझीलमधील रिओ- दी जानेरिओ येथे २० ते २२ जून २०१२ दरम्यान घेण्यात आली. शाश्वत विकासासंबंधीची ही सर्वांत महत्त्वाची तिसरी परिषद आहे. यात शाश्वत विकासाबाबत अनेक निर्णय घेतले गेले.

शाश्वत विकास संकल्पना-

शाश्वत विकास म्हणजे असा विकास की, ज्याद्वारे भावी पिढीच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला धक्का न पोहचवता आजच्या पिढीच्या गरजा पूर्ण करणे होय.

**शाश्वत विकासात व्यक्तीची, समुदायाची व शासनाची भूमिका :**

- प्रत्येक व्यक्तीची भूमिका-

आपल्याला शाश्वत विकासाच्या वाटेवरून जायचे असेल तर आपण सोप्या पायऱ्या वापरून याची व ४ 'R' ची तत्त्वे वापरून आपण हे दैनंदिन जीवनात करू शकतो. वस्तूंच्या वापरातील ४ 'R' तत्त्वे अशी आहेत-वापर कमी करा (Reduce), पुनर्वापर करा (Reuse), पुनर्चक्रीकरण करा (Recycle), पुनर्प्राप्ती करा (Recover)

- समुदायाची भूमिका -

कोणतेही गाव किंवा समुदाय त्यांच्या गावाचा कायापालट करू शकतात. यासाठी त्यांना प्रेरणा देणारी एखादी व्यक्ती किंवा घटना कारणीभूत होते. गावाच्या सहभागातून शाश्वत विकास व समृद्धी साधणारे राळेगण सिद्धी हे गाव उदाहरण आहे.

- शासनाची भूमिका -

शाश्वत विकासाची सर्व उद्दिष्टे साधण्यासाठी भारत सरकार प्रयत्नशील आहे. यासाठी सरकारने काही धोरणे व न कार्यक्रम निश्चित केले आहेत. त्यातील काही पुढीलप्रमाणे -

1. स्वच्छ भारतअभियान
2. बेटी बचाओ बेटी पढाओ योजना
3. उज्ज्वला योजना
4. प्रधानमंत्री आवास योजना
5. सर्व शिक्षा अभियान
6. नमामि गंगे अभियान

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**समारोप –**

आज २१ व्या शतकामध्ये असलेल्या सर्व प्रकारच्या समस्यांचा विचार करुन पर्यावरणाचे संरक्षण करणे महत्वाचे आहे तेव्हा प्रत्येकाने पर्यावरण रक्षण व नैसर्गिक रक्षण स्त्रोतांच्या रक्षण करणाऱ्या संस्थांच्या कार्याचा अभ्यास करून पर्यावरण संरक्षणाच्या पध्दतीचा अवलंब केल्यास पुढील पिढीसाठी आपण पर्यावरण राखून ठेवू.

**संदर्भग्रंथ सुची**

1. पाथरे, नीला (डिसेंबर, २००८) पर्यावरण शिक्षण, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर
2. भांडारकर, के. एम. (नोहेंबर, २००८) पर्यावरण शिक्षण, नित्यनूतन प्रकाशन, पुणे
3. कुलकर्णी, डी. आर. (जानेवारी, २००७) पर्यावरण शिक्षण, विद्या प्रकाशन, नागपूर
4. भोसले, रमा व डोणे उज्वला (ऑगस्ट, २०१०) शिक्षणातील बदलने विचारप्रवाह फडक प्रकाशन कोल्हापूर.
5. पारसनीस हेमलता व बहुलीकर जयभी (जुलै, २००८). पर्यावरण शिक्षण, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.
6. साळी, व झा तापकीर दत्तात्रय व चव्हाण, दिपक (सप्टेंबर, २००८) पर्यावरण शिक्षण, नित्यनूतन प्रकाशन, पुणे
7. भोसले, आरती व सरपोतदार प्राची (एप्रील २०१७) पर्यावरण शिक्षण, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.
8. पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६

   **(सन १९८६ चा अधिनियम क्रमांक २९)**

   **[२६ फेब्रुवारी, २००४ रोजी यथाविद्यमान]**

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# भारतीय राज्यघटनेतील सामाजिक स्वरूपाच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी

**धनाजी नारायण कठरे**
सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र
दादासाहेब जोतीराम गोडसे आर्ट्स, कॉमर्स, सायन्स कॉलेज वडूज
**Email-**dhanajikathare67@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170816
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8(I)
Pp. 71-74
August 2025
**Submitted:** 12 July. 2025
**Revised:** 27 July. 2025
**Accepted:** 12 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**सारांश**

सदर लेखामध्ये भारतीय राज्यघटनेतील सामाजिक स्वरूपाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा अभ्यास व त्यांच्या अंमलबजावणीचे विश्लेषण करण्यात आले आहे. कलम 36 ते 51 अंतर्गत नमूद केलेली ही तत्त्वे देशात सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी आणि कल्याणकारी राज्याची निर्मिती करण्यासाठी महत्त्वपूर्ण मानली जातात. लेखात या तत्त्वांचा ऐतिहासिक, तात्त्विक व आंतरराष्ट्रीय प्रभाव स्पष्ट केला असून सामाजिक स्वरूपातील तत्त्वांचे वर्गीकरण, त्यांच्या अंमलबजावणीसाठी सरकारकडून केलेल्या उपाययोजना व मिळालेले यश यांचा आढावा घेण्यात आला आहे. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, मागासवर्गीय कल्याण, कामगारांचे हक्क, स्मारक संरक्षण अशा क्षेत्रांतील प्रयत्न अधोरेखित केले आहेत. तसेच मार्गदर्शक तत्त्वांचे राजकीय, न्यायालयीन व लोकमताशी असलेले नाते स्पष्ट करून, त्यांचे पालन लोकशाही व लोककल्याणासाठी अपरिहार्य असल्याचे अधोरेखित केले आहे.

**बीजशब्द -** भारतीय राज्यघटना, मार्गदर्शक तत्त्वे, सामाजिक न्याय, आर्थिक समता, कल्याणकारी राज्य, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संरक्षण, मागासवर्गीय कल्याण, लोकशाही.

**प्रस्तावना**

भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात राज्याच्या धोरणासंबंधीची नीती निर्देशक तत्वे किंवा मार्गदर्शक तत्वे स्पष्ट करण्यात आलेली आहेत. भारतीय राज्यघटनेच्या कलम 36 ते 51 मध्ये राज्याच्या धोरणासंबंधीच्या मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश केलेला आहे. भारतीय घटनाकारांनी भारतीय राज्यघटनेत आर्थिक, सामाजिक, राजकीय न्यायालयीन, आंतरराष्ट्रीय संबंध विषयक अशा प्रकारच्या मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश केलेला आहे. भारत देशाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी आणि भारतात कल्याणकारी राज्याची निर्मिती करण्यासाठी ही मार्गदर्शक तत्वे उपयुक्त ठरतात. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारने मार्गदर्शक तत्वांची काही प्रमाणात अंमलबजावणीही केलेली दिसते. परंतु या मार्गदर्शक तत्त्वांना कायदेशीर मान्यता नसल्यामुळे ती स्वीकारलीच पाहिजेत असे बंधन सरकारवर नाही. त्यामुळे मार्गदर्शक तत्त्वांचा स्वीकार केला नाही म्हणून किंवा त्याची अंमलबजावणी केली नाही म्हणून न्यायालयात सरकारविरोधात दाद मागता येत नाही. देशात सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी ही न मार्गदर्शक तत्वे आवश्यक व महत्त्वाची मानली आहेत. भारत देशाचे ध्येय धोरण आणि योजना यांना मार्गदर्शन करण्यासाठी आणि राज्यकारभारासाठी अधिक चांगल्या प्रकारचा मार्ग दाखविण्यासाठी ही मार्गदर्शक तत्वे उपयुक्त ठरतात.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*धनाजी नारायण कठरे , सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र, दादासाहेब जोतीराम गोडसे आर्ट्स, कॉमर्स, सायन्स कॉलेज वडूज.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17115471
OPEN ACCESS

**How to cite this article:**
*कठरे, . धनाजी . नारायण . (2025). भारतीय राज्यघटनेतील सामाजिक स्वरूपाच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी. Journal of Research & Development, 17(8(I)), 71–74.*
https://doi.org/10.5281/zenodo.17115471

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

राज्याचे धोरण ठरवताना योग्य व चांगला मार्ग कोणता आहे? हे सांगण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मार्गदर्शक तत्त्वे करतात. भारत हे समाजवादी कल्याणकारी राज्य आहे. नागरिकांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी राज्याचे धोरण आदर्श असले पाहिजे. राज्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी राज्यकर्त्यांसमोर निश्चित व आदर्श ध्येय व आदर्श धोरण असावी लागते राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रात नागरिकांचा विकास घडवून आणण्यासाठी, त्यांचे राहणीमान सुधारण्यासाठी मार्गदर्शक तत्वे उपयुक्त ठरतात,मूलभूत अधिकारा प्रमाणेच मार्गदर्शक तत्वे ही नागरिकांच्या विकासासाठी आवश्यक व महत्त्वाची मानले जातात. भारतीय घटनेच्या सरनाम्यात लोकशाही, समाजवादी राज्य प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट सांगितले आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वांचा स्वीकार करून देशात सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट सरनाम्यात स्पष्ट केलेले आहे. अर्थात ते उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे आवश्यक व उपयुक्त ठरतात. भारतीय घटनाकारांनी आयर्लंड, स्पेन चीन युगोस लाविया, ब्रह्मदेश, नेपाळ इत्यादी देशांच्या राज्यघटनातील मार्गदर्शक तत्त्वांचा विचार करून आपल्या देशाच्या घटनेत मार्गदर्शक तत्वे स्वीकारलेली आहेत. या मार्गदर्शक तत्वांवर विविध विचारांचा आणि घोषणांचा प्रभाव पडलेला आहे. त्यामध्ये उपयुक्ततावादी विचारवंत बेंथॅम तसेच जे. एस.मिल यांच्याही विचारांचा प्रभाव पडला आहे .तसेच पाश्चात्त्य राजकीय विचारवंतांच्या समाजवादी विचारांचा प्रभाव पडला आहे त्यामध्ये रॉबर्ट ओवेन, सिडने वेब, जी. डी. एच. कोल, आणि आणि अनी बेझंट यांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. तसेच 1935 च्या कायद्याबरोबर आदेश वजा सूचना ब्रिटिश काळात देण्यात आलेल्या होत्या त्यांचाही प्रभाव या मार्गदर्शक तत्त्वांवर पडला आहे. ज्यावेळी संयुक्त राष्ट्र संघाचे मानवी अधिकाऱ्यांची सनद तयार करण्याचे कार्य ज्यावेळी चालले होते त्यावेळी भारतीय घटनेच्या निर्मितीचे ही कार्य सुरू होते तेव्हा युनोच्या मानवी हक्काच्या सनदेचा व घोषणा पत्राचा प्रभाव या मार्गदर्शक तत्त्वांवर आहे. मुख्य म्हणजे महात्मा गांधीजींच्या विचारांचा तसेच राष्ट्रीय काँग्रेसच्या ध्येय- धोरणाचा प्रभाव मार्गदर्शक तत्त्वांवर पडलेला आहे .

**मार्गदर्शक तत्वांचे वर्गीकरण**

भारतीय राज्यघटनेत मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण केलेले नाही तर कलम 36 ते 51 मध्ये ही मार्गदर्शक तत्वे स्पष्ट केली आहेत. या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये

1.आर्थिक तत्वे

2.सामाजिक तत्वे

3.राजकीय तत्वे

4. न्यायालयीन तत्वे

5. परराष्ट्र संबंध विषयक तत्वे स्पष्ट करण्यात आले आहेत.

अशाप्रकारे राज्याच्या धोरणासंबंधी मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण सोयीसाठी करण्यात आलेले आहे त्यातील सामाजिक स्वरूपाची मार्गदर्शक तत्वे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

अ. लोकांचा जीवन स्तर उंचाविण्यासाठी प्रयत्न करणे सामाजिक आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न करणे आणि सामाजिक स्वास्थ्य बिघडविणाऱ्या मादक पदार्थांवर व त्यांच्या सेवनावर बंदी घालणे.

ब. सामाजिक दुर्बल व मागास घटक प्रामुख्याने अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांच्या शिक्षणाचे व्यवस्था करणे व त्यांचे शोषण होणार नाही याची काळजी घेणे.

क. 14 वर्षाखालील सर्व मुला-मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची व्यवस्था करणे.

ड. सामाजिक स्वास्थ्य सुधारून नागरिकांचे जीवनमान उंचाविण्यासाठी प्रयत्न करणे.

इ. कामगारांच्या आहारात पौष्टिकतेचे प्रमाण वाढवून त्यांचे राहणीमान उंचविण्यासाठी प्रयत्न करणे.

ई. मागास व दुर्बल घटकांना शैक्षणिक व आर्थिक सवलती देण्यात येऊन त्यांचे कोणत्याही प्रकारे शोषण होणार नाही याची जबाबदारी घेणे.

उ. राष्ट्रीय आणि ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या स्मारकांचे संरक्षण करणे.

ऊ. कामगारांच्या सामाजिक व सांस्कृतिक विकासासाठी योग्य विश्रांतीची आवश्यकता असते त्याला अनुसरून राज्याने कायदे करणे.

ए. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी राज्यांनी वनांचे रक्षण करावे.

सामाजिक स्वरूपाची राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे भारतीय राज्यघटनेमध्ये देण्यात आलेली आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून या मार्गदर्शक तत्त्वांना महत्त्वाचे स्थान देऊन त्यातील काही मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न भारत सरकारने केलेला आहे. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये 42 व्या घटनादुरुस्तीने समाजवादी या नव्या शब्दाची भर घातली भारतीय जनतेचा एकूण राणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी सामाजिक न्याय व आर्थिक समता प्रस्थापित होणे गरजेचे आहे हे ओळखूनच समाजवादी या शब्दाची योजना सरनाम्यामध्ये करण्यात आलेली आहे .

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी**

गेल्या 75 वर्षाच्या काळात भारत सरकारने सामाजिक क्षेत्रातील मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करताना विविध उपाय योजना व तरतुदी केलेल्या आहेत त्यामुळे देशाची उल्लेखनीय प्रगती होत असल्याचे दिसून येते शिक्षण, आरोग्य, राहणीमान, संस्कृती याबाबतीत राज्याने मार्गदर्शक तत्वांचा स्वीकार केलेला दिसतो. शासनाने मार्गदर्शक तत्वे अमलात आणण्याचे केलेले प्रयत्न आणि त्याला आलेले यश ही मोठे आहे. लोककल्याण हा हेतू डोळयासमोर ठेवून शासनाने विविध उपक्रम राबवले . 14 वर्षाखालील सर्व मुला-मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याच्या बाबतीत सरकारने प्रयत्न सुरू केलेले आहेत. प्राथमिक, माध्यमिक, उच्च, तांत्रिक, व्यावसायिक शिक्षणाबाबत सरकारने विविध उपाय योजना केलेल्या आहेत ज्यांना परिस्थितीमुळे व वयामुळे शिक्षण घेता आले नाही त्यांच्यासाठी प्रौढ शिक्षणाद्वारे निरक्षरतेचे प्रमाण कमी करण्याचे विधायक कार्य सरकारने केले. मागासलेल्या व अनुसूचित जाती जमातीच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी विविध तरतुदी केलेले आहेत मागासलेल्या जाती -जमातीच्या लोकांना आर्थिक सहाय्य दिले जात आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी मध्ये सवलत दिली जात आहे . स्कॉलरशिपच्या माध्यमातून शैक्षणिक सवलत दिली जात आहे .त्यांच्यासाठी गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी उघडण्यात आलेले. शिक्षण घेत असलेल्या मुला- मुलींसाठी एस.टी. बस पास सवलत दिलेली आहे. नोकरीच्या बाबतीत त्यांना विशेष सवलती व राखीव जागाची तरतूद केलेली आहे. उद्योगधंद्याच्या बाबतीतही आर्थिक मदत देण्यात बाबत सरकारने विविध तरतुदी केलेले आहेत . शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी योजना आहे. तसेच पीक विमा योजना सुद्धा राबवली जात आहे. पंचायत राज व्यवस्थेचे अंमलबजावणी करून आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत मार्फत विशेष सेवा सुविधा दिल्या जातात. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी सेवा सवलती उपलब्ध करून दिलेले आहेत. महिला व बालकल्याण विकासाकडे शासनाने अतिशय काळजीपूर्वक लक्ष द्यायला सुरुवात केलेली असून त्यांचे स्वास्थ्य आरोग्य पोषण आहार या सवलती सुद्धा सुरू केलेले आहेत.

राष्ट्रीय स्मारके, ऐतिहासिक स्थळे किंवा वास्तू यांचे रक्षण करण्यासाठी सरकारने स्वतंत्र विभाग सुरू केलेला आहे. त्यांच्या संरक्षणासाठी आणि त्यांची झालेली पडझड दुरुस्तीसाठी सरकार प्रयत्न करत असल्याचे दिसते. ऐतिहासिक व पुरातन वस्तूंची चोरटी निर्यात थांबवण्यासाठी सरकारने कायदा केलेला आहे.नागरिकांचे आरोग्य व स्वास्थ्य विचारात घेऊन सरकारने अमली पदार्थाच्या चोरट्याआयातीवर व सेवनावर कायद्याने बंदी घातलेले आहे. दारूबंदी करण्यात आलेली आहे खाद्यपदार्थांच्या भेसळीबाबत उपाययोजना म्हणून भेसळ प्रतिबंधक कायदा केलेला आहे. अलीकडे सार्वजनिक क्षेत्रात भ्रष्टाचार बोकाळलेला आहे. त्याला प्रतिबंध करण्यासाठी सरकारने विविध कायदे व उपाय योजना केल्या आहेत. लाचलुचपत प्रतिबंधक कायदा करण्यात आला आहे. पर्यावरणाच्या सुरक्षिततेसाठी ही विविध कायदे केलेले आहेत. अशाप्रकारे देशात सामाजिक प्रगती घडवून आणण्यासाठी आणि सामाजिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी सरकारने सामाजिक स्वरूपाची मार्गदर्शक तत्वे स्वीकारलेले आहेत आणि त्याची अंमलबजावणीचे कार्य ही सुरू असल्याचे दिसून येते.

**मार्गदर्शक तत्त्वांचे महत्त्व**

मार्गदर्शक तत्त्वांमध्ये जनमताच्या शक्तीचा आधार आहे जनतेचे प्रतिनिधी मार्गदर्शक तत्त्वांना दुर्लक्षित करू शकत नाहीत नाहीतर त्यांना विधिमंडळात विरोधी पक्षाच्या टीकेशी सामना करावा लागतो तसेच सार्वत्रिक निवडणुकांमध्ये जनमताचा कौल बदलू शकतो .मार्गदर्शक तत्वे ही शासनाच्या कार्याचे मूल्यमापन करणारी फुटपट्टी आहे कारण व्यवहारात ही तत्त्वे आदर्श म्हणून नेहमी जनतेसमोर असतात व त्यांचा परिणाम शासनाचे व्यवहारावर होतो म्हणून शासनाचे धोरण ठरवताना मार्गदर्शक तत्वे ही मार्गदर्शकाची भूमिका बजावत आहेत त्यांना डोळ्यासमोर ठेवूनच शासनकर्त्यांना धोरणे ठरवावी लागत असतात. कोणत्याही राजकीय पक्षाचे सरकार सत्तेवर आले असले तरी त्यांना नियंत्रित करण्याचे कार्य मार्गदर्शन तत्त्वांद्वारे होत असते मार्गदर्शक तत्त्वांकडे दुर्लक्ष करणाऱ्या राजकीय पक्ष पुढील निवडणुकीमध्ये सत्तेवर येईल याची खात्री देता येणार नाही. तसेच सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देताना अनेकदा मार्गदर्शक तत्वांचा उल्लेख केलेला आहे न्यायालयासाठी मार्गदर्शक तत्वे ही प्रकाश स्तंभा सारखे कार्य करतात. न्यायालयांना कायद्याचा अर्थ लावताना मार्गदर्शक तत्वांकडे लक्ष द्यावे लागते.जेव्हा विशिष्ट कायद्याचा अर्थ लावायचा प्रसंग येतो त्यावेळी न्यायालय मार्गदर्शक तत्त्वांची मदत घेत असते. गोपालन विरुद्ध मद्रास राज्य, सूर्यपाल सिंग विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य ,मुंबई राज्य विरुद्ध एफ. एम बलसारा आणि बिहार राज्य विरुद्ध कामेश्वर सिंग या सर्व खटल्यांनी पूर्णपणे सिद्ध केले आहे की मार्गदर्शक तत्वे यांना फार मोठे घटनात्मक महत्त्व आहे. प्रत्यक्षात मार्गदर्शक तत्वे ही भारतात एका मजबूत लोकशाहीचे विकासाचे आश्वासन आहे त्याशिवाय आर्थिक लोकशाहीची स्थापना होऊ शकत नाही. लोक कल्याणकारी राज्य स्थापन करण्याचे ते एक साधन आहे आणि स्वतःच्या अस्तित्वाची किंमत देऊनच कोणते सरकारी या सिद्धांताकडे दुर्लक्ष करेल हे सिद्धांत लागू करण्यासाठी न्यायालयांना जरी अधिकार नसले तरी लोकमत नावाचे मोठे आणि अधिक शक्तिशाली लवाद त्यामागे आहे. कायदेमंडळात विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षावर टीका करेल मार्गदर्शक तत्वे अमलात आणण्यासाठी जर सरकार टाळाटाळ करीत असेल तर कायदेमंडळाबाहेर मतदार वर्ग त्यामागे ठामपणे उभा राहतो आणि त्याला शासनच जबाबदार असे म्हणून शासनकर्त्यांना मार्गदर्शक तत्त्वांचे आधार घेऊनच ध्येय- धोरणे निर्माण करावी लागतील, कायदे निर्माण करावे लागतील आणि योग्य अशाच कायद्याची अंमलबजावणी करावी लागेल. मार्गदर्शक तत्त्वांचे पूर्णपणे पालन झाले तर भारत देश पृथ्वीवरील स्वर्ग होईल. भारतीय घटनाकारांचे ते एक स्वप्नरंजन होते म्हणून त्याचा त्याग करता येणार नाही. भारतीय जनतेच्या आशा- आकांक्षा सफल

करावयाच्या असतील तर या मार्गदर्शक तत्त्वांचे परिपूर्ण पालन होणे आवश्यक आहे. असे मत न्यायमूर्ती छगला यांनी व्यक्त केले होते. ते अगदी बरोबरच आहे.

**संदर्भसूची**

1. पालखी वाला नानी, वुई दि पीपल.
2. महाराष्ट्र शासनाचे प्रकाशन, भारताचे संविधान 2012
3. देवगिरीकर त्र्यं. र. भारतीय राज्यघटना.
4. प्रा. बी. बी. पाटील. भारतीय राज्यघटना
5. विकिपीडिया, राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे. आणि योग...

# Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# अण्णाभाऊ साठे यांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय योगदान

**रोशन एस. भोवते**
सहा. प्राध्यापक , स्व. निर्धन पाटील वाघाये कला व विज्ञान महाविद्यालय
मुरमाडी/तुपकर ता. लाखनी जिल्हा. भंडारा
**Email**-roshanbhowate@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170817
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 8(I)
Pp. 75-77
August 2025

**Submitted:** 12 July. 2025
**Revised:** 27 July. 2025
**Accepted:** 12 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**सारांश**

अण्णाभाऊ साठे यांचा सामाजिक विचार हा समाजातील विषमतेवर आणि शोषणावर आधारित होता. त्यांनी भारतीय समाजामध्ये पसरलेल्या जातीयतेच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी सामाजिक व शैक्षणिक विचारांची मशाल व हातात पिवळा ध्वज घेऊन तत्कालीन समाज अस्मितेला उजाळा दिला. त्यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा प्रभाव होता. सनातनी समाज व्यवस्थेला धडा शिकविण्याकरिता त्यांनी आपल्या कार्याची धुरा सामाजिक न्याय, समता व शिक्षण या त्रिसूत्रीचा उपयोग केला. त्यांनी संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हावा यासाठी सामाजिक चळवळीला हातभार लावला. त्यांनी सर्वप्रथम जातीव्यवस्थेवर आघात केला. दीड दिवस शाळेत जाणारा विद्यार्थी आज मराठी साहित्यात 'साहित्यरत्न' ठरले. त्यांनी आपल्या साहित्यातून सामाजिक आणि शैक्षणिक विचारांची देवाणघेवाण केली. प्रस्तुत शोधनिबंधात अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील योगदान प्रभावीपणे जाणवते.

**बीजशब्द –** जातीयतेचे जोखड, सामाजिक अस्मिता, साहित्यरत्न.

**प्रस्तावना**

अण्णाभाऊ साठे हे मातंग समाजाचे प्रतिनिधीत्व करणारे असले तरी, त्यांनी आपल्या समाजामध्ये असलेली अराजकता, अंधश्रद्धा, अज्ञान दूर करण्यासाठी त्या काळात सनातनी धर्माविरुद्ध अत्यंत प्रभावीपणे आवाज उठवला.

**१) सामाजिक दृष्टिकोन –**

अण्णाभाऊ हे श्रमिक, शोषित आणि वंचित समाजासाठी लढणारे एक प्रगल्भ विचारवंत होते. त्यांनी समाजामध्ये सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी समता प्रस्थापित करणे हा मुख्य हेतू समोर ठेवला होता.

**अ) दलितांचे प्रभावी नेतृत्व –**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी समाजातील निरक्षरता व अंधश्रद्धेवर कडाडून आघात केला. तळागाळातील दलित, पीडित समाजाला सामाजिक दर्जा मिळावा म्हणून त्या काळात पसरलेल्या जातीयतेच्या दलदलीतून बाहेर काढण्यासाठी त्यांनी जातीव्यवस्था यावर प्रकाश टाकला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे 'जात म्हणजे जिना नसलेली इमारत होय'. अंधश्रद्धेवर आघात करताना अण्णाभाऊ साठे म्हणायचे, 'ही पृथ्वी शेषनागावर नसून कामगार कष्टकऱ्यांच्या तळहातावर उभी आहे'. यासाठी त्यांनी सामाजिक न्याय, समानता व सर्वांना शिक्षण या गोष्टीवर प्रभाव टाकला.

**ब) श्रमाचे महत्त्व –**

श्रमाचे महत्त्व विशद करताना ते म्हणत, 'श्रम ही पूजा होय'. श्रमातून मानवी विकास व स्वास्थ्य सुधारते. तसेच श्रम हा मानवी जीवनाचा आधार आहे हे स्पष्ट केले.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17115483

**Address for correspondence:**
*रोशन एस. भोवते, सहा. प्राध्यापक , स्व. निर्धन पाटील वाघाये कला व विज्ञान महाविद्यालय, मुरमाडी/तुपकर ता. लाखनी जिल्हा. भंडारा*

**How to cite this article:**
*भोवते, . रोशन . एस . (2025). अण्णाभाऊ साठे यांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय योगदान. Journal of Research & Development, 17(8(I)), 75–77.* https://doi.org/10.5281/zenodo.17115483

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**क) क्रांतिकारी विचार –**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे रुढी, प्रथा, परंपरा यावर कडाडून हल्ला केला. त्यांनी लोककलेच्या माध्यमातून 'तमाशाद्वारे' जनजागृतीची क्रांतिकारी मशाल हातात घेतली. व समाजातील छोट्या मोठ्या विषयातून सामाज जागृतीचे कार्य केले.



**२) शैक्षणिक दृष्टिकोन –**

यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव पडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे- 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो ते प्राशन करतो तो वाघासारखा गुरुकुरतो'. याच विचारांनी भारवलेले अण्णाभाऊ- 'शिक्षण हे सुलभ आणि जीवनोपयोगी असावे'. यांनी औपचारिक शिक्षण न घेता अनौपचारिक शिक्षणातून जनतेला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यामुळे ते एक तज्ञ वक्ते होते. लोकशिक्षण हे मानवी जीवनाचा घटक आहे हे सिद्ध केले.

**अ) प्रयोगशील शिक्षण-**

शिक्षण हे पुस्तकांपुरते मर्यादित न राहता सार्वभौम व्हावे यासाठी व्यक्ती व्यक्तींच्या कला विकासावर भर दिला. त्यांच्या बहुआयामी कौशल्यातून व्यक्तीला प्रगतीची चाहूल निर्माण होते हे सिद्ध केले. नव-नवीन प्रयोगातून व्यक्ती हा सुजलाम-सुफलाम होतो. प्रयोगशीलता हे मानवी मेंदूला चालना देणारे एक वैचारिक विचार आहे, हे अण्णाभाऊ साठे यांनी सिद्ध केले.

**ब) साहित्य व शिक्षण-**

अण्णाभाऊंनी आपल्या जीवनामध्ये कादंबऱ्या, कथा यासारख्या अनेक विचारात्मक व प्रबोधनात्मक साहित्याला जन्म दिला. त्यांनी फकीरा, वारणेचा वाघ, मास्तर, टिळा लावते मी रक्ताचा, बंडवाला, वळण, डोंगराचा राजा इत्यादी साहित्यातून शैक्षणिक विचार मांडण्याचे कार्य केले. एवढेच नव्हे तर तळागाळातील शोषित, पिडीत समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणणे हाच मुख्य हेतू समोर ठेऊन साहित्य व शिक्षण समाजापर्यंत पोहोचावे हेच मानस होते.

**3) आर्थिक दृष्टिकोन -**

अण्णाभाऊ साठे यांनी साहित्याच्या माध्यमातून आपले आर्थिक विचार जनसामान्यापर्यंत पोहोचवले. त्यांच्यावर कार्लमार्क्स आणि आंबेडकरवादी विचारांचा प्रभाव होता. त्यांनी समाजातील गरीब, शोषित, पीडित, कष्टकरी लोकांच्या आर्थिक समस्यांवर प्रकाश टाकला. भांडवलशाही शासन व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवला.

**अ) श्रमिकांचा प्रश्न –**

अण्णाभाऊंनी भांडवलशाही समाजव्यवस्थेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी भांडवलशाही व्यवस्थेतील विषमतेवर सर्वप्रथम टीका केली. 'श्रमिक हा केंद्रबिंदू' मानून त्यांनी त्यांच्यावर आपला देश चालतो त्यांना मिळणारे वेतन अल्पशा प्रमाणात असून त्यांच्या श्रमाच्या घामावर जगणारी समाजव्यवस्था म्हणजे भांडवलशाही, जमीनदारी, व सावकारी व्यवस्थेविरुद्ध बंड केले.

**ब) शोषणाविरुद्ध आवाज –**

भारताला 15 ऑगस्ट 1947 ला स्वातंत्र्य मिळाले. हे स्वातंत्र्य सामान्य माणसाचे नसल्याने त्यांनी 16 ऑगस्ट 1947 ला 50 हजार जलसमुदायांचे प्रतिनिधित्व करत सरकार विरुद्ध आवाज उठवला. ते म्हणत, 'ए आजादी झुटी है ! देश की जनता भूकी है !!' असा क्रांतिकारी नारा लावून व हातात पिवळा ध्वज घेऊन शोषणाविरुद्ध आवाज मांडला. कामगारांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक तसेच राजकीय विचाराविरुद्ध जनआंदोलन पेटविले. अण्णाभाऊ साठे यांनी शोषित, पिडीत आणि वंचित घटकांना मुख्य माणून आपल्या साहित्यात शोषणाविरुद्ध आवाज उठवला.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**क) कामगारांचे हित –**

अण्णाभाऊ साठे यांनी कामगारांच्या समस्या व त्यांचे होणारे शोषण या हक्कासाठी लढा दिला. कष्टकरी शेतमजूर विरुद्ध सावकार, मालक विरुद्ध मजूर असे ज्वलंत असणारे प्रश्न जनतेसमोर मांडले. जनतेच्या हक्कांना वाचा फोडण्याचे कार्य केले.

**ड) परिवर्तनवादी विचार –**

परिवर्तन ही काळाची गरज आहे असे अण्णाभाऊंना वाटायचे. त्यांनी आपल्या तमाशा या लोकप्रकारातून समाजाला बदलण्याचे ध्येय उराशी बाळगून त्यांनी पारंपारिक अंधश्रद्धा, अज्ञान, विषमता व गुन्हेगारी याविषयाचे देवाण-घेवाण केले. त्यांनी लोककलेच्या माध्यमातून समाजात पसरलेली बुवा-बाजी दैववादावर कडाडून टीका केली. आपल्या साहित्यातून जनमानसाला समज दिली. त्यांनी आपल्या साहित्यात स्मशानातलं सोनं, मरीआईचा गाडा अशा समाज उपयोगी पुस्तकातून वाचकाला योग्य दिशा दिली. आणि समाजातच नव्हे तर संबंध जनतेमध्ये साहित्याची जाण निर्माण केली. साहित्य हे जीवन उपयोगी कसे असते हे समाजाला पटवून दिले. त्यातून हळूहळू समाज परिवर्तनाचा प्रवाह वाहू लागला.

**4) राजकीय दृष्टिकोन –**

अण्णाभाऊ साठे यांनी समाजातील गरीब, वंचित लोकांच्या हक्कासाठी आणि समानतावादी विचारांसाठी त्यांनी फकीरा, वैजयंती व चिखलातील कमळ यासारख्या पुस्तकातून सामाजिक न्याय आणि समाजवादी विचार मांडले.

**अ) संयुक्त महाराष्ट्र चळवळ -**

अण्णाभाऊंनी संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हावा यासाठी सक्रिय सहभाग घेतला व त्यासाठी जनजागृती करण्याचे काम केले. महाराष्ट्राला संतांची खाण जरी लाभली असली तरी अनेक साहितीकांच्या साहित्याची भर पडली आहे. कवी नारायण सुर्वे यांनी कामगार या कवितेत ते म्हणतात, 'मी कामगार आहे, तळपती तलवार आहे'.

'सारस्वतांनो माझ्या हातून थोडा गुन्हा घडणार आहे' असा प्रखर आवाज कामगारांच्या शोषनाविरुद्ध मांडला. त्यानंतर त्यांनी पांढरपेशी संस्कृतीवर हल्ला करताना म्हटले की, 'आदमी झाला सस्ता, बकरा महाग झाला. जिंदगीमध्ये पुरा अंधेरा आला, सबको पैसे ने खा डाला,' त्यावेळी कवी वामनदादा कर्डक म्हणत की, '100 भाषणापेक्षा कलावंताचा एक प्रबोधन महत्त्वाचा ठरतो.

**ब) दलित आणि वंचितांचा विचार-**

त्या काळात पसरलेली चातुर्वर्न्य व्यवस्था ही इतर जातींना तुच्छ लेखत होती. आपल्या सनातनी संस्कृतीने व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणला होता. शुद्र वर्णातील जनतेला कुठल्याही क्षेत्रात समोर जाऊ देत नव्हते. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'शिका, संघटित व्हा आणि अन्यायाविरुध्द संघर्ष करा' असा त्रिसूत्री नारा दिला. अण्णाभाऊ साठे यांनी दलित वंचितांच्या हक्कासाठी पुढाकार घेऊन लढा ऊभारला. अशा अनेक मागासवर्गीय घटकातील लोकांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये हक्काची जाण निर्माण केली.

**क) लोककला, लेखन आणि संघटन -**

अण्णाभाऊंनी तमाशा आणि लोककलेच्या माध्यमातून सामाजिक. शैक्षणिक. आर्थिक आणि राजकीय विचार लोकांपर्यंत पोहोचवले. त्यांनी आपल्या साहित्यसृष्टीत अनेक कथा, कादंबऱ्या आणि पोवाडे लिहून समाजातील विषमता आणि शोषनाविरुद्ध प्रकाश टाकला. त्यामुळे उच्चवर्णीयांची झोप उडाली. त्यांनी लोकांमध्ये जनजागृती निर्माण करून अनेक संघटना उभ्या केल्या. आणि सरकारला जेरीस आणले. असे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे कार्य किती प्रगल्भ होते याची ग्वाही मिळते.

**निष्कर्ष –**

अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा आढावा घेतांना मानवी मनाचा कल शाबूत ठेवावा लागतो. यामध्ये त्यांनी 37 कादंबऱ्या, 11 कथासंग्रह, २ नाटक, १ प्रवास वर्णन, 13 लोकनाट्य आणि २ शाहिरी वाङ्मय इत्यादी लिहून साहित्य विश्वामध्ये आपली ख्याती प्रसिद्ध केली. त्यांच्या कथा, कादंबऱ्या चित्रपट निर्मितीसाठी मदत करतात. एका निरक्षर व्यक्तीने निर्माण केलेल्या या साहित्यसंपदेचा डोंगर मराठी साहित्यातील मोठ्या लोकांना आणि उच्च विद्या विभूषित विद्वानांना भुवया उंचवायला भाग पाडणारा आहे. आणि भुरळ घालणाराही आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील विचार त्यांच्या साहित्यावर बाबुराव गुरव आणि माधव गादे यांनी विद्यावाचस्पती या पदव्या मिळविल्या. संशोधन प्रबंध सादर केले. त्यानंतर अनेक संशोधकाच्या संशोधन विषयाचा केंद्रबिंदू अण्णाभाऊ साठे ठरले हे मात्र विसरता येत नाही.

**संदर्भ –**

1. रोकडे मनोहर, "साहित्यातील तेजस्वी ताराः अण्णाभाऊ साठे" साधना सेवा प्रकाशन, पूणे, 2015
2. अण्णाभाऊ साठे, "फकिरा", सुरेश एजन्सी, मुंबई, 1988
3. त्रिभुवन शैलेश, "साहित्य सम्म्राट अण्णाभाऊ साठे (चरित्र वाङ्मय आणि प्रातिनिधिक लेखन)" पायल पब्लिकेशन, पुणे-2006

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# कृत्रिम बुद्धिमत्ता (ए. आय.) आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम

**धनराज विष्णू आवळे**

मराठी विभाग,दादासाहेब ज्योतीराम गोडसे आर्ट्स, कॉमर्स, सायन्स, कॉलेज, वडूज

**Email-**dhanrajawale1@gmail.com

**Manuscript ID**:

JRD -2025-170818

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 8(I)

Pp. 78-82

August 2025

**Submitted:** 12 July. 2025

**Revised:** 27 July. 2025

**Accepted:** 12 Aug 2025

**Published:** 30 Aug. 2025

**सारांश**

कृत्रिम बुद्धिमत्ता (ए. आय.) हे एक वेगाने विकसित होणारे तंत्रज्ञान असून त्याचा वापर समाजातील जवळपास सर्वच क्षेत्रांत होत आहे. ए. आय. मुळे कार्यक्षमता, आरोग्यसेवा, शिक्षण, शेती, पाळीव जनावरांचे व्यवस्थापन, मच्छीमारी, अंतराळ संशोधन आदी क्षेत्रांत क्रांती घडत आहे. उदाहरणार्थ, आरोग्यसेवेत निदान आणि उपचार अधिक जलद व अचूक होत असून, शिक्षणात वैयक्तिक शिकवणी आणि व्हर्च्युअल रिॲलिटीद्वारे शिकवण्याची सुविधा मिळत आहे. शेतीत उत्पादनवाढ आणि संसाधनांचे अचूक व्यवस्थापन शक्य झाले आहे, तर पाळीव जनावरांच्या आरोग्यावर डिजिटल उपकरणांद्वारे लक्ष ठेवले जात आहे. तथापि, ए. आय.चे नकारात्मक परिणामही गंभीर आहेत. स्वयंचलित यंत्रणेमुळे बेरोजगारी वाढण्याची शक्यता आहे, तर सायबर गुन्हे, हनी ट्रॅप, चुकीची माहिती पसरवणे, गोपनीयतेचा भंग यांसारख्या समस्या वाढत आहेत. पासवर्ड क्रॅकिंग, मालवेअर तयार करणे, आवाजाची बनावट निर्मिती करून फसवणूक अशा गुन्ह्यांत ए. आय.चा गैरवापर होत आहे. त्यामुळे ए. आय.च्या नैतिक, सामाजिक आणि कायदेशीर नियमनाची गरज भासते.

**कीवर्ड-** कृत्रिम बुद्धिमत्ता ( ए. आय. ), चॅट जीपीटी, सायबर क्राईम, जनरेटिव्ह एआर, ए. आय. टूल्स, ए. आय. चे फायदे व तोटे निर्माण

**प्रस्तावना**

एकेकाळी विज्ञान कथेच्या क्षेत्रांसाठी राखीव असलेले कृत्रिम बुद्धिमत्ता ( ए. आय. ) आता एक अतिशय वास्तविक तंत्रज्ञान आहे, ज्यामध्ये अनुप्रयोग, फायदे तसेच परिणाम यांचा एक विस्तृत संच आहे. काही सेकंदात मोठ्या प्रमाणात सामग्री तयार करण्यापासून ते प्रश्नांची उत्तरं देणे, डेटाचे विश्लेषण करणे, कार्य स्वयंचलित करणे अशा गोष्टींचा समावेश होतो. कृत्रिम बुद्धिमत्ता ( ए.आय. ) म्हणजेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजे नेमकं काय ? एखादा कॅम्पुटर आपण सांगू ते काम करतो किंवा आपल्या प्रश्नांची उत्तरे देतो तेव्हा तो आपण आधीच लिहून ठेवलेल्या प्रोग्रॅमची अंमलबजावणी करत असतो एखादं काम सांगितलं, तर ते काम त्याने कसं पार पाडावं हे सगळं या प्रोग्रॅम मध्ये लिहिलेलं असतं. पण कृत्रिम बुद्धिमत्ता हा यापेक्षा थोडं वेगळे काम करते. आधीच लिहिलेले प्रोग्रॅम्स ए.आय.चा पाया म्हणून काम करतात, तर या प्रोग्रॅममध्ये गरजेनुसार व बाह्य परिस्थितीनुसार आपोआपच बदल करणे किंवा अगदी नवीन प्रोग्रॅम स्वतःलाच लिहिता येणे ही ए. आय.ची खासियत आहे. लहान मुलाला जसे आपण सगळेच शिकवत नाही पण ते स्वतःच्या

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17115491

OPEN ACCESS

**Address for correspondence:**

*धनराज विष्णू आवळे , मराठी विभाग,दादासाहेब ज्योतीराम गोडसे , आर्ट्स, कॉमर्स, सायन्स, कॉलेज, वडूज.*

**How to cite this article:**

*आवळे, . धनराज . विष्णू . (2025). कृत्रिम बुद्धिमत्ता (ए. आय.) आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम. Journal of Research & Development, 17(8(I)), 78–82.* https://doi.org/10.5281/zenodo.17115491

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

निरीक्षणातून शिकत जाते, तसंच ए. आय. मध्ये घडत असतं. आपल्या दैनंदिन जीवनात ए. आय. तंत्रज्ञानाचे वास्तविक जीवनातील अनुप्रयोग आधीच स्थापित झाले आहेत. ए.आय.चे एक वैशिष्ट्य म्हणजे एकदा तंत्रज्ञान कार्य करत असताना त्याला ए.आय. म्हणून संबोधले जाणे थांबते आणि ते मुख्य प्रवाहातील संगणकात रुपांतरीत होते. ए.आय. आपले जीवन समृद्ध करू शकते याचे अनेक मार्ग आहेत. कार्यक्षमता वाढवणे आणि कमी खर्च, आरोग्यसेवा आणि संशोधनात मोठ्या प्रमाणात सुधारणा, वाहनांची वाढलेली सुरक्षितता त्यामुळे जीवन सोपे आणि अधिक कार्यक्षम बनते. ए.आय. विकसित होत असताना ते उत्पादकता सुधारून जागतिक आव्हाने सोडवून आणि असंख्य क्षेत्रांमध्ये नवोपक्रम चालवून भविष्य घडवत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता ( ए. आय.)चा समाजावर जेवढा चांगला परिणाम होतो तेवढेच वाईट परिणाम देखील होतो. ए.आय.चा परिणाम कारखान्यांमध्ये, ऑफिसमध्ये, वकील, फायनान्स, अकाउंट, कस्टमर सर्विस, मार्केट रिसर्च, सेल्स आणि मार्केटिंग, आरोग्य सेवा, शिक्षणात , शेती, मासेमारी , पर्यटन , कला, संगीत, पत्रकारिता, अंतराळ संशोधनात, थ्रीडी प्रिंटिंग अशा अनेक माध्यमांमध्ये ए.आय.चा वापर होतो. या क्षेत्रांवर ए. आय. चा परिणाम कसा होतो किंवा या क्षेत्रात ए. आय. कसे कार्य करते व त्यातून मानवाला कशाप्रकारे फायदा होतो ते बघूया.

**ए. आय. आणि वकील -**

'डू नॉट पे' ( DO NOT PAY ) नावाचे चॅटबोट यंत्रणा तुमच्याबरोबर संभाषण करून तुम्हाला कित्येक बाबतीत विनामूल्य आणि जलद वेगाने कायद्याचा सल्ला देऊ शकते. लीगल झूम या टूलमुळे आता जरी वकिलांचं काम सोप होत असलं तरी उद्या वकिलांची गरजच कमी होणार आहे. म्हणजे प्रत्यक्ष कोर्टात आपली बाजू मांडायला रोबोट्स वकील म्हणून बनवून कोर्टात येईपर्यंत थोडा वेळ तरी वकीलच लागेल. पण त्याआधी जी पूर्वतयारी करावी लागते, आधीच्या केसचा अभ्यास, करार, केस पेपर बनवणे हे सगळं ए.आय.चं सॉफ्टवेअर करेल. त्यामुळे ज्युनियर वकील किंवा मोठ्या वकिलांचे सहकारी, असिस्टंटस असे अनेक बेकार होतील.

**ए. आय. आणि ग्राहक सेवा कस्टमर सर्विस -**

पुढच्या काळात कुठल्याही कंपनीचा कस्टमर सर्विस डिपार्टमेंट जवळपास पूर्णपणे एआय टूल्स सांभाळतील. सध्या यासाठी अनेक कंपन्यांमध्ये , बँकांमध्ये अनेक लोक काम करतात. उद्याच्या जगात ग्राहकांचे गुंतागुंतीचे प्रश्न सोडवणे, त्यांना सल्ले देणं आणि इतरही अनेक बाबतीत मदत करणे हे ए.आय.च्या मदतीने सहज शक्य व सोपे होणार आहे . पण याचमुळे अनेक नोकऱ्यांवर गदा येणार आहे. पण ए.आय.मुळे ही सेवा न दमता अविरतपणे चोवीस तास उपलब्ध होईल व ही सेवा जलद गतीने पूर्ण होईल.

**ए. आय. आणि आरोग्य सेवा -**

ए. आय. मुळे जगभराच्या आरोग्य सेवेत अमुलाग्र बदल होत आहेत. रुग्णांची मेडिकल रेकॉर्ड ठेवणं रिसर्च पेपरचा नुसताच साठा नाही तर त्यांची वर्गवारी आणि ॲनॅलेसिस करणं यात खूप वेळ जायचा. पण आता हे सगळं करायला ए. आय. टूल्स मदत करतात. ए. आय. मुळे रोगाच निदान आणि उपचार पद्धतीत बदल होत आहेत. त्यामुळे रुग्णांना चटकन आणि स्वस्त उपचार हे जास्त कार्यक्षम पद्धतीन देता येतील. जगात सातशेहून अधिक आजार हे आनुवंशिक असतात. मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार असे अनेक आजार आनुवंशिक समजले जातात. आनुवंशिक आजार ओळखण्यासाठी ए. आय. चा वापर वाढला आहे. अनेकदा आई - वडिलांमधील DNA मधील गडबडीमुळे मुलांमध्ये दुर्मिळ आजारही होतात. त्यांचं निदान करण्यातही ए. आय.ची मदत घेतली जाते. स्मार्टफोन किंवा स्मार्ट वॉचेस यांच्या ए.आय. टूल्स मार्फत आरोग्यावर लक्ष ठेवणे अत्यंत सोयीचे झाले. आपल्या हृदयाचे ठोके मोजण्यासाठी, तसेच दिवसभरात आपण किती चालतो, व्यायाम करतो, तसेच बीपी मोजण्यासाठी स्मार्टवॉच यासारख्या ए. आय. टूलचा वापर होतो.

**ए.आय. आणि शिक्षण -**

वर्गात शिकवण्यापेक्षा ई-लर्निंगचे अनेक फायदे आहेत. आज इंटरनेटवर उपलब्ध असणाऱ्या अनेक विषयावरचे व्हिडिओज द्वारे मुले घरबसल्या शिकताना दिसत आहेत. सगळयात महत्त्वाचे म्हणजे आपण हे व्हिडिओज कधीही बघू शकतो. आपल्या सोयीनुसार चोवीस सात हे आपल्यासाठी उपलब्ध असतात. विद्यार्थ्यांना अभ्यास करत असताना येणाऱ्या अडचणींचा, शंकांचे निरसन करण्यासाठी ए.आय. चा उपयोग करता येईल. प्रत्येकाला ए. आय. वापरून एक व्यक्तिगत (पर्सनलाईज्ड) शिक्षक निर्माण करता येईल. विद्यार्थी त्याच्याशी चॅटबॉट्सप्रमाणे संवादही करू शकेल. शैक्षणिक चॅटबॉबॉट्स त्या विद्यार्थ्याला त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची तोंडी उत्तर किंवा व्हिडिओज द्वारे त्यांच्या प्रश्नाचे निरसन करता येईल. अनेक शाळांमध्ये व्हर्चुअल रिॲलिटी आणि ए. आय. यांचा मिलाप करून

विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे प्रयोग केले जात आहेत उदा: विद्यार्थ्यांना एखाद्या वनस्पतीची माहिती द्यायची असेल, तर ती वनस्पती / ते झाड यांची थ्री डी इमेज वर्गातच तयार केली जाते आणि मग त्यातला एक एक भाग वेगळा करून तो विद्यार्थ्यांना शिकवला जातो.

**ए. आय. आणि शेती -**

ए. आय. ची मदत फक्त उद्योगातच नाही, तर इतर अनेक क्षेत्रातही मदत घेतली जाते. तसेच शेतीत जास्तीत जास्त आणि उत्कृष्ट दर्जाच पीक काढण ही काळाची गरज बनेल हे करण्यासाठी शेतीमध्ये ए. आय. चा खूपच मोठा उपयोग होऊ शकतो. इंग्लंडमधल्या एका शेतात मनुष्यविरहित शेती करण्यात यश मिळालं आहे. त्या शेतात बियाणं पेरण्यापासून ते कापणी पर्यंतची सगळी कामं ऑटोमेटेड मशीनच्या मदतीनं यशस्वीपणे करण्यात आली होती. या प्रयोगामध्ये ए. आय. चा वापर करून 'हँडस फ्री हेक्टर' अशा प्रकारची शेती केली जावू शकते, पण ए. आय. च्या अधिक वापरामुळे मनुष्यबळ कमी झाले आहेत व मशीन चा वापर जास्त होत असल्यामुळे रोजगार मिळणे कमी होतील. कृत्रिम बुद्धिमत्ता ए. आय. चा वापर करून एकरी २०० टन ऊस उत्पादन शक्य असल्याचे मत मृदा शास्त्रज्ञ करीत आहेत. ए. आय. तंत्रज्ञान ऊस लागवडीसाठी रोपांचा वापर , पिकांची अन्नद्रव्याची गरज ,पाणी व्यवस्थापन, कीड रोग नियंत्रण याबाबत मार्गदर्शन करते . यामुळे कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन मिळणे शक्य होईल. ए. आय.च्या मदतीमुळे पिकाची भूक , अन्नद्रव्याचा पुरवठा आणि रिकव्हरी याबाबत अचूक माहिती मिळते . तसेच भारताला जागतिक स्तरावर मनोरंजन क्षेत्रात ए. आय. याचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. मुंबई शहरात ए. आय.च्या तंत्रज्ञानाची शिक्षण नगरी उभारण्यात येत आहे. त्यामुळे भारताला ए. आय. च्या माध्यमातून मनोरंजन क्षेत्राची जागतिक नेतृत्व करण्याची संधी मिळणार आहे , असे सरकारतर्फे वेव्हज परिषदेदरम्यान सांगितले . आता फिल्म सिटी म्हणजे लोकेशन नाही तर आता फिल्मसिटी म्हणजे टेक्नोलोजी आहे . या माध्यमामुळे वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था दृकश्राव्य माध्यमाची आहे. ती या यंत्रणेमुळे देशाला मिळेल असा विश्वास वाटत आहे. आर्टिफिशल इंटेलिजन्स च्या मदतीने शिक्षणात क्रांती होणार, कारण ए. आय. केवळ तांत्रिक क्षेत्रातच नाही, तर आधुनिक शिक्षण क्षेत्रातही अभूतपूर्व बदल घडवून आणत आहे. जसजशी तांत्रिक प्रगती होत आहे तसतशी ए. आय. शिक्षण क्षेत्रात नवनवीन क्रांती घडवीत आहे. पारंपारिक पद्धती पासून विद्यार्थ्यांना अधिक सुलभ, प्रभावी करीत आहे . ए. आय. च्या मदतीने विद्यार्थ्यांना स्वयंचलित टुरिंगची सुविधा मिळते. अनेक ए. आय. प्लॅटफॉर्म विद्यार्थ्यांना २४ तास मदत करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या कोणत्याही शैक्षणिक शंकाचे निराकरण लगेच मिळते. ए. आय. चलित चॅटबॉटस् विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचे उत्तरे देणे, अभ्यासक्रमाची संबंधित सामग्री समजून सांगणे, त्यामुळे त्यांची प्रगती होत आहे . प्राचीन काळापासून शिक्षणाचा उद्देश फक्त विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम शिकवणे हा नव्हता, तर त्यांना आयुष्यातील विविध पैलूसाठी तयार करणे देखील होता . तो साध्य होण्यासाठी शिक्षण प्रणाली लवचिक सर्व समावेशक आणि विद्यार्थ्यांना वैयक्तिक पातळीवर लक्ष देणारी असावी. ए. आय. च्या मदतीने हे उद्दिष्ट आता अधिक सोपे झालेले आहे. पण शिक्षण प्रक्रियेत शिक्षकाची भूमिका नेहमीच महत्त्वाची राहील असे मला वाटते.

**ए. आय. आणि पाळीव जनावरं-**

पाळीव जनावरांच्या म्हणजेच गाई, म्हशी, शेळी अशा प्रकारच्या मानवाला उपयुक्त असणाऱ्या जनावरांच्या आरोग्यावर लक्ष ठेवण्यासाठी ए. आय. टूलची मदत होवू होऊ शकते. ऑस्ट्रेलियामधल्या 'कॉमनवेल्थ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च ऑर्गनायझेशन (CSIRO)' या संस्थेने 'सिरेस टॅग ( Ceres Tag)' या स्टार्टअपच्या मदतीनं एक छोटंसं उपकरण तयार केल आहे. हे उपकरण म्हणजे एक प्रकारचे ट्रॅकरच आहे. म्हणजे जर हे ट्रकर आपण गाईच्या कानाला लावले तर ती गाय दिवसभरात किती चरते, किती दूध देते. तिच्या शरीरात कोणते बदल होत आहेत का ? किंवा काही खटकाणाऱ्या गोष्टी देखील या ट्रॅकरद्वारे मालकाला समजू शकतात. या ट्रॅकरचा अजून एक उपयोग म्हणजे, जर गाई चरत असताना कुठं हरवल्या किंवा कोणी पळवून नेल्या तरी त्या ट्रॅकर मध्ये बसवलेल्या जीपीएस सिस्टिमच्या मदतीनं त्यांना शोधून काढता येतं. २०१८ साली अमेरिकेतल्या कागल आणि कॅनथस या कंपन्यांनी एकत्र येऊन जनावरांच्या आरोग्याच्या दृष्टीनं काही पावलं उचलली ते म्हणजे पाळीव जनावरांच्या हालचाली वर तसच त्यांच्या खाण्या-पिण्याच्या सवयींवर लक्ष ठेवण्यासाठी फेसं रेकग्निशनचा वापर करणारं सॉफ्टवेअर तयार केल आहे, हे सॉफ्टवेअर दूध उत्पादन, पुनुरुत्पादन आणि जनावरांच्या एकूणच आरोग्याच्या दृष्टीनं निर्णय घ्यायला मदन करतं, अशा प्रकारच्या ए. आय. चा वापर जर पाळीव जनावरांमध्ये

केला तर शेती बरोबरच केला जाणारा जोडधंदा म्हणजे पाळीव प्राण्यांचा व्यवसाय करणे यणि यामुळे होणाऱ्या उत्पन्न वाढीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक क्षमता वाढतील व त्यांच्या गरजा पूर्ण होतील व आपला शेतकरी हा सधन शेतकरी बनेल.

**ए. आय. आणि मच्छीमारी-**

मच्छीमारी करताना समुद्राची परिस्थिती, वादळाची शक्यता, तापमान अशा गोष्टींची जास्त अचूक भाकितं करणं हे ए. आय. च्या मदतीन शक्य होत आहे. ए. आय. च्या मदतीनं मासे कुठे जास्त प्रमाणान याबदद्लचे अंदाज करण जास्त सोपं होईल. पुढच्या काळात समुद्राखाली जाऊन मासे पकडून वर आणणारे ड्रोन्सही तयार होतील. तसेच मच्छीमारी करणाऱ्या बोटी पूर्णपणे ऑटोमेटिक असतील आणि त्या चालवणारे रोबोटच असतील. त्यामुळे आज ज्या ठिकाणी मच्छीमार जाऊ शकत नाहीत , त्या ठिकाणी अशा ऑटोमेटिक बोटी जाऊन मासेमारी करणे शक्य होईल.

**ए. आय. आणि अंतराळ :**

ए. आय. चा जसा प्रत्येक क्षेत्रात उपयोग होतो तसाच अंतराळ क्षेत्रात देखील होत आहे. अंतराळ मोहिमेत अंतराळवीरांना प्रचंड धोक्याचा सामना करावा लागतो. ए. आय. आणि रोबॉट्स यांच्यामुळे आता या मोहिमा बऱ्याच अंशी सोप्या व्हायला मदत मिळते आहे. मोहीम सुरु होताना किंवा ती सुरु असताना यंत्रणेत अचानकपणे कोणताही बिघाड होऊ शकतो. हा बिघाड अनेकदा चटकन लक्षात येण्यासारखाही नसतो. मात्र बारीकसा बिघाड ही मोहीम आणि अंतराळवीरांचा जीव धोक्यात आणू शकतो. हा बिघाड लक्षात आणून देण्यासाठी ए. आय. व्हर्चुअल असिस्टंटची मदत घेतली जाऊ शकले. माणसाला अजूनही जिथं जाणं शक्य झालेलं नाहीये तिथं हे रोबोटस जाऊन संशोधनाला हातभार लावतील. आज अंतराळात पाठवलेले रोव्हर्स पृथ्वीवरून नियंत्रित केले जातात. पण आता ही रोव्हर्स नियंत्रण क्षेत्राच्या पलीकडे जातील आणि स्वतःची कामं स्वतःच करतील, नमुने गोळा, करण, ग्रहावर फेरफटका मारून त्या ग्रहाची माहिती मिळवणं, कधी परतायचं हा निर्णय घेणं वगेरे कामं हे रोव्हर्स करतील.

**ए. आय. चा समाजावर होणारा परिणाम :**

व्यवसाय आणि सामाजिक कृत्रिम बुद्धिमत्तेची ए. आय. जलद प्रगती वाढत्या प्रमाणात वाढ यामुळे नोकऱ्यांच्या भविष्यावर आणि समाजाच्या भविष्यावर मोठा परिणाम होईल. ए. आय. अनेकांना कामावरून काढून टाकेल आणि 'निरुपयोगी वर्ग' निर्माण करेल. ए. आय. तंत्रज्ञानाचा जलद विकास (उदा; डीप लर्निंग, मशीन व्हिजन) आणि आश्चर्यकारकपणे शक्तीशाली जनरेटिव्ह ए. आय., जसे की चॅटजीपीटी आणि क्लॉड यांनी जगाला धक्का दिला आहे. जनरेटिव्ह ए. आय. ही एक शक्तिशाली मशीन लर्निंग आहे, जी प्रशिक्षण डेटा मधून नवीन डेटा/ सामग्री तयार करते. ए. आय. च्या जलद विकासामुळे कायदेशीर आणि नैतिक चिंतांची मालकी निर्माण होत आहे. ए. आय. च्या परिचय आणि वापर यामुळे लोकांच्या नोकऱ्या गमावू शकतात. ज्यामुळे सामाजिक अस्थिरता निर्माण होऊ शकते. आरोग्य सेवेत, स्वायत्त रोबोटीक उपकरणाच्या वापरामुळे नैतिकता आणि विश्वासाबद्दल लक्षणीय चिंता निर्माण झाल्या आहेत. ए. आय. च्या चॅटजीपीटी यासारख्या टूल्सच्या माध्यमाने मोबाईलद्वारे ठराविक कोडींगचा, कंडीशनचा वापर करून आपल्याला हवे तसे फोटो तयार करतात. त्या फोटोमध्ये आपल्याला हवे त्या गोष्टी आपण त्यात समाविष्ट करू शकतो. तसेच नको असलेल्या गोष्टी देखील काढून टाकता येतात. तसेच एखादा नवीन चेहरा या टूलद्वारे तयार करता येतो व या अशा चेहरांचा वापर करून लोकांची फसवणूक केली जाते तसेच हनी ट्रप सारख्या गोष्टी देखील ए. आय. टूल्सचा वापर करून केल्या जातात. त्यामुळे लोकांना काळजी आहे की ए. आय. मानवी शरीर, शारीरिक आणि मानसिक अखंडतेला हानी पोहोचवू शकते आणि मानवी स्वायत्ता कमी होऊ शकते

ए. आय.चा वापर करून सायबर गुन्ह्यांमध्ये देखील प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे.

**फिशिंग हल्ले –**

ए. आय. वापरून वास्तववादी ईमेल तयार करणे व त्याद्वारे मोठमोठ्या कंपनीचा डेटा चोरला जातो व दुसऱ्या संस्थांना व्यवसायिकांना किंवा स्वतःच्या गरजेसाठी त्याचा गैरवापर केला जातो

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**मालवेअर तयार करणे -**

ए. आय.वापरून अत्याधुनिक मालवेअर तयार केले जाते. मालवेअर म्हणजे संगणकाला हानी पोहोचवण्यासाठी किंवा त्याचे कार्य बिघडण्यासाठी तयार केलेले दुर्भावनापूर्ण सॉफ्टवेअर यामध्ये तुमच्या नकळत माहिती चोरणारे सॉफ्टवेअर म्हणजे (SPYWARE) स्पायवेअर तुमचा डेटा ब्लॉक करून खंडणी (RANSOM) मागणारे सॉफ्टवेअर म्हणजे रॅन्समवेअर असे प्रकार येतात.

**पासवर्ड क्रॅकिंग –**

ए. आय. वापरून पासवर्ड जलद क्रॅक केला जातो. यामुळे आपल्या बँक खात्याची, डेटा विक्रीची, व्यक्तिगत माहितीची फसवणूक केली जाऊ शकते.

**ओळखीच्या व्यक्तींच्या आवाजात पैसे मागणे -**

ए. आय. चा वापर करून आपल्याला हवे त्या आवाजात बोलता येणे किंवा आवाज काढू शकतो याचा गैरवापर करून पैशाची फसवणूक केली जाते. ए. आय.च्या गैरवापरामुळे समाजावर अनिष्ट परिणाम होतात. ए. आय. च्या उल्लेखनीय कार्याचा आणि वैशिष्ट्यांचा गैरवापर करत असल्यामुळे चुकीची माहिती पसरण्यासाठी कंटेंट जनरेटरचा वापर केला जाऊ शकतो. अनेक उद्योगांमध्ये अशी भीती आहे की ए. आय. अखेरीस अनेक मानवी नोकऱ्यांची जागा घेऊ शकते, कारण ते मानवी कर्तव्य खूप जलद आणि अधिक कार्यक्षम पार पाडू शकते. त्यामुळे अनेक लोक नोकरी गमवू शकतात. मानवी गोपनीयतेमध्ये अडथळे निर्माण होत आहेत. तरुण पिढी ए. आय. चा गैरवापराकडे वळत असल्यामुळे गुन्हेगारी वृत्तीकडे वळत आहेत. ए. आय. नैतिक आणि सामाजिक कोंडी निर्माण करू शकते, ज्यासाठी काळजीपूर्वक नियमन आणि देखरेख आवश्यक आहे. उदाहरणार्थ ए. आय. सुरक्षा गोपनीयता, पक्षपात, जबाबदारी, मानवी प्रतिष्ठा इत्यादी. ए. आय. प्रणाली आणि नेटवर्कची जटिलता आणि असुरक्षितता वाढवू शकते.
होतील.

**निष्कर्ष-**

ए. आय.द्वारा संगणकीय शक्तीचा विस्तार माहिती, स्मार्ट सिटी तंत्रज्ञानाद्वारे जोडलेले जीवन - ए. आय. द्वारे चालना संसाधनांचा अधिक गतिमान वापर, वाढीव कार्यक्षमता आणि उच्च राहणीमान यासह अनेक संभाव्य फायद्यांचे आश्वासन देते.

**संदर्भ**

1. आर्टिफिशियल इंटेलिजन्स – अच्युत गोडबोले (बुकगंगा प्रकाशन )
2. सायबर अॅटॅक - डॉ. संजय तुंगार ,सुधीर साबळे (राजहंस प्रकाशन )
3. इंटरनेट वेबसाईट – लिंक
4. विकिपीडिया

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि ज्ञानाचे जागतिकीकरण

**डॉ.सविता सुनील केंजळे**
मराठी विभाग प्रमुख. दादासाहेब जोतीराम गोडसे
आर्ट्स,कॉमर्स , सायन्स कॉलेज वडूज
**Email**-sskenjle@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170819
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 8(I)
Pp. 83-85
August 2025

**Submitted:** 12 July. 2025
**Revised:** 27 July. 2025
**Accepted:** 12 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**सारांश**

आंतरराष्ट्रीय शिक्षण हे विविध देशांच्या शिक्षण पद्धती, संस्कृती आणि मूल्यांच्या देवाणघेवाणीद्वारे विद्यार्थ्यांना जागतिक दृष्टिकोन, समस्या सोडवण्याची क्षमता आणि सांस्कृतिक समज विकसित करण्याची प्रक्रिया आहे. यात विदेश शिक्षण, शिक्षक-विद्यार्थी अदलाबदल, बहुभाषिकता, जागतिक समस्या समावेश आणि ऑनलाईन शिक्षण या घटकांचा समावेश होतो. ज्ञानाचे जागतिकीकरण हे माहिती, तंत्रज्ञान आणि संशोधनाचा जागतिक प्रवाह सुलभ करून सर्वांसाठी ज्ञान उपलब्ध करून देते. यामुळे उत्तम शिक्षण, कौशल्यविकास, नोकरीच्या संधी आणि सांस्कृतिक समज वाढते. तथापि, शिक्षणाचे बाजारीकरण, शैक्षणिक विषमता, स्थानिक संस्कृतीचा ऱ्हास आणि बुद्धिमत्तेचे पलायन ही आव्हाने आहेत. भारतीय शिक्षणात यामुळे आधुनिक अभ्यासक्रम, आंतरराष्ट्रीय विद्यापीठांची उपस्थिती, कौशल्यविकास आणि ई-लर्निंगचा प्रसार वाढला आहे. या प्रक्रियेचा योग्य वापर केल्यास शिक्षणाचा दर्जा व स्पर्धात्मकता सुधारता येईल.

**कीवर्ड्स** –आंतरराष्ट्रीय शिक्षण, ज्ञानाचे जागतिकीकरण, जागतिक दृष्टिकोन, सांस्कृतिक समज, ऑनलाईन शिक्षण, कौशल्य विकास, शैक्षणिक विषमता, शिक्षणाचे बाजारीकरण, भारतीय शिक्षण.

**प्रस्तावना**

आंतरराष्ट्रीय शिक्षण म्हणजे विविध शिक्षण पद्धती आणि शिक्षक यांच्यातील देवाणघेवाण. शिक्षण संस्थांमधील एकमेकांना सहकार्य. शिष्यवृत्ती योजना परदेशी शिक्षणक्रम. तसेच आंतरराष्ट्रीय शिक्षण म्हणजे वेगवेगळ्या देशातील शिक्षण पद्धती. मूल्य ज्ञान आणि संस्कृती यांचे एकत्रिकरण होणे यामध्ये विद्यार्थी शिक्षक आणि शैक्षणिक संस्था जागतिक पातळीवर शिकण्याच्या शिकविण्याच्या आणि सहकार्याच्या प्रतिक्रियेत प्रक्रिये सामील होतात. आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण म्हणजे जागतिक स्तरावर स्वीकारल्या गेलेल्या मानांकनुसार दिले जाणारे शिक्षण .यात विद्यार्थ्यांना केवळ ज्ञानाचा पुरवठा करण्यास नाही तर यात विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर विचार करण्याची समस्या सोडवण्याची आणि विविध संस्कृतीची जुळवून घेण्याची क्षमता विकसित करणे.

**आंतरराष्ट्रीय शिक्षणाचे मुख्य घटक**

1) विदेश शिक्षण- इतर देशांमध्ये जाऊन शिक्षण घेणे उदाहरणार्थ इंग्लंड अमेरिका ऑस्ट्रेलिया
2) विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे अदलाबदल कार्यक्रम.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17115512
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*डॉ.सविता सुनील केंजळे , मराठी विभाग प्रमुख. दादासाहेब जोतीराम गोडसे आर्ट्स ,कॉमर्स , सायन्स कॉलेज वडूज*

**How to cite this article:**
*केंजळे, . सविता . सुनील . (2025). आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि ज्ञानाचे जागतिकीकरण. Journal of Research & Development, 17(8(I)), 83–85.* https://doi.org/10.5281/zenodo.17115512

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

3) बहुभाषिकता आणि सांस्कृतिक समावेश- वेगवेगळया देशांच्या भाषा संस्कृती आणि जीवनशैली यांचा अभ्यास.

4)जागतिक समस्या आणि मूल्यांचा समावेश शांतता पर्यावरण मानवी हक्क जागतिक गरिबी यासारख्या मुद्द्यांवर शिक्षण.

5) ऑफ ऑनलाईन आणि दूर शिक्षण -विविध देशातील कोर्सेस ऑनलाइन पद्धतीने पूर्ण करणे.

आंतरराष्ट्रीय शिक्षणामुळे विविध देशांची माहिती संस्कृती व विचारसरणी शिकवली जाते. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, जपानी यासारख्या आंतरराष्ट्रीय भाषा शिकवल्या जातात. एका देशातील विद्यार्थी किंवा शिक्षक दुसऱ्या देशात जाऊ शकतात किंवा शिकवतात. दोन किंवा अधिक देशातील संस्था मिळून अभ्यासक्रम चालवतात शिवाय विविध देशांच्या संस्कृती आचारधर्म इतिहास आणि जीवनशैली यांचे आकलन होते. त्यामुळे जागतिक रोजगाराच्या संधी वाढतात. विविध संस्कृतीचा सन्मान करायला शिकतात . आजचा काळ हा विज्ञान तंत्रज्ञान आणि माहितीचा आहे .जागतिकीकरणामुळे जग एक ग्लोबल व्हिलेज झाले आहे .आजच्या जगात आंतरराष्ट्रीय शिक्षणांनी ज्ञानाचे जागतिकीकरण हे दोन अविभाज्य घटक बनले आहे जे एकमेकांवर खोलवर परिणाम करतात .जागतिकीकरणामुळे शिक्षण क्षेत्रात अबूतपूर्व बदल झाले आहेत आणि ज्ञानाची निर्मिती प्रसारआणि उपयोजन हे जागतिक स्तरावर होत आहे. या शोधनिबंधात या संकल्पनेचा सखोल अभ्यास आपण करणार आहोत त्याचे फायदे तोटे विचारात घेणार आहोत आणि भारतीय शिक्षणावर होणाऱ्या परिणामाचे विश्लेषण करणार आहोत . आंतरराष्ट्रीय शिक्षण ही एक गतिशील संकल्पना आहे ज्यामध्ये राजकीय आणि सांस्कृतिक सीमा ओलांडून लोक विचार आणि कल्पनांचा प्रवास देवाणघेवाण याचा समावेश झालेला असतो .केवळ परदेशात शिक्षण घेणे म्हणजे आंतरराष्ट्रीय शिक्षण नाही तर त्यामध्ये जागतिक दृष्टिकोन विकसित करणे विविध संस्कृती बद्दल समजून घेणे आणि जागतिक नागरिक बनणे अपेक्षित आहे .ज्ञानाची जागतिकीकरण एक व्यापक दृष्टिकोन ज्ञानाच्या जागतिकीकरण म्हणजे जगभरातील कल्पना माहिती तंत्रज्ञान आणि संशोधन याचा मुक्त प्रवाह आणि विस्तार. याचा अर्थ असा की ज्ञान विशिष्ट देशाच्या किंवा संस्थेच्या मालकीचे राहिलेले नाही तर ते जागतिक स्तरावर सहज उपलब्ध आहे.माहिती तंत्रज्ञानातील क्रांती इंटरनेट प्रसार आणि दळणवळणातील सुलभता यामुळे हे जागतिकीकरण शक्य झाले आहे.

**ज्ञानाच्या जागतिकीकरणाचे प्रमुख घटक**

1)माहितीचा मुक्त प्रवाह -इंटरनेट सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे माहिती आणि ज्ञान जगभरात वेगाने पसरत.

2) संशोधनांनी विकास मधील आंतरराष्ट्रीय सहकार्य विविध देशातील संशोधकाने संस्था एकत्र येऊन जागतिक स्तरावर उपाय शोधतात

3) शैक्षणिक संस्थांची उपलब्धता ऑनलाईन लायब्ररी, मुक्त शिक्षण संसाधने ,आणि ई पुस्तकामुळे जगभरातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या शैक्षणिक सामग्री मध्ये प्रवेश मिळतो.

4)बौद्धिक संपदा- ज्ञानाची जागतिकीकरण होत असताना बौद्धिक संपदा अधिकाराचे संरक्षण करणे एक आव्हान बनते ज्ञानाच्या जागतिकीकरणामुळे विविध संस्कृतीमधील ज्ञानाची आणि दृष्टिकोनाची देवाण-घेवाण होते. ज्यामुळे समग्र शिक्षणा अनुभव अस मिळते .

**आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि ज्ञानाच्या जागतिकीकरणाचे फायदे** –आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि ज्ञानाच्या जागतिकीकरणाचे अनेक सकारात्मक फायदे दिसून येतात .

1) उत्तम दर्जाचे शिक्षण जागतिकीकरणामुळे उच्च दर्जाच्या शिक्षण संस्था आणि आधुनिक अभ्यासक्रमामुळे प्रवेश मिळतो ज्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता सुधारते .

2)आधुनिक तंत्रज्ञान आणि कौशल्य विद्यार्थ्यांना नवीन नवीन तंत्रज्ञान यातील बाजारपेठेसाठी जागतिक बाजारपेठेसाठी आवश्यक असतील ती कौशल्याचे ज्ञान मिळते .

3) नोकरीच्या संधीमध्ये वाढ जागतिक स्तरावर शिक्षण घेतल्याने विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरीच्या उत्तम संधी उपलब्ध आहेत.

4)सांस्कृतिक समज व विश्वबंधुत्व विविध संस्कृती आणि पार्श्वभूमीच्या लोकांशी संवाद साधल्याने विद्यार्थ्यांमध्ये सहिष्णु तथा व सहानभूती आणि विश्वबंधुत्वाची भावना वाढते.

5) संशोधनाला चालना मिळते .

**आव्हाने व तोटे-**

शिक्षणाचे बाजारीकरण शिक्षण एक व्यापारी वस्तू बनवू शकते त्यामुळे गरिबांनी वंचित विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागते .गुणवत्तेचा प्रश्न काही परदेशी शिक्षण संस्था गुणवत्ता राबवणार तपासणारी यंत्रणा नसल्यामुळे त्यांच्या शिक्षण दर्जाबद्दल प्रश्नचिन्ह उभे राहते .शैक्षणिक विषमता आढळते .आर्थिक दृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शिक्षणाचा खर्च परवडत नाही त्यामुळे शैक्षणिक विषमता वाढते .पाश्यात्त्यसंस्कृतीचा पगडा वाढल्यामुळे स्थानिक संस्कृती आणि मूल्यांचा ऱ्हास होण्याची भीती वाटते. उच्च शिक्षणासाठी गेलेले विद्यार्थी त्याच देशात स्थायिक होतात त्यामुळे बुद्धिमत्तेचे पलायन होते.

**जागतिकीकरणाचा भारतीय शिक्षणावर होणारा परिणाम -**

1)आधुनिक अभ्यासक्रमाचे स्वीकार भारतीय शिक्षण संस्थांनी जागतिक मानांकनुसार अभ्यासक्रमात बदल केले आहेत.

2) उच्च शिक्षण संस्थांची वाढ अनेक आंतरराष्ट्रीय विद्यापीठे भारतात आपले कॅम्पस उघडत आहेत त्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना परदेशात आंतरराष्ट्रीय शिक्षण स्वदेशातही आंतरराष्ट्रीय शिक्षण घेता येते

3)कौशल्य विकासावर भर जागतिक बाजारपेठेच्या मागणीनुसार कौशल्य विकासावर अधिक लक्ष दिले जात आहे जसे की आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डेटा सायन्स

4) ऑनलाईन शिक्षण आणि ई लर्निंग प्लॅटफॉर्म चा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे

**निष्कर्ष –**

आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि ज्ञानाचे जागतिकीकरण हे एक द्विमितीय प्रक्रिया आहे ज्याचे फायदे आणि तोटे दोन्ही आहेत .त्यामुळे जगात विविध संस्कृतींना एकत्र येण्याची ज्ञान कौशल्याची देवाण-घेवाण करण्याची आणि जागतिक समस्यावर एकत्रितपणे तोडगा काढण्याची संधी मिळते .त्याचबरोबर या प्रक्रियेमुळे उद्भवणाऱ्या आव्हानांवर मात करण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे .जेणेकरून शिक्षणाचे बाजारीकरण टाळता येईल आणि सर्वांना समान संधी उपलब्ध होतील. भारतासारख्या विकसनशील देशासाठी ज्ञानाच्या जागतिकीकरणाचा योग्य वापर करून शिक्षणाचा दर्जा सुधारणे आणि युवकांना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी महत्त्वाचे आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# “ जलसाधन संपत्ती आणि जलव्यवस्थापन- एक अभ्यास”

**सुदाम नानासो खाडे**
भूगोल विभाग प्रमुख, दादासाहेब जोतीराम गोडसे,
आर्ट्स, कॉमर्स, सायन्स कॉलेज, वडूज,ता. खटाव.जि.सातारा
**Email:-** sudamkhade68@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170820
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 8(I)
Pp. 86-90
August 2025

**Submitted:** 12 July. 2025
**Revised:** 27 July. 2025
**Accepted:** 12 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**सारांश**

मध्ययुगीन काळातील धर्मव्यवस्थेतील एक क्रांतिकारी चळवळ म्हणुन भक्ती चळवळीकडे बघितले जाते. या चळवळीने धार्मिक अनिष्ठ परंपरेचा विरोध करून त्यामध्ये क्रांतिकारक बदल घडवून आणण्यात मोलाचे योगदान दिले. हे सर्व घडवून आणत असताना विविध मार्गांचा, विविध तत्वांचा वापर करण्यात आला होता. या सर्वांचा उद्देश सामाजिक - धार्मिक सुधारणा घडवून आणणे हा जरी असला तरी यातून मानसिक आरोग्य किंवा मानसिक सुधारणा घडवून आणणे ही एक बाब प्रकर्षाने जाणवते. लोकांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे, त्यांना वर्तमानात राहण्यासाठी प्रेरित करणे तसेच आनंदीमय जीवन जगण्याचा मार्ग दाखविणे या गोष्टी या चळवळीच्या माध्यमातून मांडण्यात आल्याचे दिसून येते. या गोष्टीवर सूक्ष्मपणे विचार केल्यास याचा संबंध थेट प्राचीन भारतातील बौद्ध परंपरेतील सति या संकल्पनेशी जोडता येऊ शकतो. ज्याला आधुनिक काळात माईंडफूलनेस असेही म्हटले जात आहे. भारतीय ज्ञान परंपरेतील माईंडफूलनेस ही भारताने जगाला दिलेली उत्तम देणगी आहे. माईंडफूलनेस हे वर्तमानात उपस्थित राहण्याचे शास्त्र आहे. माईंडफूलनेसच्या माध्यमातून सकारात्मक दृष्टिकोन, आत्मविश्वास विकसित होण्यास मदत होते. तसेच आनंदीमय जीवन जगण्याचा मार्ग उपलब्ध होतो. तसें पाहता आपणास माईंडफूलनेस हे तत्व विविध रूपात सर्व धर्मात प्रचलित असल्याचे दिसून येते. उदा. भगवद्गीतेत श्रीकृष्ण अर्जुनाला 'स्थितप्रज्ञ' होण्याचा सल्ला देतात, म्हणजेच मानसिक समत्व आणि सजगता जपणे. तसेच इस्लाममध्ये "तक़्वा" म्हणजे अल्लाहची सजगता, म्हणजेच प्रत्येक कृतीत त्याची उपस्थिती जाणवणे.अशाप्रकारे प्रत्येक धर्मात आपणास माईंडफूलनेस पहावयास मिळते. अगदी तसेच भक्ती चळवळीमध्ये सुद्धा ही तत्वे दिसून येतात.

**मुख्यसंज्ञा :** माईंडफूलनेस, भक्ती चळवळ, सति संकल्पना, वर्तमानात उपस्थित राहणे, मनःशांती, तक़्वा, स्थितीप्रज्ञ

**प्रास्ताविक**

इतिहास लेखन करत असताना कायमच नवनवीन प्रवाह, नवनवीन विचार समोर येत असतात. त्यापैकी इतिहास लेखनात भारतीय ज्ञान प्रणालीचा प्रसार करण्याच्या हेतूने नवीन विचार मांडले जात आहेत. भारतीय ज्ञान परंपरेतील माईंडफूलनेस ही संकल्पना जगाला मिळालेली एक देणगी आहे. माईंडफुलनेस या संकल्पनेचा उदय व विकास बौद्ध परंपरेत झाला असल्याचे मानले जात असले तरी याची मुळे भारतातील सर्व धर्मामध्ये तसेच पंथामध्ये पहायला मिळतात. त्याच दृष्टीने मध्ययुगातील विशेषतः महाराष्ट्रातील भक्ती चळवळीकडे बघितले असता आपल्या असे लक्षात येते की माईंडफूलनेसची तत्वे, सार, लक्षणे ही या चळवळीत सुद्धा पहायला मिळतात. विविध अभंगातून, भारूडातून, नामस्मरणातुन भक्ती शिकवण देत असताना माईंडफूलनेसच्या तत्वांचाही प्रसार होत असल्याचे दिसून येते.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17115769

OPEN ACCESS

**Address for correspondence:**

*सूरज संजय पडळकर , कला व वाणिज्य महाविद्यालय, मायणी ता. खटाव जि. सातारा महाराष्ट्र*

**How to cite this article:**

*पडळकर, . सूरज . संजय . (2025). भक्ती चळवळ आणि माइंडफुलनेस. Journal of Research & Development, 17(8(I)), 101–104.* https://doi.org/10.5281/zenodo.17115769

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

कृष्णा शर्मा Bhakti and the Bhakti Movement: A New Perspective या पुस्तकात लिहितात की, “Through naam-smaran and kirtan, the bhaktas cultivated a state of sustained attention — a form of ‘spiritual mindfulness’ deeply rooted in Indian tradition.” त्यांचे हे मत यथार्थ असल्याचे आपणास भक्ती चळवळीतील संतांच्या विविध अभंगातून, कीर्तनातून दिसून येते. उदा.

"नाम घेतले मने एकाग्र |गेल्या वासनांचे सागर ||"

या संत नामदेव यांच्या अभंगातून नामस्मरण हे मन एकाग्र करण्याचे साधन असल्याचे सांगण्यात आले आहे. जे की माईंडफूलनेसचे एक लक्षण आहे. अशाप्रकारे भक्ती चळवळीतील संत साहित्याच्या माध्यमातून आपणास माईंडफूलनेसची लक्षणे ही भक्ती चळवळीतही उपस्थित असल्याचे दिसून येते.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. मध्ययुगातील विशेषतः महाराष्ट्रातील भक्ती चळवळीतील माईंडफूलनेस संकल्पनेचा अभ्यास करणे.
2. भक्ती चळवळीतील मानसिक स्थैर्यतेला चालना देणाऱ्या माईंडफूलनेसचा शोध घेणे.
3. महाराष्ट्रातील भक्ती चळवळीतील माईंडफूलनेस संबंधित विचारांचे विश्लेषण करणे.

**संशोधन पद्धती :**

संशोधकाने प्रस्तुत संशोधन लेख लिहिण्यासाठी ग्रंथालयीन पद्धतीचा वापर अधिक प्रमाणात केलेला आहे. ऐतिहासिक पद्धतीबरोबरच विश्लेषणात्मक पद्धती आणि अनेक दुय्यम साधनांचाही वापर या संशोधन लेखाच्या अनुषंगाने केलेला आहे. तसेच संकेतस्थळावरील लेख आणि तज्ञांची मते विचारात घेऊन भक्ती चळवळीतील माईंडफूलनेस मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**भक्ती चळवळ :**

भक्ती संकल्पनेची बीजे वेदांमध्ये आढळतात. परंतु वैदिक कालखंडात ती फारशी फोफावली नव्हती. सगुण ईश्वराच्या भक्तीची प्रथा बौद्ध धर्माच्या लोकप्रियतेबरोबर वाढली असावी. असे मत सतीश चंद्र यांनी मांडले आहे. भक्ती योगाचा खरा विकास इ. स. सातव्या ते बाराव्या शतकात दक्षिण भारतात झाला. शैव पंथाच्या नयनार व वैष्णव पंथाच्या अलवार भक्तांनी ईश्वराच्या सगुण भक्तीचा प्रचार केला. ही चळवळ इ. स. 13 व्या शतकापासून महाराष्ट्रात विस्तार पावू लागली. महाराष्ट्रातील भक्ती चळवळीच्या विकासामध्ये संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम हे प्रमुख संत होते. या चळवळीची प्रमुख वैशिष्ट्ये ही धार्मिक सुधारणा, भक्ती मार्गाने मोक्ष प्राप्ती, जातीभेदास विरोध, स्त्री-पुरुष समानता इ. होती. थोडक्यात सामाजिक-धार्मिक वैशिष्ट्ये असलेली ही चळवळ मध्ययुगीन कालखंडात लोकप्रिय होती.

**माईंडफूलनेस :**

माईंडफूलनेस म्हणजेच साक्षीभावाने जागृतपणे वर्तमान क्षणात उपस्थित असणे. ही संकल्पना आधुनिक मानसशास्त्रात प्रसिद्ध झाली असली तरी तिची मुळे वैदिक साहित्यामध्ये खोलवर रुजलेली आहेत. ऋग्वेद, उपनिषद, आणि भगवद्गीता यांसारख्या ग्रंथांमध्ये माइंडफुलनेसची संकल्पना “ध्यान”, “स्मृति”, “चैतन्य”, “एकाग्रता”, “विवेक” अशा विविध संज्ञांमध्ये आढळते. परंतु यास विकसित रुप हे बौद्ध काळात )सुमारे इ. स. पु. 500 ते इ. स. पु. 200) प्राप्त झाले. पाली संहितांमधील “सति” म्हणजेच माइंडफुलनेस होय. हे बौद्ध परंपरेतील ध्यानमार्गाचे मुख्य तत्त्व होते. नंतरच्या काळात योगदर्शनामध्ये माईंडफूलनेसचा अंतर्भाव झाल्याचे दिसून येते. आधुनिक काळात मानसशास्त्र आणि वैद्यकीय क्षेत्रात माईंडफूलनेसचा उपयोग केला जात आहे.

**भक्ती चळवळीतील माईंडफूलनेस संबंधित विचारांचे विश्लेषण**

भक्ती चळवळ ही सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळ असल्याचे मानले जात असले तरी भक्ती चळवळीतुन आधुनिक मानसशास्त्रात वापरात असलेल्या माईंडफूलनेस या संकल्पनेचा प्रसार नामस्मरण, अभंग, ओवी, भारूडे यांच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न केल्याचे संत साहित्यातून दिसून येते. विविध संतांच्या अभंगातून माईंडफुनेसची विविध तत्वे किंवा लक्षणे आणि ती साध्य करण्यासाठी सांगितलेले मार्ग मांडण्यात आले आहेत. वर्तमान स्थितीत उपस्थित राहणे, विचार आणि भावनांचा स्वीकार करणे, कृतज्ञता, शरीराप्रती जागरूकता, ध्यान आणि एकाग्रता, सहानुभूती इ. माईंडफूलनेसची मुख्य तत्वे आहेत. भक्ती चळवळीतील संतांच्या कमिगिरीतून ही तत्वे स्पष्टपणे दिसतात. ती पुढीलप्रमाणे

**१. नामस्मरण**

नामस्मरण हा भक्ती करण्याचा उत्तम मार्ग असल्याचे भक्ती चळवळीच्या माध्यमातून मांडण्यात आले आहे. त्यांनी नामस्मरणाच्या माध्यमातून सतत जागरूक राहण्याचा सल्ला दिलेला आहे. जागरूक राहणे म्हणजेच माईंडफूलनेस होय. तसेच चित्त म्हणजेच मन शुद्ध करण्यासाठी या पद्धतीचा उपयोग होईल असेही मांडण्याचा प्रयत्न केला आहे. माईंडफूलनेसचे जागरूक राहण्याचे जे तत्व आहे ते नामस्मरणाच्या माध्यमातून मांडण्यात आले आहे. जागरूक राहण्यासाठी माईंडफूलनेसच्या सरावात एका विशिष्ट गोष्टीवर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले जाते अगदी तसेच भक्ती चळवळीत नामावर लक्ष केंद्रित करून जागरूक अवस्थेत राहण्याचा मार्ग सांगितला आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

एक तटस्थ मानसीं । एक सहज चि आळसी ॥१॥
दोन्ही दिसती सारिखीं । वर्म जाणे तो पारखी ॥ध्रु.॥
एक ध्यानीं करिती जप । एक बैसुनि घेती झोप ॥२॥
एकां सर्वस्वाचा त्याग। एकां पोटासाठीं जोग ॥३॥
एकां भक्ति पोटासाठीं । एकां देवासवें गांठी ॥४॥
वर्म पोटीं एका । फळें दोन सांगे तुका ॥५॥

या संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून नामस्मरण करणारा व नामस्मरण न करणारा यांची तुलना केली आहे. म्हणजेच माईंडफूल असणारा आणि कोणतेही नियंत्रण नसणारा व्यक्ती यांची तुलना या ठिकाणी केलेली आहे. यावरून नामस्मरण म्हणजेच माईंडफूल राहणे हे या अभंगातून स्पष्ट होते. तसेच माईंडफूल राहिल्याने मानसिक दृष्ट्या सकारात्मक परिणाम दिसून येतील असे ही या ठिकाणी स्पष्ट केले आहे.

२. **सहानुभूती**

जे का रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपुलें ॥१॥
तो चि साधु ओळखावा । देव तेथें चि जाणावा ॥२॥

या संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून इतरांप्रति सहानुभूतीची भावना असावी असा संदेश देण्यात आला आहे. माईंडफूलनेसच्या तत्वांचा विचार केला असता त्यामध्ये ही सहानुभूतीचे तत्व आहे. थोडक्यात इतरांच्या सोबत व्यवहार करत असताना जागरूक असल्याने त्यांच्या प्रती सहानुभूतीची भावना विकसित होते.

३. **स्व ओळख / आत्म निरीक्षण**

माईंडफूलनेसचे एक मूळ तत्व म्हणुन स्व ओळख किंवा आत्म निरीक्षण याकडे बघितले जाते. स्वतःकडे असणाऱ्या गोष्टींचा शोध घेणे यासाठी माईंडफूलनेस मध्ये विविध तंत्रांचा वापर केला जातो. उदा. ध्यान माईंडफूलनेसच्या या तत्वाचा प्रसार संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील "तुज आहे तुजपाशी, परि तु जागा चुकलासी" या वाक्यातून होत असल्याचे दिसून येते. स्वतःच्या सुप्त गुणांची जाणीव होण्यासाठी आत्म निरीक्षण फार गरजेचे असते. बाहेरील गोष्टींमध्ये स्वतःला न शोधता स्वतःच्या आतमध्ये स्वतःला शोधले पाहिजे असा संदेश यामधून मांडण्यात आला आहे.

४. **एकाग्रता**

भक्ती चळवळीच्या प्रमुख वैशिष्ट्यापैकी एक असणारे म्हणजे एकाग्रपणे, पूर्ण चित्ताने ईश्वराची उपासना किंवा भक्ती करणे होय. जोपर्यंत आपले चित्त एकाग्र होत नाही तोपर्यंत आपण एखादे ध्येय साध्य करू शकत नाही. म्हणूनच एकाग्रतेचे असणारे महत्व विविध अभंगांच्या माध्यमातुन संतांनी सांगण्याचा प्रयत्न केला आहे. अगदी तसेच माईंडफूलनेसचा सराव करताना मन किंवा चित्त एकाग्र करण्याच्या दृष्टीने अनेक उपाय किंवा तंत्र सांगितली आहेत.

गुंतला भ्रमर कमळिणी-कोशी । आदरे आमोदासी सेवितसे ।
तैसे राम-नामी लागता ध्यान । मन उन्मन होय जाण ।
एका जनार्दनी राम परिपूर्ण । प्रपंच परमार्थ रामचि जाण ।

या संत एकनाथ यांच्या अभंगातून मन एकाग्र करण्यासाठी नामाचा आधार घ्यावा असा संदेश दिला आहे.

५. **कृतज्ञता**

कृतज्ञ राहण्यासाठी आपणास सर्व प्रथम जागरूक रहावे लागते. जागरूकतेच्या अभावामध्ये कृतज्ञतेचा भाव विकसित होत नाही. ही जागरूकता निर्माण करण्यासाठी माईंडफूलनेसचा उपयोग होतो. माईंडफूलनेसचा सराव करताना आपल्याकडे असणाऱ्या गोष्टींप्रति कृतज्ञ राहण्याचा देखील सराव केला जातो. कृतज्ञतेचा भाव भक्ती चळवळीतील संतांनी आपल्या अभंगातून, ओवीतून, कीर्तनातून वेळोवेळी व्यक्त केल्याचे दिसून येते.

६. **समर्पण**

वेदयुक्त मंत्र जपता घडे पाप । मी मी म्हणोनि संकल्प उठतसे ।
यज्ञादिक कर्म घडता सांग । मी मी संसर्ग होता वाया ।
एका जनार्दनी मीपणा टाकून । करी कृष्णार्पण सर्व फळ ।

या संत एकनाथ यांच्या अभंगातून मीपणाचा त्याग करून केलेल्या सर्व कर्माची फळे श्रीकृष्ण नारायणाला श्रध्देने अर्पण करावी. अशाप्रकारची समर्पणाची भावना व्यक्त केली आहे. माईंडफूलनेसचा सराव करत असतानाही अहं भावनेचा त्याग केला जातो. एक तटस्थ दृष्टिकोन, साक्षीभावाचा दृष्टिकोन अवलंबिला जातो.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**७. मनावर नियंत्रण**

माईंडफूलनेस आणि भक्ती संतांच्या शिकवणीतील सर्वात महत्त्वपूर्ण असणारी गोष्ट म्हणजे मानसिक नियंत्रण ही आहे.

मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचें कारण ।
मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ॥१॥

या संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून माईंडफूलनेस संबंधित असणारी मनाची अवस्था मांडली आहे. मन एकाग्र, स्थिर, प्रसन्न असले तर कार्यक्षमता वाढते आणि कार्य सिद्धिस जाण्याची शक्यता वाढते. मनावर नियंत्रण मिळविण्यासाठी माईंडफूलनेसचा सराव अत्यंत आवश्यक ठरतो. मनावर नियंत्रण मिळविणे, इंद्रियांवर ताबा मिळविणे याला अध्यात्मामध्ये, भक्ती चळवळीच्या संतांच्या शिकवणींमध्ये आणि माईंडफूलनेस संकल्पनेमध्ये अनन्य साधारण महत्व आहे.

**निष्कर्ष :**

महाराष्ट्रातील भक्ती चळवळ केवळ आध्यात्मिक नव्हे, तर जागरूकतेवर आधारित लोकचळवळ होती. संतवाणीमधून व्यक्त झालेली नामस्मरणाची परंपरा, चिंतन आणि साक्षीभाव हे सर्व माइंडफुलनेसचे तत्वज्ञान समृद्ध करताना दिसतात. आजच्या युगातील मानसिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर हे संतविचार मूलगामी समाधान आणि आत्मचिंतनाची दिशा देतात. भक्ती चळवळीतील संतांच्या विचारातून मानसिक आरोग्य, मानसिक स्थैर्य यांचे महत्व लक्षात येते. त्यांचे हे विचार आधुनिक काळातील माईंडफूलनेस च्या संकल्पनेशी मिळते जुळते असल्याचे त्यांच्या साहित्यातून, कामगिरीतून स्पष्ट होतात.

**संदर्भग्रंथ :**

1. Thera Nyanaponika, The Heart of Buddhist Meditation, Buddhist Publication Society, Sri lanka Page No. 13-25
2. https://jonkabat-zinn.com/mindfulness-in-action/#connections
3. Sharma, Krushna. Bhakti and the Bhakti Movement: A New Perspective, Munshiram Manoharlal Publishers.
4. चंद्र, सतीश. मध्ययुगीन भारत, मराठी अनुवाद, के सागर, प्रकाशन, पृष्ठ क्र. १६० – १६३
5. सिंह, मनोज कुमार. मध्यकालीन संत साहित्य मे समाज और व्यक्ती, आयुष्मान पब्लिकेशन हाऊस.
6. संत ज्ञानेश्वर, ज्ञानेश्वरी
7. जोशी, प्र. म. तुकारामांचे निवडक अभंग, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस.

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025


Original Article

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे आर्थिक,सामाजिकव राजकीय कार्य


**डॉ.मारोती जनार्दन कंधारे[1], विरेंद्र विश्वास आहेर[2]**

कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

लासलगाव ता.निफाड जि.नाशिक

Email-virendraaher@gmail.com



**Manuscript ID:**

JRD -2025-170723

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 8(I)

Pp. 105-109

August 2025

**Submitted:** 14 July. 2025

**Revised:** 30 July. 2025

**Accepted:** 15 Aug 2025

**Published:** 30 Aug. 2025



## सारांश

या संशोधनात महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय कार्याचा अभ्यास करण्यात आला आहे. १९व्या वर्षी राज्यसत्ता हाती घेऊन त्यांनी शिक्षण, सामाजिक न्याय, स्त्री सक्षमीकरण, अस्पृश्यता निवारण, कृषी सुधारणा, सहकार चळवळ, आणि स्थानिक स्वराज्य यांसारख्या क्षेत्रांत ऐतिहासिक सुधारणा केल्या. मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दिलेली शिष्यवृत्ती, सामाजिक कायदे, वसतिगृहे, वाचनालये, ग्रामपंचायती, तसेच "बँक ऑफ बडोदा" ची स्थापना ही त्यांच्या कार्याची प्रमुख वैशिष्ट्ये ठरली. कृषी व सहकार क्षेत्रातील योगदानामुळे त्यांना "शेती राजा" म्हणून ओळख मिळाली. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण प्रशासनामुळे बडोदा संस्थान आधुनिकतेच्या मार्गावर आले आणि आजही त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेतली जाते.



**मुख्यसंज्ञा:** महाराजा सयाजीराव गायकवाड, आर्थिक सुधारणा, सामाजिक सुधारणा, राजकीय सुधारणा, सक्तीचे मोफत शिक्षण, स्त्री सक्षमीकरण, अस्पृश्यता निवारण, कृषी सुधारणा, सहकार चळवळ, बँक ऑफ बडोदा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्थानिक स्वराज्य, जाणता राजा.


## प्रस्तावना

भारताच्या इतिहासात अनेक थोर राजे होऊन गेले, परंतु काही मोजक्या राजांनी केवळ सत्ता-संवर्धन न करता जनतेच्या हितासाठी व्यापक सुधारणा केल्या. अशांपैकीच एक द्रष्टा, कर्तव्यदक्ष, सामाजिक आणि शैक्षणिक क्रांती घडवून आणणारा राजा म्हणजे बडोदा संस्थानाचे महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे). त्यांनी ६४ वर्षांच्या कारकीर्दीत समाजाच्या सर्व स्तरांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य केले. अस्पृश्य, आदिवासी, महिलावर्ग, शेतकरी, कामगार यांच्यासाठी त्यांच्या धोरणांनी मार्गदर्शक ठरले. त्यांनी केलेल्या शिक्षण, सामाजिक न्याय, सहकार, अर्थव्यवस्था, महिला सक्षमीकरण, कृषी सुधारणा आणि संस्थात्मक विकास या क्षेत्रातील कार्याचा अभ्यास आजही आपल्या सामाजिक व राजकीय अभ्यासात उपयुक्त ठरतो. महाराजा सयाजीराव गायकवाड हे १८७५ ते १९३९ या काळात बडोद्याचे राजे होते. या ६४ वर्षांच्या दीर्घ-कालावधीमध्ये त्यांनी बडोदा संस्थानात विषमता निर्मूलनाचे उल्लेखनीय कार्य केले. बडोद्यामध्ये सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि आर्थिक इत्यादी बाबतीत विषमता पसरलेली होती. सयाजीराव महाराजांनी त्यांच्या प्रजेमध्ये समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. अनेक योजना राबविल्या. त्यांच्या कार्याबद्दल इतिहासकार वि.का.राजवाडे म्हणतात की,


*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**

*डॉ.मारोती जनार्दन कंधारे, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,लासलगाव ता.निफाड जि.नाशिक*



**How to cite this article:**

*कंधारे, . मारोती . जनार्दन ., & आहेर, . विरेंद्र . विश्वास . (2025). महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे आर्थिक,सामाजिकव राजकीय कार्य. Journal of Research & Development, 17(8(I)), 105–109.*

https://doi.org/10.5281/zenodo.17115786

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17115786

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

"भारतातील शंभर वर्षातील कर्तृत्ववान व्यक्तींमध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा उल्लेख पहिल्यांदा करावा लागेल".

**उद्दिष्टे**

1. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या समाजसुधारणेतील कार्याचा अभ्यास करणे.
2. त्यांनी केलेल्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि कृषी सुधारणांचे विश्लेषण करणे.
3. त्यांच्या धोरणांची त्या काळातील परिस्थितीच्या अनुषंगाने चिकित्सा करणे.
4. सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याचा आजच्या काळातील उपयुक्ततेसह आढावा घेणे.
5. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आधुनिक भारताला मिळालेले लाभ अधोरेखित करणे.

**संशोधन पद्धती**

या संशोधनात गुणात्मक संशोधन पद्धती वापरण्यात आली आहे.

- प्राथमिक व दुय्यम दस्तऐवज (सरकारी कागदपत्रे, कायदे, आदेश)
- इतिहासकारांचे लेखन, चरित्रे, संशोधन ग्रंथ
- पुस्तकांतील संदर्भ (वि.का. राजवाडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आठवणी)
- वृत्तपत्रीय माहिती व वर्तमानपत्रातील विश्लेषण
- विविध शैक्षणिक संकेतस्थळांवरील विश्वसनीय माहिती

**महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे कार्य**

दि.२८ डिसेंबर १८८१ रोजी सयाजीरावांना संपूर्ण राज्याधिकार मिळण्याचा समारंभ झाला. राज्यकारभाराची सुत्रे हाती येताच सयाजीराव यांनी सरोवराच्या कामाचा प्रारंभ केला. लोकांपयोगी कामे सर्वत्र सुरू करताना 'लोकांना भरीव फायदा होईल' असा दृष्टिकोन त्यांनी ठेवला होता. त्यांनी राज्यकारभार हाती घेताच गाडी-घोड्यावर बसून राज्याचा सगळा भूभाग जवळून बघितला. रयतेच्या भेटी-गाठी घेतल्या. त्यामधून त्यांच्या असे लक्षात आले की, दारिद्र्य आणि शिक्षणाच्या अभावामुळे ही सारी प्रजा दुःखद आणि रानटी जीवन जगत आहे. त्यांना बघून या तरुण राजाला खूप वाईट वाटले. बडोद्यास परतताना सयाजीरावांनी मनाशी निर्णय घेतला. या अस्पृश्य, आदिवासींना अगोदर शिकवले पाहिजे आणि त्यामधुन अस्पृश्य आणि आदिवासींच्या शिक्षणासंबंधी पहिला हुकूम काढला. सरकारी खर्चाने या मुलांसाठी शाळा-वसतिगृहे सुरू केली. वंचित समाजाच्या परिवर्तनासाठी शिक्षण देणारा हा हिंदुस्थानातील नव्हे तर जगातील पहिला सामाज क्रांतिकारी हुकूम होता. यावेळी महाराज होते केवळ एकोणवीस (19) वर्षांचे ! एवढेच नाही तर यानंतर दहा वर्षातच १८९२ साली महाराजा सयाजीरावांनी बडोद्यात सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण सुरू केले. हाही हिंदुस्थानातील पहिला निर्णय होता. कारण देशातील अज्ञानाची स्थिती सुधारण्यास शिक्षण ही संजीवनी आहे असे त्यांचे मत होते. तसेच 'प्राथमिक शिक्षणाच्या योजनेमुळे सरकारचा उत्पन्न निर्माण करण्याचा हेतू बिलकुल नसून केवळ प्रजेच्या उन्नतीसाठीच सक्तीच्या शिक्षणाचा मार्ग योजनेला असल्यामुळे या कृतीस अवरोध न करता तिला विकास पावण्यास व तिजपासून लाभकारक परिणाम उत्पन्न होऊ देण्यास प्रजेनं मदत केली पाहिजे असे त्यांचे मत होते.

**सामजिक कार्य**

जातिसंस्थेमुळे सामाजिक समता, मनुष्यता, मानवी हक्क यांच्यावर आघात होतात. एक माणूस दुसऱ्यापासून दूर होतो, एक माणूस दुसऱ्याला गुलामगिरीच्या गर्तेत ढकलून देतो, हे अनुचित असल्यामुळे अस्पृश्यता निवारणाच्या कामांना त्यांनी गती दिली. परंतु हे काम केवळ कायदे केल्याने होण्यासारखे नाही, हे त्यांनी ओळखले होते. आखिल भारतीय अस्पृश्यता निवारक संमेलनाचे अध्यक्ष म्हणून २३ मार्च १९१८ च्या भाषणात ते म्हणाले होते "उच्च जातींना ज्या शैक्षणिक सोयी-सवलती आहेत त्याच अस्पृश्यांनाही मिळाव्यात म्हणून आपण नेत्यांनी प्रयत्न करू व उदारमतवादाचा पुरस्कार करून लोकजागृती करू". जातीयता- वर्णभेद हे सारे मनुष्यनिर्मित आहेत. भौतिक - सामाजिक परिस्थिती अशा कु -प्रथांना जन्माला घालतात असे त्यांनी स्पष्ट शब्दात मांडले. तसेच अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे काढली, त्यांच्या जेवणाची व राहण्याची सोय केली. कपडे, लेखन साहित्य व अभ्यास पुस्तके पुरली व अशा विद्यार्थ्यांचे शिक्षणात खंड पडू नये यासाठी खास शिष्यवृत्त्या देखील पुरविल्या.महाराजांनी स्त्रियांच्या सामाजिक प्रतिष्ठेसाठी कायद्यांची निर्मिती केली. स्त्री - शिक्षण, लग्नाचे किमान वय, बालविवाह बंदी अशा अनेक सुधारणा घडवून आणल्या. महाराजांनी सामाजिक सुधारणांसाठी केलेले पुढील चार (4) कायदे पुरोगामी आणि महत्वपूर्ण ठरल्याचे मानले जातात.

1) जाती- अस्पृश्यता निवारण कायदा,

2) हिंदू -विधवा पुनर्विवाह कायदा,

3) विशेष विवाह कायदा,

4) बालविवाह प्रतिबंधक कायदा

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

तसेच स्त्रीयांना वारसाहक्क मिळकतीत वाटा मिळविण्यासाठी हिंदू कायदा सुधारणा समितीने १९३० साली विचारविनिमय व अभ्यास करून स्त्रियांना वडिलोपार्जित आणि पतीकडील संपत्तीत वारसा हक्क देण्याचे ठरविले. तसेच स्त्रियांना मतदानाचा अधिकार करून दिली. ज्ञाननिर्मिती, ज्ञानसंवर्धन आणि ज्ञानाचे प्रजेच्या कल्याणासाठी उपयोजना ही सयाजीरावांच्या शैक्षणिक कार्याची त्रिसूत्री आहे. विद्याव्यासंगातूनच त्यांनी आपल्या राज्यात शैक्षणिक सुधारणा घडवून आणल्या. महाराजांनी सामाजिक सुधारणा व ग्रामोद्धार घडवून आणण्यासाठी भारतात गाव तिथे ग्रामपंचायत, गावोगावी वाचनालय व व्यायामशाळा,धर्मखात्याची सुरुवात केली. पाणीपुरवठा योजना, कलाभूवन व हुन्नर उद्योगाचे शिक्षण, स्थानिक स्वराज्य संस्थेचा विकास इत्यादी ग्राम उद्धार कार्य अशा सुधारणा घडवून आणल्या.स्त्री-शिक्षणातून त्यांनी त्यांच्या पत्नीला स्वतः शिकवण्यासाठी सुरुवात केली. साहित्य, कला, शिल्पकला आणि संगीत या कलांचा विकास घडवून आणला.

**आर्थिक कार्य**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पदवी ते कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी १९०८ ते १९१७ अशी सलग नऊ वर्षे महाराजांनी एकूण २०००० हजार रुपये शिष्यवृत्ती दिली. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ९० लाख रुपयांहून अधिक भरते. तीनवेळा बडोद्याची शिष्यवृत्ती मिळालेले बाबासाहेब एकमेव विद्यार्थी होते. पुढे सयाजीरावांनी ही शिष्यवृत्ती माफ केली. १९१७ मध्ये त्यांनी धारा सभेवर अस्पृश्य सदस्य म्हणून आंबेडकरांची निवड केली तसेच अस्पृश्य प्रतिनिधींबरोबर बसण्याची तयारी असणाऱ्या सदस्यांनाच धारा सभेची सर्वसाधारण निवडणूक लढण्याची परवानगी देणारे विशेष कलम त्यांनी या कायद्यात समाविष्ट केले. गंगारामभाऊ म्हस्के यांनी मराठा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी 'डेक्कन मराठा एज्युकेशन' संस्थेची स्थापना केली. या संस्थेलाही सयाजीरावांनी आर्थिक पाठबळ दिले. ही मदत ५ लाख २९ हजार ५५६ रू. इतकी होती जी आजच्या रुपयाच्या मूल्यात ७२ कोटी ४५ लाखांहून अधिक भरते. यामधून त्यांनी अस्पृश्य आणि एकंदर सर्वांच्याच शिक्षणात मोलाची कामगिरी केल्याचे दिसून येते.महाराजांनी याचबरोबर घटस्फोटाचा कायदा,बालविवाह बंदी, कन्याविक्रय बंदी असे अनेक कायदे केले जे स्त्रियांच्या दृष्टीने अतिशय लाभदायी ठरले. महाराज सयाजीराव गायकवाड हे शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे त्यांना शेतकऱ्यांबद्दल आस्था होतीच आणि शेतकऱ्यांच्या समस्याही त्यांना ज्ञात होत्या. यामधे सुधरणा करण्यासाठी 'शेतकऱ्यांना सामाजिक, नैतिक व आर्थिक परिस्थितीत कोणत्या सुधारणा घडवून आणणे शक्य आहे, हे पटवून देणे आणि त्यांच्या मनात इच्छा उत्पन्न करणे' असे धोरण त्यांनी राबविले. शिक्षण प्रसारातून जनतेला जागे करण्याचे काम हाती घेतले, प्रत्यक्ष शेतात पोहोचले. त्यांनी कर्ज देणे, तगावी देणे, जमिनीचे बारीक तुकडे होण्याचे थांबविणे, सरकारी प्रक्रिया उद्धोग काढणे यावर अशा अनेक मार्गांनी शेतकऱ्याला कर्जबंधनातून, तसेच दुष्काळ आणि पीक नासाडी यांच्या भीतीपासून मुक्त करायला सुरुवात केली.१८८६ ते १९३० या काळात बारा हजारांहून अधिक विहिरी खोदण्यात आल्या. शेतकऱ्यांना ऑईल इंजिन, कृषिपंप, ट्रॅक्टर अशी यंत्र- साधने उपलब्ध करून दिली. शेतकरी, कामगार, व्यापारी वा अन्य व्यावसायिकांच्या सहकारी संस्था निर्माण होण्यास सयाजीरावांनी उत्तेजन दिले. ग्रामपातळीपर्यंत या सहकारी संस्था असाव्यात असाही प्रयत्न केला. सहकारी संस्थांचे मोठे जाळे बडोदे राज्यात निर्माण केले. सहकारी संस्थांमध्ये तळागाळातल्या व्यक्ती, समाजांना मदत मिळते तसेच शेतकरी आणि व्यवसायिक प्रजेच्या जीवनमानात सुख-शांती, समाधान, वित्त आणि ज्ञान पोहोचवायचे असेल तर सहकाराचा अवलंब व्हावा असे धोरण त्यांनी आखले. तसेच सहकारी संस्थांसाठी कामकाज सुरळीत चालावे म्हणून कायदे केले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे बडोदा राज्यात शेती उत्पादन व सहकारी चळवळीत लक्षणीय प्रगती झाली. त्यांच्या या योगदानाबद्दल "शेती राजा" म्हणून त्यांना ओळखले जाऊ लागले. शेती ही अर्थव्यवस्थेचा पाया आहे. शेतीतील सुधारणांमुळे अर्थव्यवस्थेचा विकास होतो. सहकार चळवळ ही शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी एक महत्त्वाचे साधन आहे. महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या या विचारांची आजही प्रचिती येते आणि मार्गदर्शनही होते.इतकेच नाही तर महाराजांनी शेती पूरक उद्योगांच्या वृद्धीसाठी जाणीवपूर्वक लक्ष दिल्याचे समजते. त्यांनी वेगवेगळया मालावरील आयात - निर्यातीसाठी जकात कमी केली, पाणीपुरवठ्यात सवलती दिल्या, उद्योग वृद्धीसाठी तज्ञांचा सल्ला देऊन उद्योग वृद्धी होताना स्वदेशातील उद्योगधंदे वाढवे ही त्यांची दूरदृष्टी होती. राजाचा खाजगी खर्च, नोकरदारांचे वेतन, राज्याच्या सर्वांगीण सुधारणेची हाती घेतलेली कामे, सांस्कृतिक व कलाविषयक कृतींसाठींचे खर्च असा मोठ्या प्रमाणात खर्च राज्याला करावा लागतो.या खर्चाची पूर्तता करण्यासाठी महसूल जमा केला जातो. म्हणून महसूल वाढविण्याचे त्यांनी काही मार्ग अवलंबविले. उदा. पडित जमीन लागवड, व्यापारात उत्तेजन, बचत बँकांकडून पैसे एकत्र करणे, शेतीतील उत्पन्न वाढविणे तसेच नेहमीच्या खर्चात आपत्ती-दुष्काळ यासाठी तीन वर्षाचे उत्पन्नाइतके म्हणजे सुमारे सात कोटी रुपयांची रक्कम कायम शिल्लक असावी असाही आदेश महाराजांनी काढलेल्या दिसतो.

आर्थिक बाबींमध्ये कठोर तपासणी, खर्च औचित्य , काटकसर यांना महत्त्व देणारे आदर्श असे अर्थविषयक हुजूरहुकूम (कायदे) त्यांनी काढले. २० जुलै १९०८ रोजी 'The Bank of Baroda' (दि. बँक ऑफ बडोदा) बँकेची स्थापना केली.मोठ्या जनसमुहाची या बँकेने गरज पैशाची गरज भागवावी,कर्ज देणे, हुंड्याची देव-घेव करणे, ठेवी स्वीकारणे, कला, उद्योगधंदे व व्यापार यांची प्रगती करावी अशी उद्दिष्टे सयाजीराव यांनी बँकेच्या स्थापनेवेळी ठेवली होती. या बँकेच्या शाखा दूरवर पसरून बँकेने मोठा विकास साध्य केला. या बँकेच्या

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

स्थापनेत मोठे श्रेय सयाजीराव गायकवाड यांचे आहे. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी केलेल्या सुधारणांचा फायदा आजही आपल्याला झालेला दिसतो. इतकेच नाही आशिया खंडातील सर्वात मोठी लायब्ररी (Central Library) ची स्थापना आणि गावागावामध्ये फिरत्या वाचनालयाची संकल्पना त्यावेळी सुरू केली होती. कुठलेही राज्य हे आर्थिक नियोजनाशिवाय विकास करू शकत नाही हे आपण सगळेच जाणतो. परंतु महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी जुलै 1908 मध्ये बँक ऑफ बडोदा ची स्थापना करुन दाखवून दिले. हि बँक आजही प्रचंड यशस्वीरित्या वाटचाल करत आहे हा सर्वस्वी महाराजांचा दूरदृष्टीचा परिपाक आहे. १८८५ मध्ये सर्वात मोठे आणि देशातील पहिले धरण बांधणारा राजा, १८८५ मध्ये आशिया खंडातील सहकार क्षेत्रातील पहिला साखर कारखाना 'गणदेवी' मध्ये बांधणारा राजा, १८९२ साली मोफत शिक्षणाचा कायदा आपल्या संस्थानात पास करणारा पहिला राजा, १९१० साली या देशातील सर्वात मोठे ग्रंथालय बांधणारा राजा, ग्राम तेथे ग्रामपंचायत आणि ग्रामपंचायत तेथे ग्रंथालय सुरू करणारा राजा,'बँक ऑफ बडोदा' ची स्थापना करणारा राजा अशा अनेक कारणांमुळे प्रजेच्या मनावर राज्य करणाऱ्या आणि 'जाणता राजा' अशी ओळख असलेल्या महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे निधन ६ फेब्रुवारी १९३९ रोजी झाले.

**राजकीय कार्य**

**शासन व्यवस्था आणि स्वायत्तता**

महाराजांनी बडोदा संस्थानात आधुनिक प्रशासनिक पद्धती आणल्या. त्यांनी केंद्रीयीकृत प्रशासनाच्या जागी स्थानिक स्वराज्य संस्थांना चालना दिली. नगरपालिका, जिल्हा परिषदा आणि ग्रामपंचायतींची स्थापना करून नागरिकांना निर्णय प्रक्रियेत सामील होण्याची संधी दिली. त्यांनी हुकूमशाहीच्या जागी लोकशाही मूल्यांचा पुरस्कार केला.

**न्यायव्यवस्था सुधारणा**

त्यांनी संस्थानात स्वतंत्र न्यायव्यवस्था निर्माण केली. पारदर्शक आणि कार्यक्षम न्यायप्रणालीसाठी नवीन कायदे तयार केले. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी न्यायालये आणि प्रशासकीय यंत्रणेत सुधारणा केल्या. लोकांना न्याय वेळेत आणि समानतेने मिळावा, यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

**शैक्षणिक विकासावर भर**

सयाजीराव गायकवाड यांना शिक्षणाचे महत्त्व पूर्णपणे पटले होते. त्यांनी संपूर्ण संस्थानात मोफत व सक्तीचे शिक्षण लागू केले, जे त्या काळात एक क्रांतिकारी पाऊल होते. मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरू केल्या, तसेच दलित व मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्ती योजना सुरू केली. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात शिकवण्याची संधी दिली, हे त्यांचे सर्वात मोठे योगदान मानले जाते. शिक्षण हेच सामाजिक व आर्थिक प्रगतीचे साधन आहे, या विचारावर त्यांचा ठाम विश्वास होता.

**आर्थिक आणि औद्योगिक विकास**

सयाजीराव गायकवाड यांनी कृषी, सिंचन, पाणीपुरवठा, रस्ते आणि रेल्वे यांसारख्या मूलभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करून बडोद्याच्या आर्थिक विकासाला चालना दिली. त्यांनी सहकारी चळवळीला प्रोत्साहन दिले, जेणेकरून शेतकरी स्वयंपूर्ण होऊ शकतील. त्यांनी बँका, कापडगिरण्या आणि लघुउद्योगांना चालना दिली, ज्यामुळे स्थानिक रोजगार वाढला.

**भारतीय स्वातंत्र्यलढ्याशी अप्रत्यक्ष संबंध**

सयाजीराव गायकवाड हे ब्रिटिशांच्या अधीन असले तरी त्यांनी स्वराज्याच्या कल्पनेला विरोध केला नाही. ते राष्ट्रवादी विचारांच्या जवळ होते. त्यांनी अनेक राष्ट्रवादी नेत्यांना मदत केली, साहित्य संमेलने, राजकीय परिषदांना मदतीचा हात दिला. गांधीजींसारख्या नेत्यांबाबत त्यांना आदर होता आणि त्यांनी सामाजिक नवचेतनेला सक्रिय पाठिंबा दिला. महाराजा सयाजीराव गायकवाड हे केवळ बडोद्याचे शासक नव्हते, तर ते एका नवभारताचे स्वप्न पाहणारे आणि ते प्रत्यक्षात उतरवणारे राजकारणी नेते होते. त्यांच्या दूरदृष्टीने बडोदा संस्थान आधुनिकतेच्या दिशेने वेगाने पुढे गेले. शिक्षण, सामाजिक न्याय, आणि प्रशासनातील पारदर्शकता या तीन स्तंभांवर त्यांनी आपले राजकारण उभे केले. त्यामुळे आजही त्यांना एक *द्रष्टा, सुधारक आणि आदर्श राजा* म्हणून ओळखले जाते.

**निष्कर्ष**

सयाजीराव गायकवाड यांचे कार्य हे एका राजा कसा असावा याचे आदर्श उदाहरण ठरते. केवळ 19व्या वर्षी राज्यसत्ता हाती घेऊन त्यांनी जी धोरणे राबवली ती अत्यंत लोकाभिमुख व दूरदृष्टीची होती.

- शैक्षणिक क्रांतीच्या माध्यमातून त्यांनी अज्ञान, विषमता आणि रूढीवादाचा सामना केला.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणारे ते पहिले आणि एकमेव संस्थानिक होते.
- त्यांनी स्त्री सक्षमीकरण, अस्पृश्यता निवारण, सामाजिक कायदे, वसतिगृहे, वाचनालये, ग्रामपंचायती यांसारख्या अनेक उपक्रमांद्वारे समाजमनावर अमीट ठसा उमटविला.
- कृषी व सहकार क्षेत्रातील सुधारणांमुळे "शेती राजा" ही ओळख निर्माण झाली.
- बँक ऑफ बडोदा ही त्यांची दूरदृष्टीपूर्ण देणगी आजही कार्यरत आहे.

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

त्यांनी निर्माण केलेली कार्यपद्धती, सुधारणा व संस्था आजच्या भारताच्या विकासामध्ये महत्त्वाचा वाटा उचलतात. महाराज सयाजीराव गायकवाड हे खरोखरच 'जाणते राजा' होते, आणि त्यांचे जीवन हे सर्वच क्षेत्रात कार्य करणाऱ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

**संदर्भ:**

1. alaukikmarathi.com
2. https://en.m.wikipedia.org
3. https://Marathisahitya.com
4. महाराजा सयाजीराव गायकवाड, चरित्रसंग्रह (भाग-1)
5. दानशूर महाराजा सयाजीराव गायकवाड, लेखक - डॉ. राजेंद्र मगर
6. महाराजा सयाजीराव आणि स्त्री शिक्षण-लेखक सौ. मंदा हिंगुराव

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# महिला विकासाची सामाजिक परिस्थिती, धोरणे व आव्हाने

**डॉ.गणेश मनोहर लिंबोळे**

मविप्र समाज कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,ताहाराबाद.

ता.बागलाण.जि.नाशिक.महाराष्ट्र

**Email**-limbole.ganesh@gmail.com

**Manuscript ID**:

JRD -2025-170824

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 8(I)

Pp. 110-113

August 2025

**गोषवारा**

भारतीय समाज व्यवस्थेत महिलांना प्राचीन काळापासून दुय्यम स्थान दिले आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात महात्मा फुले,सावित्रीबाई फुले राजा राम मोहन रॉय, महर्षी कर्वे ,महात्मा गांधी सारख्या समाज सुधारकांनी सतीप्रथा, महिला शिक्षण, विधवा पूर्णविवाह, केशवपन, महिलांचा समाजिक दर्जा यासारख्या क्षेत्रात सुधारणा घावून आणल्या होत्या. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात समतेच्या तत्त्वातून महिलांना संविधानात्मक अधिकार उपलब्ध करून दिले. आज भारताला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्ष झाले आणि संविधान अमलात येवून ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. संविधानाने राजकीय लोकशाही प्रस्तापित झाली परंतु सामाजिक आणि आर्थिक लोकशाही अजूनही प्रस्थापित झालेली झालेली नाही. स्वातंत्रनंतरच्या कालखंडात महिला विषयक धोरण आणि सुधारणा यात अनेक बदल झालेले आहेत.अशा धोरण आणि कायदे बदलांचा आढावा सदर संशोधनात घेतला आहे.

**मुख्यशब्द :** पितृसत्ताक व्यवस्था ,महिला सबलीकरण, राजकीय लोकशाही,

**Submitted:** 14 July. 2025

**Revised:** 30 July. 2025

**Accepted:** 15 Aug 2025

**Published:** 30 Aug. 2025

**प्रास्ताविक**

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही असणारा देश आहे. आज भारताची लोकसंख्या जगात क्रमांक एकची आहे. चीनला मागे टाकत भारत अव्वलस्थानी आला आहे. आज भारतात अंदाजे १.४६ कोटी लोकसंख्या आहे यामध्ये ५० % प्रमाण हे महिलांचे आहे असे मानले जाते. भारतात आज सर्वच क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढता आहे. हा सहभाग मानवी जीवनाचा आरंभापासून आजतागायत आहे. परंतु महिलांना हवे त्या प्रमाणात अधिकार प्राप्त झाले नाहीत हे वास्तव नाकारता येत नाही. भारतीय समाज व्यवस्था हि प्राचीन काळी मातृसत्ताक स्वरुपाची होती नंतर पितृसत्ताक स्वरुपात परावर्तीत झाली. द्रविडीयन संस्कृतीमध्ये मातृसत्ताक व्यवस्था होती नंतरच्या काळात आर्य संस्कृतीच्या काळात पितृसत्ताक व्यवस्था रूढ झाली. भारतात महिलांना दुय्यम स्थान देण्यामध्ये अनेक सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि ऐतिहासिक घटकांचा सहभाग आहे. प्राचीन काळातील मनुस्मृती, रामायण आणि महाभारत ,कौटिल्याचे अर्थशास्त्र हे ग्रंथ त्या काळातील सामाजिक व्यवस्था आणि विचारसरणीचे प्रतिबिंब आहेत .पुरुषप्रधान विचारसरणी रुजवण्यात आणि महिलांना दुय्यम स्थान देण्यामध्ये या ग्रंथांची मोठी भूमिका आहे. युरोपात १८ शतकापासून स्त्रीवादी चळवळ सुरु झाली. मैरी वोल्स्टोनक्राफ्ट या महिलेला स्त्रीवादाचे जनक मानले जाते. १९७२ मध्ये "अ विन्डीकेशन ऑफ राइट्स ऑफ वूमन नावाचा ग्रंथ "प्रकाशित करून पहिल्यांदा महिलांच्या हक्क आणि अधिकाराबाबत चर्चा घडून आणली. सिमोन दि बोउवर, बेट्टी फ्रीडन,ग्लोरिया स्टीनेम ,सुसान बी एन्थोनी, अशा महिलांनी स्त्रीवादी विचार चळवळीत महत्वाचे योगदान दिले आहे. १९ व्या आणि २० शतकात भारतात सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई सरस्वती,रमाबाई रानडे,अहिल्या रानगेकर यासारख्या महिलांनी स्त्री विकासाच्या कार्यात मोठे योगदान दिले आहे भारतातील महिलांच्या सामाजिक सुधारणांचा इतिहासाचा आढावा घेताना लक्षात येते की सामाजिक सुधारणा करताना

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**

*डॉ. गणेश मनोहर लिंबोळे , मविप्र समाज कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,ताहाराबाद. ता.बागलाण.जि.नाशिक.महाराष्ट्र*

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17115887

OPEN ACCESS

**How to cite this article:**

*लिंबोळे, . गणेश . मनोहर . (2025). महिला विकासाची सामाजिक परिस्थिती, धोरणे व आव्हाने. Journal of Research & Development, 17(8(I)), 110–113.* https://doi.org/10.5281/zenodo.17115887

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

सामाजिक चळवळी, भारतीय सुधारकांचे योगदान, तत्कालीन कायदेशीर बदल आणि महिलांचा स्वतःचा सक्रिय सहभाग यातून सामजिक सुधारणांना काही अंशी यश आले आहे.

**संशोधन लेखाची उद्दिष्टे :**

१) भारतीय महिलांच्या सामाजिक स्थितीचा आढावा घेणे.

२) भारतीय महिलांच्या समस्या आणि आव्हाने यांचा अभ्यास करणे.

३) महिला सक्षमीकरणासाठी निर्मित धोरणांचा आढावा घेणे.

४) महिला सक्षमीकरणासाठी प्रभावी धोरण सुचविणे

**संशोधन पद्धती :**

सदर संशोधन लेखासाठी ऐतिहासिक विश्लेषणात्मक आणि गुणात्मक पद्धतीचा वापर विश्लेषण करण्यात आला. आहे.

**आशय विश्लेषण :**

भारतातील महिलांच्या सामाजिक स्थिती सुधारणांचा इतिहासाचा १९ व्या शतकापासून मुख्यतः दिसून येतो. भारतातील महिलांची सामाजिक स्थिती प्राचीन काळापासून ते समकालीन युगापर्यंत अनेक स्थित्यंतरांमधून गेली आहे सुरुवातीला .काळात काही प्रमाणात समानता असली तरी, नंतरच्या काळात महिलांची स्थिती खालावत गेली आणि आधुनिक काळात पुन्हा सुधारणा होताना दिसून येते आहे. वैदिक या काळात महिलांची स्थिती तुलनेने चांगली होती. महिलांना शिक्षण घेण्याचा हक्क होता आणि उपनयन संस्कारही काही प्रमाणात केला जात होता. गार्गी, मैत्रेयी यांसारख्या विदुषींनी तत्त्वज्ञानाच्या चर्चांमध्ये आपला सहभाग घेतल्याचे दिसून येते. महिलांना धार्मिक विधींमध्ये भाग घेण्याचा अधिकार होता आणि यज्ञ करताना त्या पुरुषांच्या बरोबरीने उपस्थित असत. बालविवाहाची प्रथा नव्हती. स्त्रियांना स्वयंवर माध्यमातून पती निवडण्याचा आणि विवाह विच्छेद- घटस्फोट यांसारखे काही अधिकार होते. विधवा पुनर्विवाहाची उदाहरणेही काही प्रमाणात दिसून येतात. उत्तर-वैदिक काळात स्त्रीच्या प्रतिष्ठेला काही प्रमाणात धक्का बसला. स्त्रियांच्या शिक्षणावर बंधने येऊ लागली. उपनयन संस्काराचा अधिकार काढून घेण्यात आला. धार्मिक विधींमध्ये स्त्रियांचा सहभाग कमी झाला आणि त्यांना काही मंत्रोच्चारास मनाई करण्यात आली. बालविवाहाची, सती प्रथा सुरू झाली. पुरुषप्रधान विचारसरणी अधिक मजबूत झाली. सीतेची अग्निपरीक्षा किंवा द्रौपदीचे वस्त्रहरण यांसारख्या घटनांमधून स्त्रीची दुय्यम स्थिती याच काळात प्रकर्षाने दिसून आली. मौर्य आणि गुप्त साम्राज्य काळात स्त्रियांच्या स्थितीत आणखी घसरण झाली. मध्ययुगीन काळात महिलांची सामाजिक स्थिती अत्यंत चिंताजनक झाली. भारतात होणारी परकीय आक्रमणे आणि त्यातून सामाजिक रूढीं परंपरा मुले महिलांच्या जीवनावर नकारात्मक परिणाम झाला. स्त्रियांच्या शिक्षणाची दारे जवळपास बंद झाली. त्या केवळ चूल आणि मुल पुरत्या मर्यादित राहिल्या. बालविवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले होते मुलींचे लग्न अगदी लहान वयात केले जाऊ लहाले त्यातून पुढे विधवा तरुणीची संख्या प्रकर्षाने यातून सती प्रथा आणि जोहरअशा प्रथा रूढ झाल्या. विधवांचा पुनर्विवाह निषिद्ध मानला गेला आणि त्यांना समाजात अत्यंत वाईट वागणूक दिली जात होती. त्यांचे केशवपन करून त्यांना समाजातून बहिष्कृत केले जात असे. उत्तर भारतात पर्दा प्रथा अधिक दृढ झाली. विशेषतः महाराष्ट्र आणि कर्नाटकात काही मंदिरांमध्ये देवदासी प्रथेसारख्या अनिष्ट प्रथा रूढ झाल्या ज्यामुळे स्त्रियांचे शोषण होवू लागले.आधुनिक काळात, ब्रिटिश राजवटीच्या सुरुवातीला समाज सुधारकांनी आणि नंतर भारतीय संविधानाने महिलांच्या स्थिती सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रयत्न केले. राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथाविरुद्ध आवाज उठवला आणि ती रद्द करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली यामुळे १८२९ मध्ये लॉर्ड विल्यम बेंटिक यांनी ती बेकायदेशीर घोषित केली ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले आणि त्यांच्या प्रयत्नांमुळे १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाह कायदा मंजूर झाला. ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले हे महिला शिक्षणाचे प्रणेते होते. यांनी भारतातील पहिली मुलींची शाळा उघडली. दयानंद सरस्वती यांनी आर्य समाज माध्यमातून विधवा पुनर्विवाह आणि महिला शिक्षणाला पाठिंबा दिला, जातिवाद आणि बालविवाहाला विरोध केला. केशवचंद्र सेन, महादेव गोविंद रानडे, पंडिता रमाबाई इत्यादींनीही महिला हक्क आणि शिक्षणासाठी कार्य केलेले दिसून येते. शिक्षणाच्या प्रहातून महिलांची एक पिढी पुढे स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभागी झाली, ज्यामुळे त्यांना सार्वजनिक जीवनात एक नवी ओळख मिळाली. स्वतंत्र भारतात भारतीय संविधानाने महिलांना समान अधिकार दिले, ज्यामुळे त्यांच्या सबलीकरणाची प्रक्रिया वेगाने सुरू झाली.

**भारतीय महिलांना संविधानिक हक्क**

समानतेचा अधिकार) कलम १४-१८(. लिंग, वंश, जात या आधारावर कोणताही भेदभाव करण्यास मनाई. समान कामासाठी समान वेतन कामाच्या ठिकाणी समान वेतनाची हमी. महिलांना मतदानाचा अधिकार, निवडणूक लढवण्याचा अधिकार आणि ७३ आणि ७४ घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ % आरक्षण दिले यातूनही महिलांचा राजकीय सहभाग वृद्धिंगत झालेला दिसून येतो.

**कायदेशीर संरक्षण :**

- हिंदू विवाह कायदा (१९५५): बहुपत्नीत्व रद्द केले, घटस्फोटाचे अधिकार दिले.
- हिंदू वारसा हक्क कायदा (१९५६, २००५ मध्ये दुरुस्ती): स्त्रियांना वडिलोपार्जित मालमत्तेत समान अधिकार दिले.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

- हुंडा प्रतिबंधक कायदा (१९६१): हुंडा घेणे आणि देणे बेकायदेशीर ठरवले.
- मातृत्व लाभ कायदा (१९६१): गर्भवती महिलांना प्रसूती रजा आणि इतर लाभ मिळाले
- कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा (२००५): घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी हा महत्त्वाचा कायदा आहे.
- लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदे: कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा (२०१३) यांसारखे कायदे आले.

**महिलांची सद्यस्थिती आणि आव्हाने**

भारत सरकार आणि विविध राज्य सरकारे महिलांच्या सामाजिक सुधारणा आणि सक्षमीकरणासाठी काही प्रमाणात प्रयत्न केले आहेत या अनुषंगाने काही उपक्रम आणि योजना सुरु केल्या यामध्ये खालावत चाललेले लिंग गुणोत्तर सुधारण्यासाठी आणि मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी बेटी बचाओ बेटी पढाओ योजना सुरु केली. मुलींच्या आर्थिक सुरक्षेसाठी सुकन्या समृद्धी योजना सुरु आहे. ग्रामीण भागातील महिलांना स्वच्छ इंधन प्रदान करण्यासाठी. प्रधानमंत्री उज्वला योजना सुरु आहे. मिशन शक्ती (संबल आणि समर्थ) महिलांच्या संरक्षण आणि सक्षमीकरणासाठी एक योजना अस्तित्वात आली यामध्ये वन स्टॉप सेंटर्स, महिला हेल्पलाइन्स, नारी अदालत इत्यादींचा समावेश आहे. प्रधानमंत्री मातृवंदना योजना: गर्भवती आणि स्तनपान देणाऱ्या महिलांना आर्थिक मदत देणे, जेणेकरून त्यांना गर्भधारणेदरम्यान आणि प्रसूतीदरम्यान चांगले पोषण आणि आरोग्य सेवा मिळू शकेल हि या योजनेची भूमिका आहे. STEP महिला प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रमया माध्यमातून महिलांना पाठिंबा देवून शेती, पशुपालन, दुग्धव्यवसाय, हातमाग, हस्तकला यासारख्या पारंपारिक क्षेत्रातील महिलांचे कौशल्य सुधारणे आणि त्यांच्या उत्पन्न मिळवून देणाऱ्या क्षमता विकास साधने या योजनेचा भाग आहे. मुख्यमंत्री लाडली बहना योजना (मध्य प्रदेश), मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना (महाराष्ट्र) राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी मासिक आर्थिक मदत प्रदान करणे, महिला समृद्धी योजना (दिल्ली) दिल्लीतील पात्र महिलांना मासिक आर्थिक मदत केली जाते. मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण योजना (विविध राज्यांमध्ये): अडचणीत सापडलेल्या महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे . विमा सखी योजना ,एलआयसी द्वारे महिलांना आर्थिक विकासासाठी शाश्वत उत्पन्नाची संधी मिळून दिली जाते. महिला आणि मुलांच्या कल्याण आणि विकासासाठी काम करणारे महिला आणि बाल विकास मंत्रालय एक प्रमुख मंत्रालय केंद्रीय पातळीवर आणि राज्य पातळीवर कार्य करते आहे.तसेच राष्ट्रीय महिला आयोग महिलांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी एक कायदेशीर संस्था निर्माण केली आहे. याच धर्तीवर राज्य पातळीवर राज्य महिला आयोग स्थापन करण्यात आले आहेत .आज भारतातील महिला शिक्षण, विज्ञान, राजकारण, कला, क्रीडा, आणि व्यवसाय या विविध क्षेत्रात लक्षणीय कामगिरी करत आहेत. परंतु अजूनही अनेक आव्हाने आहेत लिंग भेदभाव, वेतनात असमानता, शिक्षण आणि आरोग्य सेवांमध्ये भेदभाव, घरगुती हिंसाचार, बलात्कार ,लैंगिक छळ, महिला क्रय-विक्रय, तस्करी आजही सुरु अजून यामुळे महिलांचे प्रचंड शोषण सुरु आहे. सामाजिक रूढी, परंपरा अजूनही काही क्षेत्रांमध्ये स्थिर आहेत. पितृसत्ताक मानसिकता आणि पारंपारिक रूढीवाद यामुळे महिलांच्या प्रगतीला अडथळा निर्माण होतो आहे. भारतातील विविध क्षेत्रात महिलांचा सहभाग नाममात्र स्वरूपाचा आहे. उच्च पदांवर आणि काही क्षेत्रांमध्ये महिलांना अजूनही पुरेसे प्रतिनिधित्व मिळत नाही हे वास्तव प्रकर्षाने दिसून येते. महिलांच्या आरोग्य आणि सुविधा शहरी भागात काही प्रमाणात उपलब्ध आहेत. परंतु ग्रामीण भागातील महिलांसाठी आजही आरोग्याचे प्रश्न जसेच्या तसे आहेत यावर ठोस उपाययोजन होत नाही . आदिवासी भागातील महिलांची परिस्थिती अजूनही दयनीय स्वरुपाची आहे. शिक्षणाचा अभाव कुपोषण, भुकमरी, आरोग्याची समस्या, व्यसनाधीनता अशा अनेक समस्या आजही अस्तित्वात असून त्याचा विळखा तरुणींना सुधा भेडसावत आहे.

**निष्कर्ष :**

भारतात महिला सामाजिक सुधारणा ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. प्राचीन काळापासून तर आधुनिक काळापर्यंत महिला विकासात भर पडत गेली. भूतकाळातील महत्त्वपूर्ण चळवळी आणि कायदेशीर बदलांमुळे महिलांची स्थिती सुधारली आहे, परंतु अजूनही बरेच काम होणे बाकी आहे. महिला सक्षमीकरणाचे अंतिम ध्येय म्हणजे महिलांना शिक्षण, सामाजिक दर्जा , संधीची हमी ,आर्थिक स्वातंत्र्य, कायदेशीर संरक्षण आणि अनिष्ठ सामाजिकरूढी परंपरेतून मुक्तता होणे अपेक्षित आहे. सामाजिक जागरूकता याद्वारे महिलांना पूर्ण समानता आणि सक्षमीकरणाकडे नेणारी व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. महिला सक्षमीकरणासाठी निश्चित धोरण, कायदा यांची आजही आवश्यकता आहे. कायदे असूनही अंमलबजावणी होत नाही परिणामी महिलांचे शोषण अविरत सुरूच आहे.यामुळे कायदे होणे आणि त्यांची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. महिलांना राजकीय आरक्षण दिले आहे परंतु खरी राजकीय सत्ता पुरुषांकडेच असते. ठराविक महिलांनी राजकारणात आपला ठसा उमटविला आहे. यामुळे शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम महिला नेतृत्व निर्माण करावे. समाजिक न्यायाच्या माध्यमातून महिलाचे शिक्षण KG to PG निशुल्क करावे. सामाजिक न्यायाचे तत्वाने ज्या क्षेत्रात महिला पिछाडीवर आहेत तेथे विशेष आरक्षण देण्यात यावे यामूळे महिला सक्षमीकरणाला चालना मिळेल.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**संदर्भ :**

1. https://www.ncw.gov.in/hi/
2. https://mscw-org-in
3. महाजन जयश्री ,"महिला सक्षमीकरण ",अथर्व पब्लिकेशन जळगाव.
4. पाटील भारती ,स्त्रिया समाज आणि राजकारण 'मेहता पब्लिशिंग हाउस,पुणे.
5. सरोदे असीम ,"कौटुंबिक हिंसाचार आणि कायदा",मनोविकास प्रकाशन,पुणे
6. आपटे.ज.स. आणि पुष्पा रोडे ,"भारतीय महिला विकासाची वाटचाल "डायमंड पब्लिकेशन पुणे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि शांतता प्रस्थापना

**अमोल गोवर्धन भोसकर**
डॉ. डी. वाय पाटील कला, वाणिज्य रात्र महाविद्यालय, पिंपरी, पुणे
**Email**-amolbhoskar1994@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170825
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8(I)
Pp. 114-118
August 2025
**Submitted:** 14 July. 2025
**Revised:** 30 July. 2025
**Accepted:** 15 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**सारांश**

आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि शांततेची प्रस्थापना ही आजच्या जागतिक परिस्थितीत अत्यंत महत्त्वाची बाब आहे. विविध देशांमध्ये परस्पर समज, आदान-प्रदान, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक सहकार्यामुळेच जागतिक एकात्मता मजबूत होते. युद्ध, दहशतवाद, जातीयता, गरिबी, व पर्यावरणविषयक संकटे ही आंतरराष्ट्रीय सहकार्याअभावी वाढत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघ, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF), युनेस्को (UNESCO), जागतिक आरोग्य संघटना (WHO) यांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांचा उद्देश म्हणजे देशांमध्ये संवाद, सलोखा व सहकार्य वाढवून शाश्वत विकास आणि शांतता साध्य करणे. शिक्षण, आरोग्य, व्यापार, हवामान बदल, आणि मानवाधिकार यांसारख्या क्षेत्रांत सहयोग वाढल्यास जागतिक समृद्धी साध्य होऊ शकते. यासाठी सर्व राष्ट्रांनी परस्पर विश्वास, समन्वय आणि सहिष्णूता जोपासणे आवश्यक आहे. अशा प्रकारे, आंतरराष्ट्रीय सहकार्य हे केवळ शांततेसाठी नव्हे, तर एक स्थिर, सुरक्षित आणि समृद्ध जग घडवण्यासाठी एक प्रभावी माध्यम ठरते.

**मुख्यशब्द :** आंतरराष्ट्रीय सहकार्य, शांतता प्रस्थापना , संयुक्त राष्ट्रसंघ ,जागतिक विकास

## परिचय

आजचे युग जागतिकीकरणाचे आहे, जिथे एक देश दुसऱ्यावर अनेक पातळ्यांवर अवलंबून आहे. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि शांततेची प्रस्थापना अत्यंत आवश्यक झाली आहे. विविध देशांतील राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक संबंध हे परस्पर सहकार्यामुळेच सुसंगत व स्थिर राहतात. परस्पर संवाद, सामंजस्य, मानवतावादी दृष्टिकोन आणि विकासासाठीचा संयुक्त प्रयत्न हे शांततेचे मुख्य आधारस्तंभ ठरतात. दुसऱ्या महायुद्धानंतर जगभरात शांततेसाठी प्रयत्न सुरू झाले आणि त्यातूनच संयुक्त राष्ट्रसंघासारख्या संस्थांचा उदय झाला. आज जागतिक दहशतवाद, अण्वस्त्र स्पर्धा, हवामान बदल, संसर्गजन्य रोग अशा समस्या फक्त एका देशाच्या मर्यादेत न राहता संपूर्ण मानवजातीपुढे आव्हान उभे करतात. त्यामुळे विविध राष्ट्रांनी एकत्र येऊन परस्पर सहकार्यानेच या समस्यांवर उपाय शोधणे हे काळाची गरज बनले आहे. अशा प्रकारे, आंतरराष्ट्रीय सहकार्य ही केवळ गरज नाही तर जागतिक शांतता, स्थैर्य आणि प्रगतीसाठी एक प्रभावी साधन आहे.

## उद्दिष्टे

1) **जागतिक शांततेचा प्रसार करणे** – युद्ध, दहशतवाद व संघर्ष यांना आळा घालून परस्पर सहकार्याचा प्रसार करणे.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*अमोल गोवर्धन भोसकर, डॉ. डी. वाय पाटील कला, वाणिज्य रात्र महाविद्यालय, पिंपरी, पुणे*

**How to cite this article:**
*भोसकर, . अमोल . गोवर्धन . (2025). आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि शांतता प्रस्थापना. Journal of Research & Development, 17(8(I)), 114–118.* https://doi.org/10.5281/zenodo.17115908

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17115908
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

2) **विविध राष्ट्रांमध्ये परस्पर विश्वास वाढवणे** – देशा-देशांमध्ये संवाद व सहकार्याचे संबंध निर्माण करणे.

3) **मानवाधिकारांचे संरक्षण करणे** – सर्व राष्ट्रांनी एकत्र येऊन मानवी हक्क व स्वातंत्र्य यांची जपणूक करणे.

4) **शाश्वत विकासासाठी एकत्रित प्रयत्न करणे** – गरिबी, अशिक्षा, पर्यावरणीय संकटे यावर उपाय शोधण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवणे.

5) **संयुक्त राष्ट्रसंघ व तत्सम संस्थांचे महत्त्व वाढवणे** – जागतिक संस्थांद्वारे शांती व सहकार्याचे उपक्रम बळकट करणे.या उद्दिष्टांच्या पूर्ततेद्वारेच जागतिक स्थैर्य, सुरक्षितता आणि मानवतेचे रक्षण शक्य आहे.

**माहिती व संशोधन पद्धती :-** आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि शांतता प्रस्थापना यांचे महत्त्व आजच्या वैश्विक परिक्षेत्रात अनन्यसाधारण आहे. विविध देशांच्या अर्थव्यवस्था, संस्कृती आणि समाजाच्या विविधतेमुळे, या क्षेत्रातील शास्त्रीय आणि धोरणात्मक संशोधनाची गरज वाढली आहे. विविध आंतरराष्ट्रीय समस्या, जसे की युद्ध, दहशतवाद, पर्यावरणीय संकटे, आरोग्याच्या आव्हानांवर तोडगा काढण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याची महत्त्वाची भूमिका आहे. शांततेची स्थापना केवळ युद्ध टाळण्यापुरती मर्यादित न राहता, ती जागतिक समृद्धी, मानवी हक्क आणि सामाजिक समतेसाठी सक्रिय प्रक्रिया ठरते. यामुळे या विषयावर सखोल संशोधन आणि अभ्यासाचे महत्त्व अधिक वाढले आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि शांतता प्रस्थापनेवरील संशोधन हे एक गंभीर, जटिल आणि बहुविध पद्धतींच्या वापरावर आधारित आहे. या संशोधनाची दिशा आणि प्रक्रिया स्पष्टपणे ठरवली जाते, त्यासाठी काही महत्त्वाच्या पद्धतींचा वापर केला जातो.

आंतरराष्ट्रीय **सहकार्य** ही बहुपरिमाणात्मक प्रक्रिया आहे जी अनेक क्षेत्रांमध्ये कार्यरत आहे, जसे की:

1) **आर्थिक सहकार्य:** जागतिक व्यापार, गुंतवणूक आणि समृद्धीला चालना देणे.

2) **सांस्कृतिक सहकार्य:** विविध संस्कृतींचा आदानप्रदान आणि एकमेकांचा आदर.

3) **पर्यावरणीय सहकार्य:** हवामान बदल, जैवविविधतेचे संरक्षण आणि संसाधनांचे व्यवस्थापन.

4) **शक्ती संतुलन:** सामरिक तणाव कमी करण्यासाठी अंतरराष्ट्रीय करार.

5) **मानवी हक्कांचे संरक्षण:** भेदभाव, अत्याचार आणि युद्धाच्या प्रभावामुळे पीडित असलेल्या लोकांसाठी सहाय्य.

शांततेच्या स्थापनेसाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य अनिवार्य आहे. हे सहकार्य संघर्ष प्रस्थापनेसाठी परस्पर विश्वास, संवाद आणि सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

**संशोधनाचा उद्देश (Research Objective):**

1) आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या विविध मॉडेल्सचा अभ्यास.

2) शांतता स्थापनेसाठी आंतरराष्ट्रीय संस्थांची भूमिका आणि कार्य.

3) युद्ध आणि हिंसाचाराच्या टाळण्यासाठी विविध उपाययोजनांचा शोध.

4) आंतरराष्ट्रीय संस्थांच्या धोरणांमधील सुधारणा.

5) जागतिक परिस्थितीवर प्रभाव पाडणाऱ्या प्रमुख घटनांचे विश्लेषण.

**संशोधनाचा प्रकार (Type of Research)**

**1) मूलभूत संशोधन (Basic Research):** या प्रकारात आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि शांतता स्थापनेसंबंधीची शास्त्रीय, दृषटिकोनात्मक आणि तात्त्विक सिद्धांतांचा अभ्यास केला जातो

**2) अनुप्रयुक्त संशोधन (Applied Research):** या प्रकारात विद्यमान समस्यांवर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला जातो. उदाहरणार्थ, युनायटेड नेशन्सच्या शांतता मिशन्सची प्रभावीता, किंवा हवामान बदलावर आधारित आंतरराष्ट्रीय सहकार्याचे परिणाम.

**3) तुलनात्मक संशोधन (Comparative Research):** या पद्धतीत दोन किंवा अधिक देशांचे आंतरराष्ट्रीय सहकार्याचे धोरण एकत्र केले जाते. यामुळे त्यांच्यातील सामर्थ्य आणि अडचणींचा अभ्यास करता येतो.

**4) सैद्धांतिक संशोधन (Theoretical Research)**

शांततेचे तत्त्वज्ञान, तत्वशास्त्र, वादविवाद, आणि सिद्धांत यांचा अभ्यास.

उदाहरण: गांधीवादी शांतता तत्त्व, रिअलिझम व लिबरलिझमचे दृष्टिकोन.

**5) इतिहासपरक संशोधन (Historical Research)**

शांतता प्रस्थापनेसाठी घेतलेल्या ऐतिहासिक उपाययोजनांचा अभ्यास.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

उदाहरण: दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपात स्थापन झालेली संयुक्त राष्ट्रसंस्था.

**6) कार्यवाही संशोधन (Action Research)**

शांतता प्रस्थापनेमध्ये प्रत्यक्ष सहभागी होऊन केलेले संशोधन.

उदाहरण: समुदायातील संघर्ष सोडवण्यासाठी स्थानिक स्तरावर केलेले हस्तक्षेप.

**7) अनुभवात्मक संशोधन (Empirical Research)**

सांख्यिकीय पद्धती वापरून संघर्ष आणि शांतता प्रस्थापनेसंबंधी माहिती गोळा केली जाते.

उदाहरण: कोणत्या देशात शांतता प्रस्थापनेसाठी कोणते उपाय यशस्वी ठरले?

**डेटा संकलनाची पद्धती (Data Collection Method) :-**

डेटा संकलनाच्या विविध पद्धती वापरल्या जातात. यामध्ये मुख्यतः दोन प्रकार असतात :

**1) प्राथमिक डेटा (Primary Data):**

**मुलाखती** : या पद्धतीत तज्ञ, राजनैतिक नेते, आंतरराष्ट्रीय संस्थांचे अधिकारी यांच्याशी मुलाखती घेऊन थेट माहिती मिळवली जाते.

**सर्वेक्षण** : देशांमधील धोरणात्मक दृष्टिकोन समजून घेण्यासाठी साधारण लोकांचे, विश्लेषकांचे आणि तज्ञांचे सर्वेक्षण केले जाते.

**प्रश्नावली** : विविध देशांच्या शांती, सुरक्षा, आणि विकास यावर आधारित प्रश्नावली तयार केली जाते.

**2) दुय्यम डेटा (Secondary Data):**

**ग्रंथ व संशोधन पत्रिका**: शंभरहून अधिक संशोधन लेख, पुस्तकं, जर्नल्स, इत्यादी वापरून विद्यमान ज्ञानाची पाहणी केली जाते.

**आंतरराष्ट्रीय संस्थांचे अहवाल**: संयुक्त राष्ट्रसंघ, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांचे अहवाल वापरून डेटा संकलित केला जातो.

**निवडक वृत्तपत्रे व मीडिया सामग्री**: विविध माध्यमातून मिळालेल्या माहितीवर आधारित विश्लेषण.

**विश्लेषणात्मक पद्धती (Analytical Methods):**

**1) संशोधन समस्येची स्पष्ट मांडणी**

**आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि शांतता प्रस्थापनेमध्ये कोणती अडचण/गुंतागुंत आहे?**

**उदा. – "संयुक्त राष्ट्रसंस्थेच्या प्रयत्नांनंतरही मध्यपूर्वेत शांतता का प्रस्थापित होत नाही?"**

**2)आकडेवारी विश्लेषण (Statistical Analysis):** या पद्धतीचा वापर विविध देशांमधील सहकार्य आणि शांततेच्या परिणामांचा सांख्यिकीय अभ्यास करण्यासाठी केला जातो. हे विशेषतः आर्थिक सहकार्य, आरोग्याच्या क्षेत्रातील सहकार्य, आणि पर्यावरणीय सहयोगामध्ये उपयोगी आहे.

3) **तत्त्वशास्त्रीय विश्लेषण (Theoretical Analysis):** आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि शांततेच्या स्थापनेसाठी विविध तत्त्वशास्त्रीय दृष्टिकोनांचा वापर केला जातो. उदाहरणार्थ, सहकारात्मक आंतरराष्ट्रीय धोरण (Cooperative Internationalism), सार्वभौमिक मानवाधिकार, आणि न्याय व समतेची तत्त्वे.

**4)मॉडेलिंग आणि सिमुलेशन (Modeling and Simulation):** हे संकल्पनात्मक आणि प्रत्यक्ष बदलांवर आधारित गणनात्मक संशोधनासाठी वापरले जाते. उदाहरणार्थ, संघर्षावर आधारित मॉडल्स तयार करणे.

**5) चित्रीकरण व केस स्टडीज (Case Studies and Documentation):**

केस स्टडी म्हणजे एका विशिष्ट घटनेचा, व्यक्तीचा किंवा संस्थेचा सखोल अभ्यास. उदाहरणार्थ, अफगाणिस्तानमधील शांती प्रक्रिया, मध्य पूर्वेतील इस्राएल-फिलिस्तीन संघर्ष, आणि दक्षिण आफ्रिकेतील अपार्थेड धोरणाचा निष्कर्ष. यावर आधारित केस स्टडी करून त्याच्या शांती स्थापनेसंबंधी निष्कर्ष काढले जातात.या विषयावर अभ्यास करताना विविध प्रकारची माहिती गोळा करून विश्लेषणात्मक आणि तुलनात्मक पद्धतीने संशोधन करण्यात आले खालील माहिती व संशोधन पद्धती वापरण्यात आल्या

**माध्यमांचा अभ्यास:** पुस्तके , संशोधन निबंध ,वर्तमानपत्र अहवाल यांचा अभ्यास करून माहिती संकलित करण्यात आली

**तुलनात्मक पद्धत:** विविध देशांतील शांततेच्या प्रयत्नांची तुलना करून त्यांच्या यशस्वी धोरणांचा अभ्यास केला

**मुलाखती व संवाद:** काही अभ्यासक शिक्षण तज्ञ व सामाजिक कार्यकर्त्यांशी संवाद साधून त्यांच्या दृष्टिकोनातून माहिती मिळवली.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**ऑनलाइन स्त्रोतांचा वापर:** विविध आंतरराष्ट्रीय संस्थांच्या वेबसाईट शासकीय नेता वेळेस व डिजिटल ग्रंथालयांचा वापर करून अध्ययवत माहिती मिळवली. या संशोधन पद्धतीच्या आधारे निष्कर्ष काढण्यात आले, जे जागतिक शांतता व सहकारी वाढवण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.

**परिणामी चर्चा :-** आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि शांततेच्या प्रस्थापनेचा जागतिक स्तरावर फार महत्त्वपूर्ण परिणाम झाला आहे. विविध राष्ट्रांनी एकत्र येऊन अनेक आंतरराष्ट्रीय समस्या सोडवण्याचा प्रयत्न केल्यामुळे काही सकारात्मक व काही मर्यादित परिणाम स्पष्टपणे दिसून येतात.

1) **शांतता व सुरक्षा कायम ठेवण्यास मदत:** संयुक्त राष्ट्रसंघ आणि तत्सम संस्थांच्या माध्यमातून अनेक देशांमधील संघर्षांमध्ये मध्यस्थी करून युद्ध टाळले गेले आहे.

2) **मानवाधिकारांचा विस्तार:** आंतरराष्ट्रीय सहकार्यामुळे महिलांचे हक्क, बालकांचे रक्षण, अल्पसंख्यांकांचे अधिकार इत्यादींना आंतरराष्ट्रीयस्तरावर मान्यता मिळाली. मानवाधिकार उल्लंघन झाल्यास जागतिक दडपणाद्वारे सुधारणा घडवून आणली जाते.

3)**जागतिक संकटांना सामोरे जाणे:** कोविड-19 महामारी दरम्यान विविध देशांनी एकत्र येऊन वैद्यकीय मदत, लस निर्मिती व वितरण या बाबतीत सहकार्य केले. हवामान बदल, दहशतवाद, अणुशस्त्र प्रसार यांसारख्या जागतिक संकटांवरही संयुक्त प्रयत्न होत आहेत.

4) **सांस्कृतिक व शैक्षणिक आदान-प्रदान वाढले:** विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय देवाणघेवाण, सांस्कृतिक कार्यक्रम, भाषाशिकवणी आणि संशोधन यामुळे जागतिक समजूतदारपणा वाढतो आहे.

5) **अडथळे आणि मर्यादा:** काही देशांचे राजकीय हितसंबंध, राष्ट्रवाद, आर्थिक असमतोल आणि सत्ता संघर्षामुळे सहकार्याच्या प्रयत्नांना अडथळे येतात. शांतता प्रस्थापनेसाठी काहीवेळा केवळ आर्थिक किंवा तात्कालिक राजकीय हितसंबंध महत्त्वाचे ठरतात, ज्यामुळे दीर्घकालीन समाधान साधणे कठीण होते.

**निष्कर्ष**

आंतरराष्ट्रीय शांतता ही केवळ युद्ध टाळण्याची स्थिती नसून ती न्याय, मानवाधिकार, विकास, परस्पर सहकार्य आणि संवाद यांच्या आधारावर उभी राहिलेली मूल्याधिष्ठित संकल्पना आहे. विविध युगे, संघर्ष आणि ऐतिहासिक घडामोडी यावरून हे स्पष्ट होते की शांततेसाठी केवळ राजकीय करार किंवा लष्करी निर्बंध पुरेसे नाहीत, तर सामाजिक समावेश, आर्थिक समानता, सांस्कृतिक सहिष्णुता आणि विश्वासावर आधारित राजनैतिक यंत्रणा अत्यावश्यक असतात. संशोधनातून स्पष्ट होते की, संयुक्त राष्ट्रसंघ, आंतरराष्ट्रीय संस्था, प्रादेशिक संघटनांबरोबरच स्थानिक समुदाय, माध्यमे आणि शैक्षणिक संस्था ह्यांचीही शांततेच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका आहे. शांतता हे एक गुंतागुंतीचे आणि बहुआयामी उद्दिष्ट आहे जे विविध घटकांमधील समन्वयावर अवलंबून असते. दहशतवाद, अतिरेकी विचारधारा, भौगोलिक व राजकीय वर्चस्ववाद हे शांततेसाठी अजूनही मोठे अडथळे ठरत आहेत. त्यांच्यावर मात करण्यासाठी जागतिक पातळीवर सहकार्य, संवाद, सुसंवाद (diplomacy), आणि विश्वासार्ह आंतरराष्ट्रीय कायद्यांची गरज आहे. हे संशोधन दाखवते की, संघर्ष निवारणाची प्रक्रिया केवळ लष्करी वा सामरिक नसून ती अधिक मानवीकेंद्रित, संवादाधारित आणि विकासाभिमुख असावी लागते.विशेषतः आजच्या जागतिकीकरणाच्या युगात शांततेच्या मुद्द्याला केवळ राष्ट्रांच्या मर्यादेत ठेवता येत नाही. हवामान बदल, स्थलांतर, अन्न व पाणीसंकट, आणि माहिती युद्ध ही जागतिक आव्हाने शांततेला नव्या पातळीवर धक्का देत आहेत. म्हणूनच, शांततेकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक, एकात्मिक व समन्वयी असणे आवश्यक आहे. संशोधनातून हे ही लक्षात येते की, युवा पिढी, शिक्षण प्रणाली आणि नागरी समाज शांततेच्या संस्कृतीच्या प्रचारात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. त्यांच्या सामूहिक कृतीतून आणि सामाजिक संवादातून दीर्घकालीन शांतता साध्य होऊ शकते. शेवटी, हे म्हणता येईल की **आंतरराष्ट्रीय शांतता ही केवळ एक आदर्श नव्हे तर प्रत्येक राष्ट्राची आणि व्यक्तीची सामूहिक जबाबदारी आहे.** जागतिक पातळीवरच्या सहकार्याची साखळी जितकी मजबूत, तितकी शांततेची शक्यता अधिक दृढ होते. म्हणून, आंतरराष्ट्रीय सहकार्य, संवाद, मानवाधिकारांचे रक्षण आणि न्यायपूर्ण विकास यांचा समन्वय म्हणजेच खऱ्या अर्थाने शांततेची प्रस्थापना होय.

**संदर्भ**

या विषयावर संशोधन करताना व लेखन तयार करताना खालील संदर्भांचा उपयोग करण्यात आला:

1. **संयुक्त राष्ट्रसंघ (United Nations)** :- www.un.org
2. **युनेस्को (UNESCO)** :- www.unesco.org
3. **जागतिक आरोग्य संघटना (WHO)** :- www.who.int

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

4. **अंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) आणि जागतिक बँक (World Bank)**
   जागतिक आर्थिक सहकार्य, गरिबी निर्मूलन व विकास प्रकल्प यांसंदर्भातील माहिती.
5. **शैक्षणिक पुस्तके व संदर्भ ग्रंथ:**
   आंतरराष्ट्रीय संबंध व राजकारण - डॉ. सुधाकर जाधव
   संयुक्त राष्ट्रसंस्था आणि भारत - डॉ. एस.पी. कुलकर्णी
   संयुक्त राष्ट्रसंघ व आंतरराष्ट्रीय संबंध" – डॉ. सुभाष काशिनाथ ठाकूर
6. **शोधपत्रे व जर्नल लेख:**
   Google Scholar, आणि Academia.edu या संकेतस्थळांवरील संशोधन लेख.
7. **वर्तमानपत्रे व मासिके:**
   द हिंदू, इंडियन एक्सप्रेस , लोकसत्ता, आणि टाइम्स ऑफ इंडिया यांतील लेख आणि मुलाखती.
   वरील संदर्भांचा अभ्यास करून आंतरराष्ट्रीय सहकार्य व शांतता प्रस्थापनेबाबत सखोल माहिती मिळवण्यात आली व ती विश्लेषणासाठी वापरली गेली.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# उपयोजित शेतीचे ग्रामीण विकासातील महत्त्व

**स्वप्नील सारंगधर फोकमारे[1], डॉ.जे.डी.पोरे [2]**
[1]संशोधन अभ्यासक, डॉ.गोपाळराव खेडकर महाविद्यालय तेल्हारा
[2]P.hd मार्गदर्शक ,जी.एस.कोलेज खामगाव
**Email**-swapnilsfokmare@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170826
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8(I)
Pp. 119-122
August 2025

**सारांश**

जैविक तंत्रज्ञान, जैविक अभियांत्रिकी, ऊतीसंवर्धन यासारख्या नवीन शेती शाखांमुळे शेतीमध्ये आमूलाग्र बदल घडून येण्यास मोठ्या प्रमाणात मदत होईल. शेतीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढण्यास यामुळे साह्य मिळेल,शेतीमध्ये शेतीज्ञानाचा उपयोग विविध समस्या सोडविण्यासाठी करण्यात येऊन आर्थिक व सामाजिक विकासास चालना देण्यासाठी विविध पंचवार्षिक योजनांमध्ये फायक्याच्या शेतीला महत्त्व देण्यात आले. म्हणजेच उपयोजित शेतीला अग्रस्थान देण्यात आलेले दिसते. यामुळे शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल घडून येण्यास मदत झाली आहे.

**कीवर्ड** - हरितक्रांती, धवलक्रांती, पिवळीक्रांती, नीलक्रांती ,उपयोजित,जैविक तंत्रज्ञान, जैविक अभियांत्रिकी, ऊतीसंवर्धन

**Submitted:** 14 July. 2025
**Revised:** 30 July. 2025
**Accepted:** 15 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**उपयोजित शेतीचे स्वरूप :**

भारतीय शेतीच्या संदर्भात आढावा घेताना स्वातंत्र्यपूर्वकाळ आणि स्वातंत्र्योत्तर काळ असा कालखंड विचारात घ्यावा लागतो. स्वातंत्र्यपूर्व काळ हा ब्रिटिशांचा होता. ब्रिटिशांना भारतातून केवळ ठराविक कच्चा शेतमाल हवा होता आणि म्हणून शेती क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास होऊ नये. अशीच भूमिका ब्रिटिशांची राहिली. ब्रिटिशांचे धोरण हे शेती विकासाला प्रतिकूल होते. फाळणीनंतर भारताचा सुपीक भाग हा पाकिस्तानात गेला. भारतात निर्माण झालेल्या अन्नटंचाईच्या समस्येवर उपाय करण्यासाठी सरकारने शेतीविषयक धोरणात बदल करून १९४९ मध्ये शेती धोरणाचा उद्देश अन्नधान्य उत्पादनात स्वावलंबी होणे, तसेच वेगवेगळया उद्योगासाठी लागणारा कच्चा माल शेतीमधून उत्पादित करणे व शेतमालाची निर्यात करणे इ. वर लक्ष केंद्रित केले आणि भारतात अधिक धान्य पिकवा मोहीम सुरू करण्यात आली. वेगवेगळया पंचवार्षिक योजनांमध्ये सरकारने शेती विकासावर लक्ष केंद्रित केले आणि १९६६ मध्ये देशात हरितक्रांतीचा प्रयोग यशस्वी करण्यात आला. देशातील ग्राहकांना आवश्यक असणाऱ्या शेती उत्पादित वस्तू जसे दूध, भाजीपाला, अन्नधान्य कडधान्य, फळे इत्यादीच्या पुरवठ्यात वाढ करण्यात आली. शेतीमध्ये शेतीज्ञानाचा उपयोग विविध समस्या सोडविण्यासाठी करण्यात येऊन आर्थिक व सामाजिक विकासास चालना देण्यासाठी विविध पंचवार्षिक योजनांमध्ये फायक्याच्या शेतीला महत्त्व देण्यात आले. म्हणजेच उपयोजित शेतीला अग्रस्थान देण्यात आलेले दिसते. यामुळे शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल घडून येण्यास मदत झाली आहे. यामध्ये शेतीला पाणी, खत पुरविण्याच्या सोयींबरोबरच सुधारित बियाणे, किड नियंत्रण, पीक संरक्षणाबाबत शेतकऱ्यास मार्गदर्शन, अधिक शेती उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी पीक स्पर्धाचे आयोजन, यासारख्या घटकाचा समावेश करण्यात आला. १ जानेवारी १९६५ मध्ये भारतीय अन्नधान्य महामंडळाची स्थापना करण्यात आली.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*स्वप्नील सारंगधर फोकमारे, संशोधन अभ्यासक, डॉ.गोपाळराव खेडकर महाविद्यालय तेल्हारा*

**How to cite this article:**
*फोकमारे, . स्वप्नील . सारंगधर ., & पोरे, . जे . डी . (2025). उपयोजित शेतीचे ग्रामीण विकासातील महत्त्व. Journal of Research & Development, 17(8(I)), 119–122.* https://doi.org/10.5281/zenodo.17115969

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17115969
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

ऊस, जूट, कापूस, गळिताची पिके यासारख्या रोखींच्या पिकांना चालना देण्यात आली. १९६३ मध्ये शेतीपुनर्वित्त महामंडळाची स्थापना करण्यात आली. हे महामंडळे, शेती, पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि मत्स्य व्यवसाय मत्स्यशेतीला मध्यम व दीर्घ कालीन कर्जपुरवठा करण्यात आला. ग्रामीण भागात दुग्ध विकास विकसित करण्यासाठी पशुपालनाची सोय, पशुपालन, पहुंची पैदास व सहकारी खरेदी संघ स्थापन करण्यास सरकारने प्रोत्साहन व आर्थिक बळ उपलब्ध करून दिले आहे. शेतीशी संबंधित वनविकास कार्यक्रम, वृक्षरोपण, वनसंरक्षणवनशेती, वनसंशोधन व वनावर आधारित उद्योगास चालना देण्यासाठी सामाजिक वनीकरणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. उत्पादित शेतमालावर प्रक्रिया करण्यास प्रक्रिया केंद्राची स्थापना करण्यास प्रोत्साहन देण्यात आले आहे. उदा. तेलबियापासून तेल व्यवसायास चालना, विविध फळांवर, प्रक्रिया करून दुय्यम स्वरूपाचा शेतमाल, दुधावर प्रक्रिया करून त्यापासून अन्य उत्पादने, नरम लाकडापासून गवतापासून पेपर व इतर उत्पादने घेण्यावर भर वगैरे. हरितक्रांती, धवलक्रांती, पिवळीक्रांती, नीलक्रांती या क्रांत्या शेतीमध्ये अर्थात कृषी शेती करत असतानाच इतर संलग्न व्यवसायांना स्वतंत्र व्यवसाय दर्जा दिल्यामुळे घडून आल्या आहेत. शेतीविषयक शिक्षण आणि संशोधन अत्यंत महत्त्वाचे आहे. हे संशोधन व शिक्षण शेतकऱ्यास उपलब्ध करून दिल्यास नक्कीच त्यांच्या दृष्टिकोनात बदल घडून येऊन आर्थिक विकासाला वेगाने चालना मिळेल. या दृष्टीने संपूर्ण शेती यासंकल्पनेचा अर्थ सर्व शेतकऱ्यास माहीत असायला हवा. म्हणजे शेतकरी उपयोजित शेतीचा स्वीकार करून आपल्या उत्पन्नात बदल घडून आणेल. सध्या देशाची आर्थिक-सामाजिक स्थितीत बदल घडवून आणण्याची गरज आहे आणि ती या उपयोजित शेतीच्या माध्यमामधून नक्कीच होईल.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

1. शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
2. शेतकऱ्यांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
3. शेतकऱ्यांनी वापरलेल्या आदानांचा अभ्यास करणे,
4. शेतकऱ्यांचे धारण क्षेत्र व जमिनीची उत्पादकता याचा अभ्यास करणे.
5. अल्पभूधारकता निर्माण होण्याची कारणे अभ्यासणे,

**संशोधनाची गृहितके :**

1. शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होतांना दिसत नाही.
2. शेतकऱ्यांच्या सामाजिक जीवनाचा स्तर निम्न आहे.
3. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होतांना दिसून येत नाही.
4. शेतकरी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करत नाहीत.
5. शेतकऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी सामाजिकशास्त्रातील संशोधन पद्धतीनुसार सर्वेक्षणात्मक तसेच विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल

**उपयोजित शेतीचे महत्त्व**:

**१) शेतीबाबत नवीन तंत्राचा अवलंब**

जैविक तंत्रज्ञान, जैविक अभियांत्रिकी, ऊतीसंवर्धन यासारख्या नवीन शेती शाखांमुळे शेतीमध्ये आमूलाग्र बदल घडून येण्यास मोठ्या प्रमाणात मदत होईल. शेतीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढण्यास यामुळे साह्य मिळेल, नव्हे मिळत आहे. मोठे शेतकरी या नवीन तंत्रावर अवलंब करून घेण्यास उत्सुक आहेत.

**२) शेती आधारित उद्योगांचा विकास** :

कृषी शेती करीत असताना निसर्गावर पूर्णपणे भारतीय शेतकरी अवलंबून आहे. अशा वेळी त्याच्या पदरी कधी निराशा पडण्याची शक्यता असते. शेतकरी तोट्यात जातो. पूर्णपणे निराश होतो. कृषी संलग्न इतर उद्योगात शेतकरी सहभागी होत आहे. (कृषी) जमीन कसत असतानाच शेतकरी पशुपालन, दुग्धव्यवसाय, फलोद्यान, कुक्कुटपालन, रोपवाटिका तयार करणे यासारख्या व्यवसायात रस घेत आहे. मत्स्य शेतीही करणारे शेतकरी आहेत. एकूण वार्षिक उत्पादनात व उत्पन्नात भर कशी पडेल याचा नक्कीच विचार शेतकरी करताना दिसतो.

**३) नवीन संशोधनात वाढ :**

शेतकी विज्ञानामुळे आणि शेतकी शास्त्रज्ञांमुळे मोठ्या प्रमाणात शेती क्षेत्रात वेगवेगळया क्षेत्रात संशोधन होत आहे. शेतकरी स्वतः शेतीत नवीन संशोधन करण्यास प्रोत्साहित होत आहेत, शेतकी शास्त्रज्ञसुद्धा मोठे योगदान देत आहेत. मासिके, सभा, चर्चासत्रे, शेतकऱ्याशी संवाद यामाध्यमातून शाखज्ञांनी केलेले संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत असल्यामुळे शेतीसंलग्न व्यवसायाचे आर्थिक विकासात उत्पन्न वाढविण्यासाठी मदत होत आहे.

**४) देशात शेतीला अग्रस्थान**

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

शेतीतून निघणारे उत्पादन त्याला व्यापारी देत असलेली किंमत यामुळे शेती क्षेत्र हळूहळू पाठी पडल आहे. लोकांचा कल मोठ्या प्रमाणात औद्योगिक व सेवा क्षेत्राकडे जात आहे. मात्र नवीन संशोधन, शेतकी विज्ञान, हायटेक ॲग्रीकल्चरकडेही मोठ्या प्रमाणात सुशिक्षितांचे प्रमाणही बाढत आहे. त्यामुळे लवकरच भविष्यात पुन्हा एकदा देशात शेतीला अग्रस्थान मिळण्यास मदत होईल. यासाठी उपयोजित शेती महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

**५) व्यावसायिकतेत वाढ / व्यवसायभिमुख शेतीत वाढ :**

उपयोजित शेतीचा अर्थच मुळात फायद्यासाठी व्यवसायरूप शेती करणे. औद्योगिकीकरणात फायद्याचा विचार केला जातो. तोच विचार आज शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होत आहे. प्रक्रिया उद्योगात प्रामुख्याने याचा जरूर विचार केला जात आहे. यामुळे कच्च्या शेतमालाला मोठी मागणी मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहे. यामुळे व्यवसायभिमुख शेतीत वाढ होताना दिसते. उपयोजित शेतीची यामध्ये महत्त्वाची भूमिका आहे.

**६) शेतकी उत्पादनात वाढ :**

उपयोजित शेतीमुळे फलोद्यान, पशुपालन, दुग्धव्यवसाय, मत्स्यशेती, रेशीम किडे, संगोपन इतर कुटीरोद्योग, गळिताची पिके यासारख्या शेती उत्पादनात आमूलाग्र बदल घडून आला आहे. मत्स्य शेतीमध्ये मोत्याची शेतीची कल्पना लोकप्रिय होण्यास मोठा वाव निर्माण झाला आहे. एकूण काय तर मोठ्या प्रमाणात शेतकी उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होण्यास उपयोजित शेती महत्त्वाची ठरत आहे.

**७) किंमत स्थिर राहण्यास मदत :**

शेतमालावर मोठ्या प्रमाणात प्रक्रिया होत असल्यामुळे काळ टिकणारा दुय्यम स्वरूपाचा माल तयार होतो. हंगाम नसला तरीही हव्या असलेल्या उत्पादनाची चव चाखता येते. यामुळे मोठ्या प्रमाणात प्रक्रियेसाठी शेतमालाला मागणी असते. सतत मागणी असल्यामुळे उत्पादकाचे नुकसान होत नाही. हंगामात अतिरिक्त शेतमाल बाजारात आला तरीही किमतीत फारसा चढ-उतार होत नाही. यामुळे किंमत स्थिर राहण्यास मदत होते. शेतकऱ्यांचाही मोठ्या प्रमाणात फायदा होतो. नक्कीच याचे श्रेय उपयोजित शेतीकडे जाते. उदा. द्राक्ष ह्यापासून मनुका, वाईन मोठ्या प्रमाणात तयार करता येते. ऊस, उसावर प्रक्रिया करून साखर, गूळ, गुरांची वैरण, पेपर कारखाना, जैविक इंधन यासारखी उत्पादने मिळतात. वगैरे,

**८ ) उत्पादन सातत्य :**

शेतमालास मागणी असेल तर किंमत स्थिर राहण्यास मदत होते. एखाद्या शेतमालाला विक्रीभाव चांगला मिळत असेल, मागणीही असेल अशा वेळी उत्पादक आपल्या शेतातून उत्पादन काढण्यास कचरत नाही. मागणी व किंमत स्थैर्य यामुळे शेतकरी आपल्या शेतातून सतत तेच उत्पादन काढतो. प्रसंगी अधिक उत्पादन घेण्याचे धैर्यही दाखवतो. हे केवळ उपयोजित शेतीमुळे शक्य झाले आहे.

**१०) वर्षभर रोजगार निर्मिती :**

उपयोजित शेती म्हणजे फायक्यासाठी केलेली शेती. यामुळे नवीन नवीन शेती प्रयोग व उपक्रम राबविण्यास शेतकरी सज्ज झाला आहे. कृषी शेती करीत असतांना पिकाला असलेल्या मागणीचा विचार केला जात आहे. केवळ कृषी शेती न करता उपयोजित शेतीच्या संकल्पनेत येणाऱ्या शक्य तितक्या घटकांचा व्यवसायिकतेच्या दृष्टिकोनातून विचार केला जाऊन त्यापासून उत्पादनही मोठ्या प्रमाणात घेण्याचा विचार होत आहे. उपयोजित शेतीमध्ये विविध स्वरूपाच्या कामासाठी कुशल-अकुशल श्रमिकांची मोठ्या प्रमाणात मागणी असते, यामुळे कुशल अकुशल श्रमिकांना रोजगाराची संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. (उदा. दुग्धव्यवसाय, सर्व प्रकारचे प्रक्रिया उक्योग, प्रयोगशाळा वगैरे) वर्षभर रोजगार निर्मितीसाठी उपयोजित शेती महत्त्वपूर्ण कामगिरी बजावत आहे.

**११) दरडोई उत्पन्नात वाढ :**

भारतीय शेतीही देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत समजला जातो. एकूण लोकसंख्येपैकी ६७% ग्रामीण जनता ही कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. उपयोजित शेतीमध्ये प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अवलंबून असणाऱ्यांची संख्या ८०% च्या जवळपास आहे. दरडोई उत्पन्न वाढवण्यास उपयोजित शेतीची भूमिका महत्त्वाची मानली जात आहे.

**१२) माती व पाणी व्यवस्थापनाचा विकास :**

वनस्पतींच्या वाढीसाठी अतिरिक्त पाण्याची गरज नसते. योग्य प्रमाणात पाण्याचा पुरवठा शेतीस केल्यास शेतीतील क्षारांचे प्रमाण वाढत नाही. जमिनी निकृष्ट होत नाहीत. म्हणून पिकांचे स्वरूप पाहून त्याप्रमाणे आधुनिक पिकांना पाणी देण्याच्या पद्धतीचा वापर करणे गरजेचे आहे. तुषार सिंचन व ठिबक सिंचन पद्धतींचा वापर आवश्यकतेनुसार शेतकरी करीत आहेत. त्यामुळे उत्पादन खर्चात मोठ्या प्रमाणात बचत होत आहे. जमिनीचा सामू (PH) निर्देशांक आहे. हा जमिनीचा रासायनिक गुणधर्म असून जमीन अल्कली किंवा आम्लधर्मीय आहे. याचे आकलन होते. या निर्देशकांचे मापन ० ते १४ असे असते. मध्यबिंदू ७ जमीन तटस्थ तर ० ते ७ जमीन आम्लतायुक्त, ७ ते १४ अल्कता असे हे मापनाचे आकडे दर्शवीत असतात. मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी माती नमुना पृथक्करण अहवालात आम्ल विम्ल निर्देशांक ६ पेक्षा कमी असल्यास आम्लयुक्त ६.१ ते ८.५ सर्वसाधारण ८.६ ते ९ पर्यंत विम्ल होण्याच्या मार्गावर व ९.१ पेक्षा अधिक विम्लयुक्त असे वर्गीकरण करण्यात आले आहे. सर्वसाधारण परिस्थितीत सामू ५ ते ८.५ मध्ये असतो. लोकांना / शेतकऱ्यांना या जमीन घटकाची हळूहळू माहिती होऊ लागली आहे. त्यामुळे जमिनीच्या गरजेच्या दृष्टीने नत्र, स्फुरद, पालाश हे कमी-अधिक प्रमाणात घटक असतील तर त्यानुसारच माती परीक्षण करून जमिनीला ते विशिष्ट गरजू घटकच पुरविले जात आहेत. त्यामुळे

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

जमिनीचा पोत सुधारून जमिनीतून अधिक उत्पादन येण्यास मदत झाली आहे. उपयोजित शेतीमध्ये माती व पाणी व्यवस्थापनाचा विकास झाल्याने उत्पादन वाढण्यास मदत झाली आहे.

**भारतातील बियाणे उद्योगः**

भारत हा एक शेतीप्रधान देश असून येथे बियाणे उद्योगाला खूप मोठा वाव आहे. गहू आणि भात या पिकांचे उत्पादन वाढीमुळे देशात हरितक्रांती होण्यास मदत झाली. आपल्या देशातील गहू बियाण्याची आवश्यकता ३.१२ दशलक्ष टन एवढी आहे. परंतू यापैकी ९१% (म्हणजेच २.९ दशलक्ष टन) बियाणे शेतकरी स्वतःकडील बियाणे वापरतात. फक्त ९% म्हणजेच ३ लक्ष टन एवढे चांगले बियाणे उत्पादीत केले व वापरले जाते. तसेच भाताचे १.३ दशलक्ष टन बियाणे आवश्यक असताना फक्त २ लक्ष टनच (एकूण आवश्यकतेच्या १५% एवढेच आहे.) बियाणे वापरले जाते.

**अ) भारतातील काही महत्वाच्या पिकांच्या बियाण्याची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.**

मुख्यतः मका, बाजरी आणि ज्वारी यांचा एकूण बियाणे व्यापारातील हिस्सा अनुक्रमे ५९, ६४ आणि ७० % इतका आहे. देशातील फुले व भाजीपाला बियाण्याचा हिस्सा हा ६३२ टन म्हणजेच अंदाजे १६८८ दशलक्ष रुपये इतका आहे. नजीकच्या भविष्यात बियाणे उद्योगाचा व्यापार खूप पटींनी वाढणार आहे. याचे मुख्य कारण म्हणजे सुधारीत आणि संकरीत बियाण्याचे उत्तम वाण बाजारामध्ये उपलब्ध होत आहेत. तसेच बियाणे कायदा सुद्धा खूपच सुलभ आणि सोपा करण्यात आला आहे.

**ब) भारतातील बियाणे व्यापार, आयात आणि निर्यातः**

भारतातील बियाणे उद्योग हा अंदाजे रु. ४०० कोटींचा आहे. यामध्ये शासकीय / सरकारी संस्थांचा वाटा ४० % तर खाजगी बियाणे कंपन्यांचा वाटा ६०% इतका आहे. भारतातील बियाणे क्षेत्रात अंदाजे ४०० विविध खाजगी कंपन्या कार्यरत असून यातील फक्त ३३ % या मोठ्या राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत. १३% कंपन्या मध्यमवर्गीय तर ४४ % कंपन्या या असंघटीत बियाणे व्यापारी, उत्पादक संस्था आहेत, ज्यांच्याजवळ त्यांची स्वतंत्र संशोधन प्रणाली नाही. हल्ली भारतीय बियाणे क्षेत्राची वेगाने भरभराट होत आहे. त्यामुळे सर्व जगातील बियाणे उद्योग भारताकडे मोठ्या बियाणे बाजारपेठेच्या दृष्टीने बघत आहे. भारतात मुख्यत्वेकरुन फुले आणि भाजीपाला बियाण्यांची अंदाजे १००० कोटी रुपयांचे परकीय चलन खर्च होते. भारतातील ओलीताखालील आणि लागवडीखालील क्षेत्राचा विचार केला तर भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. त्याचप्रमाणे भारताला वैविध्यपूर्ण हवामान लाभलेले आहे की ज्यामध्ये सर्व प्रकारच्या शेतपिकांचे व फळपिकांचे उत्पादन सहज घेता येऊ शकते. ज्या पिकांच्या बियाण्यांची आपण निर्यात करु शकतो त्यामध्ये संकरीत भात, कपाशी, सुर्यफूल, बाजरी, ज्वारी, चारा पिके, फुले आणि भाजीपाला पिकांचे बियाणे यांचा समावेश होतो. त्यापासून जवळपास रू. ६०० ते ७०० कोटी रुपयांचे परकीय चलन प्राप्त होते.

**शुद्ध बियाण्याचे महत्वः**

शेतीचे उत्पादन अनेक गोष्टींवर अवलंबून असून यामध्ये जमीन, पाणी, हवामान, खते, पिक संरक्षण, आंतर मशागत आणि वापरण्यात येणारे बियाणे या बाबींचा मुख्यत्वेकरुन समावेश होतो. इतर घटकांच्या तुलनेत बियाण्यावर फारच कमी खर्च होतो. यासाठी वापरण्यात येणारे बियाणे शुद्ध आणि चांगल्या प्रतीचे असल्याशिवाय खते, पाणी, आंतर मशागत या बाबींवर केलेल्या खर्चाचा पुरेपूर मोबदला मिळत नाही. बियाणाचे महत्व संत तुकाराम महाराजांनी "शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी" या ओवीत सांगीतले आहे म्हणूनच शुद्ध आणि चांगल्या प्रतीच्या बियाण्यांचे उत्पादन वाढविणे गरजेचे आहे. बियाणे पेरणीसाठी वापरताना त्याची उगवणक्षमता, अनुवंशिक आणि भौतिक शुद्धता याबाबत काळजी घेणे आवश्यक असते. जर बियाण्याची उगवणक्षमता आणि शुद्धता न तपासता बियाणे पेरणीसाठी वापरल्यास त्याची उगवण चांगली होत नाही किंवा त्याचा जोम कमी असतो. त्यामुळे अपेक्षित उत्पादन मिळत नाही. काही शेतकरी त्यांच्याकडे उपलब्ध असलेले मागील हंगामातील धान्य पेरणीसाठी वापरतात. धान्य आणि बियाणे यातील मुख्य फरक म्हणजे बियाणे शुद्ध आणि उगवणक्षम असते तर धान्य म्हणून वापरलेले बियाणे उगवणक्षम आणि शुद्ध असतेच असे नाही. म्हणून पेरणी करताना शेतकऱ्यांनी चांगल्या प्रतीचेच बियाणे वापरले पाहिजे, तरच अपेक्षीत उत्पादन मिळू शकेल.

**संदर्भ सूची**

1. भारतीय अर्थव्यवस्था, कै. डॉ. स. श्री. मु. देसाई, डॉ. सौ. निर्मल भालेराव, निराली पुणे.
2. भारतीय अर्थशास्त्र, दत्त आणि सुंदरम्, एस. चंद. कंपनी लि. नवी दिल्ली.
3. कृषी अर्थशास्त्र, डॉ. निता वाणी, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव,
4. कृषी अर्थशास्त्र, डॉ. विजय कवी मंडन, मंगेश प्रकाशन, नागपूर,
5. कृषी अर्थशास्त्र, डॉ. एस. बो. कटमुसरे, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर.
6. कृषी अर्थशास्त्र, भारतातील शेती व्यवसाय, कै. डॉ. स. श्री. मु. देसाई, डॉ. सौ. निर्मल भालेराव, निराली प्रकाशन पुणे,

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025


Original Article

# नाशिक जिल्ह्यातील आदिवासी कोकणा बोलीतील म्हणी : एक अन्वयार्थ


**सुभाष नारायण कामडी[1], धनराज तोताराम धनगर [2]**

[1]संशोधक विद्यार्थी,म. गांधी विद्यामंदिर संचलित,

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मनमाड ता. नांदगाव, जि. नाशिक

[2]संशोधन मार्गदर्शक व सहाय्यक प्राध्यापक,

मराठी विभाग, महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित,कला व वाणिज्य महाविद्यालय, येवला ता. येवला, जि. नाशिक

**Email-**dr.dhanrajdhangar@gmail.com



**Manuscript ID**:

JRD -2025-170827

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 8(I)

Pp. 123-128

August 2025



**सारांश**

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी कोकणा बोलीतील म्हणी या आदिवासी समाजाच्या जीवनानुभवातून, श्रमसंस्कृतीतून आणि निसर्गाशी असलेल्या निकटच्या नात्यातून निर्माण झालेल्या आहेत. या म्हणींमध्ये भूक, दारिद्र्य, संघर्ष, परस्पर सहकार्य, श्रमाप्रती निष्ठा आणि मानवी प्रवृत्ती-प्रवृत्तींचे प्रतिबिंब दिसते. कमी शब्दांत गहन अर्थ व्यक्त करण्याची शैली, बोलीभाषेचा गोडवा आणि अनुभवांचे शहाणपण ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. काही म्हणी सर्वसामान्य समाजातही प्रचलित आहेत, तर काही अस्सल कोकणा बोलीतून आलेल्या असून त्या स्थानिक संस्कृतीचा आणि लोकजीवनाचा जिवंत दस्तऐवज ठरतात.



**मुख्यसंज्ञा:** आदिवासी कोकणा बोली, म्हणी, लोकसाहित्य, श्रमसंस्कृती, जीवनानुभव, निसर्ग, मानवी प्रवृत्ती, बोलीभाषा.

**Submitted:** 14 July. 2025

**Revised:** 30 July. 2025

**Accepted:** 15 Aug 2025

**Published:** 30 Aug. 2025


**प्रास्ताविक**

महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यात प्रामुख्याने आदिवासी कोकणा जमात मोठ्या प्रमाणात आढळते. आदिवासी जमातीचे लोक डोंगराळ भागात, दऱ्याखोऱ्यात, कडेकपारीत, व घनदाट अरंण्याच्या सानिध्यात वस्ती करून गुण्यागोविंदाने राहतात. आदिवासी संस्कृती हा जीवनाचा पाया मानून अतिदुर्गम भागातील आदिवासी बांधव आपले जीवन संस्कारशील पद्धतीने जगत आले आहेत. जुन्या रूढी, परंपरा जपत श्रम, समूह आणि सहकार्य याच मानवी जीवनमुल्यांच्या आधारे आपला जीवन व्यवहार करतात. हे करत असताना जुन्या रूढी, परंपरेनुसार पिढ्यानपिढ्या जपत आलेली संस्कृतीचे जतन संवर्धनाबरोबरच लोकसाहित्यातील मौखिक परंपरेने चालत आलेल्या म्हणींचा अमूल्य खजिना हा आजही त्यांनी जपलेला आहे. या म्हणींचा समाजभाषेच्या अंगाने असलेला अन्वयार्थ समजून घेता येतो. लोकसाहित्यातील म्हणी, आणि वाक्पप्रचारांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. उखाणे, आहाणे, कोडी, हे शब्दधन लोकसाहित्यातील अनमोल रत्न आहे. सार्वजनिक जीवनात वावरताना न्याय, समता, सचोटी आत्मीयता ही मानवी संस्कारशील जीवनमूल्ये श्रम संस्कृतीच्या आधारे जपताना लोकजीवनाच्या दृष्टीने वाक्प्रचार आणि म्हणी देखील खूप महत्त्वाच्या असतात. त्या लोकमान्यतेनुसार बोली भाषेतून रूढ होताना दिसतात. कमीत कमी शब्दांत मोठा आशय मांडण्याची शैली आणि बोलण्याची लकब हे वाक्प्रचार व म्हणींचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असते.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**

*सुभाष नारायण कामडी, संशोधक विद्यार्थी,म. गांधी विद्यामंदिर संचलित, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मनमाड ता. नांदगाव, जि. नाशिक*



Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17115989

OPEN ACCESS

**How to cite this article:**

*कामडी, . सुभाष . नारायण ., & धनगर, . धनराज . तोताराम . (2025). नाशिक जिल्ह्यातील आदिवासी कोकणा बोलीतील म्हणी : एक अन्वयार्थ. Journal of Research & Development, 17(8(I)), 123–128.* https://doi.org/10.5281/zenodo.17115989

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

महत्त्वाचा अर्थ व्यक्त करण्याची क्षमता म्हणी आणि वाक्प्रचारात असते. यातून लोक जीवनातील अनुभवांचे प्रतिबिंब पाहायला मिळते. म्हणी बद्दल लोकसाहित्याचे अभ्यासक, समीक्षक डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात, "म्हणी तर अनुभवाच्या खाणी असतात. अत्यंत कमी शब्दात केलेल्या जीवनावरच्या भाषेच्या स्वरूपाह्या त्या असतात."१

प्रा. राजकुंवर सोनवणे लिहितात, "सर्वांच्या बोलण्यात सतत येणारे चिमुकले बोध प्रबोध व सर्व सामान्य वचन म्हणजे म्हण जुन्या जाणकार लोकांच्या जीवनाच्या कसोटीला चालता, बोलता म्हणी उतरलेल्या असत."२

लोकसाहित्याच्या अभ्यासिका डॉ. पुष्पा गावित म्हणतात, "लोककथेबरोबरच आदिवासी लोकसाहित्याचे दालन म्हणींनी समृद्ध झाले आहे. भोवतालच्या परिसरात जेवढे ज्ञान मिळते तेवढे म्हणी व बोलीतून समृद्ध झालेले आहे."३

थोडक्यात बोलताना सहजपणे म्हणी वापरून आपले म्हणणे पटवून देता येते. म्हणजेच म्हणींमध्ये कमी शब्दात गहन अर्थ दडलेला असतो. आदिवासी लोकजीवनातील अनुभवाची शिदोरी ही व्यक्तीच्या जीवनाच्या परंपरेनुसार हस्तांतरित होताना दिसते. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी कोकणा बोलीतूनदेखील म्हणींचे हे समृद्ध भांडार अनुभवता येते. उदाहरणादाखल येथे काही नमुनेदार म्हणी दिलेल्या आहेत. यावरून कोकणा आदिवासी बोलीची समृद्धी आणि प्रगल्भता लक्षात येईल. त्यानुषंगाने खालील काही म्हणी पाहता येतील.

**'हाताला पाची बोटे सारखीच नसतात' :**

सार्वजनिक जीवनात वावरताना समाजातील सर्वच माणसं सारखी नसतात. प्रत्येकच क्षेत्रात भिन्नता दिसून येते. सामाजिक, आर्थिक तसेच मानसिक पातळीवर ही भिन्नता, कमी-अधिकपणा अनुभवता येतो. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' असेही या संदर्भात म्हटले जाते. प्रत्येक माणसाच्या सवयी वेगवेगळया असतात. उदा. नुसत्या बोलण्याच्या सवयीबद्दल म्हणायचे तर काही हळुवार विचार करून बोलतात, काही तोंडावर पटकन बोलून जातात. काही बोलून मग विचारात पडतात, अडखळत बोलणे, बडबड्या स्वभाव, कमी बोलणे अशा प्रकारच्या स्वभावाची माणसं आदिवासी जमातीत मोठ्या प्रमाणात आहेत. कमी बोलायचे पण महत्त्वाचेच बोलायचे हा एक संस्काराचा गुण आहे. जास्त बोलणाऱ्याची समाजात किंमत केली जाते, हे समाजात चालत आले आहे. याविषयीदेखील वरील म्हणीतून भाष्य केलेले दिसते. लोक साहित्याच्या अंगाने म्हणी विषयी संशोधन करताना आदिवासी कोकणांच्या लोक व्यवहारात प्रचलित असलेल्या पुढील काही म्हणी आढळतात.

**लाजला तो भूक निजला –**

जो माणूस खायला लाजतो तो नेहमीच उपाशी राहतो. या अर्थाची ही म्हण एखादा माणूस पहिल्यांदाच दुसऱ्याच्या घरी पाहुणा म्हणून जातो. बडबड चावळतो, पण जेवणाच्या वेळी खायला लाजतो, पाहुण्यांला "आजून सोदून पाहाजोस" असे घरमालक, मालकीनल सांगतो. मग मालकीन आग्रहाने ईचारते, "घ्या काय लागील ती पदरचे हाताने वाढून घ्या. सगळा समोर सगळा ठवलाय, लाजाय नाय, लाजला तो उपाशी निजला." अशी सांगते. त्या अर्थाची ही म्हण आहे.

**खेकडागत थुका भिजवून जगाय -**

आर्थिक परिस्थितीच गरीबीची असल्यामुळे दुसरा कोणताही पर्याय नाही. या अर्थाची ही म्हण. आदिवासी डोंगराळ भागात शेती मातीत मोल मजुरी करून जीवन जगणाऱ्या माणसाच्या घरात फक्त धान्य, भांडी आणि मोठी धन म्हणून ढोरं असतात. त्यामुळे आहे त्या गोष्टीत समाधान मानून जास्त संपत्तीबद्दल कोणताही गर्व नसतोच. त्यामुळे "मिळला ती खालाय अन् जगलाय, खेकड उन्हाळयात जमिनीत सवताचे थुक्यावर जगताय, आपले तर माणसा आहु, काहा नाय जगजण?" अशी शिकवण शहाणी माणसं लहान पोरांना देतात. यात खेकड हे गरीबीचे प्रतीक आहे. थुका हे समाधानाचे, तर भिजवून हे बेतलेल्या परिस्थितीचे प्रतीक आहे असा अर्थ म्हणीत सामावलेला आहे.

**येडी गाय काटी खाय अरदा डोंगर चढत जाय –**

मानवी समुहमन, वर्तवणूक, कामाचा पूर्णपणे अनुभव नसलेली व्यक्ती एखाद्या मोठमोठ्या गोष्टीवर वायफळ चर्चा करते. आदिवासी भागातील खेडूत श्रमजीवी तरुणाला शेती मातीत राब राबून जगल्याशिवाय पर्याय नसतो. मात्र त्याचे मन विरुद्ध दिशेने भरकटलेले असते. "सवताला काय काम करावे हे सुचत नाय, पण प्रगतिशील व्यक्तीच्या सहवासात गेल्यावर डोंगरा, होडल्या मोठ्या गप्पा सूचत असतात." मग प्रगतिशील माणूस त्याला सांगतो, "आदी सवताचे परिस्थितीचा पाय, मग मोठ्या डोंगरा होडल्या गप्पा कर. आमी प्रगतीचा डोंगर आदीज चहडून गेलुय, अजून तुजी सुरुवात पण झाली नाय. मग "येडी गाय काटी खाय अरदा डोंगर चढत जाय" अशी म्हण रूढ झाली आहे. यात येडी गाय म्हणजे जनावरा प्रमाणे मनाने सैरावैरा भरकटलेला माणूस, काटी खाय म्हणजे दिशाहीन झालेला, अरदा डोंगर हे सवताचे भान विसरून गेले आहे. असा अर्थ म्हणीत सामावलेला आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**घरी नाय दाना अन् बाबुराव म्हणा –**

"घरात खायला अन्न नाही मात्र तरीही बाहेर फुशारकी मारत मोठेपणा मिरवत राहणार्याला उद्देशून ही म्हण वापरली जाते. आदिवासी भागातील वाड्या पाड्यावर गरीब परिस्थितीमुळे लोकांना जीवन जगण्यासाठी नेहमी संघर्षच करावा लागतो हेदेखील यातून लक्षात येते. या यात अन्नाचा दान नसलेले घर हे दारिद्र्याचे प्रतीक आहे तर व बाबुराव हे धनाढ्य माणसाचे प्रतीक आहे.

**खायला वाघ कामाला कोला –**

एखादा माणूस जास्त खातो पण त्याला काम जास्त होत नाही. आदिवासी भागातील लोकांचे जीवन शेती व मोल मजुरीवर अवलंबून आहे. सगळीच माणसं शरीराने बळकट असली तरी कष्टाचे काम सर्वच चलाखीने करतील असे नाही. काही माणसे अंगाने बळकट असली तरी त्यांना हडकुळी माणसं कामाला मागे टाकतात. मग "खायला नाही म्हणत नाय, मग कामाला मागे का?" असा प्रश्न निर्माण होतो. त्या अर्थाने ही म्हण पुढे आली आहे. यात वाघ हे ताकद, आत्मविश्वास याचे प्रतीक आहे. तर कोला (कोल्हा) हे आळशी, कामचुकार व्यक्तीचे प्रतीक आहे.

**वसरीवर जागा दिली तं चुल्याशी सरकत आला -** एखाद्या व्यक्तीला थोडी मदत केली तर जास्त मदतीची अपेक्षा करतो. सार्वजनिक जीवनात श्रम, समूह आणि सहकार्याने काम करत एकमेकांना मदत करून काम पूर्ण होते. पण कधीकधी एखाद्याला अचानक कामात मदत केली तर त्याचा गैरफायदा घेतला जातो. यात वसरी हे आश्रयाचे प्रतीक आहे. तर चुला हे अवास्तव अपेक्षेचे प्रतीक आहे. मराठीतील भटाला दिली ओसरी भट हात पाय पसरी. किंवा ऊस गोड लागला म्हणून मुळासकट खाणे या अर्थाच्या म्हणीसारखी 'वसरीवर जागा दिली तं चुल्याशी सरकत आला' ही म्हण आहे.

**धोद्यात दाना कोळी ऊताना -** धोदी म्हंजे मोठी डवली, मराठीत त्याला भोपळा असे म्हणतात. तर कोळी म्हणजे भिंतीला घर करून राहणारा बारीक किटक. आदिवासी कोकणा बोलीत '(वाग्या) सांगत्याय सवताल अन राहायला चांगले घर नाय, घरात कुडाला, वाड्याला सगळेच ठिकाणी कोळीने जाळे विनलेले आहे, स्वच्छता नाय, म्हणजे कोळीचे राज्य आहे. पण बाहेर मात्र मोठमोठ्या गप्पा करणे." असा त्याचा अर्थ म्हणीत सामावलेला आहे. वरील घरात नाही दाणा, मला बाजीराव म्हणा या म्हनीसारखीच ही म्हण आहे.

**वागणी तशी भोगणी –**

कर्माचे फळ वर्तणुकीवर अवलंबून आहे या अर्थाची ही म्हण आहे. सार्वजनिक जीवनात वावरताना न्याय, समता, सचोटी, आपपरभाव ह्या सदगुणांवर समाजाची व्यक्तीकडे पाहण्याची दृष्टी तयार होत असते. असे असले तरी समाजात सगळयाच जास्त निंदा करणारे लोक, दुसऱ्याच्या प्रगतीवर जळणारे लोकही आढळतात. अशावेळी शहाणी माणसं म्हणतात, "कोणी निंदा, कोणी वंदा, पण आमी आयकून घेणे हाच आमचा धंदा." याच नियमाने ते पुढे चालत राहतात. ज्याच्या कर्माचे फळ ज्याला त्याला भोगावेच लागणार आहे यावर या लोकांची श्रद्धा असते. त्यामुळे एखाद्याच्या बाबत काही वाईट घडले तर 'जाही वागणी तशी भोगणी" असा निष्कर्ष हे लोक काढतात.

**शेटल्याची धाव कुपी पर्यंत –**

शेटल्या म्हणजे सरडा. अतिदुर्गम भागात राहणारा अडाणी, भोळा-भाबडा माणूस व प्रगत समाज यांच्यातील असमानता, सर्वच बाबतीत असणारी दरी आपल्या लक्षात येते. एखादा आदिवासी शिकला, सावरला तरी तो प्रगत समाजाची बरोबरी करू शकत नाही. त्याच्या काही मर्यादा असतात. या मर्यादा दाखवून देणारी ही म्हण आहे. सरड्याची धाव कुंपणापर्यंत या मराठी म्हणी सारखीच कोकणा बोलीतील ही म्हण आहे. यात सरडा म्हणजे धडपडणारा आदिवासी समाजातील नवतरुण आहे जो त्याच्या मर्यादा ओलांडू पाहत आहे. मात्र त्याच्या भोवती सामाजिक, आर्थिक, राजकीय मर्यादांची कुपी (कुंपण( आहे.

**कावळा बसायला फांदी मुडायला –**

निसर्ग नियमानुसार घडणाऱ्या घटनेला कोणतेही बंधन नसते. घडणाऱ्या घटनेला फक्त निमित्त लागत असते. डोंगराळ भागात दऱ्याखोऱ्यात कडेकपारीत जीवन जगणारी माणसं ही कायमस्वरूपी निसर्गाची तत्त्वे पाळत आली आहेत. त्यामुळे निसर्गाच्या पुढे कोणालाही जाता येत नाही. जे घडायचे ते घडतेच हा सृष्टीचा नियम कोणी मोडू शकत नाही हे त्याना चांगलेच ठाऊक आहे. मात्र निसर्गात घडणाऱ्या घटनांच्या समोरची त्याची हतबलता आहे. एखाद्या अपघातामागे ठरणारे निमित्त याविषयीच्या भावना या म्हणीतून व्यक्त झालेल्या आहेत.

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**पाण्यात मासा बाहेर तमासा –**

दुसऱ्याच्या कामाबद्दल कोणताही अनुभव नसताना त्याला शिकवत बसणे हास्यास्पद ठरते या अर्थाची ही म्हण आहे. मनुष्य जीवनात प्रत्यक्ष काम केले तर माणसाला अनुभव येतो. तो शहाणा होतो. म्हणजे पाण्यात उतरल्या शिवाय मासा पकडता येत नाही. असा त्याचा अर्थ बोध होतो.

**दूरचा डोंगर दूरच बेस –**

गावापासून, घरापासून लांब राहिल्यावर कोणाचेही भांडण होत नाही. उलट दूर राहून प्रेम टिकते यावर आदिवासींचीही श्रद्धा आहे. तसेच एखादी गोष्ट, व्यक्ती जोपर्यंत आपण प्रत्यक्ष अनुभवत नाही तोपर्यंतच आकर्षक वाटते मात्र प्रत्यक्ष अनुभवात आपला भ्रमनिरास होतो. मराठीतील 'दुरून डोंगर साजरे' या अर्थाची ही म्हण आहे. आदिवासी भागात गावातल्या गावात एखाद्या मुलाचे, मुलीची लग्न केले तर नियमित घरोब्याची भांडणे होतात. त्यापेक्षा गावातल्या गावात लग्न करू नये हे पटवून देताना आदिवासी समाजात या म्हणीचा वापर होतो.

**उडत्या पाखरांचे पिसे मोजणे –**

अनोळखी व्यक्तीचे मनातील बोलणे लवकर समजून घेणे. समाजात वावरताना गावंढळ माणूस व्यावहारिक जीवनात काही ठिकाणी फसवला जातो; तर काही ठिकाणी तो त्यातून धडा शिकतो. त्यामुळे प्रत्येकाला हा ठगतो का खरा बोलतो? ते ऐकून घेऊन उत्तर सुचवावे लागते. तर एखादा माणूस पटकन तोंडावर बोलून जातो की, "मी सगळ्याच माणसांचा अनुभव घेत आलुय, अरं मी मी उडत्या पाखरांचे पिसे मोजणारा माणूस आहे." अश्या रीतीने या म्हणीचे समाजातील उपयोजन दिसते.

**धाव तो चाव –**

जो कामासाठी धावून जाईल त्यालाच मजुरी मिळेल. डोंगराळ भागातील आदिवासी माणसांचे धावपळीचे जीवन आहे. प्रत्येक गोष्टीसाठी संघर्ष केल्याशिवाय त्याला जगता येत नाही. उदा. "पाण्याची झडीच आली, लोका माशी मारायला, लोदायल वहळाला, खदानावर धावलीज, बाकीचे लोका घरी रहली, बाकीची जाहा वहळावर, मासेमारी धावली, तेही मासे मारून एक सांजची कोरड्याला घरी आणली, मजे ते वहळालं गेलं तं मासे आणली, घरी बसून काय मीळताय? अशी अडाणी माणसा सांगाय लागली," अश्या प्रसंगावरून जगण्याचे शहाणपण शिकविणारी, श्रमाचे महत्त्व सांगणारी 'धावं तो चावं' ही म्हण रूढ झालेली दिसते.

**कामा पुरता मामा –**

आपले काम करून घेण्यासाठी दुसऱ्याशी गोड, गोड बोलणे. अडचणीत असलेल्या माणसांना एखाद्या कामात जरा मदत केली तर मदत करणाऱ्याचा गैरफायदा घेतला जातो. परंतु त्यालाच jr अडचण आली तर ते भागवायला टाळाटाळ केली जाते. एखाद्याचा फक्त स्वतःसाठी, स्वार्थासाठी वापर करून घेणे या अर्थाची ही म्हण आहे. कामापुरता मामा, ताकापुरती आजी अश्या आशयाची मराठीतील म्हण कोकणा आदिवासी प्रदेशातही वापरली जाते.

**बारा कारभारी त्यात एक चौधरी –**

जास्त लोकांमध्ये एकाच व्यक्तीने पुढाकार घेणे आदिवासी भागातील लोकांचे गाव गाड्यावरील जीवन हे निःस्वार्थी असले तरी बऱ्याच वेळा भांडणे, वाद सोडवण्यासाठी न्यायनिवाडा करण्यासाठी गावचे पोलीस पाटील बरोबर अनेक लहान, मोठे पुढारी यांचा आधार घ्यावा लागतो. त्यात पोलीस पाटलाच्या आधी बाहेरचा एखादा पुढारी दोन्ही बाजूने बोलतो. अश्या परिस्थितीत न्यायाची काय अपेक्षा करणार? तेव्हा हाताशेपोटी असे उद्गार काढले जातात. त्याच बरोबर सामुहिक काम करताना येणाऱ्या अडचणी, प्रत्येकाला आपलेच म्हणणे बरोबर आहे असे वाटणे, कोणीही कोणाचे ऐकून न घेणे. त्यातील एखादा सर्वांना वरचढ असणे, त्याचेच म्हणणे रेटणे असा अनुभवही येत असतो अश्या वेळीही ही म्हण कोकण आदिवासी लोकव्यवहारात वापरली जाताना दिसते.

**दिसतं तसं नसतं म्हणून जग फसतं –**

एखादी व्यक्ती सर्व सामान्य साधी सरळ दिसते पण जास्त हुशार आहे हे लक्षात येते. समाजात वावरताना केवळ वरवरच्या देखाव्याला भुलणारी माणसे फसवली जातात हे वास्तव सत्य या म्हणीतून अधोरेखित होते. समाजात एखाद्या व्यक्तीबद्दल खूपच चांगले समज असतात मात्र जेव्हा त्या व्यक्तीचे दुसरेच अनपेक्षित रूप समोर येते. तेव्हा लोक असेच म्हणतात, 'दिसतं तसं नसतं म्हणून जग फसतं.'

**झडसाल ताहा खासाल –**

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

काम केल्याशिवाय पोटासाठी अन्न भेटत नाही. आदिवासी भागातील डोंगर दऱ्याखोऱ्यात कष्ट करणारा गोरगरीब माणूस राब, राब राबतो. परंतु त्याची मुलं त्याला शेतामध्ये कामाला मदत करत नाहीत तेव्हा तो वैतागून वैतागून पोरांना सांगतो, "आमी आहु ताव खात्याहा, नाय तं खासाल दगडा चांगला, शेतात झडसाल ताहा खासाल" अश्या प्रसंगानुरूप ही म्हण रूढ झालेली दिसते.

**बिन भरोसी काम –**

कामाची कोणती काळजी न करणारा माणूस. सर्वच माणसं सारखी नसतात, काही आळशी, काहीच चलाख कामाला, तर काही हळुवार काम करतात. आदिवासी भागात कोणतेही काम करण्यासाठी जास्त वेळ लागतो. 'व्यक्ती तशा प्रवृत्ती' आढळतात. काहे माणसांवर तर भरोसाच ठेवता येत नाही. लहरी वृत्ती व मनाची चंचलता अश्या काही माणसांमध्ये असते तेव्हा तो माणूस म्हणजे 'बिन बरोसी काम' असे म्हटले जाते.

**सुई न रोवता काटा काढणे –**

एखादी गोष्ट परस्पर फायद्याची होणे. एखाद्या कर्माचे फळ कोणतेही व्यक्तीने शिवी शाप न देता भेटते. सार्वजनिक जीवनात वावरताना सगळेच माणसं चांगले वागत नाहीत. काही माणसं विनाकारण एकमेकाची निंदा, टिंगल, टवाळी करून भोळे, भाबडे माणसाची विटंबना करतात. अशावेळी भोळा माणूस कोणताच विद्रोह करत नाही. "मी तर काही नाय बोलत पण तेचा एक दिवस सुई न रोवता काटा निघिल ही पाहात रय" मराठीतील 'सूंठीवाचून खोकला जाणे' या अर्थाची ही म्हण आहे. या म्हणीतून आदिवासी कोकणा समाजाचा दैवावर विश्वास असलेला दिसतो.

**आदी पोटोबा मग विठोबा –**

पहले सवताचे पोटाची काळजी करावी मग कामाची काळजी करावी या अर्थाची ही म्हण आहे. आदिवासी भागातदेखील ही म्हण जास्त बोलली जाते. मळणीचे कामासाठी मजूर घीयल ताहा ऊन झाला तावधर काम करत, मग घरमालकीन सांगाय लागली या आता साऊले, पोट पुज्या करून घ्या. मजे जेवन करून घ्या. काम तं आहेज, मग यक मजूर सांग 'पहला पोटोबा मग विठोबा', असा बरं मग आता तसाज करून घेतू ठिक आहे. असा संवाद कोकणा आदिवासी बोलीतून चालतो. म्हणीतून बोलीभाषेला जो एक लहेजा प्राप्त होतो तो येथे दिसतो. अनुभवातील शहाणपण तसेच परस्पर संबंधातील आपुलकी याचेही दर्शन घडते. शेतकरी आणि भांडवलदार यांचे मजुरांशी असणारे परस्पर संबंधातील फरकही यातून दिसून येतो.

**रान जळ जन पहा मन जळ कोण पहा –**

रान जळले तर जनता पाहते पण एखाद्या व्यक्तीचे मनात काय चाललंय कोणाला सांगता येत नाही. आदिवासी भागात प्रगतीसाठी सामान्य माणसंही दुसऱ्याच्या प्रगतीवर मनात जळत असतात. अशी माणसं निंदा, नालस्ती करून मन हलके करतात. त्यांच्या शब्दावरून ती ओळखता येतात. रानाशी असलेले आदिवासी समाजाचे नातेही यातून अधोरेखित होते. रान जळताना मनाला होणारी वेदनाही यातून अभिव्यक्त झालेली दिसते.

**उठता बसता लाथा बुक्क्यांचा मार -** एखादे व्यक्तीला घरात, समाजात खूप त्रास होणे या अर्थाची ही म्हण आहे. "घरात दोन दिर भावजय यांचे एकमेकांशी पटत नाही, मग भावा भावांची भांडण होतात. मोठा भाऊ लहान भावाला खुप त्रास देतो. टोचून बोलतो. बायकोलाही वेळ प्रसंगी हाणामारी करतो. घरात उठता बसता लाथा बुक्क्यांचा मार असल्यावर मग लहान भावाने किवा पत्नीने जायचे कोणाकडे? असा प्रश्न निर्माण होतो. अशीच परिस्थिती कधी अस्मानी स्वरूपात तर कधी सुलतानी स्वरूपात आदिवासी अनुभवत असतात. त्यावेळी 'उठता बसता लाथा बुक्क्यांचा मार' अशी परिस्थिती झाली असल्याची अगतिकता बोलून दाखविली जाते.

**दोघांचे भांडण तिसऱ्याचा लाभ –**

एखाद्या कामावरून दोन व्यक्तींची भांडण होतात. पण लाभ मात्र तिसराच व्यक्ती घेतो. उदा. आदिवासी भागातील शासकीय योजना शेतकऱ्यांसाठी राबविल्या जातात त्या योजनांचा लाभ गावातील पुढारी घेतात. गावात दोन गटांना लढवत ठेवून पुढारी आपला स्वार्थ साधून घेतात, या अर्थाची ही म्हण आहे.

**चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे-**

सासू अन सून ही उदाहरणे घेऊन तयार केलेली म्हण आहे. प्रत्येकाला एके दिवशी संधी मिळेल असा या म्हणीचा अर्थ आहे. प्रत्येकाचीच वेळ येते. "आपलं जीवनात कोणी वाईट केलं असेल तर कायम टिकून रहात नाय, एक दिवस आपलाही यतो" असे उद्गार कोकणा आदिवासी समाजातील व्यक्तींच्याही संवादातून ऐकायला मिळतात.

**मुंगी होऊन साखर खावी –**

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

गरीब होऊन जीवन जगणे. सार्वजनिक जीवनात वावरताना कोणतेही काम करून घ्यायचे असल्यास नम्रता व शांतता ठेवावी. मोठेपणा पण आक्रमकता न दाखवता सगळ्यांशी प्रेमाने वागले तर यश मिळते अशी भावना आदिवासी समाजातही आहे. त्यामुळी 'मुंगी होऊन साखर खावी' असा शहाणपणाचा सल्ला देणारी ही म्हण सुशिक्षित समाजाबरोबरच आदिवासी कोकणा समाजातही रूढ असलेली दिसते.

**वसती शिवाय मसती नाही –**

आदिवासी भागात पाळीव प्राण्यांना वसूत म्हणतात. शेतीचे कामासाठी जनावरांचा उपयोग केला जातो. त्या आधारावर ही म्हण आहे. आदिवासी भागात शेतीसाठी मोठ्या प्रमाणात बैल, दोबड या जनावरांचा आऊत हाकण्यासाठी वापर होतो. ज्याच्याकडे हे जनावरे आहेत त्याला शेती करायला अडचण येत नाही. ज्याच्याकडे जनावरं नाहीत त्याला मात्र शेती करणे शक्य नसते. त्यावरून ही म्हण तयार झाली आहे. यात बैल हे धन संपत्तीचे, श्रमाचे प्रतीक आहे तर मसती (मस्ती) हे त्या धनसंपत्ती व श्रमसंपत्ती यामुळे निर्माण झालेल्या आत्मविश्वासाचे, स्वाभिमानाचे, गर्वाचे प्रतीक आहे.

**सांगकाम्या बाळू –**

कोणतेही काम स्वतःहून न करणारा, संगुतले तेवढेच करणाऱ्या व्यक्तीला सांगकाम्या बाळू असे महणून हिणवले जाते.

**सगळीकडे चव चाखत हिंडणे –**

एखादे काम चांगले करावयाचे असल्यास अनेक ठिकाणी चौकशी करणे या अर्थाने ही म्हण वापरली जाते. विशेषतः नोकरीला असलेला मुलगा मनपसंत वधू शोधण्यासाठी अनेक स्थळ पाहतो. तेव्हा त्याचा बाबतीत तो सगळीकडे चव चाखत हिंडतोय असं म्हटलं जातं.

**चोराच्या वाटा चोरालाच माहित –**

सर्वच गोष्टी सर्वांना जमत नाहीत. प्रत्येक जण त्याच्या त्याच्या कामात पटाईत असतो. त्या त्या क्षेत्रातील ज्ञान त्याच क्षेत्रातील व्यक्तीकडे अधिकचे असते. काही वाईट-साईट धंदे करणाऱ्या व्यक्तीही त्याला अपवाद नसतात. असे चुकीची किंवा समाजाला अमान्य, अप्रतीष्ठेची कामे करणाऱ्या व्यक्तीला उद्देशून ही म्हण वापरली जाते.

**थोडक्यात**

आदिवासी कोकणा बोलीतील म्हणी या इतर म्हणीप्रमाणेच अनुभवातून आलेल्या शहाणपणाचे द्योतक आहेत. समाजात वावरताना सामाजिक भान ठेवणे आवश्यक असते नाहीतर समाजात माणसाचे हसे होते; याचा प्रत्यय देणाऱ्या या म्हणी आहेत. आदिवासी समाजातील भूक, दारिद्र्य, संघर्ष, काम केले तरच दोन वेळेचे जेवण मिळेल ही परिस्थिती, रान, जंगल, त्यातील पशू, प्राणी- वाघ, कोल्हा, सरडा, गाय, खेकडे, मासा, कावळा, कोळी, मुंगी वगैरे प्राणी या म्हणीतून येतात. आदिवासी जीवनाचे प्रतिबिंब त्यातून दिसून येते. श्रमाप्रतीची निष्ठा त्यातून अभिव्यक्त होताना दिसते तसेच मानवी वृत्ती-प्रवृतींचे प्रतिबिंबही त्यात पाहायला मिळते. यातील काही म्हणी सर्वसामान्यपणे सुशिक्षित समाजाच्या लोकव्यवहारातही वापरल्या जाणाऱ्या म्हणी आहेत तर काही अस्सल कोकणा बोलीतून आलेल्या म्हणी आहेत. कोकणा बोलीतील म्हणी या बोलीचा गोडवा वाढवतात व त्यातील अनुभवांचे शहाणपणही अधोरेखित करतात.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1. मांडे प्रभाकर, 'लोकपरंपरेतील शहाणपण', गोदावरी प्रकाशन औरंगाबाद पृ. १.
2. सोनवणे राजकुंवर, 'मराठी भाषा अध्यापनातील क्षेत्र प्रयोग', अनुबंध प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती २६ जानेवारी २००५, पृ. ४८.
3. गावित पुष्पा, 'पश्चिम खानदेशातील आदिवासी लोकसाहित्य', प्रशांत पब्लिकेशन जळगाव, प्रथम आवृत्ती २०११, पृ. १६४.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# गुजर समाज व संस्कृती

**तुषार पाटील[1], डॉ. धनराज धनगर [2]**
[1]संशोधक विद्यार्थी , म.गां.विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्याल, मनमाड
[2]पीएच्.डी. संशोधन मार्गदर्शक,
मराठी विभाग, म.गां.विद्यामंदिर संचलित कला व वाणिज्य महाविद्यालय, येवला
**Email-**dr.dhanrajdhangar@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170828
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8(I)
Pp. 129-133
August 2025
**Submitted:** 14 July. 2025
**Revised:** 30 July. 2025
**Accepted:** 15 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**सारांश**

सदर शोधनिबंधात उत्तर महाराष्ट्रातील गुजर समाज व संस्कृतीचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. सातपुडा पर्वतरांगांच्या दक्षिण पायथ्याशी व तापी नदीच्या खोऱ्यात वसलेला हा समाज गुजर बोली (गुजरी) भाषेसाठी ओळखला जातो. ऐतिहासिक नोंदींमधून गुर्जर प्रतिहार वंश, लेवा व दोडे गुजर अशा उपशाखांचा उगम, स्थलांतराची प्रक्रिया व त्यांचे वसतिस्थान स्पष्ट केले आहे. पारंपरिक शेती व पशुपालन हा समाजाचा मुख्य व्यवसाय असून धार्मिक जीवनात शिवपार्वती, रामसीता, राधा-कृष्ण, गणेश, सरस्वती पूजन व कुलदैवतांची उपासना यांना महत्त्व आहे. सामाजिक जीवनात संयुक्त कुटुंब पद्धती, सण-उत्सव, लोकगीते, रितीरिवाज व सामूहिक सहजीवन यांचा प्रभाव दिसून येतो. बोलीभाषा, लोकसाहित्य व संस्कृतीचे जतन हे आजच्या जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाचे आव्हान असून त्याचे दस्तावेजीकरण करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे.

**बीजशब्द :** गुजर समाज, गुजरी बोली, गुर्जर प्रतिहार, लेवा गुजर, दोडे गुजर, उत्तर महाराष्ट्र, लोकसाहित्य, संस्कृती, संयुक्त कुटुंब पद्धती, धार्मिक जीवन, सामाजिक जीवन.

**प्रास्ताविक**

महाराष्ट्राच्या उत्तरेकडील भागात स्थित सातपुडा पर्वतरांगांच्या दक्षिणेकडील पायथ्याशी, तापी नदीच्या खोऱ्यात, जळगाव, धुळे जिल्ह्यात गुर्जर/गुजर समाज मोठ्या प्रमाणात स्थिरावला आहे. या समाजाची बोली 'गुजर बोली' किंवा 'गुजरी बोली' म्हणून ओळखली जाते. भाषेच्या आधारावर अल्पसंख्यांक म्हणून या समाजाने आपली वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. या समाजाची स्वतःची अशी एक वेगळीच व वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आहे. गुजर बोलीतून स्वतंत्र असे लोकसाहित्यदेखील आढळून येते. लोकसाहित्याचे विपुल भंडार असणारी ही बोली आहे. मात्र इतर बोलींप्रमाणे जागतिकीकरणाच्या लाटेत या बोलीसंदर्भातही नामशेष होण्याची भिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे इतर बोलींप्रमाणे या बोलीतील असणारा शब्दसंग्रह तसेच लोकसाहित्य व इतर सांस्कृतिक खजिना जतन करण्याचे मोठेच आव्हान उभे राहिले आहे. त्यानुषंगाने गुजर बोलीभाषेचा अभ्यास करत असताना गुजर समाज व संस्कृतीची तोंडओळख करून देण्याचा प्रयत्न प्रस्तुतु शोधनिबंधातून केलेला आहे.

**गुजर समाजाचा इतिहास :-**

गुर्जर किंवा गुजर ही भारतातील एक जात/जमात असून ती पंजाब, हिमाचाल प्रदेश, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश,

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*तुषार पाटील , संशोधक विद्यार्थी , म.गां.विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्याल, मनमाड*

**How to cite this article:**
*पाटील, . तुषार ., & धनगर, . धनराज . (2025). गुजर समाज व संस्कृती. Journal of Research & Development, 17(8(I)), 129–133.* https://doi.org/10.5281/zenodo.17116006

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17116006
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

महाराष्ट्र, गुजरात व राजस्थान या भागात आढळते. या समाजाच्या संदर्भात खालील काही नोंदी आढळतात.

"भारतात आठव्या शतकात तीन प्रबळ राजसत्ता होत्या. पूर्व भारतात पाल घराणे, पश्चिम भारतात 'गुर्जर प्रतिहार' आणि दक्षिण भारतात दख्खनमध्ये 'राष्ट्रकूट' या तिन्ही सत्तांच्या संघर्षाचा केंद्रबिंदु होता. 'कान्यकुब्ज' अर्थात 'कन्नोज' ती राजधानी आपल्या ताब्यात असावी, यासाठी तिन्ही सत्ता झगडत होत्या. त्याला इतिहासात त्रिपक्षीय संघर्ष म्हणूनच ओळखले जाते; गुर्जर प्रतिहार या तिघांमधला एक बलाढ्य पक्ष होता." १ "मिहीर भोज हा गुर्जर प्रतिहार वंशातील सर्वात कर्तबगार आणि प्रसिद्ध राजा होता. इ.स.८२६ मध्ये तो सत्तेवर आला. त्याची कारकीर्द जवळजवळ ५० वर्षाची आहे. त्याच्या पराक्रमाचा दबदबा त्या काळी सर्वत्र होता. त्याने पाल आणि राष्ट्रकूट या आपल्या पारंपरिक प्रतिस्पर्धी राजांना नमवून प्रतिहारांचे वर्चस्व कायम केले." २ "गुर्जर प्रतिहार या नावाबद्दल अनेक दावे आहेत. हे घराणे स्वतःला लक्ष्मणाचे वंशज मानत होते. लक्ष्मण हा वनवासात रामाचा व्दारपाल-प्रतिहार म्हणून वावरला होता. त्यामुळे त्याच्या या वंशजांनी स्वतःला 'प्रतिहार' म्हटले; गुर्जर हे काहींच्या मते प्रदेश वाचक नाव आहे. तर काहींच्यामते मुळात एका टोळीचे नाव होते. या वंशातील राजां.नी स्वता: ला नेहमीच केवळ 'प्रतिहार' म्हणवून घेतले होते. गुर्जर असा त्यांचा उल्लेख इतरांनी केलेला दिसून येतो. राजस्थानातील राजोर येथील शिलालेखात गुर्जर प्रतिहार हा शब्द पहिल्यांदा वापरलेला दिसून येतो."३ उत्तर महाराष्ट्रातील गुजर जमातीचा इतिहास बघता असे दिसून येते की, रेवा / लेवा, दोडे गुजर अशा उपशाखा दिसतात; परंतु बोलीभाषा गुजरीच आहे. 'लेवा पुराण' नामक ग्रंथानुसार (१९१८) लेवा गुजर सोमवंशीय असल्याचे अनुमान काढले जाते; त्यांचे मूळ गोत्र काश्यप असून सोमवंशीय राजा बळी यांचा पुत्र लेहक यापासून लेवा आणि बळीचा भाऊ भद्र याचा पुत्र कटभ यापासून कडवा या शाखा उत्पन्न झाल्या आहेत.४ चिनी प्रवासी युआन श्वांग हा इ.स. ६४० मध्ये लिहीतो की, "गुजरातमध्ये वृधनगर या सुंदर भागात लेवा व कडवा लोकांची सुखी वस्ती होती. लेवा शाखेतून रेवा/ लेवा गुजर, लेवा पाटीदार आणि कडवा शाखेतून कडवा गुजर अशा उपशाखा निर्माण झाल्या असाव्यात."५ चोपडा जि. जळगाव याठिकाणच्या भाटांच्या नोंदीनुसार, "गुजर नंदुरबार मार्गे संवत १२३४ च्या सुमारास खानदेशात आले, मात्र यात फरक पडू शकतो इ. स. १२१९ मध्ये जामनेर जि. जळगाव या ठिकाणच्या देशमुखीचे गवळयांकडून लेवा गुजरांकडे हस्तांतर झाले होते."६यावरून रेवा / लेवा गुजर १२१९ च्या आधी खानदेशात आले हे सिद्ध होते. खानदेशातील रेवा/लेवा गुजर हे अहमदाबाद व बडोदे चरोतर-मधील मानले जात असून ते प्रामुख्याने रावेर, जामनेर, एरंडोल व मुक्ताईनगर या तालुक्यात स्थिर झालेले आहेत. रावेर तालुक्यातील ऐनपुर, खिर्डी, निंबोल, निंभोरे, वाघोदा, तांदलवाडी, केऱ्हाळे, दसनुर, पिंप्री, बलवाडी, कुंभारखेडा तसेच जामनेर तालुक्यातील पळासखेडा, हिंगणे त्याचप्रमाणे पाचोरा तालुक्यातील पिंपळगाव हरेश्वर, उत्राण, दुसखेडा, म्हैसवाडी इ. गावात बहुसंख्येने रेवा गुजर समाज आढळतो. त्याचप्रमाणे दोडे गुजर ही एक उपशाखा प्रचलित आहे. दोडे गुजर प्रामुख्याने चोपडा, एरंडोल व जळगाव तालुक्यात अधिक प्रमाणात आहेत. या समाजाचा मुख्य व्यवसाय शेती आहे. यांची एकूण ४१ कुळे आढळतात, जसे पवार, चव्हाण, सिमल, गेहलोत, सोलंकी, काबा, खखवी, निकुंभ, टोका, गोहेल, दोडीये, खापरे, वनहोल, खिची, जाधव, दाभी, गौड, हुना, दोडे, कागवा, बोर्शी, साखेळे, पाढीकर, ककुंबा, टोका, चावडा इत्यादी. गुजर समाजात सकुळ विवाह मान्य नाही. रेवे गुजर व दोडे गुजर यांच्यात रोटी व्यवहार चालत असला तरी बेटी व्यवहार होत नाही, परंतु विवाह पध्दतीत मात्र बरेचसे साम्य आहे. तसेच बोलीभाषा गुजर (गुजरी) बोली हीच आहे.

**गुजर समाजाचे पारंपरिक जीवन -**

गुजर / गुर्जर समाजातील लोकांची देहबोली राहणीमान, रितीरीवाज, बोलीभाषा, वेशभूषा इ. सांस्कृतिक ठेवा आणि इतर कसोट्यांच्या माध्यमातून विचार केला तर आपल्याला असे दिसून येते की, गुर्जर समाज गुजराती संस्कृती आणि सभ्यता यांच्या अगदी जवळ आहे. परंपरेनुसार गुर्जर लोक लेवा कुलभाट यांच्या पोथीतून त्यांचे निवासस्थान व विकास यात्रेतील काही तथ्य जाणून घेण्याचा प्रयत्न करत असतात. उत्तर महाराष्ट्रातील गुजर समाजाचे जीवनदेखील पारंपरिक पद्धतीने चालते. समाजातील सर्वच लोक मुख्यत्वेकरून शेती व्यवसायाशी निगडीत आहेत. घरातील प्रत्येक व्यक्ती शेती, पशुपालन यांच्याशी एकनिष्ठ दिसून येतो. तसेच रितीरीवाजाप्रमाणे आपले कौटुंबिक व सामाजिक जीवन जगत असतो. गुजर बोलीच्या माध्यमातून इतर समाजाशी संवाद साधतांना त्यातील गोडवा, मऊपणा प्रकर्षाने जाणवतो. गुर्जर समाज परंपरा आणि संस्कृती जाणून घेण्यासठी गुजर समाजाचे धार्मिक जीवन, सामाजिक जीवन, आर्थिक जीवन यांचा सविस्तर आढावा आपल्याला घेता येईल.

**गुजर समाजाचे धार्मिक जीवन -**

भारत देश शेतीप्रधान देश असून विविध धार्मिक संस्कृतीचे दर्शनदेखील भारतात घडून येते. भारतातील प्रत्येक समाज आपापल्या परीने आपल्या धार्मिक संस्कृतीची जपणूक करतांना दिसतो. तसेच प्रत्येक समाज एकमेकांच्या धार्मिक विधींमधूनही आपला सहभाग नोंदवित असतो. याच माध्यमातून भारतात धार्मिक विविधतेतूनही एकता दिसून येते. उत्तर महाराष्ट्रातील गुजर समाजदेखील असाच विविधतेतून एकता जोपासणारा समाज आहे. गुजर समाजाच्या धार्मिक जीवनात शिवपार्वती, रामसीता, राधा-कृष्ण, श्रावणबाळ आदि चरित्रांचा प्रभाव लोकांमध्ये दिसून येतो. त्याचप्रमाणे श्रीगणेश, सरस्वती वंदन यांना खूप महत्त्व आहे. कोणत्याही शुभ

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

प्रसंगी श्री गणेशाचे व सरस्वती मातेचे स्मरण केले जाते. पुजनीय सर्व देवतांबरोबरच या समाजातील लोक तापी नदीला 'तापीमाय' म्हणून तिचे मनोभावे पूजन करतात. उत्तर महाराष्ट्रातील गुजर समाजातील प्रत्येक लहान-मोठा व्यक्ती प्रभुचरणी लीन होतांना दिसतो. याचा प्रभाव धार्मिक जीवनावर दिसून येतो. त्याचप्रमाणे धर्माच्या बाबतीत त्यांची अतूट श्रद्धा आणि निष्ठा दिसून येते. गुजर समाज आपल्या कथांमधून 'राम वनवास', 'सीता त्याग', 'श्रावण बाळाची मातृपितृ भक्ती', 'गणेश सरस्वती वंदना', 'कृष्णा-सुदामाचे मित्रप्रेम' इ. धार्मिक चरित्रांचे वाचन हा समाज धार्मिक जीवनात करतांना दिसतो. गुजर समाज धार्मिक जीवन जगत असतांना अंधश्रध्देला बळी न पडता आपल्या शैक्षणिक गुणवत्तेचा वापर करून श्रध्देने आपले धार्मिक जीवन व्यतित करताना दिसतो. गुजर समाजाची कुलदैवते आपापल्या उपजातीनुसार दिसून येतात. उदा. देवास याठिकाणची चामुंडा माता, पावागढ येथील कालिका माता, आशापुरी देवी, सप्तश्रृंगी देवी, एकविरा माता, ज्वालामाता, खोडीयार माता, कलेश्वरी देवी इ. कुलदैवते असून सदर समाज त्यांची मनोभावे पुजाअर्चना करतांना दिसतो. लग्नकार्य पार पडल्यानंतर नववधू-वर कुलदैवताचे दर्शन घेऊनच नवीन संसाराला प्रारंभ करतात. प्रत्येक शुभ कार्याला कुलदैवत अग्रस्थानी मानून आपल्या शुभकार्याची सुरुवात केली जाते. या समाजाचा प्रमुख व्यवसाय शेती असल्याने प्रत्येकाकडे भरपूर शेती असते. त्यातदेखील पेरणीपूर्वी विविध पूजा-अर्चना करुनच शेतकामाला सुरुवात केली जाते. याठिकाणी प्रामुख्याने नमूद करावेसे वाटते की, गुजर समाजातील महिला धार्मिक बाबींमध्ये अग्रेसर राहून धार्मिक विधींना खूप महत्व देतात. आपल्या घरामध्ये वावरत असतांना सकाळी भल्या पहाटे उठून स्नान आदि विधी आटोपून घरासमोरील अंगणात शेणाचा सडा शिंपून त्यावर रांगोळी काढली जाते. नंतर घरातील देवघरात पूजा आदि करून पुढील कामांना सुरुवात केली जाते. धार्मिक जीवनात मध्यप्रदेशातील पुष्कर या तीर्थस्थानाला या समाजात विशेष अग्रस्थान आहे. "भगवान विष्णु आणि महेश यांचे मंदिर प्राचीन काळापासून पूर्ण विश्वात प्रत्येक जागी स्थित आहेत, परंतु संपूर्ण विश्वात ब्रम्हाचे पुष्कर याठिकाणी एकमेव मंदिर आहे."७ रामायण, महाभारत यासारख्या ग्रंथांमधून तसेच पुराणांमधून पुष्करराजचे महत्व अधोरेखीत केले गेलेले आहे. पौराणिक युगापासून या तीर्थस्थानाचे महत्व आहे. पुष्कर नावाच्या बाबतीत असे सांगितले जाते की, पृथ्वी- तलावर यज्ञ व्हावा या हेतूने ब्रम्हाने कमळपुष्प पृथ्वीवर टाकले आणि हे पुष्प ज्याठिकाणी पडले त्याठिकाणचे नाव पुष्कर पडले. पूर्वीच्या ऐतिहासिक पुराव्यानुसार प्राचीन युगापासून १२ व्या शतकापर्यंत पुष्कर याठिकाणी चेची गुर्जरांचे राज्य होते. त्यामुळे गुर्जर समाजात पुष्कर या स्थानाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले असावे असे वाटते. तसेच गुजर समाजाची कुलदैवत चामुंडा माता असल्यामुळे चोटीला राजस्थान याठिकाणी असलेले चामुंडा मातेचे मंदिर हे तीर्थक्षेत्र गुजर समाजात महत्त्वाचे मानले जाते. नवरात्रीत व रोजच्या पुजेत चामुंडा मातेची मनोभावे पूजा केली जाते. नवरात्रीचे नऊ रात्री जागरण व गरबा रास खेळून नवरात्री उत्सव साजरा केला जातो.

**गुजर समाजाचे सामाजिक, आर्थिक जीवन :-**

गुजर समाजाच्या सामाजिक जीवनाचा विचार केल्यास कौटुंबिक जीवन, त्यांच्या कुटुंबातील लोकांची संख्या, त्यांच्या घराची रचना तसेच आजूबाजूचा परिसर, त्यांचा पोशाख, खानपान पद्धती, जीवन जगण्याची कला, त्यांची विशिष्ट देहबोली, त्यांच्यातील आडनावे, सामाजिक जीवनात महिलांचे महत्व, सण-उत्सव साजरे करण्याची विशिष्ट पद्धती, त्यांचे पारंपरिक लोकगीते, गुजर लोकांची कला, सामाजिक रितीरीवाज इ. अभ्यास आपल्याला याठिकाणी करता येईल. ग्रामीण भागात राहणारे गुजर लोक प्रेमाच्या आणि जिव्हाळयाच्या भक्कम आधारावर सामाजिक भान जपत समाजात वावरतांना दिसतात. आजच्या आधुनिक काळात देखील गुजर समाजात एकत्र कुटुंब पद्धती दिसून येते. या पद्धतीमुळे घरातील लहानथोर मंडळी पिढ्यांपिढ्या एकत्रित राहिल्यामुळे समाजात एक वेगळेच स्थान या समाजाला प्राप्त होते. नवीन पिढीत एकत्र कुटुंब पद्धतीतील सर्व रीतिरिवाज, सामाजिक भान, इतर लोकांशी वागणुकीची पध्दती, तसेच मोठ्या व्यक्तीबद्दलचा आदर इ. गोष्टींची जाण या पिढीला होते. याच मार्गाने समाजात वावरतांना त्याचा उपयोग होतो. १० ते २५ लोक एकत्र असलेल्या संयुक्त कुटुंबाला 'खटलू' म्हणून ओळखले जाते. या खटल्यातील प्रत्येक सदस्य एकमेकांवर मनापासून प्रेम करतांना दिसतात. याच प्रेमाच्या आणि जिव्हाळयाच्या मजबूत बंधनाने संपूर्ण कुटुंब एकसंघ झालेले दिसते. ६५% हुन अधिक कुटुंबे अजूनही पारंपरिक संयुक्त कुटुंब पद्धतीचे पालन करतात. उत्तर महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांमध्ये आजही ही व्यवस्था आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे ग्रामीण भागात शेती व्यवसाय असून शेतीत राबणारी कुटुंबे दिसून येतात. तसेच या समाजातील तरूण पिढी शिक्षणाकडे वळलेली दिसून येते. तरुउन मुले शिक्षणानिमित्त बाहेरगावी राहून आपले शिक्षण पूर्ण करताहेत. एकत्र कुटुंब पध्दतीमुळे सर्व जबाबदाऱ्या वाटल्या जातात. तसेच शेती व पशुपालन मुख्य व्यवसाय असल्याने सर्व कामे कुटुंबातील सदस्यांमध्ये विभागली जातात. कुटुंबातील प्रमुख कामाची विभागणी करतो. यामुळे घरातील जे तरूण शिक्षण घेत आहेत त्यांच्या शिक्षणात कुठलीही बाधा येत नाही. त्यामुळे त्यांनादेखील आपल्या जबाबदारीची जाण असते. कुटुंबातील सर्व सदस्य कुटुंब प्रमुखाचा आदेश पाळून आपली नेमलेली कामे व्यवस्थितरित्या पार पाडतात. गुजर बोलीत नेहमी म्हटले जाते 'एकंदर काम करानं पाहिजे, ती मझार आपलु भलू सं' याचा अर्थ असा की, सर्व मिळून एकत्रीत काम केल्यास त्यात आपलाच उत्कर्ष होईल तसेच प्रगती साधता येईल; तसेच घरातील महिलादेखील गुण्यागोविंदाने आपली सर्व काम विभागून पार पाडतात. येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत त्यांचा पाहुणचार या सर्व गोष्टी त्या जबाबदारीने पार पाडतात. तसेच कुटुंबातील इतर मंडळी नोकरीनिमित्त बाहेरगावी तसेच परदेशात स्थायिक आहेत पण ही सर्व सदस्य मंडळी कुटुंबातील तसेच सामाजिक उपक्रमात सहभागी होतात. आधुनिक जीवनशैली व नोकरी व्यवसायानिमित्त व शहरी प्रभावामुळे आता काही प्रमाणात विभाजीत कुटुंबपद्धतीही या समाजात नव्याने रुजू पाहते आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे शहरात वास्तव्य, सोबत दुय्यम

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

व्यवसाय करणे, जसे की, तयार कपड्यांचे दालन, धान्य दुकान, मेडीकल, इलेक्ट्रानिक्स वस्तुंचे दालन, किराणा दुकान, कृषी केंद्र इ. उद्योग ह्या समाजात करणारे तरुण कुटुंबापासून विभक्त झलेले दिसतात. व्यवसायात विशिष्ट प्राविण्य मिळवून सचोटीने आपला व्यवसाय करतांना हा समाज दिसतो. मात्र इतर समाजांच्या तुलनेत गुजरांमध्ये मोठ्या आकाराची कुटुंबे जास्त आढळतात. सरासरी गुजर समाजात लहान कुटुंबाचे प्रमाण कमी आहे; म्हणजेच गुजर समाज अजुनही मोठ्या कुटुंब पद्धतीवर विश्वास ठेवतांना दिसतो. यातूनच त्यांची सामाजिक एकता व एकसंधताही दिसून येते.

**गुजर समाजाची वसतिस्थाने :-**

गुर्जर समाजाच्या मूळ निवासस्थानाबद्दल तज्ञांमध्ये मतभिन्नता दिसून येते. "महर्षि पतंजली यांच्या मतानुसार गुर्जर समाजातील लोक पंजाबमध्ये निवासीत होते. त्या ठिकाणाहून ते गुजरात राज्यात गेले. डॉ. उपाध्याय यांच्या मतानुसार इ.स. १५० ते इ.स. १७३ मध्ये गुर्जर समाज गांधार व पंजाबमध्ये आढळून आला. रतनलाल वर्मा यांनी बऱ्याच ऐतिहासीक पार्श्वभूमीच्या आधारे गुर्जर समाजाचे मूळ स्थान पूर्वी तातार प्रदेशातील मानले जाते आणि त्या ठिकाणाहून ते काबुल, पंजाब, मारवाड इ. ठिकाणी स्थित झाल्याचे म्हटले आहे.

के. एम. मुंशी यांच्यामते गुर्जर समाजाचे मूळ स्थान इ.स. ५०० मध्ये आबू पर्वतातील क्षेत्र मानले जाते. भारतीय संस्कृती कोषागार नुसार याच (पाचव्या) शतकात गुर्जर समाजाचे मूळ निवासमान पंजाब, राजस्थान, अरावली पर्वतातील पश्चिमी प्रदेशालगत मानले जाते. श्री सत्यकेतु विद्यालंकार यांच्या मतानुसार सहाव्या शतकात गुर्जर समाज राजपुताना तसेच भडोचमध्ये स्थित होते. श्री वर्माजी यांच्या मते गुर्जर समाजाचे प्रारंभिक शक्ती केंद्र भिनमाल होते. याठिकाणाहुन निरंतर विकास गुर्जर समाजाचा होतांना दिसून येतो आणि याचाच परिणाम म्हणजे राजपुताना, मालवा, गुजरात, पंजाब, इ. भाग गुर्जर देश म्हणून ओळखला जाऊ लागला. श्री कानिंधेम यांच्या मते गुर्जरांचे मूळ निवासस्थान गुजरात प्रदेश असून महाराष्ट्राला परिचीत काहींच्या मते गुर्जर लेवा जातीतील लोक राजपुतानाहून खानदेशात आले, असेच मत दुर्गा भागवत, इरावती कर्वे, बालुभाई मेहता इ.महाराष्ट्रीयन लेखकांचे देखील आहे. सरदार पटेल यांच्याबद्दल लिहीणारे सांगतात की, वल्लभभाई पटेल यांचे वंशज लेवा गुजर खानदेशात येवून स्थित झाले." ८उपरोक्त सर्व कथनानुसार असे दिसून होते की, गुर्जर समाजाचे वास्तव्य सर्वत्र भारतात आढळून येते. काळानुसार ते पंजाब, गुजरात, गांधार, पूर्वी तातार, काबूल, मारवाड, आबू आणि अरावली तसेच गिरनार पर्वतीय क्षेत्र, राजपुताना, भडोच, भिनमाल, मालवा, खानदेश इ. ठिकाणी स्थलांतर करीत राहीले आणि आजचा विचार केल्यास संपूर्ण भारत व भारताबाहेर देखील गुर्जर समाजाची वसतिस्थाने मोठ्या प्रमाणात दिसून येतात. भारतातील गुर्जर समाजाचा विचार करायचा झाल्यास हा समाज गुजरात, राजस्थान, जम्मू आणि उत्तर पश्चिम भागात वास्तव्यास आहे. काश्मीर, हिमाचलप्रदेश, उत्तरप्रदेश, उत्तरांचल, पंजाब, हरियाणा आणि महाराष्ट्र या राज्यात आढळणारा गुर्जर समुदाय एक योद्धा समुदाय आहे. लोहरकोटचा किल्ला काश्मीरचे प्रवेशद्वार म्हटले जाते आणि याठिकाणी गुर्जर राज्य होते. १५ व्या शतकात याठिकाणचा गुर्जर राजा जैन. उल आबेदीन जो की बडशाह या नावाने ओळखला जात होता. जैन. उल-आबेदीन हा काश्मीरमधील सर्व राजांमध्येचे त्याचे मानाचे स्थान होते, सर्व वेळ त्याचा आदर करायचे.९ असे उल्लेख आढळतात. आजदेखील बड़शाह या नावाने त्याची आठवण केली जाते. या गुर्जर समुदायाने पंजाबमध्ये गुर्जर राष्ट्र निर्माण करून जम्मू-काश्मीर याठिकाणी आठव्या आणि नवव्या शताब्दीमध्ये त्यांना स्वामीत्व मिळाले. परंतु मुगल शासकांनी त्यांच्यावर अत्याचार व आक्रमण करून त्यांच्या विकासाची गती कमी केली; आणि याच जातीभेदाच्या राजकारणात हा समुदाय मागे पडला. काळानुसार जातींचा प्रभाव दिसून येतो जसे की, पंजाब सीमा प्रांत किंवा स्वतंत्र कबायली क्षेत्र, स्वात, हजारा, गुजरात, काश्मीर किंवा पंजाबमधील सर्व जिल्हे ज्याठिकाणी बहुसंख्य गुर्जर स्थित आहेत; तसेच त्याठिकाणी पठाण इ. आर्य समाजाने इस्लाम धर्म स्वीकारलेला असतांना राजपूत, जाट, गुर्जर, डोगरे इ. नी देखील स्वाभाविकच इस्लाम स्वीकारला, परंतु गुर्जर समाजाने आपली भाषा, वेशभूषा आणि आपली संस्कृती यात कुठलाही बदल केलेला दिसून येत नाही. काश्मीर, स्वात, पेशावर तसेच सीमारेषेवरील प्रदेश यातील मुसलमान गुर्जर, गुर्जरी भाषा बोलतात, त्यांची सामाजिक स्थिती इतर परंपरा तसेच रितीरिवाज गुर्जर समाजाशी मिळते जुळते आहेत. रावीपासून स्वात नदीपर्यंत गुर्जरी भाषेव्यतिरीक्त कोणत्याही भाषा बोलल्या जात नाही इतके महत्व गुर्जरी बोली भाषेचे द *दिसून येते.* १० थोडक्यात केवळ भारतातच नाही तर पाकिस्तान, इराण, अफगाणिस्तान आणि रशियासारख्या देशांमध्येही काही प्रमाणात गुर्जर समाज फार पूर्वीपासून वास्तव्यास दिसून येतो. काही भागामध्ये गुर्जरांना गुर्जर, गोजर, गुजर, गुज्जर, गोर्जर, गोदार अशा वेगवेगळया नावांनी ओळखले जाते. अनेक प्रसिद्ध इतिहासकारांनी ते आर्य वंशाचे आणि क्षत्रिय असल्याचे सिद्ध केले आहे. भारतातील गुर्जरांची अंदाजे लोकसंख्या ५.५ कोटी आहे. पाकिस्तान मध्ये गुर्जर लोकसंख्या अंदाजे ३.५ कोटी असून प्रामुख्याने मुझफ्फराबादमध्ये गुर्जर समाज आढळतो. अटक, पेशावर, झेलम, रावळपिंडी, गुजरावाला, सियालकोट, लाहोर,

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

गुजरात आणि बलुचिस्तान इ. ठिकाणी गुर्जर वास्तव्यास आहेत. गुर्जरखान (रावळपिंडी), हजारा गुर्जरन (सीमारेषा) आणि गुर्जर नदी (बलुचिस्तान) हे गुर्जरांच्या अस्तित्वाचे प्रतीक आहेत. *पाकिस्तानमधील गुर्जरांची शाखा 'गुर्जर परिषद' म्हणून ओळखली जाते.*[११] (चौ. खुर्शीद भाटी, पान नं. ८१६) उपासना पद्धतीत काही ठिकाणी भिन्नता असणारेदेखील स्वतःला गुर्जर म्हणतात. यामध्ये हा समूह मूळ वैदिक धर्म मानणारा असला तरी आर्येत्तर धार्मिक प्रथांवरही विश्वास विश्वास ठेवतो. तसेच बौद्ध, जैन, शीख आणि मुस्लीम धर्म या सर्वांचा समन्वय राखून गुर्जर भारत, पाकिस्तान, नेपाळ, अफगणीस्तान, रूस आणि जॉर्जिया या देशांमध्येही आपले वास्तव्य टिकवून आहे. खानदेशातील गुर्जरांचा भौगोलिक परिसर व विस्तार विकासाचा विचार केल्यास महाराष्ट्राच्या उत्तर सीमेवर पूर्व-पश्चिम दिशेला पसरलेला विस्तीर्ण सातपुडा पर्वत व या पर्वताच्या दक्षिणेस प्रवाहमान तापी नदी या दोहोंमधील सुपीक भूभाग म्हणजेच गुर्जरांच्या वास्तव्य स्थानाचा भौगोलिक परिसर होय. *"बृहत संहितेत तापीच्या पाण्याच्या गोड चवीबद्दल सांगितलेले आहे.*[१२] हा परिसर सुपीक समृद्ध संपन्न असल्याचा पुरावा महाराष्ट्राच्या गॅझेटमधूनही उपलब्ध होतो. *"गुर्जराना' संपूर्ण महाराष्ट्रात गहू पुरवू शकतो. हा गौरवशाली उल्लेखदेखील याच गॅझेटमधून मिळतो.*[१३] गुर्जर समाजाचे लोक महाराष्ट्र प्रदेशाच्या पश्चिमोत्तर सीमेवरील सातपुडा तसेच दक्षिणेस तापी नदीच्या खोऱ्यात वास्तव्य करून आहेत, याच परिसराला 'गुर्जराना' म्हणून संबोधिले जाते. *'गुर्जराना' किंवा 'गुजरानु' शब्दप्रयोग केला म्हणजे गुर्जर समाज वास्तव्यास असलेला परिसर त्याचा अर्थ होतो."* [१४] थोडक्यात इसवी सनाच्या पहिल्या-दुसऱ्या शतकापासून भारतातील गुर्जर समाजचे उल्लेख आढळतात. केवळ भारतातच नाही तर पाकिस्तान, इराण, अफगाणिस्तान आणि रशियासारख्या देशांमध्येही काही प्रमाणात गुर्जर समाज फार पूर्वीपासून वास्तव्यास दिसून येतो. काही भागामध्ये गुर्जरांना गुर्जर, गोजर, गुजर, गुज्जर, गोर्जर, गोदार अशा वेगवेगळया नावांनी ओळखले जाते. देश विदेशातील गुजर समाजाचा विचार करायचा झाल्यास स्थळ कालपरत्वे त्यात काही बदल झालेले असले तरी सामाजिक स्थिती व काही परंपरा व रितीरिवाज मिळते जुळते दिसून येतात. उत्तर महाराष्ट्रातील गुजर समाज हा असाच उत्तरेकडून व मुख्यतः गुजरात राज्यातून स्थलांतरीत होऊन आलेला समाज आहे. बोली व संस्कुतीच्या आधारावर महाराष्ट्रात हा समाज अल्पसंख्यांक असला तरी आपल्या बोली व संस्कृतीच्या आधारावर समाजात मानाचे स्थान मिळवून आहे. सातपुडा पर्वत व तापी नदी यांच्यामधील सुपीक पट्ट्यात शेती आणि पशूपालन हे मुख्य व्यवसाय असणारा हा समाज वास्तव्य करत असल्याने या प्रदेशास 'गुजरानू' किंवा 'गुर्जराना' असेदेखील संबोधले जाते. या समाजाची बोली गुजर बोली किंवा गुजरी बोली म्हणून ओळखली जाते. या बोलीचा लहेजा, शब्दसंग्रह, या बोलीतील लोकसाहित्य यातूनही गुर्जर समाजाच्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीचे दर्शन घडते. मात्र कालौघात इतर बोलींप्रमाणेच या बोलीसंदर्भातही मूळ स्वरूपात बदल होण्याचा व बोली नाहीशी होण्याचा धोका जागतिकीकरणाच्या लाटेत निर्माण झालेला आहे. त्यामुळे या बोलीतील शब्दसंग्रहाचे व या बोलीतील लोकसाहित्याचे दस्तावेजीकरण होणे आवश्यक झाले आहे.

**संदर्भ सूची :**

1. ॲड सुशील अत्रे - राजवंश भारती, 'दैनिक सकाळ' रविवार दि. ७/७/२०२४
2. तत्रैव
3. तत्रैव
4. लेवापुराण भीम कवि (गुज) काण्हवे द्वारा मराठीमध्ये अनुदित प्रकाशन वर्ष १९१८ पृ.क्र. २
5. https://en.wikipedia.org/wiki/Gurjar acc Date: 21.12.2023
6. प्रा. डॉ. सविता का. पटेल - 'गुर्जरी लोकगीतांतील लोकतत्व व लोकसंस्कृती' अवे मारिया पब्लिकेशन्स प्र. आ. २०१८ पृ. क्र. २७
7. चौ० खुर्शीद भाटी- 'गुर्जरो का संपूर्ण इतिहास,' जे. के. ऑकसेट प्र०सं. २०१० पृ.क्र. ४५५
8. कर्वे, जोशी, जोगळेकर- 'महाराष्ट्र परिचय' पृ. क्र. ८२ व ८३
9. श्री. वर्मा - गुर्जर वीर गाथा' पृ. १०९
10. इरावती कर्वे- 'मराठी लोकांची संस्कृति' पृ. क्र. ५१
11. चौ० खुर्शीद भारी-'गुर्जरों का संपूर्ण इतिहास,' जे.के. ऑफसेट प्र.सं. २०१० पृ.क्र.८१६
12. प्रा. डॉ. सविता का. पटेल - 'गुर्जरी लोकगीतांतील लोकतत्व व लोकसंस्कृती' अवे मारिया पब्लिकेशन्स प्र. आ. २०१८ पृ. क्र. २७
13. तत्रैव - पृ.क्र.२७
14. दिलीप पटेल – 'गुर्जरी लोक साहित्य,' गुर्जर समाज साहित्य विद्या मंदिर प्र.सं. १९९९ पृ.क्र. ५

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025


Original Article

# आदिवासी कला आणि सांस्कृतिक शाश्वतता


**डॉ. माहेश्वरी वीरसिंग गावित**

प्राचार्य, हिंद सेवा मंडळाचे, पेमराज सारडा कॉलेज,

अहिल्यानगर

**Email**- maheshwarigavit23@gmail.com



**Manuscript ID**:

JRD -2025-170829

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 8(I)

Pp. 134-143

August 2025

**Submitted:** 14 July. 2025

**Revised:** 30 July. 2025

**Accepted:** 15 Aug 2025

**Published:** 30 Aug. 2025



**सारांश**

आदिम म्हणजे लोकजीवनाचे प्राचीनतम स्वरूप होय,आदिवासी निसर्गाच्या सान्निध्यात राहतो.निसर्गाच्या सान्निध्यात आदिवासी हा स्वभावतः स्वतंत्र,स्वच्छंदी झाला आहे.नागर समाजापेक्षा दूर राहणाऱ्या आदिवासींची भौगोलिक वेगळेपणामुळे स्वतःची अशी एक वेगळी वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती निर्माण झालेली दिसते.निसर्गाशी समायोजन,एकात्मता,तादात्म्याची भावना दिसते. आजही आदिवासी अतिदुर्गम भागात राहात असल्यामुळे,भौतिक सुविधा त्यांच्यापर्यंत पोहोचलेल्या नाहीत.आदिवासी मागासलेले आहेत ते भौतिक दृष्टीने,सांस्कृतिक दृष्टीने नाही.आदिवासी जमातींच्या आचारविचार पद्धती,सामाजिक आणि सांस्कृतिक कल्पना विभागनिहाय व जमातीनिहाय वेगवेगळया दिसतात. वैश्विक मानव जातीच्या प्रारंभिक अवस्थेतील मानवी जीवनसमूह अवशेष म्हणून आदिवासींकडे बघावे लागेल.त्यांची संस्कृती ही सर्व संस्कृतींची मूलस्त्रोत आहे.म्हणून तर स्त्री-पुरुष समानता,किंबहुना स्त्रियांना प्रधान स्थान,मातृसत्ताक पद्धती, प्राणीप्रेम, सहकार्याची भावना,समूहनिष्ठा,धर्मनिरपेक्षता,स्वातंत्र्य,समता,बंधुता,न्याय,अल्पसंतुष्ट वृत्ती,माणुसकी,चराचराकडे समदृष्टीने पाहण्याची वृत्ती,निसर्गाशी घट्टपणाने टिकविलेले नाते ही लोकनिष्ठा घट्टपणे जपणारी मूल्ये या संस्कृतीत आजही तितक्याच जीवटपणे अवलंबिली जाताना दिसतात.आपल्या विधिविधानांतून,सणोत्सवातून,दैवतविधींतून,नृत्यगाण्यांतून,संगीतातून,निसर्गाशी तादात्म्य पावून मिळणारा भूतलावरील अपरिमित,निरपेक्ष आनंद त्यांच्या जीवनात ओतप्रोत भरलेला दिसतो. दैनंदिन जीवनासाठी लागणाऱ्या अनेक वस्तू आदिवासी आजही निसर्गातील साधनांतून बनवितात.आदिवासी कलाकार एकाच प्रकारच्या वस्तू बनवित नाही.तो गरजेनुसार वस्तू बनवितो.वेळेच्या उपलब्धतेनुसार आणि प्रसंगाच्या निकडीनुसार त्या वस्तूवर कलाकुसर करतो व सुबकता आणतो.काही पारंपरिक संकेत पाळण्याच्या प्रयत्नांतून देखील साध्या साध्या वस्तू करताना तो आपले कसब पणाला लावतो, त्यातून त्याची कला जन्माला येते आणि विकास पावते. आदिवासी संस्कृतीच्या जडणघडणीत निसर्गाचा फार मोठा वाटा आहे.निसर्गाच्या सान्निध्यातच,निसर्गातील विविध घटकांचे आकार त्यांना सतत प्रेरणा देतात,म्हणून तर साधेपणा,सुंदरता, रेखीवपणा व उपयोगिता ही आदिवासी कलांची वैशिष्ट्ये आहेत. आदिवासी समाज राहतो,त्या भागातील नैसर्गिक व सामाजिक वातावरण म्हणजेच डोंगरदऱ्या,नदी- नाले,जंगले,पशुपक्षी,शेती,वृक्षवेली,सणोत्सव, नाचगाणी,बाजार,जन्मप्रथा,विवाहप्रथा,मर्तिकप्रथा,जत्रा- यात्रा, जीवनापासून वेगळया करता येत नाहीत.जमातपंचायत,लोकसमजुती,संकेत या सगळयांचा ठसा त्यांच्या कलाजीवनावर जाणवतो.



Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



DOI:10.5281/zenodo.17116026

OPEN ACCESS



**Address for correspondence:**

*डॉ. माहेश्वरी वीरसिंग गावित, प्राचार्य, हिंद सेवा मंडळाचे, पेमराज सारडा कॉलेज, अहिल्यानगर.*



**How to cite this article:**

*गावित, . माहेश्वरी . वीरसिंग . (2025). आदिवासी कला आणि सांस्कृतिक शाश्वतता. Journal of Research & Development, 17(8(I)), 134–143.* https://doi.org/10.5281/zenodo.17116026

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

आदिवासी कला त्यांच्या सांस्कृतिक त्यांच्या कलांचे रसग्रहण करताना त्यांच्या रुढी,परंपरा,धार्मिक श्रद्धा,संगीत, नृत्ये,लोकगीते इत्यादींच्या संदर्भाशिवाय ते करता येत नाही.

**बीजसंज्ञा :-** आदिवासी संस्कृती,आदिवासी कला,आदिवासी भावविश्व,निसर्ग,मानवी मूल्ये

**प्रस्तावना**

नागर किंवा प्रगत भागापासून दूर रानावनात, डोंगरद-यांच्या आश्रयाने दुर्गम भागात राहणा-या आदिवासींचे जीवन निसर्गावलंबी असणे साहजिकच आहे.निसर्ग सान्निध्यात राहत असल्याने आदिवासींची स्वतःची अशी एक संस्कृती निर्माण झालेली दिसते.आदिवासींचे भावविश्व हे निसर्गाशी एकरूप झालेले दिसते.कोणताही आदिवासी सदोदित एकाच प्रकारची वस्तू बनवत बसत नाही,त्याला गरज असले तेव्हा तो त्या गरजेनुसार आवश्यक वस्तू बनवितो, वेळेच्या उपलब्धतेनुसार आणि प्रसंगाच्या निकडीनुसार आदिवासी कलाकार त्या वस्तूत सौंदर्य ओतत असतो.आपले संपूर्ण कसब तो पणाला लावतो व त्यातून त्याची कला जन्माला येते, त्याची कल्पना आणि त्याला ज्ञात असलेले संकेत यांचा सुंदर मेळ घालून तो प्रगल्भ विचार प्रकट करीत असतो.हे करीत असताना परंपरागत शैलीचा विसर त्याला पडत नाही आदिवासींच्या घरात दारिद्रय पाचवीलाच पुजलेले.त्यात आदिवासी अल्पसंतुष्ट.घरात असेल त्यात सुख मानावे हा त्याचा स्वभाव.गरजेनुसार तो बांबूपासून टोपल्या बनवील, निरनिराळी वाद्ये बनवील आणि उद्योग नसेल तेव्हा झोपडीबाहेर शांत बसून राहील.लग्नसमारंभात,सणासुदीला आकर्षक पेहराव करुन चपळाईने हलत-डुलत नृत्य करील, भिंतीवर चित्रे काढील,लाकडावर कोरुन लग्नखांब बनवील, मुखवटा कोरुन देईल,रोजच्या वापराच्या वस्तू बनवील आणि हे सारे करताना त्याची हौस भरभरुन ओसंडत असते.आदिवासी वस्तू गरजेनुसार निर्माण करतो.त्या वस्तूंमध्ये आदिवासी संस्कृतीची वेलबुट्टी,त्यांची श्रध्दा,विश्वास,त्यांची कल्पना आणि मनोव्यापार प्रतिबिंबित झालेले असतात. तो राहतो त्या भागातील वातावरण लोककलांमध्ये स्पष्ट जाणवते.निसर्ग सान्निध्यामुळे निसर्गातील सुसंवादी आणि सुंदर आकार,आकृती त्यांच्या प्रेरणा ठरतात.आदिवासी कलाकार सर्वव्यापी निसर्गशक्तीच्या व्याप्तीची जाणीव प्रसृत करते असतो.म्हणूनच साधेपणा,सौंदर्य,निर्मळपणा ही आदिवासी कलेची वैशिष्टये आहेत.त्या धारणांना धरुनच तो जगत असतो.त्याचे जीवन त्यामुळेच उत्सव समारंभ,श्रध्दा,पितृपूजा आणि कुलबंधन या भोवती केंद्रित झाले आहे.आदिवासी लोककलांच्या संदर्भात ही बाब विचारात घेणे आवश्यक आहे.

**संशोधनाची गृहितके :-**

१) आदिवासी कलाकार स्वभावत:च स्वच्छंदी असून, सभोवतालच्या निसर्गाशी एकरूप होणारा आहे.

२ ) आराधनेचा,उपासनेचा एक भाग म्हणूनही आदिवासी कलाकार आपल्या कलेचा वापर करताना आढळतो.

३ ) आदिवासी कलाकार सर्वव्यापी निसर्गशक्तीच्या व्याप्तीची जाणीव प्रसृत करतो.

४ ) आदिवासी कलांमधून मानवी मूल्यांचे व मानवी संस्कृतीचे दर्शन घडते.

५ ) आधुनिक काळातील कलाविष्कारांची मुळे ही आदिम कलांमध्येच असलेली पाहावयास मिळतात.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१ ) आदिवासी कलांचे आदिमपण सिद्ध करणे.

२ ) आदिवासी कला आणि निसर्ग यांचा अन्योन्य संबंध विशद करणे.

३ ) आदिवासी कला आणि आदिवासी संस्कृती यांचा अन्योन्य संबंध स्पष्ट करणे.

४ ) आदिवासी कलांचे विशेष,वेगळेपण आणि सांस्कृतिक शाश्वतता स्पष्ट करणे.

५ ) आदिवासी कलांमध्ये स्थलकालपरिस्थितीनुसार होणाऱ्या परिवर्तनाचा शोध घेणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी क्षेत्रीय संशोधन पद्धतीचे उपयोजन केले आहे.क्षेत्रीय संशोधन पद्धतीने अभ्यास करताना मुलाखती,प्रत्यक्ष भेटी,ध्वनिमुद्रण,छायाचित्रण यांचा अवलंब केला आहे.प्रस्तुत विषयावरील ग्रांथिक साधनांचा वापर संदर्भासाठी केलेला आहे.तसेच समाजशास्त्रीय,मानसशास्त्रीय,आदिबंधात्मक,लोकसाहित्यशास्त्रीय संशोधन पद्धतींचे उपयोजन यात केले आहे.

**विषय विवेचन :-**

**नृत्यकला :-**

आदिवासींनी आपल्या आनंदाच्या सर्व प्रसंगांमध्ये नृत्याला स्थान दिलेले आहे.गावातील लग्नप्रसंग, पिकांच्या हंगामाची सुरुवात, सणोत्सव, देवदैवतांचे विधी, नव्याने आलेले धान्य घरात आणण्याची वेळ आणि कोणताही महत्त्वाचा दिवस याप्रसंगी नृत्यगाण्याची विशेष संधी मिळते.ढोल-डफाच्या तालावर नृत्ये केली जातात.या वेगवेगळया प्रसंगाच्या वेळी गाणीही म्हटली जातात.आदिवासींची नृत्ये उत्साही,जोशपूर्ण,जोमदार,ताल आणि नाद यांचा संगम असलेली आणि विविध रंगांनी सजलेली आहेत.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

आदिवासी नृत्यात बाप,मुलगा आणि नातू अशा तीन पिढ्या अमाप उत्साहाने एकत्र नाचताना दिसतात. आदिवासींच्या धार्मिक कल्पनांमध्ये प्रामुख्याने निसर्गपूजा आहे.ते सतत निसर्गाच्या सान्निध्यात राहतात. प्रत्येक चराचर वस्तुमध्ये चैतन्य आहे,असे मानून त्या शक्तिची ते पूजा करतात.नृत्ये ही याच शक्तिची देणगी असल्याने 'अनाकलनीय' शक्तींना प्रसन्न करण्याचे साधन म्हणून ते नृत्याकडे पाहतात.त्यामुळे नृत्याला पावित्र्य प्राप्त झाले आहे.सर्वशक्तिमान निसर्गावरच जीवन अवलंबून असल्याने,त्याला संतुष्ट ठेवावे या भावनेने केली जाणारी पवित्र कृती म्हणजे नृत्य,अशी आदिवासींची धारणा दिसून येते. अनेक प्रसंगी धार्मिक समारंभासाठी आदिवासी नृत्ये करतात.भयशक्तींपासून संरक्षण मिळावे हा या नृत्यांचा मुख्य उद्देश असतो. देवाची मूर्ती,पवित्र झाड,देवस्थान,बळीचा पशू यांच्याभोवती ही नृत्ये केली जातात.पावरांमध्ये इंदलपूजेच्या वेळी केले जाणारे नृत्य, कोकणांमध्ये डोंगरदेवाच्या उत्सवाच्या वेळी केले जाणारे नृत्य,भिल्लांमध्ये होळीच्या वेळी केला जाणारा दिंडण नाच ही नृत्ये धार्मिकता दर्शवितात. पावरा जमातीत 'इंदल' हा मोठा उत्सव असतो.'इंदल' म्हणजे इंदीराजा. त्याला प्रसन्न करण्यासाठी केलेला नवस फेडण्याचा जो कार्यक्रम असतो,त्याला 'इंदल' म्हणतात,इंदल वैयक्तिक व सामुहिक पद्धतीने साजरा करतात,त्याला अनुक्रमे ' गाव गोंदल्या इंदल' व 'चु-यो इंदल' असे म्हणतात.गावच्या इंदलसाठी घरोघरी वर्गणी गोळा केली जाते.इंदलसाठी भजनी मंडळीही आलेली असतात.कळंब वृक्षाच्या फांद्या विधिवत पूजा करून वाजत-गाजत आणतात.इंदीदेवाची,कणसरीमातेची आणि हुडोवदेवाची अशा तीन फांद्या तीन खड्ड्यात रोवल्यावर पुजारी त्यांची पूजा करतो,त्यावेळी मोठे रिंगण धरून लोक ढोलाच्या तालावर नाचत असतात.यावेळी बोकडाचा किंवा कोंबड्याचा बळी दिला जातो.यावेळी सप्रेम भेटीचा कार्यक्रम होतो.भेटपूजेचा कार्यक्रम झाल्यानंतर मंडपात सारवलेल्या ठिकाणी इंदल नृत्याचा कार्यक्रम सादर होतो.यावेळी सर्व तरुण-तरुणी,मुले-मुली,म्हातारा-म्हातारी आनंदाने नाचतात.ढोलाच्या ठेक्यावर या नृत्याचा बहारदार कार्यक्रम रात्रभर चालू असतो.एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवून हे नृत्य करतात.इंदलदेवाच्या पूजेच्या वेळी गीतेही म्हटली जातात.

असेच एक गीत -

इंदी राजा चवरेमें बोठ्यो
इंदी राजा बोंदोडे बोया ओ
इंदी राजा निंबुने मुक्यो
इंदी राजा बांदोडे बोयो ओ
इंदी राजा लुकडोने गुवयो
इंदी राजा बांदोडे बाये ओ
इंदी राजा कुकेडाने भुवयो
इंदी राजा बंदोडे बाये ओ

**( गावित,२०१५,पृ.क्र.४१ )**

(**भावार्थ** - इंदीदेव अंगणात बारीक नजरेने पाहात आहे.देवाला लिंबाची गरज आहे.देव कोंबडीचा भुकेला आहे.या गोष्टी अर्पण केल्यास देव संतुष्ट होईल.)

इंदलपूजेत कसर राहू दिली जात नाही.नाहीतर इंदीराजाचा कोप होतो असे मानतात.आर्थिक परिस्थितीमुळे तीन वर्षांनी इंदल बसविता आला नाही,तर आणखीन तीन वर्षे पुढे ढकलता येतो,परंतु त्यानंतर मात्र इंदल करावाच लागतो.आजही हे पथ्य अगदी काटेकोरपणे पाळले जाते. कोकणा जमातीत मार्गशीर्ष पौर्णिमेस ८-१० दिवस डोंगरीदेवाचा उत्सव साजरा करतात.देवाचे वास्तव्य असणाऱ्या डोंगराला 'देवडोंगर' किंवा 'गड' म्हणून ओळखले जाते.जसे मांडवगड,कणसऱ्यागड.५०-६० घांगळी भक्त एकत्र येऊन कार्यक्रमाची सुरुवात होते.कार्यक्रमाचा एक सूत्रधार असतो,तो घांगळी (डोंगरीदेवाची घोड्याची काठी) सांभाळतो.सूत्रधार सांगेल त्याप्रमाणे बाकीचे लोक त्याचे अनुकरण करतात.प्रमुख घांगळी वाद्य वाजवितो व डोंगरीदेवाची गाणी म्हणतो.मध्यरात्रीला भक्ताच्या अंगात डोंगरीदेवाचे वारे संचारते.यावेळी डोंगरीदेवाला केलेले नवस फेडणारे लोकही मोठ्या संख्येने आलेले असतात.डोंगरीदेव रोगराई नष्ट करतो, गायी-गुरांचे संरक्षण करतो,पीकपाणी भरपूर देतो,अशी लोकांची समजूत आहे.म्हणून दरवर्षी किंवा दर तीन वर्षांनी किंवा सहा वर्षांनी डोंगरीदेवाचा उत्सव साजरा केला जातो.या उत्सवात घांगळी वाजवून 'देवगाणी' गाण्याची फार जुनी परंपरा कोकणा आदिवासीत आहे.उदाहरणादाखल पुढील गीत पाहा-

धुनी पेटली व कोनत्या गडाले
धुनी पेटली व कुवरीले किलाले
दिवा लावलय व कोनती गडाले
दिवा लावलय व कुवरली किलाले
धुनी पेटली व कोनत्या गडाले
धुनी पेटली व सराई किलाले
दिवा लावलेय व कोनती देवुले

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

दिवा लावलेय व संकरजी देवुले
ध्वज लावलाय व कोनत्या गडाले
ध्वज लावलाय व धवळी बारीले

**( गावित,२०१५,पृ.क्र.४२ )**

संपूर्ण गावाच्या सहभागाशिवाय हा उत्सव पूर्ण होऊ शकत नाही.रात्रीच डोंगरीदेवाच्या ठिकाणी मुक्कामाला जातात. या उत्सवात भगताला अनन्यसाधारण महत्त्व असते.रात्री तेथेच झोपणे सक्तीचे असते.याठिकाणी देवगीते म्हणत गोलाकार फेर धरून शिस्तीत नाचतात.थोड्या वेळाने सर्व तयारी करून परगावी नाचण्यासाठी जातात.याला ते ' गाव मागणे' म्हणतात.यात प्रत्येक घरासमोर अंगणात जाऊन फेर धरून नाचतात. भिल्लांचा 'दिंडण नाच' हे होळीला करावयाचे धार्मिक नृत्य आहे.या नृत्यात पुरुष स्वीचा पेहराव करतो,तिची आभुषणे घालतो. होळीपूर्वी दहा दिवस अगोदर हा नाच सुरू होतो.आदिवासी धरतीची पूजा वेगवेगळया रूपांत करतात,'दिंडण नाच' हा धरतीच्या पुजेचाच भाग आहे.बहुप्रसवा,बहुविविधा अशी ही धरित्रीमाता अनेक जीवांना जगवीत असते.तिच्या चमत्कारांनी दिपून जाऊन आणि तिचा गौरव करण्यासाठी पुरुषांनी तिच्याच प्रतिकात्मक स्त्रीरूपात काही पथ्थ्ये पाळून नाचायचे, हा दिंडणचा मूळ उद्देश आहे.ढोल,सनया,मंजिरा यांच्या गजरात सतत दहा दिवस;पण दिवसातून ठराविक वेळी हा नृत्याविष्कार चालतो.पंचक्रोशीत ठराविक एखाद्या ठिकाणी 'दिंडण' साजरे होते.गावोगावचे लोक श्रद्धेने तेथे जमतात.या नृत्याचे नऊ चाळे आहेत. मांदोळची पूजा करून दिंडणचे चाळे सुरू होतात.वर्तुळाकार नर्तकांच्या फेऱ्यात मध्ये मांदोळ असतो.त्याच्या आवाजाच्या इशाऱ्यावर नर्तक फिरत असतात.या नाचाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे मांदोळच्या ठोक्यावर शरीराच्या अर्थपूर्ण हालचाली.नऊ चाळयांतून माणसाच्या नृत्यभावना नर्तक यशस्वीपणे साकार करतात.त्यांचा म्होरक्या म्हणजे मांदोळ वाजविणारा मांदोळ्या.तो तर कमी पडणाऱ्या नर्तकास मांदोळाच्या आवाजानेच इशारा देतो. दिंडणचा वसा घेतलेले नर्तक पूर्वी गावोगाव असत. हल्ली ही प्रथा मात्र कमी झालेली दिसते.धार्मिक नृत्यांच्या बाबतीत पारंपरिक संकेत आजही तितक्याच पावित्र्याने पाळले जाताना दिसतात.

भिल्लांमध्ये होळीच्या सणामध्ये पंधरा दिवसांपर्यंत होळीगीते गायली जातात.त्यांना 'लोल' असे म्हणतात.पुरुषांनी गावयाच्या होळी गीतांत शेती,शिकार,वर्षभरातील सृष्टीक्रम यांचे वर्णन असते;तर स्त्रियांच्या गीतांत निसर्गवर्णन,होळी सणाचे व त्यासंबंधी देवदेवतांचे माहात्म्य,जीवनाचे तत्त्वज्ञान,मानवी स्वभाववर्णन व निरनिराळया सामाजिक समस्यांचे संदर्भ आढळतात. होळीगीते ही नृत्यगीते नाहीत,त्यांना कुठल्याही वाद्यांची साथ नसते;मात्र ती समूहगीते आहेत.पुरुष मंडळी काटेसावरीच्या आणि सागाच्या होळीभोवती फेर धरून ही गाणी म्हणतात.स्त्रिया मात्र होळीच्या जवळपास असलेल्या घराच्या अंगणात बसून समूहाने गातात. होळीगीते ही दीर्घ नाहीत.त्याच त्याच ओळींची पुनरावृत्ती केली जाते.लग्नगीते किंवा रोडालीतील गाण्यांप्रमाणे होळीगीतात नव्या रचना दिसत नाहीत.ही गीते पारंपरिक दिसतात.उदाहरणादाखल पुढील होळीगीत पाहा

ओली बाय आली गोवारी
पोटलू को फुचेरे, पोटलू को फुचेरे
कुगरालो बाणो तोज
पोटलू को हायरे, पोटलू को हाय
ओली बाय आली गोवारी
पोटलू को फुचेरे, पोटलू को फुचेरे
कुगरावालो हुपडो तोज
पोटलू को हाय रे, पोटलू को हाय
ओली बाय आली गोवारी
पोटलू को फुचेरे, पोटलू को फुचे
कुगरावालो मुहलो तोज
पोटलू को हाय रे, पोटलू को हाय

**( गावित,२०१५,पृ.क्र.४६ )**

(**भावार्थ** - होळीबाई पाहुणी म्हणून आली आहे. ती पोलीस पाटलाचे (गावप्रमुखाचे) घर शोधते आहे. ज्या घराच्या दरवाजाला, घरातील सुपाला, मुसळाला घुंगरू लावले आहेत, तेच पाटलाचे घर आहे.)

वीरश्रीयुक्त नृत्ये आणि लोकगीते यांचे आता मोजकेच नमुने पाहावयास मिळतात.भिल्लांमध्ये आता होळीच्या सणाला आणि काही ठिकाणी लग्नात मुखवटे घालून सोंगे नाचविण्याची फक्त प्रथा शिल्लक राहिलेली आहे.भिल्ल आपल्या शिकारी नृत्यात अस्वलाच्या व डुकराच्या शिकारीचा प्रसंग सादर करतात,त्यासाठी ते भोपळयांना अस्वलाच्या किंवा डुकराच्या तोंडाचा छान आकार देतात.घोंगडी पांघरून माणसाला डुकरासारखा आकार देतात व मुखवटा घालून ते सोंग सजवितात. युद्धनृत्यासारखी वीरश्री या

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

नृत्यांद्वारे प्रदर्शित होत नसली,तरी शिकारीतील जोश,शिकारीतील धाडस,बेहोषपणा व आनंद नर्तक सादर करतात, विविधरंगी पेहराव,हत्यारे,आरडाओरडा आणि आरोळया यांद्वारे शिकारनृत्यातून वीरश्रीचे दर्शन घडते.शिकारनृत्यात ढोलाला फार महत्त्व आहे,ढोलांच्या आवाजाने शिकारीचे वातावरण निर्माण होण्यास मदत होते आणि नृत्याचा जोशदेखील टिकविला जातो. भिल्लांमध्ये एखादी व्यक्ती मृत्यू पावल्यास तूर नाच केला जातो.तूर वाद्याचा उपयोग मर्तिकाच्या व उत्तरकार्याच्या वेळीच केला जातो.मृत व्यक्तीच्या नातेवाईकांनी यावेळी नाचल्यास मृत व्यक्तीच्या आत्म्याला शांती मिळते असा समज आहे.या नृत्याच्या वेळी एकमेकांचे हात हातात घेऊन,पायांच्या ठेक्यावर वर्तुळाकार फेर धरून नाचतात. लग्नप्रसंगी केल्या जाणाऱ्या नृत्यात,ढोल वाजविणारा मध्यभागी उभा राहून ढोल वाजवितो,स्त्रिया व पुरुष त्याच्याभोवती वर्तुळाकार फेर धरून नृत्य करतात.एकमेकांच्या कमरेत हात घालून किंवा एकमेकांच्या हातात हात घालून ही नृत्ये केली जातात.या नृत्यात पदन्यास महत्त्वाचा असतो.नृत्याच्या वेळी गाण्याचा कार्यक्रमही चालू असतो.आदिवासींमध्ये लग्नगीतांची संख्या फार मोठी आहे.ही गीते समूहाने गायली जातात.प्रत्येक गावात ही लग्नगीते सुरेलपणे गाणाऱ्या मुलींचे दहा-दहा,बारा-बारा मुलींचे गट असतात.या मुलींच्या गटाला 'गीताऱ्या' म्हटले जाते. लग्नगीतांत अनेक विषय हाताळलेले दिसतात.हळद लावताना,घर सोडताना मुलीला होणारे दुःख,आई-वडिलांचे प्रेम,सासू-सासऱ्यांचे स्वभाव,असे अनेक विषय लग्नगीतांत येतात.या गीतांना लयबद्धता व तालबद्धता असते. उदाहरणादाखल पुढील गीत पाहा-

नोव चोराल्यो वोराड्यो मांडवो
केडाहा बोनाव्यो भाया रा ऽऽऽ
नोव चोराल्यो वोराड्यो मांडवो
बाहकाहा बोनाव्यो भाया रा ऽऽऽ
नोव चोराल्यो वोराड्यो मांडवो
किकेडाहा बोनाव्यो भाया रा ऽऽऽ
नोव चोराल्यो वोराड्यो मांडवो
पावहू बोनाव्यो भाया रा ऽऽऽ

**( गावित,२०१५,पृ.क्र.४८ व ४९ )**

**(भावार्थ :-** भायाला (नवरदेवाला) उद्देशून - नऊ खांबाचा असा लग्नाचा मंडप कोणी बनविला असेल,तर तो मंडप वडिलांनी आणि भावांनी मिळून बनविला आहे.)

आता गणपती-गौरी,नवरात्र या उत्सवांच्या प्रसंगी गरबा नृत्य केले जाते.लग्नप्रसंगीही गरबा नृत्य आदिवासी लोक करताना दिसतात.गुजराती चालीरीतींचे तसेच नृत्यगाण्यांचे अनुकरण त्यांनी केलेले दिसते.आज सह्याद्री वाहिनीवर 'दम दमा दम' सारख्या लोकनृत्यांवर भर देणाऱ्या नृत्यस्पर्धेत विविध आदिवासी जमातींची वैशिष्ट्यपूर्ण नृत्ये सादर होताना दिसतात. आदिवासींच्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीमुळे आदिवासी पोशाख,वाद्ये,संगीत,नृत्य यातील नावीन्याचे आकर्षण नागर समाजाला असणे स्वाभाविक आहे.त्यामुळे आदिवासीबहुल भागात एखादी बडी हस्ती आली की त्यांच्या स्वागतासाठी आदिवासी नृत्यांचे प्रदर्शन केले जाते.चित्रपटांतून आदिवासींच्या नृत्यातील पदन्यास,संगीत,वाद्ये,गीतांच्या चाली यांचा वापर सर्रास होताना दिसतो.आपल्या नृत्यांच्या नावीन्याचे आकर्षण शहरवासीयांना आहे,हे लक्षात आल्यामुळे आदिवासी भागातील नृत्यकलाकार,आपल्या नृत्यांच्या कार्यक्रमांतून काही प्रमाणात पैसेही मिळवितात.लोककलांच्या परिषदा,संमेलने यांतूनही आदिवासी नृत्यकलांचे प्रदर्शन होताना दिसते. आदिवासींची लोकगीते ही बहुसंख्येने नृत्यसंबद्ध असतात.नृत्य करतानाच ती गायली जातात.ती प्रसंगांशी संबंधित असल्यामुळे,तो विशिष्ट प्रसंग वगळता अन्य वेळी व सहज भावनांची अभिव्यक्ती म्हणून ती गीते गायली गेली असे सहसा घडत नाही. या लोकगीतांचे विश्व मोठे वैविध्यपूर्ण आणि बहुरंगी आहे.साखरपुडा होऊन लग्न ठरल्यापासून,ते लग्न लागेपर्यंत प्रत्येक वैवाहिक कार्यक्रमासाठी वेगवेगळी वैशिष्ट्यपूर्ण लोकगीते आढळतात.

**नाट्यकला**

भिल्ल जमातीत प्रचलित असलेले 'सोंगाड्या' हे लोकनाट्य आदिम जीवनशैलीचे यथार्थ चित्रण करीत लोकरंजन करते.हे एक मुक्त नाट्य असते.त्याच्यासाठी खास रंगमंच उभारावा लागत नाही.पोशाख साधेसुधे असतात.रंगभूषेसाठी फारतर पावडर,काजळ आणि भडक लिपस्टीक.सोंगाड्यात पुरुषच स्त्रियांच्याही भूमिका करतात.साधारणतः कोवळया वयाची मुलेच स्त्रियांची भूमिका करतात.गावदिवाळीच्या निमित्ताने साधारणतः सुगी संपली आणि नवी पिके घरात आली की सोंगाड्याचे आयोजन केले जाते. यानिमित्ताने गावातल्या प्रत्येक घरातून ' फाळ' म्हणजे लोकवर्गणी जमा केली जाते. \पूर्वी गावदिवाळी म्हणजे कोणी कागदाचा घोडा बनवून नाचायचे, कोणी बासरी-डफ वाजवून नाचायचे, कोणी गाणी म्हणून दाखवायची, कोणी एखादे सोंग करून दाखवायचे. अशाप्रकारे आपापल्या अंगचे कलागुण सादर केले जायचे.सुरुवातीला 'भोवण पूजा' म्हणजे रंगमंचाची पूजा करूनच कार्यक्रमाला सुरुवात होते.गावदिवाळी म्हणजे एक प्रकारे गावाचा,देवाचा नवस पूर्ण करणे हा आधीचा हेतू होता.आता करमणुकीसाठी, समाजप्रबोधनासाठी

रोडालीचा उपयोग केला जातो. आता केवळ गावदिवाळीलाच नव्हे,तर कुणा मोठ्या माणसाकडील मुलाचा जन्म, बारसे,लग्नविधी आदिंच्या निमित्तानेही सोंगाड्याचा कार्यक्रम केला जातो.एखाद्या मृत व्यक्तीला दगडात वा लाकडात घडवून 'खांबदेव'म्हणून बसवितात,तेव्हाही सोंगाड्या पार्टीचा कार्यक्रम केला जातो.सोंगाड्यात साधारणतः आठ,दहा किंवा बारा पात्रे असतात.यातील दोन-चार पात्रे स्त्री भूमिका करतात. नायक,नायकाचा मित्र,नायिका,तिची मैत्रीण,खलनायक,एखादी प्रौढ स्त्री आणि दोन विदूषक अशी साधारण पात्रयोजना असते. विदूषक रंगमंचावर हास्यरस सतत उचंबळत ठेवण्याचे काम करतो.कधी प्रसंगनिष्ठ,तर कधी व्यक्तिनिष्ठ विनोद करतात. यामध्ये एखादे कथानक घेऊन ते रंगविले जाते.रात्री सुरू झालेले लोकनाट्य पहाटे उजाडेपर्यंत चालते.याला नृत्य, गीते यांची सुंदर जोड असते.यातील रोडाली गीते ही उत्तम भावगीते आहेत.तरल, कोमल,भावनांचा अत्यंत हळुवार आविष्कार ही रोडाली गीते करतात.त्यात प्रियकर प्रेयसीचा संवाद आहे,संवादानंतरच्या मिलनाची ओढ आहे.प्रितीच्या चोरट्या खाणाखुणा,धुंद अनवट शृंगारही आहे.सोंगाड्यात कार्यक्रमाच्या आरंभी किंवा मध्यंतरी जी गाणी गातात त्यांना 'रोडाली गीते' म्हणतात.ही द्वंद्वगीते असतात. सोंगाड्या पार्टीत एक-दोन स्त्रीवेश घेतलेली पुरुष मंडळी असतात त्यांना रोडाली,रोडाली जोडी (प्रेमिका) म्हणतात.तिच्या सोबत दोन पुरुष पात्रे असतात.त्यांना रोडाला जोडा (प्रेमिक) असे म्हणतात.रोडाली गीते ही नृत्यासह सादर केली जातात.प्रथम पुरुषपात्रे हे गीत गातात व त्यानंतर स्त्रीवेश धारण केलेली पात्रे हे गीत गातात.बहुतेक रोडाली गीते ही प्रेमगीते असली तरी आदिवासी समाजाचे परिपूर्ण दर्शन या रोडाली गीतांतून येते.प्रेम,प्रेमविवाह,काडीमोड,कौटुंबिक कलह,समाजातील गरिबी-श्रीमंती, लबाडी,भ्रष्टाचार,दुराचार,सणवार,यात्रा-जत्रा,शोषण,व्यवसाय,कौटुंबिक जीवन असे अनेक विषय रोडाली गीतांत येतात.रोडाली गीतांत काळानुसार,परिस्थितीनुसार बदल होत गेला.अलिकडील रोडाली गीते ही सोंगाड्या पार्टीतले प्रतिभावंत लोक रचत असतात.ही गीते रचून ते नामानिराळे राहतात.त्यामुळे अमूक गीताचा रचनाकार कोण ते आपल्याला नेमके सांगता येत नाही.यातील जवळजवळ प्रत्येक गीतातून रोडाला/रोडाली,मेराला/मेराली,जोडा/जोडी हे प्रियकर-प्रेयसी यांचे सूचक शब्द येतात. उदाहरणादाखल पुढील रोडाली पाहा -

पाच वोडूवाला खेतू मे
हियाली खेड खेडूना
माजन्यो तोपे तोपे
मा राणी रोडाली जोडी
मुनेकापे पातू शिबेली
कायमा राजा रोडाला
पाते लेती आवूरा
मा राजा रोडाला जोडा

**( पाडवी,२००६,पृ.क्र.१९ )**

(**भावार्थ** :- वडाची पाच झाडे आहेत,त्या शेतात मी हिवाळयाच्या दिवसात शेत नांगरत आहे.त्यावेळेस भर दुपारी ऊन पडले असता,तू डोक्यावर भाकरी (शिदोरी) घेऊन येते आहेस माझ्यासाठी.)

लोकप्रिय हिंदी गाण्यांच्या चालीवर आदिवासी बोलीतील गीते आता सोंगाड्यात गायली जातात.काळानुसार स्वरूप बदलले आहे, पण सोंगाड्याची लोकप्रियता मात्र कायम आहे. सोंगाड्या या कार्यक्रमाचे मूळ स्वरूप धार्मिक असले तरी आजकाल मात्र ते केवळ मनोरंजनाचे एक साधन न राहता समाजप्रबोधनाचे साधन बनले आहे.नवस,यात्रा,देवाचा भंडारा,ईश्वरी शक्तीचे चमत्कार अशी विविध कथानके त्यात असली तरी अलिकडे सामाजिक विषयही सोंगाड्यातून चर्चिले जातात. सामाजिक अनाचार, भ्रष्टाचार,शाहू समाज करीत असलेली आदिवासींची फसवणूक,शहरात होणारी फटफजिती,अर्धवट शिक्षणाने बिघडणारी तरुणांची मानसिकता,शिक्षणाचे महत्त्व,कुटुंबनियोजनाचे महत्त्व असे अनेक विषय सोंगाड्यात येतात. 'आदिवासींमध्ये प्रत्येक गावात वेगवेगळया दिवशी ही दिवाळी साजरी होते.पूर्वी आसपासच्या खेड्यांवरून आदिवासी लोक नाटक पार्ट्या आणत आणि आळीपाळीने रात्रभर नाटक करीत.या नाटक पार्ट्या आदिवासी बोलीतून आपली कला सादर करीत.पूर्वी फक्त आनंदासाठी नाटक पार्ट्या यायच्या तशा आता येत नाहीत.आता पैसे देऊन नाटक पार्ट्या आणाव्या लागतात.ही दिवाळी पाहण्यासाठी दूरदूरवरून पायी चालत किंवा बैलगाड्या जुंपून लोक येतात.नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने शहरात गेलेला आदिवासी आपल्या कुटुंबासमवेत आवर्जुन गावाकडे येतो.आपल्या गावात अमूक दिवशी दिवाळी आहे,असे ठरल्यावर गावातला गरिबातील गरीब आदिवासी दिवाळी साजरी करण्यासाठी आपले बजेट बसविण्याच्या खटपटीत असतो.दिवाळीच्या दिवशी त्यांच्या घरी वेगवेगळया गावांतून नातेवाईक येतात,त्यांच्यासाठी ते दारू आणि मटणाची सोय करतात.

सोंगाड्यात देवदेवतांची गीतेही असतात.ही गीते म्हटल्यावर बऱ्याच लोकांच्या अंगात देवाचा वारा येतो व ते घुमू लागतात.आता चित्रपटातील गाणीही सोंगाड्यात म्हटली जातात.सोंगाड्यातील गीतांना वन्स मोअर दिला जातो.आवडणाऱ्या गीतांना लोक बक्षीस देतात.बक्षीस देणाऱ्याचे नाव माईकवर सांगितले जाते.आता सोंगाड्या पार्टी असतील तेव्हा गावात जुगारही खेळला जातो.आता या कलेला व्यावसायिक स्वरूप आलेले दिसते. कोकणा जमातीत डोंगरीदेवाच्या उत्सवात गडपूजेच्या आदल्या रात्री किंवा

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

दोन दिवस आधी रात्रीचे जागरण करून 'शेवरी' खेळविली जाते.या शेवरी खेळात शिवारातील सगळ्या देवदेवतांना नमन करून इडा पिडा,दुःख-दारिद्रय आणि संभाव्य अडथळे दूर करण्याचे निवेदन 'भगतामार्फत केले जाते.गडपूजेच्या कामात काही कोपीवृत्तींच्या देवदेवतांनी अडथळे आणू नयेत, म्हणून त्यांना डोंगरीदेव उत्सवातील या जागरणाच्या रात्री महत्त्वाचे स्थान दिले जाते.यात संपूर्ण आदिवासी जीवनाचा एक जीवनपट खिलाडू वृत्तीने उलगडून दाखविण्याचा प्रयत्न असतो.बाह्यतः मनोरंजनात्मक वाटणाऱ्या या कार्यक्रमाच्या मुळाशी मोठे जीवनविषयक तत्त्वज्ञान असते.आदिवासींचे जीवन हलक्या-फुलक्या मनोरंजनातून लोकांसमोर ठेवले जाते; मात्र या खेळाचा शेवट भक्तिभावाने होत असतो.

शेवरी खेळ सर्वसाधारणपणे 'शेणगुलीन' पासून सुरू होऊन इंद्र दरबाराला संपतो.भगताकरवी डोंगरीदेवाचे नमन झाल्यानंतर पहिले पात्र शेणगुलीनचे निघते.वर्तुळाकार बसलेल्या गावातील लोकांसमोर ही पात्रे आपला अभिनय करावयास सुरुवात करतात. 'शेणगुलीन' म्हणजे सकाळी गाई-बैल-शेळयांचा गोठा साफसफाई करणारी आदिवासी कुटुंबातील जबाबदार स्त्री, ही स्त्री घरातील सून किंवा मुलगी असू शकते.यात सासू-सुनेच्या संबंधातील मजेशीर प्रसंगही उभे केले जातात.त्यानंतर 'टेहळीण'चे पात्र. आदिवासी जीवनामध्ये शिकार करणे हे उदरनिर्वाहाचे साधन होते,ते आजही आहे.कोणत्याही जंगली प्राण्यांची शिकार असो वा मध गोळा करणे असो,प्रत्यक्ष शिकारीच्या काही दिवस आधी शिकारक्षेत्राचे निरीक्षण,शिकार चालू असताना खबरदारी घेणे आणि शिकारीनंतरसुद्धा सगळ्या गोष्टी नीटनेटक्या रांगेला लावण्यासाठी व्यवस्थापनाची गरज असते.या सर्व प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी नेमके सावज शोधण्यासाठी टेहळीण ताजी माहिती पुरवीत असते.त्या माहितीच्या आधारे शिकारीचे डावपेच रचले जातात.शिकार यशस्वी होण्यात टेहळीणची भूमिका खूप महत्त्वाची असते. गुराखीचे पात्रही रंगविले जाते.प्रत्येक पात्राच्या अंतिम भागात देवकार्य करणाऱ्या मालकाकडे झेंडूच्या फुलांच्या प्रतीकरूपात बरकत सुपूर्द करतात.भगताचे पात्रही मोठ्या प्रभावीपणे सादर करतात.भगताचे चालणे,बोलणे, विविध गोष्टींकडे बघण्याचा दृष्टिकोन विनोदी ढंगाने दाखवितात.नशापानावरही सादरीकरण केले जाते,याला 'अंमलपाणी' म्हणतात.अजगर,सर्प,गारुडी,माकडे,सिंह,बैल,बोकड,कुत्रे अशा प्राण्यांच्या पात्रांनाही या खेळात स्थान मिळत असते.

**शिल्पकला :-**

आदिवासी निसर्गालाच परमेश्वर मानतात.निसर्गसृष्टीतील वनस्पती,पशु-पक्षी,डोंगर,नद्या,सूर्य,चंद्र,धरती यांना ते देव मानतात.विविध शक्तींना आपल्या भोवती असलेल्या दगडधोंड्यांच्या स्वरूपात प्रतिकात्मकतेने पाहण्याची दैवतकृपा स्थिर जीवनाचे प्रतीक म्हणता येईल.भटकी वृत्ती सोडून स्थिर जीवन निर्माण झाल्यानंतर विविध दैवतांना उदा:- सूर्य,चंद्र,तारे,पुराणपुरूष, पुराणवंशज,मातृशक्ती,पितृदेवता यांना प्रतीक स्वरूपात एका ठिकाणी मांडून संपूर्ण समूह स्थिर जीवनाची धर्मधारणा अविचल स्वरूपात प्रकट झालेली दिसते.आदिवासी जीवनामध्ये मूर्तीपूजा पाहावयास मिळते.अलीकडील काळात दगडधोंड्यांच्या दैवतांऐवजी टाकांच्या स्वरूपात,किंवा मूर्तीच्या स्वरूपात देव पाहावयास मिळतात.आदिवासींची ही दैवते उत्कृष्ट शिल्पकलेचा नमुना म्हणून सांगता येतात.

**१) वाघदेव -**आदिवासींच्या प्रत्येक पाड्याच्या वेशीवर वाघदेवाची स्थापना केलेली आढळते.वाघदेवाची मूर्ती सुमारे तीन फुट उंच लाकडी खांबावर वा दगडावर कोरलेली असते.त्यावर सूर्य आणि चंद्रही कोरलेले असतात.काही ठिकाणी सर्प वा विंचूही कोरलेले असतात.भक्षकालाच रक्षक मानून त्याची पूजा केली जाते.जंगलात फिरताना गाय, बैल, शेळी, मेंढी यांचे रक्षण करावे यासाठी वाघदेवाची पूजा केली जाते.वाघदेवाला नवस केले जातात.त्याला संतुष्ट करण्यासाठी पशुबळी देण्याची प्रथा आहे. वाघदेवाचा उत्सव साधारणतः पोळ्यानंतर येणाऱ्या पौर्णिमेच्या सुमारास साजरा करण्यात येतो.

**२) खांबदेव -**भिल्लांमध्ये अपघाती मरण आलेल्या व्यक्तींचे स्मृतिस्तंभ उभारण्याची पद्धत आहे.मृत व्यक्तीच्या स्मरणार्थ लाकडाचा किंवा दगडाला खांब तयार करून त्याची पारंपरिक रीतीने विधिपूर्वक स्थापना केली जाते.या निमित्ताने मृताचे नातेवाईक, शेजारच्या गावातील नातेवाईक आणि गावकरी एकत्र येतात.याला 'खांबुल्या देवाची जत्रा' असे म्हणतात. या खांबुल्या देवाच्या ठिकाणी मृत व्यक्तीचा जीव येऊन वसतो, अशी या लोकांची धारणा असल्याने त्याला ते देवतासमान मानतात.या खांबुल्या देवाच्या स्थापनेच्या कार्यक्रमाच्या वेळी स्त्रिया काही पारंपरिक गीते गातात.त्याला 'खांबुल्या देवाची गीते' म्हणतात.या गीतांतून मृतकाच्या जीवाला खांबुल्या देवाच्या ठिकाणी स्थिर होण्याची विनवणी केलेली असते.अशा प्रकारच्या काही गीतांतून खांबुल्या देवाच्या पूजाविधीचे, तर काही गीतांतून मानवी जीवनाच्या क्षणभंगुरतेचे वर्णन केलेले असते.या खांबदेवाची रचनाही वैशिष्ट्यपूर्ण असते.साधारणतः तीन फुटापासून ते पाच फुटांपर्यंत उंचीचे हे खांबदेव आढळतात.ह्या स्मारक स्तंभाचा वरचा भाग घोटून गुळगुळीत केलेला असतो.त्यावर शेंदूर लावलेला असतो.सूर्यचंद्र,कमलपुष्पे,घोड्यावर बसलेला हातात तलवार घेतलेला वीर किंवा नुसतीच तलवार असे विविध आकार ह्या खांबावर कोरलेले असतात.वीरांच्या चेहऱ्यावर आदिवासींच्या स्फूर्तिदायी शक्तीचे दर्शन कलाकार स्पष्टपणे घडवितो.कलाकाराने कोणत्याही शैलीचे अनुकरण न करता चित्राकृती जास्तीत जास्त सजीव करण्याचा प्रयत्न केलेला असतो.त्यामुळे त्यातील आकृतींना एक प्रकारचा खडबडीतपणा,ओबडधोबडपणा आलेला दिसतो.

**३) याहामोगी-**गुजरात राज्यातील सागबारा तालुक्यातील देवमोगरा या गावी आदिवासींची कुलदेवता याहामोगीचे मंदिर आहे.महाराष्ट्र,गुजरात,मध्यप्रदेश या तीन राज्यांतील आदिवासी या ठिकाणी मोठ्या संख्येने येतात.महाशिवरात्रीला याहामोगीची जत्रा असते.याहामोगीची मूर्ती म्हणजे कष्ट करणाऱ्या आदिवासी स्त्रीची प्रतिमा आहे.तिच्या एका हातात दुधाचे भांडे व दुसऱ्या हातात गायी-गुरे बांधण्याचे दोर आहेत.समृद्धीची देवता म्हणून ओळखली जाते.

**४) कणसरी-**कोकणा जमातीची ही समृद्धीची देवता.ही देवता शिश्याची असते.हिच्या हातात समृद्धीचे प्रतीक म्हणून धान्यांची कणसे असतात.राजा पानठा व गांडा ठाकूर यांच्या घोड्यावर बसलेल्या लाकडी,दगडी व मातीच्या मूर्तीही या भागात दिसतात.तसेच पांढर,हिवाऱ्यादेव यांच्याही मातीच्या वैशिष्ट्यपूर्ण मूर्ती पाहावयास मिळतात.कोणतीही वस्तू निर्माण करताना आपण जीव घडवीत आहोत,अशी आदिवासींची श्रद्धा असते.अशा श्रद्धेतून निर्माण झालेली देवीची मूर्ती आदिवासींचे भावनाविश्वच बदलून टाकते.त्यात जीव ओतण्याचा कार्यक्रमही धुमधडाक्याने साजरा होतो.आदिवासी निराकार दगडाकडे शक्तिदैवत म्हणून पाहतात.शक्तिरूपाचे पूर्ण रूप म्हणूनच ते त्या दगडाचा स्वीकार करतात.तीच धारणा शिल्पामागेही असते.निराकार दगड जसा कोणत्याही इतर आकाराशी संबंधित नव्हता,तशी आदिवासी मूर्तीही कोणत्याही नमुनेदार मानवी आकाराशी संबंधित आहे,असे तो समजत नाही.कोणत्याही शिल्पाकृतीचा तो साकल्यानेच विचार करतो व म्हणून या शैलीत अवयवांना वेगळे अस्तित्व राहतच नाही.आदिवासी शैलीत वस्तुच्या वास्तवरूपापेक्षा तिचे भावरूप वेगळे आणि महत्त्वाचे मानण्यात आले आहे.त्यामुळे आदिवासी शिल्पातील स्त्रीचे आकृतीसौष्ठवही वेगळे होते.शिल्प कोरणाऱ्या किंवा मूर्ती घडविणाऱ्या आदिवासी कारागिराची धारणा वस्तुच्या फक्त भावरूपाला महत्त्व देणारी असल्याने,त्याची शैली पूर्णतः मनस्वी आणि मुक्त असते.उदा.:- 'कणसरी' ही पिकांची देवता म्हणून तिच्या हातात कणसे दाखवायची,तसेच कान,गाल इ.अवयवांना कणसांचाच आकार द्यायचा.मुख्य देवतेचे अनुचरही देवतेसारखेच शक्तिभारीत आकृती दाखविण्यात येतात.

**चित्रकला :-**

भिंतीवर रंगाने चित्र काढण्याची मानवाची सवय फार पुरातन आहे.प्राचीन काळात गुहाजीवन जगताना,माणसाने गुहांच्या भिंतीवर चित्रे काढली.प्राणी,वनस्पती हेच त्यांच्या चित्रांचे विषय होते.गुहेतील चित्रांपासून भिंतीवरील चित्रकलेचा उगम झाला. नंदुरबार-धुळे जिल्ह्यांतील आदिवासी स्त्रिया लाल,काळया, पांढऱ्या रंगांच्या मातीने आपल्या घराच्या भिंती सारवतात.जमिनीवर शेणाने सारवतानाही हाताने अर्धवर्तुळाकार आकार देतात.त्याची एक नक्षीच तयार होते.दारांवर पशू-पक्षी,वृक्ष-वेली,नदी-नाले, पहाड,जंगल,नृत्ये,यात्रा,शेतीचा हंगाम इत्यादी विषय चितारून रंगविलेले असतात.दुष्टात्म्यांना घरापासून दूर ठेवण्यासाठी घराच्या उंबरठ्यावर आणि दरवाजाभोवती काळया खुणा असतात.लग्नप्रसंगी मांडवाची पूजा करताना,हत्यारांचे पूजन करताना, हेंगोलपूजेच्या वेळी भगत विशिष्ट प्रकारच्या रेषा काढतो.या चित्रकलेत सांकेतिकता आहे, गूढता आहे. आदिम चित्रकला हे प्राचीन मानवाच्या कल्पनांना मूर्तस्वरूप देण्याचे,त्यानेच शोधून काढलेले साधन असावे.अनेक भाषांची मूळ लिपी चित्रलिपी समजली जाते.त्यादृष्टीने आदिवासी चित्रकला मानवाच्या सांकेतिक विश्वाचे आदिवासींनी जतन केलेले एक अंग समजण्यास हरकत नाही.आदिवासी चित्रकलेत येणाऱ्या संकेतांचा अर्थ लावणे आजच्या परिस्थितीत अतिशय अवघड काम आहे.चित्र काढण्याची जुनी पद्धती सामाजिक रूढींमुळे त्यांनी चालू ठेवली आहे;परंतु आजच्या काळात त्याचे अर्थ आणि अन्वयार्थ यांचा विसर पडत असल्याचे दिसते.मुखवटे भिल्ल जमातीत होळीच्या सणाला आणि काही लग्नात मुखवटे घालून सोंगे नाचवितात.शिकारीनृत्यात अस्वलाच्या व डुकराच्या शिकारीचा प्रसंग सादर करतात.भोपळयांना अस्वलाच्या किंवा डुकराच्या तोंडाचा छान आकार देतात.

आदिम कलेचे मूळ बीजच वारली चित्रकलेत विकसित झालेले दिसते.**( गारे,२०००,पृ.क्र.५८)** मूळ 'देवाचा चौक' लिहिण्याच्या कल्पनेतून वारली चित्रकलेचा आविष्कार दिसतो.या चित्रकलेचा परिपोष वारली संस्कृती आणि परंपरा व त्यांच्या सभोवतालच्या परिसरातील निसर्ग संपत्तीचा आधार घेऊन झालेला आहे.त्यामुळेच त्यात धार्मिक विधी,लग्नविधी,देवदेवता,दैनंदिन जीवन,लोकजीवन व त्याबरोबर आजूबाजूचा परिसर,पशुपक्षी,वृक्षवेल,नदी,नाले,डोंगर,पहाड,वने,जंगले,नृत्य,घरदार,शेतीचे हंगाम,शिवार,परिसर,जत्रा'उत्सव दळणकांडण,व्यवसाय इत्यादी विषय रेखाटले जातात.या चित्रकलेत निसर्गातील किडामुंगी पासून प्राणी,मानवाकृती सभोवतालची सृष्टी आणि वृक्षवेली यांचे अतिशय सुरेख चित्रण,मानवी जीवनाचे निसर्गाशी असलेले नाते त्यांच्या जाणीवेच्या पातळीवर चित्रित करून ते आपला आविष्कार चित्रातून प्रकट करतात.ही चित्रकला स्त्रियांनी सुरू केली आहे.ही भित्तीचित्रे लग्नप्रसंगी धवलेरी काढतात.वारली जमातीत लग्नप्रसंगी काढल्या जाणा-या चौकांचे आकार धरती मातेच्या अगम्य रुपांचीच प्रतीके असतात.त्यांना धरतीमातेची अपार ओढ आहे,माया आहे.त्यांच्या चार बांधांची मर्यादित खाचरे ही माया व लोभ सदोदित वृद्धिंगत करीत असतात आणि हे जन्मापासूनचे त्यांचे अतूट संबंध धरतीचे प्रतीक म्हणून येतात.

**दागदागिने व सौंदर्यप्रसाधने :-**

आदिवासी स्त्रिया चांदीचे व बहुधा नकली धातूचे दागिने वापरतात.आदिवासी स्त्रियांनी पितळ,काच,दगड,मणी,लाकूड, हाडे,वेळू,विशिष्ट गवत,बिया,पिसे आणि कवड्या यांचे दागिनेही सोडलेले नाहीत.विशिष्ट घाटांची व बांधणीची आवड आणि खोलवर रुजलेल्या रुढी यामुळे आदिवासी स्त्रिया पेहरावाशी सुसंगत व पूरक असे दागिने निवडतात.आदिवासी वृद्ध स्त्रियांच्या दागदागिन्यांत

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

शिंपले,कवड्या आणि मण्यांच्या माळांचा भरपूर उपयोग केलेला आढळतो.तर मधल्या पिढीच्या स्त्रिया रंगीत दगड, काच,कवड्यांच्या माळांबरोबरच धातुचे दागिनेही वापरतात.तरुण पिढीने मात्र धातुच्या दागदागिन्यांचा जास्तीत जास्त वापर सुरू केलेला दिसतो.या पिढीत ऐपतीनुसार चांदी,नकली धातू,ॲल्युमिनियमचे दागिने घालण्याची प्रथा आहे.आदिवासी पुरुषही कडा नावाचे दंडभूषण,पायात तोडा,कानात भिकबाळी,चलनी नाण्यांच्या कंठमाळा घालतात. आदिवासी स्त्रिया कानात घालावयाच्या अलंकारात कानाची पाकळी भरून एकेक कानात ९-९ रुप्याच्या किंवा चांदीच्या बाळ्या घालीत.अलिकडे हा प्रकार आढळत नाही.नाकात घालावयाच्या अलंकारात रवेदार फुली,मधल्या पाकळीत छोटी रिंग (बुलाख),लग्नकार्यात उत्सवादी प्रसंगी राजस्थानी पद्धतीची रिंग (नाक्यों) वापरतात.गळयातील अलकारांमध्ये चांदीची साखळी, (आहली),चोहरो (नऊ साखळयांचा मोठा हार) वापरतात. हातात घालावयाच्या अलंकारात पाटली,चोखरे, बांगड्या,कडे,वाळी असे दागिने,तर पायातील अलंकारात साखळया (पैजण),कोरणे,वाळे,जेहरे,सारण्ये वापरतात. हे सर्व दागिने चांदीचे असतात.ज्यांची चांदीचे दागिने घ्यायची ऐपत नसते ते रूप्याचे दागिने वापरतात.पूर्वी चांदीच्या रुपयांचा हारही (चांदुडो) स्त्रिया वापरीत.पूर्वी विवाहित स्त्रियांच्या गळयात ४-५ पदरी काळया मण्यांमध्ये केशरी रंगाच्या काड्यांचा गुच्छ मधोमध ओवलेला असायचा.या केशरी रंगाच्या काड्यांना 'हुंदले' म्हणत.आता हा प्रकार दिसत नाही. आदिवासींचेही स्वतःचे सोनार होते.आदिवासी सोनाराकडे कोणताही साचा नसतो.आदिवासी सोनार प्रत्येक दागिना वेगवेगळा घडवितो. आधुनिक बाजारातील स्पर्धेत ही कला मागे पडली आहे.या दागिन्यांच्या नक्षी खास आदिवासी पद्धतीच्या असतात.या दागिन्यांचे घाट नीट तपासल्यास असे लक्षात येते की,अजिंठा-वेरूळ येथील शिल्पातील दागिने या घाटाचेच आहेत. हसली व मण्यांच्या माळा या दागिन्यांत हे साम्य हमखास दिसते.आता दागिन्यांची पारंपरिक घडण मागे पडू लागली आहे. आधुनिकीकरणाच्या संपर्काने सोन्याच्या दागिन्यांचा वापर आता सर्रासपणे होताना दिसतो.अलिकडे धंदेवादेक लोकांनी आदिवासींची ही कला उचलली आहे.

**गोंदण :-**

जत्रा-यात्रांच्या ठिकाणी गोंदणाऱ्यांची संख्या जास्त असते.काही गोंदणाऱ्यांकडे विद्युत घट असतात.गोंदण्यासाठी झाडांच्या सालीचा रंगही वापरतात.सुई अगर झाडाचा काटासुद्धा गोंदण्यासाठी वापरतात.झाडे,पाने,फुले,विंचू,साप,पक्षी असे आकार गोंदतात.अलिकडे आपापली नावे गोंदवून घेतली जातात.गोंदण्याच्या खुणा,बाक,आकार,वळणे व नक्षी कमालीच्या एकरूप असतात.गोंदणातील हे आकार म्हणजे हजारो वर्षांपासून वाईट किंवा दुष्ट शक्तींच्या आघातापासून स्वतःला जपण्यासाठी स्वीकारलेल्या कल्पनांची ही सांकेतिक रूपेच आहेत.आता कपाळ,गाल,दंड,पाठ,कंबर यांवर 'टॅट्यू' म्हणून गोंदणाच्याच नक्षी दिसतात.मेंदीमध्येही याच नक्षींचा वापर होताना दिसतो.गोंदणाचा आणि आधुनिक वैद्यकशास्त्राने स्वीकारलेल्या 'ॲक्युपंक्चर' उपचार पद्धतीचा संबंध असावा.आजही आदिवासी भागात गुडघेदुखीवर गुडघा गोंदवून घेतला जातो.असा हा संबंध प्रस्थापित झाल्यास आदिवासींची रोगनिदान व उपचारपद्धती यावर बराच प्रकाश पडू शकेल.

**घरगुती वापराच्या वस्तू : -**

आदिवासींच्या झोपड्या उभ्या-आडव्या कारवीच्या कुडाच्या असतात.बांबूचा वापरही केला जातो.या झोपड्यांचे छत पळस,सागाची पाने व गवत यांनी शाकारलेले असते.घरांसाठी भरपूर लाकडांचा उपयोग केलेला असतो.घरांसाठी वापरलेल्या लाकडावर निरनिराळे आकार काढून नक्षीकाम केलेले असते.आदिवासींच्या घरगुती उपयोगाच्या वस्तूंमध्ये शेतातील पीक घरात साठवून ठेवण्यासाठी मातीच्या कोठ्या (बोदड्या), बांबूपासून बनविलेल्या कणग्या यांचा वापर होतो.स्वयंपाकाची भांडी मातीची असतात.मातीची भाजलेली परात (ठोंबलो),मातीचा तवा (खापुं),मातीची पातेली (आंडली), मातीची हंडी (वेंडली),लाकडापासून तयार केलेला चमचा (चाटू), दुधी भोपळा कोरून तयार केलेल्याचा उपयोग पाणी, भाजी,वरण वाढण्यासाठी (डोवी) करतात.धान्य उखळात कुटतात आणि विविध प्रकारच्या डाळी दगडी जात्यावर भरडतात.आता नागरीकरणाच्या संपर्कामुळे स्टील, ॲल्युमिनिअमच्या भांड्यांचा वापर केला जातो.गिरणीच्या सुविधांमुळे उखळ आणि जात्याचा वापरही कमी झालेला दिसतो.

**बांबूकाम :-**

बांबूचा वापर अनेक कारणांसाठी केला जातो.घरे उभारण्यासाठी,घरे शाकारण्यासाठी, तट्टे,टोपल्या,चटया,सूप,खाटा, भिंती विणण्यासाठी,खेळणी,फण्या बनविण्यासाठी,भोपळयाचे आच्छादन विणण्यासाठी,मासे व पक्षी पकडावयाचे निरनिराळे फासे सापळे बनविण्यासाठी,लग्नप्रसंगीची बाशिंगे,धान्याच्या कणग्या,धनुष्यबाण व निरनिराळी वाद्ये,अशा कितीतरी वस्तू बनविण्यासाठी बांबूचा वापर करतात.खाण्या-पिण्याचे पदार्थ ठेवण्यासाठी, धान्य ठेवण्यासाठी व बाजारहाटासाठी टोपल्यांचा सर्रास वापर केला जातो. काही आदिवासी लोक घरातले देव टोपलीत ठेवतात.तर पूजेसाठी व पूजा साहित्यासाठीही टोपलीचा वापर करतात. उदा.:- कुलदेवता याहामोगीच्या पूजेसाठी घेऊन जायची पूजेची टोपली (पातेची सिबली). विवाहप्रसंगीची टोपली (सिबली) नाचविली जाते.बांबूपासून बनविलेल्या या टोपलीला गोंडे,आरसे,मणी,रिबीनी लावून सजविले जाते.आता चक्राकार फिरणाऱ्या टोपल्यांचा वापर लग्नांमध्ये सर्रास केला जातो.ही टोपली लग्नप्रसंगी भाडेतत्त्वावर दिली जाते.भिल्लांच्या होळीनृत्यात नर्तक विविध रंगांचे मुकुट घालतात.हे मुकुट बांबूपासून तयार करून त्यांना रंग लावला जातो.पूर्वी त्या टोपांवर पक्ष्यांची पिसे लावली जात.अलीकडे पक्ष्यांच्या पिसांऐवजी रंगीबेरंगी

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

कागदाच्या पताका लावून ते टोप सजविले जातात.आदिवासी कला म्हणून बांबूच्या वस्तूंची निर्मिती करीत नाहीत.तसेच छंद म्हणूनही या वस्तूंची निर्मिती करीत नाहीत.अशी वस्तू प्रथम त्यांची गरज भागविणारी वस्तू म्हणून निर्माण होते,त्यानंतर ती कलावस्तू ठरते.खरे तर बाजार विचारात घेऊन विक्रीसाठी फार थोड्या टोपल्या बनविल्या जातात.आता बांबूपासून काही शोच्या वस्तूही पैसे मिळविण्याचे एक साधन म्हणून आदिवासी बनविताना दिसतात.

**निष्कर्ष :-**

१ ) वैश्विक मानव जातीच्या प्रारंभिक अवस्थेतील मानवी जीवनसमूह अवशेष म्हणून आदिवासींकडे बघावे लागेल.त्यांची संस्कृती ही सर्व संस्कृतीची मूलस्त्रोत आहे.

२ ) आदिवासींचा निसर्गवादी धर्म आणि निसर्गाश्रयी संस्कृती वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

३ ) आदिवासी जीवनात मानवी मूल्यांची वैश्विक संवेदना पाहावयास मिळते.

४ ) निसर्ग सान्निध्यामुळे निसर्गातील सुसंवादी आणि सुंदर आकार व आकृती आदिवासी कलाकारांच्या प्रेरणा ठरतात.

५) निसर्गाशी एकतानता पावणाऱ्या या कला आत्मकेंद्री कधी असत नाहीत.समूहाला आपल्यात सामावून घेण्याची क्षमता त्यात असते. म्हणूनच,या कला त्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग बनल्या आहेत.

६ ) आदिवासी कलांमधून समूहभावना आविष्कृत होते.

७ ) आदिवासी कलांचे रसग्रहण करताना आदिवासी संस्कृती विचारात घेणे आवश्यक ठरते.

८ ) आदिवासी कला त्यांच्या सांस्कृतिक जीवनापासून वेगळया करता येत नाहीत.

९) धार्मिक विधी,लग्नविधी,देवदेवता दैनंदिन जीवन,पशुपक्षी, नदीनाले,डोंगर,पहाड,नृत्य,जंगल,झाडे,शेती हंगाम,जत्रा इत्यादी विषय आदिवासी कलेतून साकार होताना दिसतात.

१० ) यात्वात्मकता,प्राकृतिकता,मंत्रशरणता,प्रतिकात्मकता,हर्षनिर्भरता हे आदिवासी शैलीचे विशेष होत.

११ ) आदिवासी कला या आदिम श्रद्धेपासून आणि विधींपासून वेगळया काढता येत नाहीत.त्यामुळे आदिवासी कला या सांस्कृतिक संचितांचा मूर्त आविष्कार होत.

१२ ) शहरी आर्टगॅल-यांमधून आदिवासी कलाप्रदर्शनाच्या नावावर आदिवासी कलांची भ्रष्ट मोडतोड पाहावयास मिळते.

१३ ) आदिवासी कला आदिवासी क्षेत्रांत थोड्याफार बदललेल्या स्वरूपात अस्तित्वात आहेत.आदिवासींकडून कलावस्तूंची निर्मिती हवी असल्यास बाजारू दृष्टिकोन ठेवून चालणार नाही.

**समारोप :-**

आदिवासी जीवनात मानवी मूल्यांची वैश्विक संवेदना पाहावयास मिळते. ही संवेदना म्हणजे निसर्ग व जीवसृष्टी यांच्याशी सारख्याच सहानुभूतीचे मानवाचे वर्तन.भूतमात्रांविषयीचा जिव्हाळा असल्यामुळे त्यांच्याशी अतूट नाते राखत जीवन जगायचे असते,हे बाळकडूच त्यांना मिळालेले असते. आपल्या आजूबाजूच्या परिसरातील प्राणीजीवनातील कृतज्ञता आदिवासींनी आपल्या मुखवट्याच्या नृत्यातून-नाट्यातून व्यक्त केली,त्याचप्रमाणे प्राचीन मंदिरांवर कोरलेली व्यालशिल्पे ही याच हेतूने निर्माण झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. लोकसांस्कृतिक परंपरा या आदिम काळापासून अस्तित्वात आल्या असून, त्या सातत्याने प्रवाही असतात.या परंपरा लोकमानसातून निर्माण होतात आणि आधुनिक काळातील कलाविष्कारांची मुळे ही लोककलांमध्येच पाहावयास मिळतात. आदिवासींच्या परंपरागत शैलीचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास झाल्यास आदिवासी कला उत्तरोत्तर वाढतील आणि सध्याच्या आदिवासी संस्कृतीची वाटचाल,तिचे पुरातन संबंध स्पष्ट होण्यास मदत होईल.आदिवासींच्या कलांना बाजारू रूप अजून आलेले नाही.त्यामध्ये अजून जिवंतपणा आहे.

**संदर्भ :-**

1. आदिवासी लोकपरंपरा,डॉ. माहेश्वरी गावित,चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद, प्रथमावृत्ती मार्च २०१५
2. पारंपरिक आदिवासी मौखिक गीत संग्रह,वीरसिंग पाडवी,आदिवासी साहित्य एवम सांस्कृतिक परिषद नंदुरबार,प्रथमावृत्ती एप्रिल २००६
3. वारली चित्र संस्कृती,डॉ. गोविंद गारे,श्रीविद्या प्रकाशन,पुणे प्रथमावृत्ती जून २०००

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# शिक्षा और नवाचार डिजीटल युग में शिक्षा के बदलते आयाम

**डॉ. सुनंदा सूर्यभानू वाघमारे**
सहायक प्राध्यापक मॉडर्न कॉलेज
एज्युकेशन विटा
**Email:** Sunanda9552@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-170830
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 8(I)
Pp. 144-146
August 2025
**Submitted:** 14 July. 2025
**Revised:** 30 July. 2025
**Accepted:** 15 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**सारांश**

डिजिटल युग में शिक्षा पारंपारिक कक्षाओं से आगे बढ़कर ऑनलाइन प्लेटफॉर्म, इंटरैक्टिव सिमुलेशन और वर्चुअल कक्षाओं के माध्यम से अधिक सुलभ और लचीली हो गई है। डिजिटल इंडिया पहल के तहत डिजिटल आधारभूत ढांचे का निर्माण, सेवाओं का इलेक्ट्रॉनिक वितरण और डिजिटल साक्षरता पर जोर दिया गया है, हालांकि इंटरनेट सुविधा, डिजिटल विभाजन, अवसंरचना की कमी और लैंगिक अंतर जैसी चुनौतियाँ बनी हुई हैं। डिजिटल शिक्षा से ज्ञान तक व्यापक पहुँच, व्यक्तिगत शिक्षण, समय और स्थान की स्वतंत्रता, तथा सहयोग के नए अवसर मिले हैं। यह शिक्षा के लोकतंत्रीकरण में सहायक है, परंतु डिजिटल साक्षरता और समान अवसर सुनिश्चित करना आवश्यक है। यदि उचित दिशा और मार्गदर्शन मिले, तो डिजिटल शिक्षा गुणवत्तापूर्ण और सर्वसुलभ शिक्षा का प्रमुख माध्यम बन सकती है।

**मुख्यसंज्ञा:** डिजिटल शिक्षा, डिजिटल इंडिया, ऑनलाइन शिक्षा, डिजिटल साक्षरता, डिजिटल विभाजन, व्यक्तिगत शिक्षण, शिक्षा का लोकतंत्रीकरण, तकनीकी नवाचार, ऑनलाइन प्लेटफॉर्म, ई-गवर्नेंस.

**प्रस्तावना**

डिजिटल युग में शिक्षा के आयामों में व्यापक बदलाव आया है। अब शिक्षा केवल पारंपारिक कक्षाओं तक सीमित नहीं है, बल्कि यह ऑनलाइन प्लेटफॉर्म इंटरैक्टिव सिमुलेशन, और वर्चुअल कलासरूप के माध्यम से छात्रों के लिए सुलभ हो गई है। डिजिटल उपकरण छात्रों को स्व-निर्देक्षित और व्यक्तिगत शिक्षण अनुभव प्रदान करते हैं। जिससे सीखने की प्रक्रिया अधिक लचीली और गतिशील होती है।

"माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी के डिजिटल भारत के सपने को पूर्ण करने के लिए नवीन विचार एवं व्यावहारिक समाधान देना है।" डिजिटल इंडीया भारत सरकार की एक पहल है जिसके तहत सरकारी विभागों को देश की जनता से जोडना है। इसका उद्ध्येश्य यह सुनिश्चित करना है कि बिना कागज के इस्तेमाल से सरकारी सेवाएँ इलेक्ट्रॉनिक रूप से जनता तक पहुँच सकें। इस योजना का उद्ध्येश्य ग्रामीण इलाको को उच्च गति का इंरेनेट के माध्यम से जोड़ना भी है।

डिजीटल इंडिया के तीन मुख्य घटक हैं-

1- डिजिटल आधारभूत ढाँचे का निर्माण करना,

2- इलेक्ट्रॉनिक रूप से सेवाओं का जनता तक पहुंचाना,

3- डिजिटल साक्षरता

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.17116064
OPEN ACCESS

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. सुनंदा सूर्यभानू वाघमारे,सहायक प्राध्यापक मॉडर्न कॉलेज एज्युकेशन विटा.*

**How to cite this article:**
*वाघमारे, . सुनंदा . सूर्यभानू . (2025). शिक्षा और नवाचार डिजीटल युग में शिक्षा के बदलते आयाम. Journal of Research & Development, 17(8(I)), 144–146. https://doi.org/10.5281/zenodo.17116064*

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

डिजीटल इंडिया को कार्यान्वयित करने से पहले इन सभी कमियों को दूर करना चाहिए। डिजिटल भारत के प्रमुख 9 स्तम्भ -

1. ब्रॉडबैंड हाइवे
2. मोबाइल कनेक्टिविटी के लिए सार्वभौमिक पहुँच
3. पब्लिक इंटरनेट एक्सेस कार्यक्रम
4. ई-गवर्नंस - प्रौद्योगिकी के माध्यम से सकार में सुधार
5. ई-क्रांति - सेवाओं की इलेक्ट्रॉनिक डिलीवरी
6. सभी के लिए सूचना
7. इलेक्ट्रॉनिक्स विनिर्माण
8. नौकरियों के लिए आईटी
9. अली हर्विस्ट कार्यक्रम

**भारत में डिजिटलीकरण के समक्ष चुनौतियाँ**

1. राष्ट्रीय प्रतिदर्श सर्वेक्षण कार्यालय (National sample survey office, NSSO) द्वारा शिक्षा पर किये गए सर्वे में प्राप्त आँकड़ों के अनुसार, भारत में केवल 27 प्रतिशत परिवार ही ऐसे हैं जहाँ किसी एक सदस्य के पास इंटरनेट सुविधा उपलब है।

2. भारत में केवल 12.5 प्रतिशत छात्र ऐसे है जिनके पास इंटरनेट की सुविधा उपलब्ध है।

3. विगत कुछ वर्षों में कई निजी और सरकारी सेवाओं को डिजिटल रूप प्रदान किया गया है और जिनमें कुछ तो सिर्फ ऑनलाइन ही उपलब्ध है। जिसके कारण उन लोगों को असमानता का सामना करना पड़ता है जो डिजिटल निरक्षर है।

4. किसी व्यक्ति के पास मोबाइल फोन का होना डिजिटल होने का प्रमाण नहीं है। यहाँ तक कि यदि कोई व्यक्ति स्मार्टफोन का उपयोगकर्ता है, तो भी वह स्वयं को डिजिटल सेवी' 'नहीं कह सकता है। जब तक कि उसके पास इंटरनेट कनेक्टिविटी न हो और वह इंटरनेट पर प्रासंगिक और समय पर जानकारी प्राप्त करना न जानता हो।

5. विश्वसनीय सूचना, बुनियादी ढाँचे और डिजिटल साक्षरता की कमी में उत्पन्न होने वाला डिजिटल डिवाइड सामाजिक और आर्थिक पिछडेपन का एक बड़ा कारण है।

6. भारत में अधिकांश मोबाइल व इंटरनेट उपयोगकर्ता शहरी क्षेत्रों में निवास करते है, जबकि हम जानते है कि भारत की कुल आबादी का 67 प्रतिशत भाग ग्रामीण क्षेत्रों में निवास करता है।

7. भारत में लिंग अंतराल दुनिया में सबसे अधिक है। जब यह मोबाइल उपयोग के स्वामित्व में तब्दील हो जाता है, तो यह लिंग अंतराल और अधिक हो जाता है। भारत में लगभग 16 प्रतिशत महिलाएँ मोबाइल इंटरनेट से जुड़ी है। जो डिजिटलीकरण की दिशा में लैगिंग विभेद का रेखांकन करता है।

8. वर्ष 2016 के मध्य में जारी एक रिपोर्ट में सामने आया था कि भारत में डिजिटल साक्षारता की दर 10 प्रतिशत से भी कम है।

9. डिजिटलीकरण के प्रसार के समक्ष एक अन्य सबसे बड़ी चुनौती अवसंरचना की कमी भी है।

**बदलते आयाम । समाधान / सकारात्मक प्रभाव:-**

डिजिटल युग में, शिक्षा में एक परिवर्तनकारी बदलाव देखने को मिल रहा है क्यों कि तकनीक हमारे सीखने और सिखाने के तरीके में क्रांतिकारी बदलाव ला रही है। डिजीटल उपकरणों में तेजी से हो रही प्रगति के साथ शैक्षिक परिदृश्य अभूतपूर्व दर से विकसीत हो रहा है।

**ज्ञान तक पहुंच:-**

इंटरनेट और डिजिटल उपकरणों के माध्यम से, छात्र दुनिया भर के संसाधनों और सूचनाओं तक पहुंच प्राप्त कर सकते हैं, जो पहले दुर्गम थे।

**सीखने के तरीके में बदलाव:-**

पारंपारिक शिक्षण विधियों के साथ-साथ, डिजिटल शिक्षा छात्रों को इंटरैक्टिव सिमुलेशन वर्चुअल रियालिटी और ऑनलाइन पाठ्यक्रमों के माध्यम से सीखने के नए तरीके प्रदान करती है।

**समय और स्थान की स्वतंत्रता:-**

ऑनलाइन शिक्षा छात्रों को समय और स्थान की सीमाओं से परे अपनी गति और सुविधा के अनुसार सीखने की अनुमति देती है।

**व्यक्तिगत शिक्षण:-**

डिजिटल उपकरण छात्रों की व्यक्तिगत आवश्यकताओं के अनुरूप अनुकूलित शिक्षण अनुभव प्रदान करते हैं, जिससे प्रत्येक छात्र अपनी गति और शैली के सीख सकता है।

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**सहयोग और संचार:-**
डिजिटल प्लेटफॉर्म छात्रों को एक दूसरे के साथ और शिक्षकों के साथ संवाद करने और सहयोग करने के नए अवसर प्रदान करते हैं।
**शिक्षा का लोकतंत्रीकरण:-**
डिभीरत्न शिक्षा ने ज्ञान को अधिक सुलभ और लोकतांत्रिक बना दिया है। जिससे दूरदराज के क्षेत्रों और वंचित समुदायों के छात्रों को भी शिक्षा प्राप्त करने का अवसर मिल रहा है।
**सारांश:-**

डिजिटल युग में, ज्ञान की खोज अब पारंपारिक शैक्षणिक संस्थानों तक सीमित नहीं रह गई है। प्रोद्योगिक ने सीखने के संसाधनों को आसानी से सुलभ बना दिया है जिससे व्यक्तियों को आजीवन सीखने में संलग्न होने का अधिकार मिला है। ऑनलाइन पाठ्यक्रम, मुक्त शैक्षिक संसाधन और डिजिटल पुस्तकालय व्यक्तिगत और व्यवसायिक विकास के लिए जानकारी और अवसरों का खजाना प्रदान करते हैं। तेजी से विकसीत हो रही दुनिया में आजीवन सीखना जरूरी हो गया है, जहाँ व्यक्तियों को अपने करियर और निजी जीवन में सफल होने के लिए नए कौशल अपनाने और हासिल करने की जरूरत होती है। डिजिटल रूप में साक्षर रहते हुए अपने स्वास्थ्य का ध्यान रखना जरूरी है, क्योंकि कंप्यूटर और मोबाइल के बढ़ते उपयोग में आंखो, मस्तिष्क और त्वचा पर प्रतिकुल प्रभाव पड़ रहा है। उसके लिए अपनी सेहत का ठीक से खयाल रखना और डिजिटल दुनिया में वापस आना ही काफी नहीं है। डिजिटल युग में शिक्षा के बदलते आयामों ने सीखने की प्रक्रिया को अधिक सुलभ अधिक सुलभ व्यक्तिगत और गतिशील बना दिया है। हालांकि, डिजिटल विभाजन और डिजिटल साक्षरता जैसी चुनौतियों का समाधान करना भी आवश्यक है ताकि सबी छात्रों को समान अवसर मिल सकें। डिजिटल शिक्षा का भविष्य उज्ज्वल है, और यदि इसे उचित दिशा और मार्गदर्शन दिया जाए, तो यह सभी के लिए गुवत्तापूर्ण शिक्षा का एक महत्त्वपूर्ण माध्यम बन सकता है।
**संदर्भ ग्रंथ:-**

1. भूमंडलीकरण और हिंदी- कल्पना,
2. जनसंचार और मीडिया लेखन - डॉ. दत्तात्रय मुरूमकर
3. यूनेस्को (2020). "कोविड-19 के बाद की दुनिया में शिक्षा: सार्वजनिक कारवाई के लिए नौ विचार
4. संचार भाषा हिंदी - डॉ सुर्यप्रकाश दीक्षित
5. कोहेन. सी. जे., और काहने, जे (2011) सहभागी राजनीति : नया मीडिया और युवा राजनीतिक कार्रवाई । शिकागो, आईएल: युवा और सहभागी राजनीति पर मैकआर्थर नेटवर्क ।
6. https://newsnow24x7.com
7. https://zenodo.org

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

**Original Article**

# वैश्वीकरण, विविधता आणि सांस्कृतिक बदल: एक ऐतिहासिक अभ्यास

**राजेंद्र मारुती घार्गे**
सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग
दादासाहेब ज्योतीराम गोडसे आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेज वडूज
**Email-**ghargerajendra@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170831
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 8(I)
Pp. 147-152
August 2025

**Submitted:** 15 July. 2025
**Revised:** 31 July. 2025
**Accepted:** 16 Aug 2025
**Published:** 30 Aug. 2025

**सारांश**

या संशोधनप्रबंधात वैश्वीकरण, विविधता आणि सांस्कृतिक बदल या विषयांचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून सखोल अभ्यास करण्यात आला आहे. प्राचीन व्यापारमार्ग, धर्मप्रसार, युद्धे, स्थलांतर आणि साम्राज्यविस्तार यांमुळे विविध संस्कृतींचा परस्पर संपर्क वाढला. मौर्य, गुप्त, मुघल, रोमन व ऑटोमन साम्राज्यांतील बहुसांस्कृतिक धोरणांनी विविधतेला चालना दिली. औद्योगिक क्रांती, युरोपीय वसाहतवाद आणि आधुनिक तंत्रज्ञान क्रांतीमुळे जागतिकीकरणाचा वेग वाढला.ग्लोबल मीडिया, इंटरनेट व सोशल नेटवर्क्समुळे इंग्रजीसारख्या जागतिक भाषांचा प्रसार झाला, परंतु स्थानिक भाषा आणि परंपरांवर संकटही निर्माण झाले. पाश्चिमात्य जीवनशैली, फॅशन आणि उपभोग संस्कृती जगभर पसरली, तर दुसरीकडे योग, आयुर्वेद, भारतीय सण यांसारख्या स्थानिक परंपरांचा जागतिक स्तरावर गौरव झाला.जागतिकीकरणामुळे व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्री-सक्षमीकरण, मानवाधिकार यांसारख्या मूल्यांना चालना मिळाली, परंतु सांस्कृतिक अस्मितेवर दबावही वाढला. यासाठी 'स्वदेशी', 'वोकल फॉर लोकल' यांसारख्या चळवळींनी स्थानिक संस्कृती व उत्पादनांचे पुनरुत्थान घडवले. स्थलांतरामुळे 'हायब्रिड ओळख' असलेले समाज तयार झाले, ज्यात स्थानिक आणि जागतिक संस्कृतींचा संगम दिसतो.इतिहास दर्शवितो की वैश्वीकरण ही केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय परिवर्तनाची दीर्घकालीन प्रक्रिया आहे. भविष्यात 'ग्लोबल' दृष्टिकोनासोबत 'लोकल' संवेदनशीलता राखणे हेच सांस्कृतिक टिकाव आणि शाश्वत विकासाचे प्रमुख साधन ठरेल.

**मुख्यसंज्ञा-** वैश्वीकरण,सांस्कृतिक विविधता,सांस्कृतिक बदल,प्राचीन व्यापार मार्ग,धर्मप्रसार,मौर्य साम्राज्य,मुघल साम्राज्य,औद्योगिक क्रांती,युरोपीय वसाहतवाद,ग्लोबल मीडिया,स्थानिक भाषा संकट,पाश्चिमात्य जीवनशैली,योग व आयुर्वेद,स्त्री-सक्षमीकरण,सांस्कृतिक अस्मिता,स्वदेशी चळवळ,वोकल फॉर लोकल,स्थलांतर,हायब्रिड ओळख,ग्लोकल दृष्टिकोन.

**प्रस्तावना**

वैश्वीकरण हा शब्द सध्या अनेक क्षेत्रांमध्ये वापरला जातो, परंतु त्याचे मूळ आणि परिणाम समजून घेण्यासाठी इतिहासाचा मागोवा घेणे आवश्यक आहे.

प्राचीन काळात व्यापार, धर्मप्रसार आणि स्थलांतराद्वारे विविध संस्कृतींचा एकमेकांशी संपर्क झाला आणि ही

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*राजेंद्र मारुती घार्गे , सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग दादासाहेब ज्योतीराम गोडसे आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेज वडूज*

**How to cite this article:**
*घार्गे, . राजेंद्र . मारुती . (2025). वैश्वीकरण, विविधता आणि सांस्कृतिक बदल: एक ऐतिहासिक अभ्यास. Journal of Research & Development, 17(8(I)), 147–152. https://doi.org/10.5281/zenodo.17116082*

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI:10.5281/zenodo.17116082

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

प्रक्रिया आधुनिक काळात अधिक व्यापक आणि गतीशील झाली. वैश्वीकरणामुळे विविधतेचा प्रसार झाला, परंतु त्याचवेळी अनेक सांस्कृतिक बदल, संघर्ष आणि समायोजनाचे प्रसंगही निर्माण झाले [1]. या संशोधन प्रबंधात आपण वैश्वीकरणाच्या ऐतिहासिक प्रवासाचा मागोवा घेत विविधतेच्या संकल्पनेचा अभ्यास करू, आणि त्यातून उद्भवलेल्या सांस्कृतिक परिवर्तनांचा सखोल विचार करू. वैश्वीकरण, विविधता आणि सांस्कृतिक बदल हे विषय आजच्या काळातील सामाजिक आणि ऐतिहासिक चर्चेचे केंद्रबिंदू ठरले आहेत. गेल्या काही शतकांमध्ये जग अधिक जवळ आले असून, वेगवेगळ्या संस्कृतींमध्ये परस्पर संपर्क, देवाणघेवाण आणि समन्वयाची प्रक्रिया गतिमान झाली आहे. परंतु या प्रक्रियेचा इतिहास फार पुरातन आहे. प्राचीन व्यापार मार्ग, धर्मप्रसार, युद्धे, स्थलांतर आणि साम्राज्यविस्तार यांच्या माध्यमातून विविध समुदायांमध्ये संपर्क निर्माण झाला. त्यातून केवळ आर्थिकच नव्हे तर सांस्कृतिक आणि सामाजिक परिवर्तनही घडले.

आज जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे अनेक समाजांचे सांस्कृतिक स्वरूप झपाट्याने बदलत आहे. एकीकडे यामुळे जागतिक एकात्मतेला चालना मिळते आहे, तर दुसरीकडे स्थानिक सांस्कृतिक ओळखी व अस्मिता टिकवण्यासाठी संघर्षही वाढला आहे. त्यामुळे इतिहासाच्या प्रकाशात या घडामोडींचे सखोल विश्लेषण करणे अत्यंत आवश्यक आहे. हा संशोधनप्रबंध वैश्वीकरणाच्या ऐतिहासिक प्रवासाचा मागोवा घेत विविधतेच्या विविध पातळयांवरील प्रभावांचा आणि त्यातून उद्भवणाऱ्या सांस्कृतिक बदलांचा अभ्यास करतो.

**1. वैश्वीकरणाचा ऐतिहासिक प्रवास**

सिंधू नदी खोऱ्यातील नागरीकरणापासूनच भारताचा रोम, मेसोपोटेमिया व चीनशी व्यापार सुरु होता श्वीकरण ही संकल्पना जितकी आधुनिक वाटते, तितकीच ती प्राचीन जगतातही मूळ धरून आहे. आपल्याला ही प्रक्रिया नीट समजून घ्यायची असल्यास, इतिहासाचा मागोवा घेणे अपरिहार्य ठरते. वैश्वीकरणाची बीजे मानवाच्या स्थलांतरात, व्यापारात, आणि सामाजिक देवाणघेवाणीत आढळतात. प्राचीन काळात भौगोलिक अडथळे असूनही संस्कृतींचा परस्पर संपर्क होत राहिला. सिंधू नदी खोऱ्यात विकसित झालेली एक महान नागरी संस्कृती – सिंधू संस्कृती – ही जगातील सर्वात प्रगत आणि नियोजित नागरीकरणांपैकी एक मानली जाते. या संस्कृतीने केवळ स्थानिक विकासावर भर दिला नाही, तर आंतरसंस्कृती संबंध निर्माण केले. सिंधू संस्कृतीचा मेसोपोटेमिया, रोम व चीनशी व्यापार सुरु असल्याचे पुरावे आढळतात .या व्यापारातून केवळ धातू, मसाले, आणि वस्त्रे यांची देवाणघेवाण झाली नाही, तर सोबतच विविध सामाजिक रीतिरिवाज, विचारधारा, आणि धर्मांचे आदानप्रदानही झाले. हे आदानप्रदान अनेक मार्गांनी झाले — त्यात रेशीम मार्ग हा एक महत्त्वाचा मार्ग ठरतो. रेशीम मार्गाने चीनमधून रेशीम भारत, मध्य आशिया आणि युरोपात पोहोचली. [2] याशिवाय मसाल्याचा मार्ग, समुद्री मार्ग यामुळे दक्षिण भारतातील मसाले, सुती कापड आणि हस्तकलेची उत्पादने प्राचीन काळात दूरदेशात पोहचवली गेली. या संपर्कामुळे सांस्कृतिक समृद्धी झाली, आणि लोकांमध्ये परस्पर आकलन वाढले. धर्मप्रसाराच्या दृष्टीनेही हे मार्ग अत्यंत प्रभावी ठरले — बौद्ध धर्म चीनपर्यंत पोहचला. मग आले इस्लामचे युग — इस्लामच्या उदयाने नव्या संपर्क मार्गांचा उदय झाला. मध्य आशिया, अरब जगत, उत्तर आफ्रिका आणि भारत यांच्यात नव्याने संवाद सुरू झाला. इस्लामच्या माध्यमातून मध्यपूर्व आणि दक्षिण आशियात सांस्कृतिक विविधता निर्माण झाली. एक नवीन बहुसांस्कृतिक परिपाठ तयार झाला, ज्यात व्यापार, कलेचा आणि स्थापत्यकलेचा समावेश होता. १५व्या शतकानंतर युरोपीय साम्राज्यविस्ताराच्या प्रक्रियेस सुरुवात झाली. कोलंबसच्या अमेरिकेच्या शोधापासून वास्को-द-गामाच्या भारत आगमनापर्यंतचा प्रवास हा एक नवीन जागतिक व्यापारी जाळयाचा प्रारंभ ठरला. युरोपियन शक्तींनी आपापल्या वसाहतींच्या माध्यमातून व्यापार, धर्म आणि सत्ता यांचा प्रसार केला. भारतासारख्या देशांमध्ये ब्रिटीश, फ्रेंच आणि पोर्तुगीजांचे आगमन झाले. त्यांच्या वसाहती धोरणांमुळे स्थानिक परंपरा, कला, भाषा आणि शिक्षणपद्धतींवर परिणाम झाला [4]. ब्रिटीशांनी भारतात रेल्वे, पोस्ट व्यवस्था, इंग्रजी शिक्षणप्रणाली रुजवली. त्यातून देशाच्या अंतर्गत व्यापारी संपर्कात वाढ झाली, परंतु त्याचबरोबर संस्कृतीवरही गडद छाया पडली. वसाहती साम्राज्यांमुळे पश्चिमी मूल्यांचा प्रभाव वाढला, आणि भारतात इंग्रजी भाषेचे वर्चस्व निर्माण झाले. पण याच काळात भारतीय राष्ट्रीय चळवळीचा जन्म झाला — जिच्यातील अनेक नेतृत्वांनी पाश्चिमात्य शिक्षण घेतले होते. असे सांगता येईल की वसाहतवाद हे जागतिकीकरणाचे एक दुधारी शस्त्र ठरले. १८व्या व १९व्या शतकात युरोपमध्ये औद्योगिक क्रांतीचा उदय झाला. ही क्रांती जगातील उत्पादन, वाहतूक, आणि माहितीच्या पातळीवर आमूलाग्र बदल घडवणारी ठरली. युरोपातील राष्ट्रांनी आर्थिक आणि राजकीय वर्चस्व निर्माण करण्यासाठी साम्राज्यांचा विस्तार केला. त्यामुळे जागतिक व्यापाराचे प्रमाण वाढले, आणि एक जागतिक

आर्थिक प्रणाली उदयास आली[3].रेल्वेच्या माध्यमातून शहरांचा विस्तार झाला, आणि मालवाहतुकीस गती मिळाली.टेलिग्राफ व टेलिफोनने संदेशवहनात क्रांती घडवली. प्रिंट मिडियामुळे विचारविनिमय, राजकीय चळवळी आणि जनमत यांना चालना मिळाली. हा काळ 'संचार क्रांती'चा सुरुवात काळ ठरला — जो पुढे माहिती तंत्रज्ञानाच्या युगात विकसित झाला. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २०व्या शतकाच्या प्रारंभी जगात दोन मोठी जागतिक युद्धे झाली — ज्यांनी जगाची राजकीय आणि सामाजिक रचना बदलून टाकली. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक वसाहती राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळाले. परिणामी एक नवा जागतिक राजकीय संतुलन तयार झाला — आणि संयुक्त राष्ट्रांची स्थापना झाली. [4] संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेनंतर जागतिक सहकार्य, विकास आणि शांतता या मूल्यांना चालना मिळाली. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांनी व्यापार, आरोग्य, शिक्षण आणि मानवाधिकार यांसाठी सहकार्य केले. या जागतिक संस्थांनी विविध देशांना एकत्रित आणण्यासाठी नवे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. गॅट (GATT), WTO, IMF, World Bank यांसारख्या संस्था जागतिकीकरणाच्या गतिला चालना देणाऱ्या ठरल्या. या संपूर्ण प्रवासात, जागतिकीकरणाचा मुख्य उद्देश 'संपर्क' आणि 'एकत्रित प्रगती' हा राहिला. परंतु, यामध्ये वर्चस्व, असमतोल, आणि सांस्कृतिक ताणतणाव यांनाही सामोरे जावे लागले. वैश्विक व्यापार आणि तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले, परंतु सर्व समाजांना समान संधी मिळाल्या नाहीत. या साऱ्या प्रवासात स्थानिक संस्कृतींनी समायोजन करत स्वतःची ओळख जपण्याचा प्रयत्न केला. आजचा जागतिकीकरणाचा चेहरा हा प्राचीन व्यापार मार्गांपासून औद्योगिक क्रांती आणि माहिती क्रांतीपर्यंतचा प्रवास सांगतो. या प्रवासात अनेक संस्कृती परस्पर भिडल्या, बदलल्या, काही विलीन झाल्या, आणि काहींनी आपले अस्तित्व टिकवले. म्हणूनच, ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहता, वैश्वीकरण हे केवळ आर्थिक प्रक्रियेपुरते मर्यादित नाही, तर ते एक व्यापक सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिवर्तनाचे प्रवाह आहे — जो अद्यापही सुरू आहे. [5]

### 2. सांस्कृतिक विविधतेचे ऐतिहासिक स्वरूप

सांस्कृतिक विविधता ही मानव इतिहासातील मूलभूत आणि सतत अस्तित्वात असलेली वैशिष्ट्य आहे. जगातील अनेक प्राचीन व मध्ययुगीन साम्राज्यांनी या विविधतेचा स्वीकार केला आणि तिचा समावेश आपल्या प्रशासन आणि सामाजिक रचनेत केला. ही साम्राज्ये केवळ राजकीय सत्ता स्थापन करणारी नव्हती, तर वेगवेगळ्या भाषांतील, धर्मांतील, जातीजमातींतील लोकांना एकत्र ठेवून, त्यांच्यातील संवाद, देवाणघेवाण आणि समन्वय घडवणारी यंत्रणा होती. मौर्य साम्राज्य हे याचे प्रारंभिक उदाहरण आहे. सम्राट अशोकाने कलिंग युद्धानंतर अहिंसा, सहिष्णुता आणि बौद्ध धर्माच्या तत्त्वांचा स्वीकार करून त्याचा प्रसार भारताच्या सीमा ओलांडून श्रीलंका, म्यानमार, थायलंड, चीन आणि मध्य आशियापर्यंत केला. त्याच्या धर्मलेखांमध्ये धर्मनिरपेक्षतेची व सहिष्णुतेची स्पष्ट भूमिका आढळते, जी त्या काळच्या समाजाच्या अनेकस्तरीय संस्कृतींसाठी दिशा ठरली [6].

गुप्त साम्राज्यातही, जरी मुख्यतः वैदिक व ब्राह्मणवादी तत्वज्ञानाचा उत्कर्ष झाला, तरी बौद्ध व जैन धर्मालाही मान्यता मिळाली. नालंदा व तक्षशिला यांसारख्या विद्यापीठांमध्ये विविध देशांतील व धर्मांतील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळायचे, जे विविधतेच्या संकलनाचे प्रातिनिधिक स्वरूप होते. ह्याच प्रक्रियेला पुढे मुघल साम्राज्याने अधिक गती दिली. मुघल साम्राज्य हे बहुधा भारतीय उपखंडातील सर्वात प्रभावी व दीर्घकालीन बहुसांस्कृतिक साम्राज्य होते. बाबरपासून औरंगजेबापर्यंत मुघल सम्राटांनी आपापल्या धोरणांनुसार विविधतेचा स्वीकार, समायोजन किंवा विरोध केला. परंतु अकबरने यामध्ये नवा दृष्टिकोन दिला. 'सुलहे कुल' या तत्त्वाच्या आधारावर त्याने सर्व धर्म, जाती व परंपरांमध्ये समता आणि सहिष्णुता राखण्याचा प्रयत्न केला. त्याच्या राजदरबारात हिंदू, मुस्लिम, जैन, पारशी आणि ख्रिश्चन विचारवंतांना स्थान दिले गेले, जे त्याच्या प्रशासनाच्या बहुसांस्कृतिक तत्त्वज्ञानाचे निदर्शक होते [6]. याचप्रमाणे इतर जागतिक साम्राज्यांमध्येही सांस्कृतिक समावेशकतेची उदाहरणे दिसतात. रोमन साम्राज्य हे लॅटिन व ग्रीक संस्कृतीच्या प्रभावाखाली असले, तरी त्यांनी आपले साम्राज्य वाढवताना स्थानिक देवता, धार्मिक प्रथा आणि कला यांचा स्वीकार केला. त्यांनी स्थानिक संस्कृतींना पूर्णपणे नाहीसे करण्याऐवजी त्यांना सामील करून घेतले. ऑटोमन साम्राज्यानेही आपल्या विस्ताराच्या कालखंडात, मुख्यतः इस्लाम धर्मप्रणालीचा प्रचार केला असला, तरी विविध ख्रिश्चन संप्रदाय, यहूदी समुदाय, आणि इतर अल्पसंख्य गटांना कायदेशीर आणि सामाजिक अधिकार दिले. त्यामुळे त्यांच्या साम्राज्याचा सांस्कृतिक पट अधिक समृद्ध झाला होता. सांस्कृतिक विविधतेचा दुसरा मुख्य आधार धर्मप्रसाराच्या प्रक्रियेतूनही विकसित झाला. बौद्ध धर्म हा त्याच्या सुरुवातीच्या काळात भारतात उदयास आला आणि त्यानंतर तो चीन, कोरिया, जपान आणि आग्नेय आशियात विस्तारला. या प्रसारामुळे विविध भाषांमधील धार्मिक ग्रंथ तयार झाले, स्थानिक

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

देवतांची बौद्ध विचारसरणीत गुंफण करण्यात आली आणि एक प्रकारचा आंतर-सांस्कृतिक समन्वय तयार झाला. बौद्ध धर्माच्या अध्यात्मिक स्वरूपामुळे लोकशाही मूल्यांना चालना मिळाली आणि विविधतेच्या स्वीकाराला सामाजिक अधिष्ठान मिळाले [7].

इस्लाम धर्माचा प्रसारही याच प्रकारे आफ्रिका, मध्य आशिया, दक्षिण आशिया, आणि युरोपात झाला. कुराणाच्या भाषांतरांमुळे इस्लामने वेगवेगळ्या भाषांतील लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. सुन्नी, शिया, सूफी व इतर संप्रदायांद्वारे विविध समाजांमध्ये सामाजिक व धार्मिक समजुती रुजल्या. भारतातही सूफी परंपरा आणि भक्ति चळवळींमधून हिंदू-मुस्लिम समन्वयाची एक नवी दिशा तयार झाली. या प्रवाहांमुळे धर्म म्हणजे संघर्ष नव्हे, तर संवादाचे माध्यम असू शकते, ही कल्पना रूढ झाली. परंतु सांस्कृतिक विविधतेच्या या समृद्ध परंपरेला धक्का लागला तो युरोपीय वसाहतवादाच्या उदयाने. १५व्या शतकानंतर युरोपियन सत्तांनी व्यापाराच्या निमित्ताने जगभर साम्राज्य विस्तार सुरू केला. या वसाहती प्रक्रियेत अनेक पारंपरिक प्रथा, स्थानिक भाषा व शिक्षणपद्धती हळूहळू दुर्लक्षित होऊ लागल्या. भारतात इंग्रजांनी शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल घडवून आणले. इंग्रजी भाषेवर आधारित शिक्षणपद्धती लागू करण्यात आली, जिच्यामधून भारतात नवीन प्रकारचे सामाजिक विभाजन तयार झाले [8]. या

चबरोबर स्थानिक भाषांमधील शिक्षण संस्था, गुरुकुल, मठे यांची उपेक्षा झाली आणि एकपक्षीय शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्टिकोन निर्माण झाला. यामुळे पाश्चिमात्य मूल्यांचा प्रभाव वाढून स्थानिक परंपरांमध्ये कमकुवतपणा आला. अनेक भाषांमध्ये लुप्त होण्याचा धोका निर्माण झाला आणि सांस्कृतिक ओळखी धूसर होऊ लागल्या. पाश्चिमात्य कायदे आणि न्यायप्रणाली भारतात लागू झाली, ज्यामुळे पारंपरिक पंचायत, न्यायनिवाडा व स्थानिक सामाजिक संरचना हळूहळू नष्ट होऊ लागल्या. या प्रक्रियेचा परिणाम म्हणजे स्थानिक संस्कृतींना व धर्मपरंपरांना जपण्याची गरज आणि संघर्ष दोन्ही वाढले. काही ठिकाणी या विविधतेने समृद्धी दिली, तर काही ठिकाणी ताणतणावही निर्माण झाले. एकंदरीत पाहता, सांस्कृतिक विविधता ही इतिहासात स्थिर नव्हती, ती बदलती, प्रतिसाद देणारी आणि समायोजन करणारी प्रक्रिया होती. विविध साम्राज्यांमधून, धर्मांमधून, आणि वसाहती प्रभावांमधून ही विविधता सतत नव्याने घडत गेली. या प्रवाहांनी मानवतेच्या सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाला नवी दिशा दिली. [7]

### 3. सांस्कृतिक बदल व वैश्वीकरणानंतरचे परिणाम

गेल्या काही दशकांत जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे संपूर्ण जग एकमेकांच्या संपर्कात आले आहे. विशेषतः ग्लोबल मीडिया, इंटरनेट, आणि सोशल नेटवर्क्स यांमुळे माहितीचा, विचारांचा आणि सांस्कृतिक घटकांचा अतिशय जलद प्रसार होतो आहे. या प्रक्रियेचा प्रभाव केवळ आर्थिक किंवा राजकीय पातळीवर मर्यादित नसून सांस्कृतिक जीवनावरही खोलवर परिणाम करत आहे. आज इंग्रजी ही एक प्रमुख जागतिक संवादाची भाषा बनली आहे. अनेक देशांमध्ये इंग्रजीचा वापर केवळ शैक्षणिक किंवा व्यावसायिक पातळीपुरता मर्यादित न राहता, तो दैनंदिन संवाद, माध्यमं, आणि सांस्कृतिक अभिव्यक्तीचा भाग बनला आहे. याचा एक गंभीर परिणाम असा झाला की अनेक स्थानिक भाषा अस्तित्वाच्या संकटात सापडल्या आहेत. विविध प्रादेशिक भाषांमध्ये बोलणाऱ्या समुदायांचे प्रमाण घटत आहे, आणि त्या भाषांची पिढ्यान्-पिढ्यांची परंपरा, साहित्य व अभिव्यक्ती धोक्यात येत आहे. तथापि, या जागतिक संवादव्यवस्थेमुळे काही स्थानिक भाषांना नवे व्यासपीठही मिळाले आहे. उदाहरणार्थ, युट्यूब, ब्लॉगिंग प्लॅटफॉर्म्स, आणि सोशल मीडिया यांमुळे अनेक लोक आपल्या मातृभाषेतून विविध विषयांवर चर्चा करत आहेत. यामुळे भाषांचा नव्याने गौरव होत असून, लोक आपल्या भाषेचा अभिमानाने प्रचार करत आहेत [9].

याशिवाय, पाश्चिमात्य फॅशन, फास्ट फूड, जीवनशैलीचे ट्रेंड्स हे जगभरातील शहरांमध्ये सहजपणे आढळतात. मॅकडोनाल्ड, केएफसी, स्टारबक्ससारखी ब्रँड्स कोणत्याही शहरात सामान्य दृश्य झाले आहे. युवावर्ग आधुनिक कपड्यांची शैली, जीवनशैलीचे प्रकार, वागणूक आणि विचार हे सर्व गोष्टींमध्ये पाश्चिमात्य प्रभावाने प्रभावित झाला आहे. पण त्याच वेळी, स्थानिक परंपरा, सण, आणि धार्मिक कार्यक्रम हे देखील जागतिक पातळीवर मान्यता मिळवत आहेत – दिवाळी, होळी, गणेशोत्सव, आणि विशेषतः योगाचा जागतिक प्रसार हे याचे स्पष्ट उदाहरण आहे. योगदिन साजरा करणे, आयुर्वेदाचा प्रचार, आणि भारतीय सणांची विविध देशांमध्ये उत्सवमय साजरीकरण हे भारतीय संस्कृतीच्या जागतिक स्वीकाराचे द्योतक आहे. यामुळे स्थानिक संस्कृतींचा आत्मविश्वास वाढला असून, 'ग्लोकल' दृष्टिकोन म्हणजेच 'जागतिक दृष्टिकोनासोबत स्थानिक मूल्यांचा संगम' अधिक बळकट झाला आहे [10].

या बदलांबरोबरच सामाजिक मूल्यांमध्येही मोठे परिवर्तन झाले आहे. व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना अधिक बळावली असून, व्यक्तीच्या हक्कांबाबत जागरूकता वाढली आहे. स्त्री-सक्षमीकरणाच्या चळवळींना जागतिक पाठिंबा मिळाला आहे. महिलांना शिक्षण, रोजगार,

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

आणि नेतृत्वाच्या संधी मोठ्या प्रमाणात मिळू लागल्या आहेत. हे जागतिकीकरणाचे सकारात्मक फलित मानले जाते. लोकशाही मूल्यांचाही विस्तार झाला असून, मानवाधिकारांचे महत्त्व, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, लिंग समानता यासारख्या मूल्यांची चर्चा आता जागतिक व्यासपीठावर होते आहे. पण या सकारात्मक गोष्टींच्या जोडीला काही नकारात्मक परिणाम देखील झाले आहेत. अनेक परंपरागत समाजांमध्ये पाश्चिमात्य जीवनपद्धतींच्या प्रभावामुळे सांस्कृतिक अस्मितेवर संकट निर्माण झाले आहे [11].

**4. संघर्ष, समायोजन आणि सांस्कृतिक ओळख**

ग्लोबलायझेशन ही प्रक्रिया जितकी समावेशकतेचा विचार करते, तितकीच ती वर्चस्व, असमतोल आणि संघर्ष निर्माण करणारी सुद्धा ठरते. जागतिकीकरणाच्या वाढत्या लाटेमध्ये अनेक वेळा शक्तिशाली आणि प्रभावशाली संस्कृती कमकुवत आणि पारंपरिक संस्कृतींवर आपले वर्चस्व निर्माण करतात. या प्रक्रियेमध्ये सांस्कृतिक समावेश ऐवजी एकसंधता किंवा सांस्कृतिक एकरूपतेचा दबाव अधिक जाणवतो. आधुनिक जीवनशैली, आहारशैली, वस्त्रशैली, भाषाशैली आणि उपभोगाच्या सवयी या जागतिकीकरणामुळे अधिक प्रमाणात पश्चिमेकडून इतर भागांत पसरल्या आहेत. त्यामुळे स्थानिक परंपरा, चालीरीती आणि सांस्कृतिक संकेत यांच्यावर अपार दबाव निर्माण झाला आहे. 'मॅकडोनाल्डायझेशन' ही संज्ञा याच प्रक्रियेचे एक प्रतीक आहे, जिच्यामधून वैश्विक ब्रँड आणि सांस्कृतिक उत्पादन स्थानिक जीवनशैलीला पूर्णपणे व्यापून टाकतात आणि स्थानिकतेचा गळा दाबतात [12]. अशा स्थितीत स्थानिक संस्कृतींच्या अस्मितेला धोका निर्माण होतो, कारण स्थानिक आहार, पोशाख, भाषा आणि सण-समारंभ हळूहळू बाजूला पडतात आणि जागतिक मानकांनुसार जीवनशैली स्वीकारली जाते. या परिणामस्वरूप स्थानिक ओळखी पुसट होत जातात आणि सांस्कृतिक विवेक हरवू लागतो. अशा वातावरणात अनेक देश आणि समाज आपापल्या सांस्कृतिक अस्मितेला पुन्हा जिवंत करण्याच्या दिशेने प्रयत्न करू लागतात. हा प्रतिसाद मुख्यतः सांस्कृतिक अभिमानाच्या रूपात दिसून येतो. 'स्वदेशी' चळवळ, 'मेड इन इंडिया', 'वोकल फॉर लोकल', 'एक भारत श्रेष्ठ भारत' या मोहिमा स्थानिक संस्कृती, शिल्पकला, भाषा आणि परंपरांचा पुनरुत्थान करण्याच्या दृष्टीने सुरू झाल्या. ह्याद्वारे केवळ स्थानिक उत्पादनांनाच चालना मिळत नाही, तर स्थानिक ओळखी, परंपरा आणि सांस्कृतिक वारशालाही नवसंजीवनी मिळते. विशेषतः भारतात खादी, आयुर्वेद, योग, शास्त्रीय संगीत, लोककला, आणि स्थानिक सण-उत्सवांचा पुनर्विचार होऊन ते जागतिक व्यासपीठावर सन्मानाने मांडले गेले आहेत [13].

ह्या मोहिमांमधून लोकांना आपल्या संस्कृतीबाबत अभिमान वाटू लागला असून, जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर स्थानिकतेचा ठाम आवाज पुन्हा निर्माण झाला आहे. हा प्रवाह केवळ भारतातच नव्हे तर जपान, कोरिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका यांसारख्या विविध देशांमध्येही दिसून येतो. स्थानिक वस्त्रपरंपरा, खाद्यसंस्कृती आणि लोकधारणा यांना सन्मान मिळू लागल्यामुळे सांस्कृतिक विविधता केवळ जिवंत राहिली नाही, तर नव्याने फुलू लागली आहे. मात्र या प्रक्रियेत अजून एक महत्त्वाचा घटक आहे – स्थलांतर. जागतिकीकरणामुळे स्थलांतराचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले असून, अनेक देशांचे लोक वेगवेगळ्या भूप्रदेशांमध्ये राहू लागले आहेत. स्थलांतरित समुदाय हे त्यांच्या मूळ संस्कृतीसोबतच नवीन समाजात समायोजन करीत असतात. त्यामुळे त्यांच्या जीवनशैलीत एक नवाच प्रकारचा सांस्कृतिक समन्वय निर्माण होतो. ह्या प्रकारच्या ओळखीला 'हायब्रिड आयडेंटिटी' असे संबोधले जाते. उदाहरणार्थ, भारतीय वंशाचे अमेरिकन नागरिक – जे Indian Americans म्हणून ओळखले जातात – हे आपल्या दैनंदिन जीवनात दोन्ही संस्कृती जपत आहेत. एकीकडे ते अमेरिकेतील शिक्षणपद्धती, कामकाज पद्धती, भाषाशैली आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांना स्वीकारतात, तर दुसरीकडे ते घरात भारतीय भाषा बोलतात, दिवाळी आणि होळी साजरे करतात, पारंपरिक जेवण खातात आणि कुटुंबकेंद्रित मूल्ये जपतात [14].

**5. निष्कर्ष**

वैश्वीकरण, विविधता आणि सांस्कृतिक बदल यांचा ऐतिहासिक अभ्यास करताना असे स्पष्ट होते की ही प्रक्रिया केवळ आर्थिक देवाणघेवाणीपुरती मर्यादित नसून ती सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व वैचारिक स्तरावरही खोलवर परिणाम करणारी आहे. प्राचीन व्यापार मार्गांपासून ते आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रसारापर्यंत, मानवी समाजाने नेहमीच परस्पर संपर्क साधत नव्या संधी व आव्हानांचा सामना केला आहे. या प्रक्रियेमुळे विविध संस्कृती एकमेकांच्या संपर्कात आल्या, काही विलीन झाल्या, काहींनी समायोजन केले, तर काहींनी आपली ओळख जपण्यासाठी संघर्ष केला. इतिहास आपल्याला दाखवतो की बहुसांस्कृतिक सहअस्तित्व ही मानवी विकासाची एक महत्त्वाची गुरुकिल्ली आहे. मौर्य, मुघल, गुप्त व रोमन साम्राज्यांतील बहुसांस्कृतिकता, धर्मप्रसाराचे मार्ग, वसाहतवादाचे परिणाम

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

आणि आधुनिक तंत्रज्ञानातील संप्रेषण क्रांती या सर्वांनी जागतिकीकरणाला चालना दिली. यासोबतच स्थानिक संस्कृतींची टिकवणूक, अस्मितेचे संघर्ष, आणि नव्या 'हायब्रिड' ओळखी यांचीही निर्मिती झाली. आजच्या वेगवान जागतिकीकरणाच्या युगात, एकात्मतेच्या दिशेने वाटचाल करताना विविधतेचा सन्मान राखणे आणि सांस्कृतिक समावेश सुनिश्चित करणे आवश्यक आहे. जागतिक पातळीवरील सहकार्य ही गरज असली तरी स्थानिक संस्कृती, भाषा, परंपरा आणि मूल्यांचे जतन हा शाश्वत विकासाचा मूलभूत पाया असायला हवा. म्हणूनच भविष्यातील धोरणांमध्ये 'ग्लोबल' दृष्टीकोनासोबतच 'लोकल' संवेदनशीलताही तितकीच महत्त्वाची ठरेल.

**संदर्भ सूची**

1. डॉ. कुलकर्णी, आर. व्ही. (२०१६). वैश्वीकरण: एक ऐतिहासिक दृष्टीकोन. पुणे: प्रगती प्रकाशन.
2. गोखले, एस. एम. (२०१७). प्राचीन भारताचा इतिहास. मुंबई: महाराष्ट्र विद्या प्रतिष्ठान.
3. भंडारे, पी. के. (२०१९). रेशीम मार्ग आणि संस्कृती देवाणघेवाण. औरंगाबाद: इतिहास संशोधन मंडळ.
4. शिंदे, एल. जी. (२०२०). मध्ययुगीन भारतातील सामाजिक बदल. नागपूर: भारत इतिहास परिषद.
5. देसाई, एम. टी. (२०१८). औद्योगिक क्रांती आणि भारत. पुणे: यशोदा प्रकाशन.
6. जोशी, आर. एन. (२०१५). मुघल साम्राज्य आणि सांस्कृतिक धोरणे. दिल्ली: नॅशनल बुक ट्रस्ट.
7. राऊत, ए. ए. (२०१७). बौद्ध धर्माचा आंतरराष्ट्रीय प्रभाव. कोल्हापूर: प्रज्ञा प्रतिष्ठान.
8. कुलकर्णी, जी. एच. (२०१८). ब्रिटिश भारतातील शिक्षण. सातारा: लोकजागर प्रकाशन.
9. देशपांडे, वी. डी. (२०१६). ग्लोबल मीडिया आणि भाषा. मुंबई: मीडिया मंडळ.
10. नाईक, आर. एन. (२०१९). भारतीय सण आणि जागतिकीकरण. पुणे: साखर कामगार प्रकाशन.
11. सावंत, एस. जे. (२०१७). भारतीय सामाजिक मूल्यांतील परिवर्तन. नाशिक: समाजदर्शन प्रकाशन.
12. केळकर, पी. ए. (२०२०). मॅकडोनाल्डायझेशन आणि सांस्कृतिक संकट. मुंबई: तत्वज्ञान संमेलन.
13. पाटील, एन. डी. (२०१८). स्वदेशी आणि सांस्कृतिक पुनरुत्थान. कोल्हापूर: स्वराज प्रकाशन.
14. मोहिते, जी. के. (२०१७). भारतीय स्थलांतरित आणि सांस्कृतिक ओळख. औरंगाबाद: डायस्पोरा स्टडी सेंटर.

# Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-8(I)| August - 2025

Original Article

# वीरेन्द्र आस्तिक के नवगीतों में कलात्मक सौंदर्य

**विपिन चन्द्र पाण्डेय[1], डॉ. रीता पाण्डेय[2]**

[1]शोधार्थी, हिंदी विभाग, वी.एस.एस.डी. कालेज, कानपुर (उ.प्र)

[2]शोध–निदेशिका, हिंदी विभाग, वी.एस.एस.डी. कालेज, कानपुर (उ.प्र)

**Email –**vipinpandey30061990@gmail.com

**Manuscript ID:**

JRD -2025-170832

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 8(I)

Pp. 153-154

August 2025

**Submitted:** 15 July. 2025

**Revised:** 31 July. 2025

**Accepted:** 16 Aug 2025

**Published:** 30 Aug. 2025

**शोधसार**

हिंदी नवगीत परम्परा में वीरेन्द्र आस्तिक गीत– नवगीत के जाज्वल्यमान दीप –स्तम्भ है। शुभचिंतक गीतकार और विचारक है उनके नवगीता में विविध विषय समाहित है। वे जीवन के सभी पहलुओं खेत खलिहान, पर्वत–पठार, पर्यावरण, शोषण, उत्पीड़न, संयुक्त परिवारों का विघटन, भ्रष्टाचार जंगल–जमीन और आदिवासी, नारी–दलित आदि के साथ ही साथ विशेष महत्वपूर्ण स्थान दिया है। उनके गीतों में कलात्मक सौंदर्य बहुआयामी दृष्टि उद्घाटित होता है। अपने नवगीत में केवल जीवन का यथार्थवादी, संवेदनात्मक तथा कलात्मक पाठ को प्रस्तुत न कर के बल्कि भावनात्मक अनुभवन को भी प्रस्ततु किया गया है। उन्होंने नवगीत को 'कला के शिखर' तक पहुँचाने में प्रमुख भूमिका रही है। गीत– नवगीत संसार में कोमलता लयात्मकता और संगीतमयता की त्रिवेणी प्रवाहित होती रहती है सही मायने में तो उन्हे नवगीत परम्परा के आधुनिक भगीरथ कहा जा सकता है।

**बीजशब्द:** भाषा, बिंब, प्रतीक, लय शिल्प

**मूलआलेख:**

